११५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११४६८

REFBK-0009771

विशाखदत्तकृत

# मुद्राराक्षस

या नाटकाची सर्वांगपरिपूर्ण मराठी आवृत्ति


संपादक

डॉ. रा. शं. वाळिंबे,

एम्. ए., पीएच्. डी.


ग्रंथाचीं वैशिष्टयें—

(१) विस्तृत विवेचक प्रस्तावना.

(२) मूळ संस्कृत नाटक व सुरस मराठी अनुवाद.

(३) विस्तृत टीपा.

(४) उपयुक्त परि


REFBK-0009771


(५) सूची.

पृष्ठें डेमी ५३० : किंमत १० रुपये


मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळकरस्ता, पुणें २.

# कुटिलमति कौटिल्य

विशाखदत्तकृत 'मुद्राराक्षस' नाटकाचें
सांगोपांग विवेचन.

> कौटिल्यः कुटिलमतिः स एव येन
> क्रोधाग्नौ प्रसभमदाहि नन्दवंशः ।

क्र. ८०७५

लेखक

डॉ. रामचंद्र शंकर वाळिंबे,
एम्. ए., पीएच्. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

किंमत तीन रुपये

मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें २.

मुद्रक :
**प्र. भा. काळे,**
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ,
टिळकरस्ता, पुणें २.

प्रकाशक :
**दे. श्री. जोशी,**
**म. द. लोखंडे,**
मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळकरस्ता, पुणें २.

# प्रास्ताविक

विशाखदत्ताच्या ‘ मुद्राराक्षस ’ या विख्यात नाटकाच्या अभ्यासांतून निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची सांगोपांग व मूलग्राही चर्चा करणें हा प्रस्तुत प्रबंधाचा हेतु आहे.

विशाखदत्ताची वैयक्तिक माहिती व त्याचा काळ, चन्द्रगुप्त मौर्याच्या काळाची ऐतिहासिक माहिती, चाणक्य व चन्द्रगुप्त यांच्याविषयींच्या विविध आख्यायिका, इत्यादींचें विवेचन केल्यावर कौटिलीय ‘ अर्थशास्त्रा ’चें ‘मुद्राराक्षसां ’त विशाखदत्ताने जें ऋण घेतलें आहे त्याचें साधार विवेचन केलें आहे. यानंतर नाटकाची रचना, कथानक, आणि व्यक्तिलेखन इत्यादि दृष्टींनी विस्तृत विवेचक रसास्वाद दिला आहे.

कॉमनवेल्थ कॉलनी,
पुणें २.
१ सप्टेंबर, १९५८

रा. शं. वाळिंबे


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........................ वि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ......................

दा. क्र. ८५५९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दिः ................
नों: दिः ................

# कुटिलमति कौटिल्य

## १

### नाटकाचा कर्ता—विशाखदत्त

'मुद्राराक्षस' हें नाटक विशाखदत्ताने रचलेलें आहे. नाटकाच्या प्रस्तावनेंतील 'प्ररोचना' या भागांत त्याने आपल्या नांवाचा अगदी स्पष्टपणें उल्लेख केला आहे. कर्त्याच्या नांवाशिवाय त्याच्या पित्याच्या आणि पितामहाच्या नांवाचा उल्लेख प्रस्तावनेंत आहे. वटेश्वरदत्त या सामन्त किंवा मांडलिक राजाचा विशाखदत्त हा नातू, आणि महाराज अशी उपाधि धारण करणाऱ्या भास्करदत्ताचा तो पुत्र.[१] विशाखदत्ताविषयीं यापलीकडे कांहीहि माहिती या नाटकांतून मिळत नाही. आणि यामुळे त्याचा काळ निश्चित ठरविणें कांहीसें कठिण झालें आहे.

### विशाखदत्ताचा काळ

विशाखदत्ताचा काळ ठरवितांना मुद्राराक्षसांतील सातव्या अंकाच्या शेवटच्या श्लोकाची थोडीशी मदत होते. 'स श्रीमद्बन्धुभृत्यश्चिरमवतु महीं पार्थिवश्चन्द्रगुप्तः' अशी या श्लोकांतील शेवटची ओळ आहे. या पंक्तींत सम्राट् चन्द्रगुप्ताचा उल्लेख आहे हें उघडच आहे. या ओळींत आणखी कांही पाठभेद सुचविले गेले नसते तर कांहीच प्रश्न उद्‌भवला नसता. परंतु तीन निरनिराळे पाठभेद प्रचलित असल्यामुळे लेखकाचा काळ निश्चित करणें दुर्घट होऊन बसलें आहे. 'पार्थिवोऽवन्तिवर्मा,' 'पार्थिवो रन्तिवर्मा' आणि 'पार्थिवो दन्तिवर्मा' असे हे पाठभेद आहेत. या निरनिराळ्या पाठभेदांमुळे विशाखदत्त चार निरनिराळ्या राजांच्या आश्रयाला होता अशी कल्पना होण्याचा संभव आहे. परंतु असें असण्याची शक्यता नाही. तसेंच हे सर्व राजे नक्की कोण होते हें अद्यापि निश्चित ठरविण्यांत आलेलें नाही. निदान ते समकालीन नव्हते

---

१. आज्ञापितोऽस्मि परिषदा यथाद्य त्वया सामन्तवटेश्वरदत्तपौत्रस्य महाराजभास्करदत्तसूनोः कवेर्विशाखदत्तस्य कृतिरभिनवं मुद्राराक्षसं नाम नाटकम्......

एवढें आपण खात्रीपूर्वक म्हणूं शकतों. त्यांच्यामध्ये कितीतरी दशकांची तफावत आहे. तेव्हा या चौघांपैकींच कोणीतरी एक राजा विशाखदत्ताचा समकालीन आणि आश्रयदाता होता असें आपण मानलें पाहिजे.

'पार्थिवो रन्तिवर्मा' यांतील रन्तिवर्मा या नांवाचा कोठेंहि शोध लागत नाही, म्हणून तो पाठभेद संशयास्पद आहे. कदाचित् 'पार्थिवो दन्तिवर्मा' याबद्दल झालेली ती चूक असावी, असें प्रो. ध्रुव यांचें मत आहे.

मुद्राराक्षसाच्या अनेक प्राचीन आणि विश्वासार्ह हस्तलिखितांत 'पार्थिवो दन्तिवर्मा' असा उल्लेख सापडत असल्यामुळे तोच पाठभेद खरा आहे असें श्री. ए. रंगस्वामी अय्यंगार म्हणतात. हा दन्तिवर्मा नांवाचा राजा कोणता? इसवी सनाच्या आठव्या शतकांतील पहिल्या दोन दशकांत राज्यावर असलेला पल्लव सम्राट् दन्तिवर्मा तो हाच असें त्यांचें मत आहे.

परंतु 'दन्तिवर्मा' हा पाठ कितपत बरोबर आहे याविषयीं शंका घेण्यास बरींच कारणें आहेत. शेवटच्या अंकांतील शेवटच्या श्लोकांत लेखकाच्या आश्रयदात्याचा उल्लेख आहे, आणि म्लेच्छांच्या संकटांतून त्यानें पृथ्वीचें संरक्षण केलें असाहि त्यांत उल्लेख आहे. हे म्लेच्छ म्हणजे हूण किंवा दुसरे कोणी परकीय लोक असावे. आणि आठव्या शतकाच्या आरंभीं अगदी दूर दक्षिणेंतील पल्लव राजांना हूण किंवा इतर म्लेच्छांच्या आक्रमणाला तोंड द्यावें लागलें असें आपल्याला निश्चितपणें सिद्ध करतां येणार नाही. प्रो. ध्रुव यांनी आणखीहि एक शंका उपस्थित केली आहे. विष्णूच्या वराहावताराचा सातव्या अंकांतील शेवटच्या श्लोकांत विशिष्ट रीतीनें उल्लेख केला गेला आहे. परंतु पल्लव राजे विष्णूचे भक्त अथवा वैष्णव कधीच नव्हते. ते शैव होते. तसेंच दत्त हें नांव लावणारें एखादें घराणें या पल्लव राजांच्या पदरीं होतें असें सिद्ध करणारा पुरावाहि पुढे आला पाहिजे. आणि म्हणून 'दन्तिवर्मा' हा पाठ मान्य धरून आठव्या शतकाचीं पहिलीं पंचवीस वर्षें हा विशाखदत्ताचा काळ मानतां येणार नाही.

श्री. तेलंग यांच्याप्रमाणेंच प्रो. ध्रुव यांनाहि 'पार्थिवोऽवन्तिवर्मा' हा पाठ मान्य वाटत असावा असें दिसतें. त्यांच्या मतें अवन्तिवर्मा हाच विशाखदत्ताचा आश्रयदाता. पण या पाठाचा स्वीकार केला तर एक घोटाळा निर्माण होत आहे. एकाच नांवाचे दोन राजे भिन्न कालांत व भिन्न देशांत होऊन गेले असें यामुळे मानावें लागतें. काश्मीरचा अवन्तिवर्मा हा एक, आणि कनोजचा अवन्तिवर्मा हा दुसरा. कनोजचा राजा अवन्तिवर्मा हाच विशाखदत्ताचा

आश्रयदाता होता असें श्री. तेलंग मानतात असें दिसतें, आणि प्रो. ध्रुव यांचेंहि मत तेंच आहे.

हा अवन्तिवर्मा कनोजच्या मौखरी राजांच्या वंशांतील होता. इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या पहिल्या भागांत हूणांचे जबरदस्त हल्ले झाले, आणि ईशानवर्मा व शर्ववर्मा या मौखरी राजांनी त्यांना मोठ्या शौर्याने तोंड देऊन इ. स. ५४३ ते ५५२ च्या दरम्यान त्यांचा अनेक युद्धांत पराभव केला. या युद्धांत स्थानेश्वरचे ( स्थाण्वीश्वराचे ) राजे मौखरी राजांच्या पक्षाला मिळाले होते असें कांही पंडित मानतात. या दोन राजघराण्यांत विवाहसंबंधाहि घडून आला होता. कनोजच्या सुस्थितवर्म्याला स्थाण्वीश्वराच्या आदित्यवर्धनाची बहीण दिली होती. इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास केव्हा तरी ही घटना घडली.

परंतु स्थानेश्वरच्या राज्याला हूणांचा होत असलेला उपद्रव चालूच राहिला. या वेळीं स्थानेश्वर येथे प्रभाकरवर्धन हा राजा होता. विख्यात सम्राट् हर्ष हा याचाच मुलगा. कनोजचा राजा अवन्तिवर्मा हा प्रभाकरवर्धनाचा मावसभाऊ. हूणांशीं चाललेल्या सर्व घनघोर युद्धांच्या प्रसंगीं अवन्तिवर्म्याने प्रभाकरवर्धनाला शक्य तितकी मदतहि केली होती. प्रभाकरवर्धनाच्या काळा-विषयीं संशय नाही. त्याचा मुलगा, आणि प्रसिद्ध कवि बाणभट्ट याचा आश्रय-दाता सम्राट् हर्ष याने इ. स. ६०६ ते ६४८ पर्यंत राज्य केलें. सहाव्या शत-काचीं शेवटचीं २५ वर्षें हा प्रभाकरवर्धनाचा काळ होय असा याचा अर्थ आहे. आणि त्याचा समकालीन जो अवन्तिवर्मा तोहि याच काळांत होऊन गेला.

मुद्राराक्षसाच्या शेवटच्या श्लोकांत ज्याचा विशाखदत्ताने गौरव केला आहे, असें प्रो. ध्रुव आणि श्री. तेलंग यांचें मत आहे तोच हा कनोजचा अवन्तिवर्मा. तो इ. स. ६०० त दिवंगत झाला आणि त्याच्यानंतर त्याचा पुत्र ग्रहवर्मा हा राज्यावर आला. यानेच नंतर सम्राट् हर्षाची भगिनी राज्यश्री हिच्याशीं विवाह केला.

इ. स. ५४३ ते ६०६ च्या दरम्यान् हूणांशीं जीं युद्धें चाललीं होतीं त्यांचाच उल्लेख विशाखदत्ताने केला आहे, याविषयीं प्रो. ध्रुवांची पूर्ण खात्री आहे. स्थाण्वीश्वराचा प्रभाकरवर्धन, आणि कनोजचा अवन्तिवर्मा, या दोन भावांनी हूणांचें आक्रमण मोठ्या धैर्याने परतवून लावलें, आणि सरतेशेवटीं इ. स. ६०६ मध्ये त्यांनी हूणांची पूर्ण दाणादाण उडवून त्यांना हाकून लावलें. म्लेंछांवर मिळविलेल्या विजयाचा उल्लेख करताना विशाखदत्त वस्तुत: इ. स.

५८२ मध्ये पूर्ण झालेल्या हूणांवरील विजयाचाच उल्लेख करीत आहे, असें प्रो. ध्रुव यांचें प्रतिपादन आहे. आणि मुद्राराक्षसाच्या शेवटच्या श्लोकांत ज्याचा उल्लेख आला आहे तो राजा अवन्तिवर्मा म्हणजेच इ. स. ६०० मध्यें निधन पावलेला कनोजचा मौखरी सम्राट् अवन्तिवर्माच जर असेल, तर इ. स. सहाव्या शतकाचा उत्तरार्ध हाच विशाखदत्ताचा काळ मानला पाहिजे, असें प्रो. ध्रुव म्हणतात.

विशाखदत्ताचा काळ हाच होय हें सिद्ध करण्यासाठी प्रो. ध्रुवांनी आणखीहि एक प्रमाण मांडलें आहे. 'किरातार्जुनीय' या भारवीच्या महाकाव्यांतील दुसऱ्या सर्गाचा सत्तेचाळिसावा श्लोक पुढीलप्रमाणें आहे :—

उपजापसहान्विलङ्घयन्स विधाता नृपतीन्मदोद्धतः ।
सहते न जनोऽप्यधःक्रियां किमु लोकाधिकधामराजकम् ॥

आशय आणि अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनी किरातार्जुनीयांतील या श्लोकाच्या दुसऱ्या ओळीचें मुद्राराक्षसाच्या चौथ्या अंकांतील दहाव्या श्लोकाशीं आश्चर्यजनक साम्य आहे. तो श्लोक असा आहे:—

सद्यःक्रीडारसच्छेदं प्राकृतोऽपि न मर्षयेत् ।
किं नु लोकाधिकं तेजो बिभ्राणः पृथिवीपतिः ॥

या दोन श्लोकांतील संपूर्ण साम्याचा आधार घेऊन, भारवीनंतर विशाखदत्त होऊन गेला असावा, असें प्रो. ध्रुव मानतात. पांचव्या शतकाच्या अगदी शेवटीं भारवि होऊन गेला असावा, असें त्यांचें मत आहे. शिशुपालवधाचा कर्ता माघ याचा काळ सातव्या शतकाचा पूर्वार्ध असून त्याच्या पूर्वीं विशाखदत्त होऊन गेला असेंहि ते मानतात. सारांश, सहाव्या शतकाचा उत्तरार्ध हा प्रो. ध्रुवांच्या मतें विशाखदत्ताचा काळ आहे.

परंतु अवन्तिवर्मा या नांवाचा दुसराहि एक राजा होऊन गेला. तो काश्मीरचा राजा असून त्यानें इ. स. ८५५ ते ८८३ पर्यंत राज्य केलें. 'शूर' नांवाच्या अवन्तिवर्म्याच्या मंत्र्यासमोर २ डिसेंबर ८६० रोजीं मुद्राराक्षस नाटकाचा प्रयोग झाला, असें याकोबीचें म्हणणें आहे. विशाखदत्त नवव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला, असा याचा अर्थ आहे. आणि डॉ. ए. बी. कीथ यांचेंहि असेंच मत आहे. 'जरी प्रस्तुत नाटक नवव्या शतकाच्या पूर्वीं लिहिलें असण्याची शक्यता आहे, तरी नववें शतक हा त्याचा काळ मानण्यास तरी कांहीच प्रत्यवाय नाही' ('There is nothing that prevents

a date in the ninth century though the work may be earlier'), [२] असें डॉ. कीथ म्हणतात.

'पार्थिवश्चन्द्रगुप्तः' या पाठभेदाबद्दल मुद्राराक्षसाचा टीकाकार धुण्डिराज याचें म्हणणें निराळेंच आहे. त्याच्या मताप्रमाणें चाणक्याचा शिष्य, आणि या नाटकाचा नायक मौर्य सम्राट् चन्द्रगुप्त याचाच हा उल्लेख आहे. परंतु हें संभवनीय वाटत नाही. चन्द्रगुप्त मौर्याच्या मृत्यूनंतर कित्येक शतकांनी नाटक लिहिणारा लेखक त्याचें कल्याण व्हावें अशी इच्छा व्यक्त करणार नाही. तसेंच भरतवाक्यांत आपल्या आश्रयदात्यांची प्रशंसा करण्याचा नाटककारांचा प्रघात आहे. तेव्हा 'पार्थिवश्चन्द्रगुप्तः' हा पाठभेद जर बरोबर असेल, तर समकालीन असलेल्या किंवा अगदी जवळपास होऊन गेलेल्या कोणत्या तरी चन्द्रगुप्ताचाच विशाखदत्ताने उल्लेख केला असला पाहिजे असें मानण्यास हरकत नाही. इ. स. पूर्व चौथ्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत होऊन गेलेल्या चन्द्रगुप्त मौर्याचा हा उल्लेख नाही हें मात्र निश्चित आहे.

मग विशाखदत्ताने आपला आश्रयदाता म्हणून ज्याचा उल्लेख केला आहे, तो हा सम्राट् चन्द्रगुप्त कोण? विख्यात गुप्त घराण्यांतील द्वितीय चन्द्रगुप्त तोच हा चन्द्रगुप्त. या चन्द्रगुप्ताने इ. स. ३८० ते ४१३ पर्यंत राज्य केलें. इ. स. ३७५ मध्ये मरण पावलेल्या समुद्रगुप्ताचा तो पुत्र. कालिदास हा या द्वितीय चन्द्रगुप्ताचाच समकालीन होता असें अनेक विद्वानांचें मत आहे. याच चन्द्रगुप्ताचा विशाखदत्ताने उल्लेख केला आहे, आणि तो 'कालिदासाचा समकालीन परंतु त्याच्यापेक्षा वयाने लहान आहे' असें कोनो ( Konow ) या पंडिताचेंहि मत आहे.

'साहित्यांत आणि आख्यायिकांत विद्येचा आश्रयदाता म्हणून प्रसिद्ध असलेला आणि सिथियन् लोकांचा शत्रु (शकारि) व विक्रमादित्य म्हणून विख्यात असलेला' गुप्त घराण्यांतील जो द्वितीय चन्द्रगुप्त, त्याचाच उल्लेख मुद्राराक्षसाच्या भरतवाक्यांत विशाखदत्ताने केला आहे, असें श्री. पंडित यांचेंहि मत आहे. [३]

सम्राट् विक्रमादित्य हा 'शकारि' ( शक किंवा सिथियन लोकांचा शत्रु ) असल्याचें आख्यायिकांवरूनहि दिसतें. कालिदासाच्या कृति शकारातीच्या [४]

२. Sanskrit Drama, P. 204. मुद्राराक्षस नाटक शिशुपालवधानंतर लिहिलें गेलें हें डॉ. कीथचें मत विचारांत घेण्याजोगें आहे.

३. R. S. Pandit: Mudrārākṣasa, Appendix C, p. 171.

४. ख्यातिं कामपि कालिदासकृतयो नीताः शकारातिना।

कृपेमुळे प्रसिद्ध झाल्या असें अभिनन्द या अकराव्या शतकांतील कवीनें म्हटलें आहे. कालिदास हा द्वितीय चन्द्रगुप्ताचा समकालीन होता, आणि 'शकारि,' किंवा 'शकाराति' हें नामाभिधान दुसऱ्या चन्द्रगुप्ताच्या विक्रमादित्य किंवा स्कन्दगुप्त म्हणून विश्रुत असलेल्या नातवाला लावतां येणार नाही, तर तें खुद्द दुसऱ्या चन्द्रगुप्तालाच समर्पकपणें लावतां येईल. कारण त्यानेंच इ. स. ३९५ च्या आसपास काठेवाडच्या परकीय शक किंवा सिथियन् सत्रपांचा (क्षत्रपांचा) समूळ उच्छेद करून तो प्रदेश आपल्या राज्यांत सामील केला होता.

'देवीचन्द्रगुप्त' या नांवाच्या हस्तलिखित नाटकाचा कांही भाग अलीकडेच उपलब्ध झाला आहे. गुजरातमध्ये सापडलेल्या या नाटकाच्या एका हस्तलिखितांत तें विशाखदत्तानेंच लिहिलें असल्याचा उल्लेख आहे. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या चन्द्रगुप्ताच्या आयुष्यांतील सत्य घटनांवरच तें आधारलेलें आहे. चन्द्रगुप्त आणि पश्चिमेकडचे सिथियन् क्षत्रप यांच्यांत दीर्घ काळपर्यंत चाललेल्या युद्धाविषयींच्याच त्या घटना होत. सर्वांत शेवटच्या क्षत्रपाचा शत्रुपत्नीचा अनुनय करण्याच्या प्रयत्नातच वध झाला, तिच्या क्रोधाविष्ट पतीनें स्त्रीचा वेष घेऊन त्याचा वध केला, असा बाणभट्टानें आपल्या हर्षचरितांत उल्लेख केला आहे.[५] 'देवी-चन्द्रगुप्त' नाटकांत द्वितीय चन्द्रगुप्ताच्या आयुष्यांतील ज्या कांही घटनांचें चित्रण करण्यांत आलें आहे त्याच्या योगानें बाणाच्या या कांहीशा गूढ व मोघम विधानावर पूर्ण प्रकाश पडतो.

पित्याच्या मृत्यूनंतर द्वितीय चन्द्रगुप्ताला ताबडतोब राज्यलाभ झाला नाही, चन्द्रगुप्ताचा भाऊ रामगुप्त हाच राज्यावर आला, असें 'देवीचन्द्रगुप्त' या नाटकावरून दिसतें.[६] विशाखदत्ताच्या या नवीनच उपलब्ध झालेल्या नाटकाच्या हस्तलिखितांत द्वितीय चन्द्रगुप्ताच्या आयुष्यांतील ज्या घटना रंगविलेल्या आहेत, त्यांचें सविस्तर विवरण डॉ. एस्. के. अय्यंगार यांनी केलें आहे. रामगुप्ताच्या राणीचें नांव ध्रुवदेवी असें होतें. शक आणि रामगुप्त यांच्यांत झालेल्या एका युद्धांत रामगुप्ताचा पराभव झाला, आणि तो शत्रूच्या हातांत सापडला. ध्रुवदेवी या आपल्या पत्नीला शत्रूच्या स्वाधीन करून त्यानें आपली सुटका करून घेतली. अशा रीतीनें त्यानें गुप्त घराण्याच्या प्रतिष्ठेचा बळी दिला. परंतु त्याच्याबरोबर असलेल्या युवराज चन्द्रगुप्ताला या विचित्र प्रकारानें मोठाच अपमान झाल्यासारखें वाटलें, आणि शत्रूच्या छावणींतून त्यानें ध्रुवदेवीची अत्यंत रोमहर्षक पद्धतीनें सुटका घडवून आणली. या घटनेचें डॉ.

५. Dr. S. K. Aiyangar: Ancient India, P. 157.

६. Aiyangar: Ancient India, foot-note, P. 261.

अय्यंगार यांनी पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. त्यानें ( चन्द्रगुप्तानें ) स्वतः राणीचा वेष घेतला, राणीच्या दासींचा वेष घेतलेले कांही सैनिक बरोबर घेतले, आणि ज्या शहरांत तिला बंदींत ठेवलें होतें तेथे प्रवेश मिळवला. नंतर आपला वेष टाकून देऊन त्यांनी राणीची मुक्तता केली, आणि विजयी होऊन ते परतले.[७] ध्रुवदेवीची शत्रूच्या छावणींतून मुक्तता केल्यानंतर चन्द्रगुप्तानें स्वतःच तिच्याशीं विवाह केला आणि तो राज्यावर बसला.

ध्रुवदेवीशीं किंवा ध्रुवस्वामिनीशीं चन्द्रगुप्ताचा जो विवाह झाला त्याला इतिहासाचाहि सबळ पाठपुरावा आहे. शकांनी केलेलें त्या राणीचें अपहरण, तिची सुटका, आणि नंतर तिने आपल्या दिराशीं—चंद्रगुप्ताशीं—केलेला विवाह, याच घटनांवर विशाखदत्तानें 'देवीचन्द्रगुप्त' हें नाटक लिहिलेलें आहे.

ज्या पद्धतीनें चन्द्रगुप्ताच्या आयुष्यांतील सत्य घटनांचें सूक्ष्म वर्णन नाटककारानें केलें आहे, तिच्यावरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. ती म्हणजे हा नाटककार चन्द्रगुप्ताचा समकालीन असला पाहिजे, किंवा चन्द्रगुप्ताच्या अगदीं आसपास तरी होऊन गेला असला पाहिजे. "आतापर्यंत उपलब्ध झालेल्या नाटकाच्या भागावरून पाहतां राजा, राणी, आणि युवराज चन्द्रगुप्त या तीन प्रमुख पत्रांचें विशाखदत्तानें मोठें हुबेहुब चित्रण केलें आहे. राजाच्या दरबारीं जातीनें हजर असलेल्या आणि सर्व संबंधित व्यक्तींना पूर्णपणें जाणणाऱ्या माणसालाच असें चित्रण करतां येईल. किंवा नंतर राज्यपदावर अधिष्ठित झालेल्या युवराजाच्या आचरणाची स्तुति करणें, आणि जरूर तर त्यावर मुलामा चढविणें ज्याला आवश्यक वाटलें अशा लेखकालाच हें शक्य आहे. कांहीहि असलें तरी सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त याच्या समकालीन लेखकाचीच ही कृति असण्याचा संभव आहे,"[८] असें श्री. पंडित यांचें विवेचन आहे.

विशाखदत्त हा चन्द्रगुप्ताचा केवळ समकालीनच नव्हे, तर नातेवाईकहि होता, असेंहि श्री. पंडितांचें म्हणणें आहे. अर्थात् हा केवळ एक तर्क आहे, हेंहि ते मान्य करतात. दत्तदेवी या राणीपासून समुद्रगुप्ताला जो पुत्र झाला तोच चन्द्रगुप्त, या सत्य घटनेवर श्री. पंडितांचा तर्क आधारलेला आहे. त्यांच्या मतें 'दत्त' या शब्दानें 'दत्त'घराणें सूचित होतें. आणि दत्तदेवी हा बहुधा त्या राणीचा किताब असावा. विशाखदत्त हाहि याच दत्त घराण्यांतील होता. त्याच्या पित्याचें नांव भास्करदत्त असून त्याच्या पितामहाचें नांव वटेश्वरदत्त

७. कित्ता, पृष्ठ २६९

८. R. S. Pandit: Mudrārākṣasa, P. 172.

होतें. वटेश्वरदत्त हा केवळ एक सामंत होता, तर भास्करदत्ताला 'महाराज' ही पदवी मिळाली होती. केवळ एका पिढीच्या अंतराने घराण्याच्या प्रतिष्ठेंत हा जो बदल झाला तो दत्त आणि गुप्त या दोन घराण्यांतील विवाहसंबंधामुळेच झाला, असें श्री. पंडित सुचवितात. द्वितीय चन्द्रगुप्ताशीं विशाखदत्ताचा जो संबंध आला त्याचें असें स्वरूप आहे.

प्रो. शारदारंजन रे यांचेंहि असेंच मत आहे. भरतवाक्यांत विशाखदत्ताने ज्याचा उल्लेख केला आहे, तो सम्राट् चन्द्रगुप्त म्हणजे द्वितीय चन्द्रगुप्तच होय. अत्यंत पराक्रमी अशा त्या सम्राटाचें राज्य सर्व भारतांत पसरलें होतें, आणि हूणांचा व इतर म्लेच्छांचा उच्छेद करून पंजाबांत त्यांनी बळकावलेला सर्व प्रदेश त्यानेच परत हिरावून घेतला असें प्रो. रे म्हणतात. स्वाभाविकच इ. स. पांचवें शतक हा विशाखदत्ताचा काळ प्रो. रे यांनी मानला आहे. त्याचप्रमाणें मगधाचा सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त याच्या राज्यांत बंगालमध्ये कोठें तरी एका लहानशा प्रदेशावर विशाखदत्त राज्य करीत होता, असेंहि त्यांचें मत आहे. अशा रीतीने चन्द्रगुप्त मौर्याच्या कृत्यांची प्रशंसा करून अप्रत्यक्ष रीतीने आपला सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त याच्याच वैभवाचे विशाखदत्ताने गोडवे गायिले आहेत.

तात्पर्य, आपला कवि विशाखदत्त हा इ. स. चौथ्या शतकाच्या शेवटचीं पचवीस वर्षें आणि पांचव्या शतकाचीं पहिलीं पंचवीस वर्षें, या काळांत होऊन गेला असला पाहिजे असें सिद्ध होतें.

## मुद्राराक्षसाची ऐतिहासिक पार्श्वभूमि

मुद्राराक्षस हें एक ऐतिहासिक नाटक आहे. चाणक्य आणि चन्द्रगुप्त या प्रस्तुत नाटकांतील दोन प्रमुख व्यक्ति इतिहासाला चांगल्याच परिचित आहेत; आणि इ. स. पूर्व चौथ्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत मगधामध्ये प्रत्यक्ष घडलेल्या एका राज्यक्रांतीवर नाटकाचें कथानक आधारलेलें आहे.

इसवी सनापूर्वी कांही शतकें उत्तर भारतांत कोसल आणि मगध या दोन जवळजवळ असलेल्या राज्यांमध्ये सत्तेसाठी झगडा चाललेला होता. विशेषतः बिंबिसार आणि त्याचा पुत्र अजातशत्रु यांच्या कारकीर्दीत शिशुनाग घराण्यांतील राजांना मगधाच्या राज्याचा विस्तार करण्यांत यश आलें. या दोन राजांच्या काळांत राजगृहाभोवतीं तटबंदी उभारण्यांत आली आणि राजधानी वैशालीला नेण्यांत आली. अजातशत्रूनंतर गादीवर आलेल्या उदयनाने पाटलिपुत्र येथील किल्ल्याचें मगधाच्या सुप्रसिद्ध राजधानींत रूपान्तर केलें. परंतु या

शिशुनाग घराण्यांत अन्तर्गत बेबनाव होता. त्यामुळे, आणि शत्रूच्या आक्रमणां-मुळे, या घराण्याचा नाश झाला. शिशुनाग राजाचा पराभव झाला, आणि नन्द घराण्याच्या हातीं राजसत्ता आली. पाटलिपुत्र शहर नन्दांची राजधानी झालें. नन्द घराण्यालाहि फक्त दोन पिढ्यांपर्यंतच हें ऐश्वर्य टिकवतां आलें.

या नन्दांच्याविषयीं निश्चित अशी कोणतीच ऐतिहासिक माहिती उपलब्ध झालेली नाही. नन्द आणि शिशुनाग हे एकच होत असें एका परंपरे-वरून दिसतें. शेवटचा शिशुनाग राजा महानन्दी याने एका शूद्र स्त्रीशीं विवाह केला, आणि स्वाभाविकच तिच्यापासून झालेल्या संततीला समाजामध्ये क्षत्रियां-पेक्षा हीन दर्जा मिळाला. महानन्दीनंतर महापद्म नन्द हा राज्यावर आला. त्याला आठ पुत्र होते, अशी आख्यायिका आहे. महापद्म आणि त्याचे आठ पुत्र या सर्वांना मिळून 'नवनन्दा:' अशी संज्ञा मिळालेली आहे. कांही विद्वानांच्या मतें 'नवनन्दाः' या शब्दप्रयोगाचा संबंध या नऊ नन्दांशीं नसून नन्द घराण्याची जी शाखा मागाहून निर्माण झाली, तीच येथे अभिप्रेत आहे. 'जुन्या' नन्दांपासून निराळे असलेले ते हे 'नव' (नवे) नन्द होत. हे नन्द अविचारी आणि उद्दाम होते अशीहि आख्यायिका आहे.

मगधावर नन्दांचें राज्य असतांनाच भारताच्या पश्चिम सरहद्दीवर एक फार मोठें स्थित्यन्तर घडून आलें. अलेक्झँडर द ग्रेट याने इ. स. पूर्वी ३२६ मध्ये भारतावर आक्रमण केलें. काबूल नदीच्या तीरावरून कूच करीत त्यानें सिंधु नदीहि पार केली. तक्षशिलेच्या राजाचे जवळच्या पोरस या राजाशीं चांगले संबंध नसल्यामुळे त्याने अलेक्झँडरशीं तह केला. नंतर अलेक्झँडर पेशा-वरच्या मैदानांतून झेलम नदीपर्यंत आला. तेथे त्याची प्रबल पोरस राजाशीं गाठ पडली. मोठा संग्राम होऊन शेवटीं अलेक्झँडरने पोरसाचा पराभव केला. परंतु पोरसाच्या धैर्याचा आणि पराक्रमाचा अलेक्झँडरवर मोठाच प्रभाव पडला, आणि त्याने जिंकलेला प्रदेश पोरसला परत केला. नंतर पुढे मगधापर्यंत चाल करून जाण्याचा अलेक्झँडरचा विचार होता; परंतु त्याच्या सैन्यांत बंड झाल्यामुळे त्याचा नाइलाज झाला. त्याला परत जाणें भाग पडलें, आणि नंतर तो कधीहि पुन्हा भारतांत आला नाही. स्वदेशाला परत जात असतांनाच इ. स. पूर्व ३२३ मध्ये तो बॉबिलॉन येथे मृत्यु पावला.

पंजाबांत चालू असलेल्या या गोंधळाचा आणि पडामोडीचा पूर्णपणें उपयोग करून घेण्याचें मगधांतील दोन सामर्थ्यसंपन्न पुरुषांनी ठरवलें. ते पुरुष म्हणजे चन्द्रगुप्त मौर्य, आणि त्याचा गुरु व सहायक चाणक्य नांवाचा एक

ब्राह्मण (यालाच विष्णुगुप्त, किंवा कौटिल्य असेंहि म्हणत.) हे होत. या दोघांनी मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला, आणि आपल्या इच्छेप्रमाणें बदलत्या परिस्थितीला निराळें वळण लावलें. नन्दांनी चन्द्रगुप्त आणि चाणक्य या दोघांचाहि अपमान केला होता, आणि त्यांना राजधानींतून हद्दपारहि केलें होतें, असें इतिहासावरून दिसतें. तेव्हा नन्दांविषयीं त्यांच्या मनांत मोठा राग असला तर तें स्वाभाविकच आहे. असेंहि सांगतात की, ते दोघेहि वायव्य सरहद्दीवर असलेल्या तक्षशिलेला गेले होते, आणि अलेक्झँडरच्या ग्रीक सैन्याशीं त्यांची ओळख झाली होती. चन्द्रगुप्ताने स्वतः अलेक्झँडरची भेट घेतल्याचें नमूद आहे. ही गोष्ट खरी असेल तर त्या महान् सेनापतीचे गुण जवळून पाहण्याची चन्द्रगुप्ताला चांगलीच संधि मिळाली असली पाहिजे, आणि यामुळे अलेक्झँडरचें अनुकरण करण्याची महत्त्वाकांक्षा चन्द्रगुप्ताने बाळगली असली तर त्यांतहि कांही आश्चर्य वाटण्यासारखें नाही.

फार मोठ्या योजना आखून चन्द्रगुप्त आणि चाणक्य योग्य संधीची वाट पाहत होते. ही संधि त्यांना अलेक्झँडरच्या मृत्यूनंतर इ. स. पूर्व ३२३ मध्ये मिळाली. चन्द्रगुप्ताने चाणक्याच्या मदतीने आपलें सैन्य एकत्र केलें, इतर सामर्थ्यसंपन्न राजांचेंहि साहाय्य मिळवलें, आणि पाटलिपुत्र या मगधाच्या राजधानीवर त्याने चाल केली. इ. स. पूर्व ३२१ च्या सुमारास त्याने नंदांची दाणादाण उडवून पाटलिपुत्र शहर ताब्यांत घेतलें. याच वेळीं या पहिल्या मौर्य सम्राटाने राज्यारोहण केलें. प्राचीन भारताच्या इतिहासांतील अतिशय विश्वसनीय अशी ही पहिलीच तारीख आहे.

इ. स. पूर्व ३१० च्या आधीच पश्चिम सरहद्दीवरील सर्व प्रदेशावर चन्द्रगुप्ताने स्वामित्व मिळवलें. याच सुमारास पोरसचा वध झाला. इ. स पूर्व ३०५ च्या सुमारास सेल्युकस निकेटर ('विजयी वीर') याने भारतावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. परंतु चन्द्रगुप्ताच्या सैन्याने त्याचा पराभव केला, आणि त्याला अफगाणिस्तान चन्द्रगुप्ताच्या स्वाधीन करावें लागलें. नंतर सेल्युकस निकेटरच्या मुलीशीं चन्द्रगुप्ताने विवाह केला. या वेळीं चन्द्रगुप्ताचें साम्राज्य अफगाणिस्तानापासून बंगालच्या उपसागरापर्यंत, आणि हिमालयापासून विंध्यापर्यंत पसरलें होतें. दक्षिण भारत सोडलें तर चन्द्रगुप्ताचें साम्राज्य सर्व भारतावर पसरलें होतें असाच याचा अर्थ आहे. चन्द्रगुप्ताच्या या वैभवाचा बराचसा वाटा चाणक्य किंवा कौटिल्य या त्या काळच्या अत्यन्त प्रभावी मुत्सद्याकडे जातो यांत शंका नाही.[१]

---

१. Dr. S. K. Aiyangar: Ancient India, PP. 11–13.

## नन्द आणि चन्द्रगुप्त यांच्याविषयींची परंपरागत माहिती

चन्द्रगुप्त इ. स. पूर्वी ३२१ मध्यें राज्यावर आला. त्यापूर्वीची नंदांच्या विषयीं किंवा चन्द्रगुप्ताविषयीं जवळजवळ कांहीच माहिती इतिहासांतून आपल्याला मिळत नाही. परंतु नन्द, चन्द्रगुप्त, आणि कौटिल्य यांच्यासंबंधीं अनेक आख्यायिका आणि दन्तकथा उपलब्ध आहेत. कौटिल्यानेच चन्द्रगुप्ताच्या मदतीने नन्द घराण्याचा नि:पात केला ही सत्य घटना पुष्कळच परंपरागत आख्यायिकांमध्ये आढळते. विष्णुपुराणांतील एका उताऱ्यांत याचा उल्लेख आला आहे. 'महापद्मः। तत्पुत्राश्चैकं वर्षशतमवनीपतयो भविष्यन्ति नवैव। तान्नन्दान् कौटिल्यो ब्राह्मणः समुद्धरिष्यति। तेषामभावे मौर्याश्च पृथिवीं भोक्ष्यन्ति। कौटिल्य एव चन्द्रगुप्तं राज्येऽभिषेक्ष्यति।' या उताऱ्यावरून महापद्म नन्दाला नऊ पुत्र असून त्यांनी पृथ्वीवर शंभर वर्षें राज्य केलें, आणि चाणक्याने त्यांचें निर्मूलन करून चन्द्रगुप्ताला राज्यावर बसविलें असें दिसतें.

मोरिय या नांवाच्या डोंगरी प्रदेशांत राहणाऱ्या एका क्षत्रिय घराण्यांत चन्द्रगुप्ताचा जन्म झाला; एका युद्धांत त्याचा पिता निधन पावला; आणि त्याची विधवा आई पाटलिपुत्र येथील आपल्या नातेवाईकांच्या म्हणजे नंदांच्या आश्रयाला गेली; तेथेच चन्द्रगुप्ताचा जन्म झाला, असें बौद्धपरंपरा सांगते.

दुसरी एक परंपरा असें सांगतें की, चन्द्रगुप्ताला एका धनगराने लहानाचा मोठा केला, आणि धनगरांच्या सान्निध्यांतच त्याचें बालपण गेलें. नन्दाने चाणक्याचा अपमान केला होता, आणि त्यामुळे संतापून तो पाटलिपुत्र सोडण्याच्या विचारांत होता. चन्द्रगुप्त लहान असतांनाच चाणक्याला सहजगत्या दिसला, आणि त्याच्या ठायीं असलेलीं चक्रवर्ति राजाचीं चिन्हें ओळखून[१०] चाणक्याने त्याला तक्षशिला या आपल्या मूळ गांवीं नेलें, आणि तेथे त्याला लष्करी शिक्षणहि दिलें. चंद्रगुप्त जेव्हा युद्धनीतींत निष्णात झाला, तेव्हा चाणक्याने त्याची मदत घेऊन नंदांचा विनाश केला. मौर्य हा शब्द मयूर (मोर) यापासून निघाल्याचा कांही बौद्ध परंपरांत उल्लेख आहे, तर मोरिय-नगर या एका शहराच्या नांवाशीं, आणि मौर्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या व तें शहर वसविणाऱ्या लोकांशीं त्याचा संबंध आहे असें इतर परंपरांवरून दिसते.[११] याच संदर्भात विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी की,

---

१०. मुद्राराक्षस, अंक ७, श्लोक १२ यांत या घटनेचा उल्लेख आहे.

बाल एव हि लोकेऽस्मिन्संभावितमहोदयः
क्रमेणारूढवान् राज्यं यूथैश्वर्यमिव द्विपः ॥

११. R. S. Pandit : Mudrārākṣasa, P. 196.

मौर्यांनी दक्षिणेंत केलेल्या स्वारीचे तामीळ भाषेतील कांही ग्रंथांत उल्लेख आहेत, आणि मोरियर ( Moriyar ) असा मौर्यांचा तामीळ ग्रंथांत उल्लेख केलेला आहे.[१२]

पुराणांत उपलब्ध असलेल्या कथेचें स्वरूप पूर्णपणें निराळें आहे. चंद्रगुप्त हा हलक्या कुळांतील ( शूद्रा किंवा वृषलात्मजा ) मुरा या स्त्रीपासून नन्द राजाला झालेला मुलगा होता असें पुराणांवरून दिसतें. उलट, महापद्माचा पिता महानन्दी यानेच एका शूद्र स्त्रीशीं विवाह केला, आणि क्षत्रियांहून खालच्या दर्जाच्या एका घराण्याची स्थापना केली, असें इतर कांही परंपरांवरून दिसतें. 'नन्दान्तं क्षत्रियं कुलम्' या प्रसिद्ध उक्तीची यावरून आठवण होईल. मुद्राराक्षसाचा टीकाकार धुंडिराज याचें म्हणणें असें आहे की, सर्वार्थसिद्धि या नंद राजाच्या सुनंदा आणि मुरा या दोन स्त्रिया होत्या. चन्द्रगुप्त हा मुरेचा मुलगा. धुंडिराज असेंहि सांगतो की, सर्वार्थसिद्धीचें ऐश्वर्य फार मोठें होतें, आणि वक्रनास व इतर लोक हे त्याचे वंशपरंपरागत सचिव होते. या सर्व सचिवांमध्ये राक्षस हा ब्राह्मण श्रेष्ठ होता. धुंडिराजाच्या उपोद्घातांतील या विषयींचे श्लोक पुढीलप्रमाणें आहेत :—

नन्दान्तं क्षत्रियकुलमिति पौराणशासनात् ।
कल्यादौ नन्दनामानः केचिदासन्महीभुजः ॥ २३ ॥
सर्वार्थसिद्धिनामासीत् तेषु विख्यातपौरुषः ।
स चिरादाशिषत्पृथ्वीं नवकोटिशतेश्वरः ॥ २४ ॥
वक्रनासादयस्तस्य कुलामात्या द्विजातयः ।
बभूवुस्तेषु विख्यातो राक्षसो नाम भूसुरः ॥ २५ ॥
राज्ञः पत्नी सुनन्दासीज्ज्येष्ठान्या वृषलात्मजा ।
मुराख्या सा प्रिया भर्तुः शीललावण्यसंपदा ॥ २७ ॥
मुरा प्रासूत तनयं मौर्याख्यं गुणवत्तरम् ॥ ३१ ॥

परंतु स्वतः नन्द राजेच हलक्या कुळांतील होते असें पुराणांतील कांही उल्लेखांवरून दिसतें. आणि ग्रीक वाङ्मयांत या गोष्टीचें जें रूपांतर आढळतें त्याचेंहि पुराणांतील हकिकतीशीं साम्य आहे.

धुंडिराजानें दिलेल्या माहितीला 'मुद्राराक्षस—नाटककथे'चा[१३] कर्ता महादेव यानेंहि पुष्टि दिलेली आहे. मुरा ही स्त्री हलक्या कुळांत जन्मलेली होती

१२. Dr. S. K. Aiyangar : Ancient India, P. 36.

१३. Edited by Dr. V. Rāghavan (1946).

( सूतपुत्री ), असें महादेव म्हणतो. सुनन्दा या सर्वार्थसिद्धीच्या प्रथम पत्नीने नऊ पुत्रांना जन्म दिला, आणि मुरेला फक्त एकच मुलगा झाला. अशा रीतीने सर्वार्थसिद्धि, आणि त्याची हलक्या कुळांत जन्मलेली पत्नी मुरा, या दोघांचा मौर्य हा मुलगा, ही गोष्ट धुंडिराज आणि महादेव या दोघांनाहि मान्य आहे.

चन्द्रगुप्त हा या मौर्याचा मुलगा होता, असें धुंडिराज आणि महादेव हे दोघेहि म्हणतात. धुंडिराजाच्या उपोद्घातांतील पुढील श्लोकांवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

> तेषु राज्यं समासज्य तत्सेनान्यं महामतिम् ।
> विधाय मौर्यं राजासौ वृद्धः शमरतोऽभवत् ।। ३४ ।।
> चन्द्रगुप्तोत्तमास्तस्य मौर्यस्यासञ्शतं सुताः ।

याचा अर्थ असा की, मौर्याला शंभर पुत्र असून चन्द्रगुप्त हा त्यांच्यापैकीच एक होता. महादेवहि अगदी हेंच सांगतो. 'अनन्तरं मुरापुत्रस्य (म्हणजेच 'मौर्यस्य') शतं पुत्राः पितृतुल्या अजायन्त । तेषु शततमश्चन्द्रगुप्तो नाम अतीव बुद्धिमान् दण्डनीतौ परिनिष्ठितः । तैः पुत्रैः पित्रा मौर्येण च गुणवत्तया सर्वोऽपि जनः वशीकृतः ।' म्हणजे मौर्य हा पिता असून चन्द्रगुप्त हा त्याचा पुत्र होता, आणि मुरा ही चन्द्रगुप्ताची आई नसून आजी होती. चन्द्रगुप्त हा मौर्याचा मुलगा होता या गोष्टीला मुद्राराक्षसांतील एका श्लोकानेच पुष्टि दिली आहे. दुसऱ्या अंकांतील सहावा श्लोक असा आहे :—

> आनन्दहेतुमपि देवमपास्य नन्दं सक्तासि किं कथय वैरिणि **मौर्यपुत्रे** ।

या ठिकाणीं 'मौर्याचा मुलगा' असाच चन्द्रगुप्ताचा स्पष्टपणें उल्लेख केलेला आहे.

परंतु 'मौर्यपुत्र' असा या नाटकांत चन्द्रगुप्ताचा उल्लेख आल्याचें हें एकच उदाहरण आहे. इतर सर्व प्रसंगीं त्याचा 'मौर्य' असाच उल्लेख झालेला आहे. या नाटकांतील नंतरचाच श्लोक असा आहे :—

> पृथिव्यां किं दग्धाः प्रथितकुलजा भूमिपतयः ।
> पतिं पापे **मौर्यं** यदसि कुलहीनं वृतवती ।

चन्द्रगुप्ताविषयीं कोणत्याहि आख्यायिका प्रचलित असल्या, तरी त्याने सामर्थ्यसंपन्न अशा चाणक्याचें मार्गदर्शन स्वीकारून नन्दांचा उच्छेद केला हें मात्र निश्चित आहे.

## चाणक्याविषयींच्या आख्यायिका

कौटिल्य अथवा चाणक्य यांच्या नांवाशीं अनेक आख्यायिका निगडित झालेल्या आहेत. तो मोठा विद्वान् आणि स्वभावानें अत्यंत रागीट होता. एक आख्यायिका अशी आहे— एकदा नंदांच्या राजवाड्यांत मोठी मेजवानी होती. अतिशय प्रख्यात आणि विद्वान् अशा ब्राह्मणांसाठी राखून ठेवलेल्या मानाच्या जागेवर चाणक्य जाऊन बसला. नंदांना हें रुचलें नाहीं, आणि हा उद्धटपणा आहे असें वाटून त्यांनीं तत्क्षणीं 'चाणक्याला हाकलून द्या' अशी नोकरांना आज्ञा दिली. चाणक्यालाहि आपला फार मोठा अपमान झाल्यासारखें वाटून त्यानें सर्वांच्या समक्ष आपली शेंडी मोकळी सोडली, आणि नन्दांचा समूळ विनाश करण्याची घोर प्रतिज्ञा केली.

महादेवानें आणि धुंडिराजानें आपल्या उपोद्घातांत दिलेली हकीकत याहून थोडी निराळी आहे. भोजनगृहाची व्यवस्था ठेवण्याचें काम चन्द्रगुप्तावर सोंपवलेलें होतें. एकदा तो विद्वान् ब्राह्मणाची मार्गप्रतीक्षा करीत असतांना हरळी उपटण्यांत गर्क असलेला एक ब्राह्मण त्याला सहजगत्या दिसला. एक लहानसें कुसळ त्या ब्राह्मणाच्या पायांत घुसलें होतें. म्हणून चिडून तो सारें गवतच उपटून टाकण्याच्या बेतांत होता. त्या ब्राह्मणाच्या भयंकर तापटपणाचें हें प्रत्यंतर चंद्रगुप्ताला मिळालें, आणि नन्दांचा नाश करण्याच्या कामीं त्याचा उपयोग होईल असा विचार करून तो अत्यंत नम्रतेने चाणक्याजवळ गेला. आपण गवत कां उपटत होतों याचें कारण चाणक्यानें चंद्रगुप्ताला सांगितलें, आणि भुकेनें व्याकुळ झाल्यामुळे 'भोजनगृहाची व्यवस्था चन्द्रगुप्ताकडे आहे, तेव्हा मला त्याच्याकडे घेऊन चल' अशी चाणक्यानें त्याला विनंती केली. चन्द्रगुप्तानें त्याला आपलें नांव सांगितलें, आणि भोजनगृहांत येण्याची त्याला विनंती केली. आंत गेल्यावर चाणक्याला दहा सोन्याचीं आणि शंभर चांदीचीं ताटें दिसलीं. त्या सोन्याच्या दहा ताटांपैकीं नऊ ताटें राजकुमारांसाठी राखून ठेवलेलीं आहेत असें चौकशी केल्यावर चाणक्याला कळलें. उरलेलें दहावें ताट सर्व शास्त्र जाणणाऱ्या विद्वान् ब्राह्मणासाठी राखून ठेवलेलें होतें, आणि इतर ब्राह्मणांसाठी चांदीचीं ताटें ठेवलेलीं होतीं. विद्वान् ब्राह्मणासाठी ठेवलेल्या त्या सोन्याच्या ताटावरच चाणक्य जाऊन बसला. तो खरोखर कोण आहे, हें त्या राजकुमारांना मुळीच माहीत नव्हतें. यामुळे त्या अग्रासनावरून त्याला तत्क्षणीं हुसकून लावण्याची त्यांनी नोकरांना आज्ञा केली. यावर भयंकर संतापून वर सांगितल्याप्रमाणें चाणक्यानें ती घोर प्रतिज्ञा केली, आणि लगेच तो चन्द्रगुप्ताच्या घरीं गेला. तेथें 'मी नन्दांचा समूळ उच्छेद करून त्यांचें

राज्य तुला मिळवून देईन ' असें त्याने चन्द्रगुप्ताला वचन दिलें, आणि अशा रीतीने त्यांच्यांत मैत्रीचा करार झाला.[१४]

## चाणक्याविषयींची ऐतिहासिक माहिती

आख्यायिका आणि दंतकथा सोडल्या तर चाणक्याविषयीं फार थोडी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे. परंतु कांही घटनांतील सत्य संशयातीत आहे. त्यानेच आपल्या मुत्सद्दीगिरीने आणि दूरदृष्टीने नन्दाचा विनाश घडवून आणला आणि मगधाच्या गादीवर चन्द्रगुप्ताची स्थापना केली. ' अर्थशास्त्र ' या नांवाच्या राजनीतीवरील प्रख्यात ग्रंथाचा तोच कर्ता होय. ' कामन्दकीय नीतिसार ' या आपल्या प्रसिद्ध राजनीतिविषयक ग्रंथाच्या प्रस्तावनेंत पुढील श्लोकांमध्ये कामन्दकाने चाणक्याच्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेची प्रशंसा केली आहे.

---

१४. धुण्डिराजाच्या उपोद्घातांतील पुढील श्लोकांवरून या घटनेची पूर्ण कल्पना येईल.

अन्नसत्राधिकारे तैर्नियुक्तः कालपर्ययम् ।
प्रतीक्षमाणस्तत्रास्थात्स नन्दापचिकीर्षया ।। ४४ ।।
स कदाचिद् द्विजं कंचिदद्राक्षीदतिकोपनम् ।
पादलग्नकुशोन्मूलदाहे कृतमहोद्यमम् ।। ४५ ।।
मत्वातिक्रोधनं मौर्यस्तं नन्दोन्मूलनक्षमम् ।
उपेत्य शरणं स्वेष्टसिद्धये समुपाचरत् ।। ४६ ।।
विष्णुगुप्ताभिधानः स बाल एव द्विजोत्तमः ।
औशनस्यां दण्डनीत्यां ज्योतिःशास्त्रे च पारगः ।। ४७ ।।
नीतिशास्त्रप्रणेता यश्चणकस्तस्य नन्दनः ।
चाणक्य इति विख्यातः श्रोत्रियः सर्वधर्मवित् ।। ४८ ।।
गुणाढ्ये चन्द्रगुप्तेऽस्य पक्षपातो महानभूत् ।
स च नन्दकृतं तस्मै व्यसनं स न्यवेदयत् ।। ४९ ।।
नन्दराज्यं सदा तस्मै प्रतिश्रुत्य बुभुक्षितः ।
भुक्तिशालां स नन्दानां प्रविश्याग्रासने स्थितः ।। ५० ।।
नन्दाः क्रुद्धा महात्मानं कालोपहतचेतसः ।
बटुरित्यवमत्यैनमासनादुदतिष्ठिपन् ।। ५१ ।।
धिग्धिग्मामैवमित्येवं वादिष्वखिलमन्त्रिषु ।
अग्रासनात्ते चाणक्यं क्रोधाकुलमचीक्रुषन् ।। ५२ ।।
मध्येशाले स रोषान्धः शिखामुन्मुच्य पाणिना ।
प्रतिज्ञामकरोत्तीव्रां नन्दवंशदिधक्षया ।। ५३ ।।

यस्याभिचारवज्रेण वज्रज्वलनतेजसः ।
पपात मूलतः श्रीमान्सुपर्वा नन्दपर्वतः ॥ ४ ॥
एकाकी मन्त्रशक्त्या यः शक्त्या शक्तिधरोपमः ।
आजहार नृपचन्द्राय चन्द्रगुप्ताय मेदिनीम् ॥ ५ ।
नीतिशास्त्रामृतं धीमानर्थशास्त्रमहोदधेः ।
समुद्दध्रे नमस्तस्मै विष्णुगुप्ताय वेधसे ॥ ६ ॥
दर्शनात्तस्य सुदृशो विद्यानां पारदृश्वनः ।
यत्किञ्चिदुपदेक्ष्यामो राजविद्याविदां मतम् ॥ ७ ॥

'अर्थशास्त्रा'च्या शेवटच्या श्लोकांत चाणक्याने आपल्या कर्तृत्वाची पुढीलप्रमाणें स्तुति केली आहे—

येन शास्त्रं च शस्त्रं च नन्दराजगता च भूः ।
अमर्षेणोद्धृतान्याशु तेन शास्त्रमिदं कृतम् ॥ [१५]

'दशकुमारचरितां'त 'आचार्य विष्णुगुप्त' असा दण्डीने चाणक्याचा उल्लेख केला आहे, आणि मौर्यांसाठीच त्याने आपला राजनीतिविषयक ग्रंथ रचला, असेंहि म्हटलें आहे.

इ. स. पूर्वी ३२१ ते ३०० च्या दरम्यान केव्हा तरी कौटिल्याने आपलें 'अर्थशास्त्र' लिहिलें असावें असें दिसतें.

## मुद्राराक्षसांतील ऐतिहासिक सत्य आणि कल्पित भाग

विशाखदत्ताने स्वतःच लिहिलेल्या आणि हस्तलिखित स्वरूपांत अलीकडेच उपलब्ध झालेल्या 'देवीचन्द्रगुप्त' नाटकाचा अपवाद सोडला, तर ज्ञात इतिहासांतील राजकीय विषयावर आधारलेलें संस्कृत वाङ्मयांत मुद्राराक्षसाखेरीज दुसरें नाटक नाही. चाणक्याच्या मदतीने चन्द्रगुप्ताने नंद घराण्याचा केलेला नाश, आणि इ. स. पूर्वी ३२१ मध्ये पाटलिपुत्र येथील नंदांच्या गादीवर चन्द्रगुप्ताचें आरोहण, या नाटकाच्या आरंभीं उल्लेखिलेल्या घटनांतील सत्य संशयातीत आहे. निदान चन्द्रगुप्त आणि चाणक्य हीं प्रस्तुत नाटकांतील दोन प्रमुख पात्रें तरी इतिहासाला चांगलींच परिचित आहेत. तितक्याच

१५. "This śastra has been made by him who from intolerance (of misrule) quickly rescued the scriptures and the science of weapons and the earth which had passed to the Nanda king."
(श्यामशास्त्री यांनी केलेलें भाषांतर.)

महत्त्वाच्या राक्षस या पात्राचा मात्र इतिहासांत उल्लेख नाहीं. परंतु तो नंद राजांचा मंत्री होता, आणि जेव्हां नंद घराण्याचा नाश करण्यांत आला तेव्हा आपल्या स्वामीच्या नाशास कारणीभूत असलेल्या शत्रूला त्रास देण्यासाठी त्याने भगीरथ प्रयत्न केले, असें आख्यायिकांवरून दिसतें. अर्थात् इतिहासाने या बाबतींत पूर्ण मौनच स्वीकारलें आहे.

परंतु नाटककार विशाखदत्ताने त्याला ज्ञात असलेल्या इतिहासांतून कांही भाग घेतला आहे, आणि अनेक पिढ्यांच्या द्वारें त्याच्यापर्यंत चालत आलेल्या परंपरांचें आणि आख्यायिकांचें मोठें कलापूर्ण मिश्रण त्याने त्या इतिहासांत घडवून आणलें आहे. त्याला आणि त्याच्या पूर्वीच्या पिढ्यांना नंद घराण्याच्या निःपाताचा इतिहास चांगलाच परिचित होता. आणि या प्रचंड क्रांतीमागे असलेल्या चाणक्याचें किंवा कौटिल्याचें प्रभावी व्यक्तित्वहि शेकडो वर्षें घरोघरीं सर्वांना माहीत होतें. मगधांत घडलेल्या या महान् क्रांतीची, आणि सम्राट चन्द्रगुप्ताच्या स्वाऱ्या आणि त्याची शौर्याचीं कृत्यें यांची नोंद करण्यापलीकडे इतिहासाने कांहीहि केलेलें नाही. या क्रांतीनंतर तिचा सूत्रधार चाणक्य जवनिकेंत अंतर्धान पावला असें दिसतें. क्रांतीनंतर त्याच्या उद्योगाविषयीं इतिहासाने मोठें आश्चर्यजनक मौन स्वीकारले आहे. ज्या मेगॅस्थेनिसने इतर कित्येक मोठ्या व्यक्तींचा नांवें घेऊन उल्लेख केला आहे, त्याने चाणक्याचें नांवहि उच्चारलेलें नाही. परंतु इतिहासाने चाणक्याची उपेक्षा केली असली, तरी 'राजनीतिशास्त्राचा विख्यात प्रणेता' असा पतंजलि, कामन्दक, आर्यसूर, दण्डी, बाण या थोर लेखकांनी त्याचा गौरव केला आहे. इतकेंच नव्हे तर त्याच्या नंतरच्या शास्त्रीय आणि ललित वाङ्मयांत त्याच्या अर्थशास्त्रांतून उद्धृत केलेले असंख्य उतारे किंवा त्यांचा आशय या गोष्टी सहज आढळून येतील. कौटिल्याच्या अर्थशास्त्राशीं विशाखदत्ताचा नुसता परिचय होता असें नसून त्याने त्याचें फार चांगलें अध्ययन केलें होतें, हें मुद्राराक्षसावरून अगदी उघड दिसतें. अर्थशास्त्राच्या प्रत्येक पानांत, किंबहुना प्रत्येक वाक्यांत, चाणक्याचें अतिशय प्रभावी आणि आकर्षक व्यक्तित्व व्यक्त झालेलें आहे. अशा रीतीने इतिहास ज्याच्याविषयीं मुग्ध आहे, त्याच्याविषयीं राजनीतिविषयक अशा या ग्रंथाने भरपूर माहिती पुरविली आहे. आणि इतिहासाने वर्णिलेल्या चाणक्याच्या अत्यंत अस्पष्ट व्यक्तिचित्रांत विशाखदत्ताने चैतन्य ओतलें आहे व त्याला साकार केलें आहे. अर्थशास्त्राचा कर्ता पुन्हा सजीव होऊन आपल्या नाटकांतील प्रत्येक पृष्ठांतून बोलत राहील, अशी व्यवस्था नाटककाराने केली आहे. नंद घराण्याचें

जेव्हा पूर्ण निर्दालन होतें, आणि गंगेच्या कांठावरील प्रख्यात सुगाङ्ग राजवाड्यांतील सुवर्णासनावर जेव्हा चन्द्रगुप्त मौर्य अधिष्ठित होतो, अगदी तेव्हाच नाटकाचा पडदा वर जातो. आणि याच प्रसंगापासून चाणक्याच्या पुढील कर्तृत्वाविषयीं इतिहासानें मौन धारण केलें आहे. अशा रीतीनें मुद्राराक्षसाच्या पानांपानांतून व्यक्त होणारें चाणक्याचें बहुरंगी व्यक्तित्व हें पूर्णपणें आपल्या कवीच्या प्रतिभेंतूनच अवतीर्ण झालेलें आहे. परंपरा आणि आख्यायिका यांतून त्याला कांही धागेदोरे मिळालेहि असतील. परंतु यांतील मुख्य भाग केवळ त्यानेच निर्मिलेला आहे. आणि कवीच्या कल्पनेंतून निर्माण झालेलें हें व्यक्तिचित्र एवढें तेजस्वी आणि वैभवपूर्ण आहे की, प्रत्यक्ष इतिहासहि त्यापेक्षा अधिक सरस ठरला असता कीं काय, अशी शंका आल्यावाचून राहत नाही.

वक्रनास आणि इतर कांही लोक नंदांचे मंत्री असून राक्षस त्यांच्यात सर्वश्रेष्ठ होता, एवढी माहिती विशाखदत्ताला परंपरागत अशी मिळाली होती. राक्षस हा ब्राह्मण असून राजनीतिशास्त्रांत पारंगत होता, अशीहि परंपरा आहे. युद्धांतील डावपेंचांत तो मोठा प्रवीण होता, अत्यंत शूरहि होता, आणि त्याचें चित्त निर्मळ असून आपल्या स्वामींच्या ठायीं त्याची अचल भक्ति होती. नंदांच्या विनाशानंतरच्या राक्षसाच्या कर्तृत्वाविषयीं इतिहासानें मौन पाळलें असलें तरी, किंवा कदाचित् राक्षस नांवाची व्यक्ती इतिहासांत होऊन गेली नसली तरी, राक्षसाच्या स्वभाववैशिष्ट्यांविषयीं आख्यायिकांतून मिळालेल्या सूचनांनी विशाखदत्ताच्या कल्पनाशक्तीला प्रेरणा दिली असली पाहिजे. या मोघम धाग्यांतूनच त्यानें रसरसलेल्या भावनांनी आणि मृदु विचारांनी युक्त असलेल्या, निधन पावलेल्या आपल्या स्वामींची चिरंतन स्मृति हृदयांत बाळगणाऱ्या, आणि सूडाच्या भावनेनें सतत जळत असलेल्या राक्षसाच्या व्यक्तिचित्राची निर्मिति केली आहे. आपल्या प्रभूच्या नाशाच्या दुःखामुळे होणारी वेदना विशाखदत्ताचा राक्षस सदैव अनुभवीत आहे. आणि या दुःखजनक घटनेला जबाबदार असलेल्या प्रत्येकाचा पुरता सूड उगविण्याच्या योजनांनी त्याच्या मनांत काहूर केलें आहे. तात्पर्य, त्याची भूमिका चाणक्याच्या अगदी विरुद्ध आहे, आणि चन्द्रगुप्ताचा विनाश घडवून आणण्यासाठी त्यानें पराकाष्ठेचे यत्न केले आहेत. त्यानें योजिलेल्या सर्व युक्त्या आणि त्याचे डावपेच, नंतर त्याचा झालेला पराभव आणि उपमर्द, आणि शेवटीं त्यानें पतकरलेली शरणागति, या सर्व गोष्टी विशाखदत्ताच्या प्रतिभेंतून अवतीर्ण झालेल्या आहेत. आणि त्यानें निर्मिलेली ही व्यक्तिरेखा केवढी आकर्षक झाली आहे !

चन्द्रगुप्ताच्या नाशासाठी, आणि नंदांच्या गादीवर मलयकेतूची स्थापना

करण्यासाठी, राक्षसाने आंखलेल्या योजनांचा वस्तुतः इतिहासाशीं कांहीहि संबंध नाही. त्या कल्पितच असल्या पाहिजेत. यामुळे स्वाभाविकच नाटकांतील कथानकाच्या विकासासाठी जीं पात्रें एकत्र झालेलीं आहेत, त्यांचा कथानकाच्या कलापूर्ण रचनेसाठी नाटककाराला उपयोग करून घ्यावयाचा आहे. म्हणूनच त्यांची निर्मिति नाटककाराने केली आहे; इतिहासाने त्यांच्या कर्तृत्वाची दाद घेतली आहे म्हणून नव्हे.

आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या दहा वर्षांत (इ. स. पूर्वी ३२१ ते ३१०) चन्द्रगुप्ताने सर्व साधनांचा उत्कृष्ट उपयोग करून घेतला आणि जवळ जवळ सर्व उत्तर भारत त्याने आपल्या अमलाखाली आणला, असें इतिहासांत निश्चितपणें नमूद आहे. यानंतर पांचच वर्षांच्या आंत, ज्याने आपल्या स्वामीच्या मृत्यूनंतर सर्व आशिया खंडाचें स्वामित्व मिळविलें त्या सेल्युकस निकेटर या अलेक्झँडरच्या एका अत्यंत प्रभावी अशा सेनापतीचा त्याने पराभव केला. यावरून त्याच्या ठायीं कांही अलौकिक गुण असलेच पाहिजेत हें उघड आहे. चाणक्याच्या राजकीय दूरदृष्टीचीच मदत घेऊन त्याने नंदांचा पराजय केला आणि त्यांची गादी मिळवली हें जरी मान्य केलें तरी त्याच्या स्वतःच्या ठिकाणीं जर महान् गुण नसते तर तें राज्य टिकविणेंहि त्याला शक्य झालें नसतें. एवढ्या थोड्या काळांत साम्राज्याचा एवढा विस्तार करणें ही गोष्ट तर दूरच राहिली. अगदीं बालवयांतहि राजगुणांचीं स्पष्ट चिन्हें त्याच्या ठायीं दिसत होतीं आणि तो सर्व अर्थांनी मोठा शूर राजपुत्र होता, अशी परंपरागत माहितीहि मिळते. एरवीं त्याला राजा आणि विशेषतः सम्राट बनविण्याचें चाणक्यासारख्या त्या काळच्या अत्यंत महान् मुत्सद्द्याच्या मनांत कधीहि आलें नसतें. परंतु चाणक्याची व्यक्तिरेखा अत्यंत आकर्षक करण्याच्या भरांत विशाखदत्ताने भारताच्या पहिल्या सम्राटाला चाणक्याच्या मानाने अगदी सामान्य व्यक्तीचें रूप दिलें आहे. राजकार्याची फारशी आवड नसणारा आणि चाणक्याच्या शिरावर राज्यकारभाराची सर्व जबाबदारी टाकून स्वतः आराम करणारा, असेंच त्याचें स्वरूप प्रस्तुत नाटकांत दिसतें. चाणक्याच्या मुखाने विशाखदत्ताने ही तक्रार वदविलीहि आहे.[१६] आणि जरी तिसऱ्या अंकांत चाणक्याशीं कलह करून चन्द्रगुप्ताने कारभाराची जबाबदारी आपल्याकडे घेतली असली, तरी तो एक देखावा आहे. वस्तुतकः कृतक कलहाचाहि त्याला तिटकारा असून चाणक्याच्या सूचनेप्रमाणेंच मोठ्या नाखुषीने तो ही कल्पना स्वीकारीत असल्याचें नाटकांत दाखविलें आहे.

---

१६. अंक १. तदेवमस्मत्तो न किंचित्परिहास्यते । वृषल एव केवलं प्रधानप्रकृतिरस्मास्वारोपितराज्यतंत्रभारः सततमुदास्ते ।

अशा रीतीने नाटकांत चाणक्याच्या हातांतील केवळ बाहुलें, एवढीच त्याची भूमिका दिसते. राज्यकारभाराशीं त्याचा कांहीहि संबंध नसून तिकडे चाणक्यच सारें लक्ष देत आहे. आणि विशाखदत्ताने राक्षसाच्या द्वारें चन्द्रगुप्ताचें अशा प्रकारचें वर्णन केलेंहि आहे. [१७]

विशाखदत्तानें रंगविलेलें हें चन्द्रगुप्ताचें व्यक्तिचित्र पराक्रमी सम्राट् चन्द्रगुप्ताच्या ऐतिहासिक चरित्राशीं फारच विसंगत आहे. विशाखदत्ताने चन्द्र-गुप्ताचें महत्त्व जें कमी केलें आहे त्यापाठीमागे त्याचा कोणता उद्देश असावा ? राज्यकारभारांत आवड नसलेल्या आणि चाणक्याच्या हातांतील एक बाहुलें बनलेल्या चन्द्रगुप्त मौर्याशीं तुलना करून, ज्याच्या शौर्याचें 'देवीचन्द्रगुप्त' नाटकांत विशाखदत्ताने मोठें रसभरित वर्णन केलें आहे, त्या आपल्या आश्रयदात्याचें, म्हणजेच द्वितीय चन्द्रगुप्ताचें, वैभव अधिक खुलवून दाख-वण्याचा विशाखदत्ताचा हेतु असावा काय ? शक्य आहे !

## कौटिल्याचें अर्थशास्त्र आणि मुद्राराक्षस

इ. स. पूर्वी ३२१ मध्ये मगधांत घडून आलेल्या प्रसिद्ध राज्यक्रांती-विषयींच्या घटना आपल्या नाटकाच्या मुख्य विषयासाठी विशाखदत्ताने निवडलेल्या आहेत. चन्द्रगुप्त आणि चाणक्य या प्रस्तुत नाटकांतील दोन प्रमुख पात्रांनी त्या राज्यक्रांतींतहि प्रमुख भाग घेतला होता. त्या क्रांतींतील या दोन व्यक्तींपैकी चाणक्यावरच विशाखदत्ताने आपलें सर्व लक्ष केंद्रित केलें आहे. चन्द्रगुप्ताविषयीं त्याला एवढी आस्था वाटत नाही; आपल्या गुरूचा किंवा मंत्र्याचा अत्यन्त आज्ञाधारक आणि एकनिष्ठ शिष्य या दृष्टीनेच त्याने चन्द्र-गुप्ताचें व्यक्तिचित्र रेखाटलें आहे. परंतु चाणक्याचें व्यक्तित्व आणि कर्तृत्व याविषयीं विशाखदत्ताने जी आस्था दाखविली आहे, ती केवळ अपूर्व आहे. नाटकाच्या सुरवातीला पडदा वर गेल्यापासून तों शेवटच्या दृश्यानंतर तो खाली येईपर्यंत त्याने नाटकांत सर्वत्र चाणक्याचेंच वर्चस्व दाखविलें आहे.

अशा रीतीने विशाखदत्ताने सर्वस्वीं ऐतिहासिक विषय निवडलेला आहे, आणि इतिहास घडविण्यांत प्रमुख भाग घेतलेल्या दोन व्यक्ति त्यांत प्रधान आहेत. परंतु प्राचीन भारताच्या कोणत्याहि काळीं पद्धतशीर आणि

१७. अंक ४. 'चन्द्रगुप्तस्तु दुरात्मा नित्यं सचिवायत्तसिद्धिरेव स्थितश्चक्षुर्विकल इवा-प्रत्यक्षलोकव्यवहारः कथमिव स्वयं प्रतिविधातुं समर्थः स्यात्।' 'अदृष्टलोकव्यहारमन्दधीः' असेंहि तो पुढे त्याला म्हणतो आणि त्याची तुलना स्तनंधयाशीं (लहान अर्भकाशीं) करतो. अंक ४, श्लोक १४.

तारीखवार असा इतिहास कधीच लिहिला गेला नव्हता. त्यामुळे ज्यावर आपल्या नाटकाची उभारणी करतां येईल, अशी फार थोडी सामग्री विशाखदत्ताला उपलब्ध होती.

मग हें नाटक केवळ कल्पनारंजितच आहे कीं काय ? नाही. विशाखदत्त हा पूर्णपणें वास्तववादी होता. जरी प्रत्यक्ष लिहिलेला इतिहास त्याला उपलब्ध झालेला नव्हता, तरी चाणक्याच्या व्यक्तिरेखेविषयीं त्याला भरपूर सामग्री मिळण्यासारखी होती. राजनीतीवरील कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' हा प्रसिद्ध ग्रंथ हीच ती सामग्री होय. चाणक्याचें अथवा कौटिल्याचें अत्यंत अद्‌भुत आणि आकर्षक व्यक्तित्व या विलक्षण ग्रंथाच्या प्रत्येक पृष्ठांतून किंबहुना प्रत्येक वाक्यांतून व्यक्त झालेलें आहे. अर्थशास्त्रांत प्रकट झालेलें हेंच चाणक्याचें व्यक्तित्व विशाखदत्ताच्या चाणक्यालाहि लाभलें आहे. अर्थशास्त्रांतील राजनीतिविषयक सिद्धान्त ज्याने प्रणीत केले, तोच कौटिल्य मुद्राराक्षसांतील पहिल्या दृश्यापासून शेवटच्या दृश्यापर्यंत वर्चस्व गाजवत आहे. एखाद्या शंभर टक्के वास्तववादी लेखकाप्रमाणें, विशाखदत्ताने चाणक्याचें व्यक्तिचित्र आणि या नाटकांत ज्यांचा प्रमुख भाग आहे तीं विविध कारस्थानें रंगविण्यापूर्वीं अर्थशास्त्राचें फार काळजीपूर्वक अध्ययन केलें होतें हें याचें कारण आहे. यामुळे या नाटकाची भूमिका पूर्णपणें वास्तववादी झाली आहे. दुसऱ्या कोणत्याहि संस्कृत नाटकामध्ये वास्तववादाचा असला प्रभावी आविष्कार दिसणार नाही. या नाटकांतील प्रत्येक युक्ति, प्रत्येक डावपेच, प्रत्येक राजकीय कारस्थान, आणि मनुष्यवधाचा प्रत्येक बेत, हा संपूर्णपणें अर्थशास्त्राच्या पार्श्वभूमीवर उभारलेला आहे. अर्थशास्त्रांतील परिभाषेवर विशाखदत्ताने पूर्णपणें प्रभुत्व मिळविलें आहे. अशा प्रकारें, अर्थशास्त्र ज्याने रचलें तोच कौटिल्य विशाखदत्ताच्या नाटकांत चाणक्य झालेला आहे, असें स्पष्ट दिसून येईल. अर्थशास्त्राचें अध्ययन करीत असतांना चाणक्याचें जें चित्र आपल्यापुढे साकार होतें, तें विशाखदत्ताने आपल्या नाटकांत रंगविलेल्या चित्राप्रमाणेंच हुबेहूब आहे. तेव्हा अर्थशास्त्रांत प्रकट झालेलें चाणक्याचें व्यक्तित्व विशाखदत्ताने आपल्या नाटकांत अजरामर केलें आहे, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाही.

अर्थशास्त्राचा कर्ता कौटिल्य हाच विशाखदत्ताच्या चाणक्याची भूमिका करीत आहे, चाणक्याने नाटकांत वापरलेली प्रत्येक मुत्सद्देगिरीची युक्ति म्हणजे कौटिल्याने सुचविलेल्या युक्त्यांचें केवळ अनुकरण आहे, आणि चाणक्याने येथे प्रतिपादिलेलीं अनेक राजकीय तत्त्वें कौटिल्याने अर्थशास्त्रांत प्रणीत केलेल्या तत्त्वांशीं पूर्णपणें जुळणारीं आहेत, हें एकदा मान्य केलें म्हणजे महत्त्वाच्या

राजकीय चर्चांच्या प्रसंगींच नव्हे, तर अत्यंत सूक्ष्म अशा तपशिलावषयींहि विशाखदत्ताने अर्थशास्त्राचें भरपूर ऋण घेतलें आहे असें दिसलें तर आश्चर्य वाटण्याचें कांही कारण नाही.

**षाड्गुण्य आणि उपाय**—'गुणवती', 'उपायानिलया', आणि 'त्रिवर्गस्य साधिका' असें राजनीतिचें वर्णन पहिल्या अंकाच्या पांचव्या श्लोकांत केलेलें आहे. त्याचप्रमाणें अंक ६, श्लोक ४ मध्ये 'षड्गुणसंयोगदृढा' आणि 'उपायपरिपाटिघटितपाशमुखी' असें राजनीतीचें वर्णन आलें आहे. उपाय हे मंत्र्याचे हातच होत, असा उल्लेख अंक २, श्लोक २ मध्ये आलेला आहे.[१८] त्याचप्रमाणे अंक ३, श्लोक २५ यांत उपाय हा राक्षसाला जिंकण्याचा एक मार्ग होय, असा उल्लेख आहे.[१९] अंक ७, श्लोक १३ यांत षाड्गुण्याचाहि उल्लेख केलेला आहे.[२०] षाड्गुण्य, उपाय, आणि त्रिवर्ग यांची अर्थशास्त्रांत केलेली चर्चाच विशाखदत्ताने या शब्दांच्या केलेल्या उल्लेखाच्या मुळाशीं आहे. षाड्गुण्याची, किंवा सन्धि, विग्रह, यान, आसन, संश्रय आणि द्वैधीभाव या राजनीतीच्या सहा अंगांची कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्राच्या सातव्या भागांत विस्तृत चर्चा केली आहे. उपाय किंवा मुत्सद्देगिरीचे डावपेंच साम, दाम, भेद आणि दण्ड असे चार असल्याचें कौटिल्याने नमूद केलें आहे. आणि पहिल्या भागाच्या तिसऱ्या प्रकरणांत 'इन्द्रियजय' या शीर्षकाखाली त्रिवर्गाचा म्हणजे मानवी जीविताच्या त्रिविध आदर्शाचा उल्लेख केलेला आहे. 'धर्मार्थाविरोधेन कामं सेवेत।' असें कौटिल्याने या ठिकाणीं म्हटलें आहे.

**गुप्त हेर**— राक्षस आणि चाणक्य या दोघांच्याहि नीतीमध्ये ज्यांचा प्रमुख भाग आहे, अशीं अनेक गुप्त हेरांचीं कारस्थानें आणि युक्त्याप्रयुक्त्या या राजकीय उपायांच्या उल्लेखांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहेत. याविषयींची प्रत्येक बारिकसारिक गोष्ट अर्थशास्त्रांतील प्रतिपादनाशीं पूर्णपणें जुळते.

अर्थशास्त्राच्या पहिल्या भागाच्या ११ व १२ या प्रकरणांत गुप्त हेरांच्याविषयीं संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांना 'गूढपुरुषाः' असें संबोधिलें आहे. तेथें या हेरांच्या अनेक प्रकारांचा उल्लेख केलेला आहे. कापटिक, उदास्थित, गृहपति, वैदेहक व तापस यांचा वेष घेतलेले, आणि सत्रि, तीक्ष्ण, रसद, आणि भिक्षु हे ते प्रकार होत. मुद्राराक्षसाच्या पहिल्या अंकांत चाणक्याच्या स्वगत भाषणांत पुढील उल्लेख आहे. 'प्रयुक्ताश्च स्वपक्षपरपक्षयोरनुरक्तापरक्त-

१८. उपायहस्तैरपि राक्षसेन निष्कृष्यमाणामिव लक्षयामि।

१९. वनगज इव तस्मात्सोऽभ्युपायैर्विनेयः।

२०. गुरौ षाड्गुण्यचिन्तायामार्ये चार्ये च जाग्रति।

जनजिज्ञासया बहुविधदेशभाषाचारसंचारवेदिनो नानाव्यञ्जनाः प्रणिधयः।... शत्रुप्रयुक्तानां च तीक्ष्णरसदायिनां प्रतिविधानं प्रत्यप्रमादिनः परीक्षितभक्तयः क्षितिपतिप्रत्यासन्ना नियोजितास्तत्र तत्राप्तपुरुषाः।' या उताऱ्यांत उल्लेखिलेलीं अनेक सोंगें (व्यञ्जनानि), त्याचप्रमाणें तीक्ष्ण आणि रसद (किंवा रसदायी), हे गुप्त हेरांचे प्रकार अर्थशास्त्राने केलेल्या विवरणावरच उघड उघड आधारलेले आहेत. इन्दुशर्मा या चाणक्याच्या एका ब्राह्मण हेराने क्षपणकाचा वेष घेतला होता. तो अर्थशास्त्राने उल्लेखिलेल्या 'तापसव्यञ्जन' प्रकारांत वसतो, असें म्हणतां येईल. 'मुण्डो जटिलो वा वृत्तिकामस्तापसव्यञ्जनः।' असें त्याचें वर्णन केलेलें आहे.

**तीक्ष्ण आणि रसद**— मुद्राराक्षसांतील वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांत 'तीक्ष्ण' आणि 'रसद' या प्रकारच्या हेरांचाहि उल्लेख आला आहे. 'ये जनपदे शूरास्त्यक्तात्मानो हस्तिनं व्यालं वा द्रव्यहेतोः प्रतिशोधयेयुः ते तीक्ष्णाः।' अशी अर्थशास्त्राने 'तीक्ष्ण' या प्रकाराची व्याख्या केली आहे. तीक्ष्ण हेर हा खुनी मारेकरी असून त्याला मृत्यूचें भय वाटत नाही. तो मोठा तेजस्वी आणि अग्नीप्रमाणें दाहक असतो. 'ये बन्धुषु निःस्नेहाः क्रूराश्चालसाश्च ते रसदाः।' अशी अर्थशास्त्रांत 'रसदा'ची व्याख्या केलेली आहे. 'रसद' हा कधीहि न डगमगणारा धाडसी माणूस असून विष देण्यासाठी त्याची योजना करावी, असें अर्थशास्त्र सांगतें. (अर्थशास्त्र भाग १, प्रकरण १२). 'शस्त्रप्रणिधयः' 'अग्निप्रणिधयः' आणि 'रसप्रणिधयः' यांचा उल्लेख अर्थशास्त्राच्या बाराव्या भागांतील चौथ्या प्रकरणांत आलेला आहे. मुद्राराक्षस अंक २, श्लोक १६ यांतहि त्यांचा स्पष्ट उल्लेख आहे.–'ये शस्त्रेषु रसेषु च प्रणिहितास्तैरेव ते घातिताः।' या ओळींत उल्लेखिलेले हेर 'शस्त्रप्रणिधयः' आणि 'रसप्रणिधयः' हे असून अर्थशास्त्रांत त्यांचें कार्य पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे— "स्कन्धावारे वाऽस्य शौण्डिकव्यञ्जनः पुत्रमभित्यक्तं स्थापयित्वा अवस्कन्दकाले रसेन प्रवासयित्वा 'नैषेचनिकम्' इति मदनरसयुक्तान् मद्यकुम्भान् शतशः प्रयच्छेत्। शुद्धं वा मद्यं माद्यं वा मद्यं दद्यादेकमहः उत्तरं रससिद्धं प्रयच्छेत्। शुद्धं वा मद्यं दण्डमुख्येभ्यः प्रदाय मदकाले रससिद्धं प्रयच्छेत्।'[२१]

२१. "... a spy disguised as a vintner in the service of the enemy, may distribute as a toast hundreds of vessels of liquor mixed with the juice of the madana plant; or for the first day, he may distribute a mild or intoxicating variety of liquor, and on the following days such liquor, as is mixed with poison; or having given pure liquor to the officers of the enemy's army, he may give them poisoned liquor when they are in intoxication." (शामशास्त्री यांचें भाषांतर.)

सुरङ्गा— चंद्रगुप्ताच्या शयनगृहांतील भिंतींत असलेल्या एका गुप्त बळदांत किंवा भुयारांत ( सुरङ्गा ) राक्षसाच्या कांहीं हेरांनी कसा प्रवेश मिळवला होता याचें वर्णन विराधगुप्ताने दुसऱ्या अंकांत केलें आहे. भुयारांचें ( सुरंगा: ) फार मनोरंजक वर्णन अर्थशास्त्र विभाग २, प्रकरण ५ यांत आलें आहे. भुयारांची रचना 'संनिधाता' नांवाच्या अधिकाऱ्याने करावयाची असते असें तेथे म्हटलें आहे. भूमिगत भुयार एखाद्या पिंजऱ्यासारखें असावें; तें तिमजली असून सर्वांत वरचा मजला जमिनीच्याच पातळीवर असावा; निरनिराळ्या प्रकारांचीं अनेक दालनें त्यांत असावीं; आणि तिला फक्त एक दार असावें, असें वर्णन अर्थशास्त्रांत आहे.[२२]

भिंतींतील पोकळींत ( सुरंगा ) लपून बसून राजाचा किंवा इतर कोणत्याहि श्रेष्ठ व्यक्तीचा खून करणाऱ्या गुप्त हेरांचा पुन्हा एकदा उल्लेख अर्थशास्त्र भाग १२, प्रकरण ५ यांत आला आहे. हा उल्लेख असा आहे— 'प्रमदवनविहाराणामन्यतमे वा विहारस्थाने प्रमत्तं भूमिगृहसुरंगागूढभित्तिप्रविष्टास्तीक्ष्णा हन्युः ।'[२३] 'राजगृहस्यान्तर्भित्ति सुरंगा' असा शब्दप्रयोग आपल्या नाटकांत वापरलेला आहे. अर्थशास्त्रांतील वर उद्धृत केलेल्या उताऱ्याच्या अगोदरहि याविषयीं एक महत्त्वाचें वाक्य आहे. 'सुरंगया रात्रौ राजावासमनुप्रविश्य सुप्तममित्रं हन्यात् ।' हें तें वाक्य होय.

यन्त्र— मुद्राराक्षसाच्या दुसऱ्या अंकांत एका कळीच्या कमानीचा ( यन्त्रतोरणम् ) उल्लेख आहे. तिच्यांतील एखादी लोखंडाची कळ काढून घेतल्याबरोबर ती कोसळून पडावी, अशी त्या कमानीची रचना केली होती. अर्थशास्त्राच्या त्याच प्रकरणांत (१२–५) आपल्याला पुढील वाक्य आढळतें— 'यन्त्रविश्लेषणं वा विश्लेष्याधस्तादवपातयेत् ।'[२४]

विषकन्या— मुद्राराक्षसांत अनेक स्थळीं पर्वतेश्वराचा खून करणारी म्हणून विषकन्येचा उल्लेख आला असून ती नेमकी कोण असावी हा प्रश्न

---

२२. सारदारुपञ्जरं भूमिसमं त्रितलमनेकाविधानं कुट्टिमप्रदेशस्थानतलमेकद्वारं... भूमिगृहं कारयेत्।

२३. Fiery spies, hidden in an underground chamber, or in a tunnel, or inside a secret wall, may slay the enemy when the latter is carelessly amusing himself in a pleasure or any other place of recreation. ( शामशास्त्री यांचें भाषान्तर ).

२४. ...... or loosening the fastening of a machine (yantra) he may let it fall on his enemy. ( शामशास्त्री यांचें भाषान्तर ).

सोडविणें बिकट आहे. विषकन्येचा प्रत्यक्ष उल्लेख अर्थशास्त्रांत कोठेहि नाही. परंतु शत्रूचा वध करण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या हेर स्त्रियांचे मात्र उल्लेख आहेत. इतर उपायांबरोबर अशा स्त्रीला विषप्रयोगहि करतां येतो. हें विष ती स्वतः देईल, किंवा शत्रूला मोह घालून त्याला ती एका विवक्षित स्थळीं आणील, आणि तेथें लपून बसलेले इतर हेर त्या शत्रूला विषप्रयोग करतील. अर्थशास्त्राच्या तेराव्या भागाच्या दुसऱ्या प्रकरणांत पुढील उतारा आढळून येतो– 'द्रव्यस्त्रीलोलुप-माढ्यविधवाभिर्वा परमरूपयौवनाभिः दायादनिक्षेपार्थमुपनीताभिः सत्रिणः प्रलो-भयेयुः। प्रतिपन्नं रात्रौ सत्रिच्छन्नाः समागमे शस्त्ररसाभ्यां घातयेयुः।' येथे शत्रूला मोह पाडण्याचें केवळ एक साधन म्हणूनच हेर स्त्रियांचा उल्लेख केला आहे. अर्थशास्त्र भाग १२, प्रकरण ५ यांत खून करण्यासाठीं नेमलेल्या स्त्रियांचा आणखी एक उल्लेख आहे— 'गूढप्रणिहिता वा रसेन स्वपतो वा निरुद्धे देशे गूढाः स्त्रियः सर्परसाग्निधूमानुपरि मुञ्चेयुः।'[२५]

परंतु मुद्राराक्षसांतील विषकन्या निराळी दिसते. महादेवाने तिचें पुढील-प्रमाणें मोठें सुरस वर्णन केलें आहे— "क्षपणकोऽपि राक्षसमाचचक्षे–मया तावदत्यन्तसुन्दरी तरुणरूपा काचन कृत्या सृज्यते। तां च सकृद्यः कश्चिपुरुष उपभुङ्क्ते चेत्, तदानीमेव सा कृत्या तं घातयित्वा स्वयमपि तिरोभवति।" यावरून एखाद्या पुरुषाचा वध करण्यासाठी या विषकन्येचा त्याच्याशीं शरीर-संबंध घडून येणें आवश्यक होतें असें उघड दिसतें. कांहीं लोकांनी निराळीच कल्पना सुचविली आहे. विषकन्येला अगदी लहानपणापासून अल्प प्रमाणांत विष देण्यांत येत असे, आणि कालांतराने तिचें सर्व शरीर विषमय होत असे. जर एखाद्या पुरुषाने तिच्याशीं समागम केला तर त्याला तत्क्षणीं मृत्यु येत असे. अशा तऱ्हेच्या विषकन्येची कल्पना अर्थशास्त्रांत उपलब्ध नाही. हा अर्थ-शास्त्रानंतरच्या काळांतील शोध असावा असें दिसतें. तें कांहीहि असो, हेर आणि दूत म्हणूनच नव्हे, तर वध करण्यासाठीं आणि विषप्रयोगासाठींहि स्त्रियांचा उपयोग केला जात असे हें स्पष्ट आहे.

विषयुक्त चूर्णें—राक्षसाच्या एका गुप्त हेराने कांहीं चमत्कारिक गुण असलेलें चूर्ण औषधांत मिसळून (योगचूर्णमिश्रितमौषधम्) चन्द्रगुप्ताला पिण्या-साठीं दिलें होतें असा उल्लेख मुद्राराक्षसाच्या दुसऱ्या अंकांत आहे. अर्थशास्त्र

२५. Or women under concealment may throw a snake, or poison, or fire or poisonous smoke, over his person when he is asleep in a confined place. (शामशास्त्री यांचें भाषान्तर.)

भाग १४, प्रकरणं १ यांतील 'परघातप्रयोगः' या शीर्षकाखाली मृत्यु आणण्यासाठी तयार केलेल्या अशा प्रकारच्या चूर्णांची मोठी यादी दिलेली आहे.

**हेरांचीं कामें**—अर्थशास्त्र, भाग १ प्रकरण १२ यांत हेरांच्या कामांचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे—'आपल्या मंत्र्यांच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी राजाने उच्च घराण्यांत जन्मलेले, राजानिष्ठ, भरंवशाचे, निरनिराळ्या देशांना आणि व्यवसायांना उचित अशीं सोंगें घेण्याच्या कलेंत निष्णात असलेले, आणि अनेक भाषांचें व कलांचें ज्ञान असलेले लोक पाठवावेत.'[२६] यानंतर अधिकाऱ्यांची एक विस्तृत यादी दिलेली आहे. या सर्वांच्या हालचालींवर हेरांनी बारकाईने नजर ठेवावयाची आहे. वर उल्लेख केलेल्या मुद्राराक्षसाच्या पहिल्या अंकांतील पुढील उताऱ्याची याच्याशीं तुलना करावी. 'प्रयुक्ताश्च स्वपक्षपरपक्षयोरनुक्तापरक्तजनजिज्ञासया बहुविधदेशवेषभाषाचारसंचारवेदिनो नानाव्यञ्जनाः[२७] प्रणिधयः। अन्विष्यते च कुसुमपुरनिवासिनां नन्दामात्यसुहृदां निपुणं प्रचारगतम्।

सर्वत्र संचार करणाऱ्या या हेरांविषयीं अर्थशास्त्राने आणखी एक स्पष्ट दंडक घातला आहे. 'हेरांच्या मंडळ्याना किंवा भटकणाऱ्या हेरांना एकमेकांची माहिती असतां कामा नये' हा तो दण्डक होय.[२८] चाणक्याच्या हेरांपैकी बहुतेकांना एकमेकांची माहिती नाही हें या नाटकावरून आपल्याला स्पष्टपणें दिसत आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत प्रणिधिसंस्थेचें आणि अनेक खुनी कारस्थानांचें अत्यंत विस्तृत वर्णन केलेलें आहे. आणि कौटिल्याने हेरांचें जें काम सांगितलें आहे तेंच चाणक्याच्या आणि राक्षसाच्या अनेक गुप्त हेरांचें काम आहे

• **शत्रुसैन्यांतील फितुरी**— 'उपजाप' या शीर्षकाखाली अर्थशास्त्र भाग १३, प्रकरण १ यांत शत्रूच्या सैन्यांत कलहाचीं बीजें पेरण्याच्या कार्यांची चर्चा केलेली आहे. फितूर घडवून आणणारा गुप्त किंवा कर्णोपकर्णी प्रचार असा 'उपजाप' या शब्दाचा आशय आहे. या फितुरीसाठी अनेक लोकांना मोठ्या मौल्यवान देणग्या दिल्या जात. मुद्राराक्षसाच्या दुसऱ्या अंकांत आपल्याला पुढील उतारा आढळतो—'चन्द्रगुप्तशरीरमभिद्रोग्धुमस्मत्प्रयुक्तानां तीक्ष्णरस-

---

२६. शामशास्त्री यांच्या भाषांतराच्या आधारानें.

२७. यमपटधारी, आहितुण्डिक, वैतालिक, आणि क्षपणक यांचा वेष घेतलेले हेर मुद्राराक्षसांत आपल्याला आढळतात.

२८. न चान्योन्यं संस्थास्ते विद्युः। भाग १, प्रकरण १२.

दायिनामुपसंग्रहार्थं परकृत्योपजपार्थं च महता कोशसंचयेन स्थापितः शकटदासः।' जे लोक शत्रूला अनुकूल किंवा प्रतिकूल असतील, त्यांना वश कसें करून घ्यावयाचें हें अर्थशास्त्राच्या पहिल्या भागांतील चौदाव्या प्रकरणांत सांगितलें आहे. असंतुष्ट लोकांना आपल्या बाजूला कसें वळवून आणावयाचें हेंहि त्यांत सांगितलें आहे. परकी राजांच्या मित्रांना मन वळवून किंवा पारितोषिकें देऊन कसें वश करतां येतें, आणि दुर्दम्य शत्रूंना घरभेदेपणा करून किंवा धमक्याहि देऊन कसें ताळ्यावर आणावें लागतें याचीहि माहिती त्यांत आढळते.[२९]

**विजिगीषु आणि त्याचे शेजारी—** मुद्राराक्षसाच्या चौथ्या अंकांत 'विजिगीषु' राजाचा उल्लेख आला आहे. त्याचप्रमाणें अंक ७ श्लोक १४ यांत पुन्हा विजिगीषूचा उल्लेख असून तेथे त्याला 'द्रव्य' (योग्य शिक्षण मिळालेला गुणी राजा) असें संबोधिलें आहे. चौथ्या अंकांतील वर उल्लेखिलेल्या उताऱ्यांत विजिगीषूच्या विशिष्ट गुणांचाहि उल्लेख आहे. 'आभिगामिकगुणाः' आणि 'आत्मगुणाः' असे शब्द तेथे वापरले आहेत.[३०] अर्थशास्त्र भाग ६, प्रकरण २ यांत विजिषूची व्याख्या केली असून त्याचे गुणहि सांगितले आहेत. 'राजा आत्मद्रव्यप्रकृतिसंपन्नो नयस्याधिष्ठानं विजिगीषुः।' विजिगीषु हा 'सुशील आणि उत्कृष्ट राजगुणांनी युक्त' आणि 'नीतीविद्येचा उगम' असलेला विजयी राजा असतो. राजाच्या 'आभिगामिक' गुणांचा अर्थशास्त्र भाग ६ प्रकरण १ यांत उल्लेख केलेला आहे. त्यांना 'स्वामिसंपद्' असें म्हटलें आहे.

मुद्राराक्षसाच्या चौथ्या अंकांतील एका उताऱ्यांत विजिगीषूच्या जवळच्या प्रदेशांतील राजांविषयीं पुढील उल्लेख आहे– 'इह खल्वर्थशास्त्रव्यवहारिणामर्थवशादरिमित्रोदासीनव्यवस्था न लौकिकानामिव स्वेच्छावशात्।' अरि, मित्र, आणि उदासीन या शेजारी राजांच्या तीन प्रकारांचा येथे उल्लेख केला आहे. अर्थशास्त्र भाग ६, प्रकरण २ यांत या प्रकारांची व्याख्या केली आहे. 'तस्य (विजिगीषोः) समन्ततो मण्डलीभूता भूम्यन्तरा अरिप्रकृतिः। तथैव भूम्येकान्तरा मित्रप्रकृतिः। अरिसम्पद्युक्तः सामन्तः शत्रुः।'यानंतर अरिमित्र, मित्रमित्र, अरिमित्रमित्र, पार्ष्णिग्राह, आक्रन्द, पार्ष्णिग्राहासार, आणि आक्रन्दासार या प्रकारांची व्याख्या केल्यानंतर अर्थशास्त्राने मध्यस्थ राजाच्या गुणांचें वर्णन

---

२९. लभेत सामदानाभ्यां कृत्यांश्च परभूमिषु।
अकृत्यान् भेददण्डाभ्यां परदोषांश्च दर्शयेत्॥ (अर्थशास्त्र, १. १४)

३०. 'कुमारमाभिगामिकगुणयोगादाश्रयामहे' आणि 'विजिगीषुमात्मगुणसंपन्नं प्रियहितद्वारेणाश्रयणीयमाश्रयेत् ......।' अंक ४.

केलें आहे. नंतर त्यानें उदासीन ( neutral ) राजाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे–'अरिविजिगीषुमध्यानां वहिः प्रकृतिभ्यो बलवत्तरः संहतासंहतानामरिविजिगीषुमध्यमानामनुग्रहे समर्थो निग्रहे चासंहतानामुदासीनः ।[३१]

**अंतःस्थ आणि बाह्य उपद्रव**—राक्षसाच्या राजधानींतील वास्तव्यामुळे गंभीर तऱ्हेचा अंतर्गत उपद्रव निर्माण झाला असता, आणि त्याचें राहणें घोक्याचें झालें असतें म्हणूनच केवळ तो राजधानींतून निसटून जात असतां आपण त्याकडे दुर्लक्ष केलें, असें मुद्राराक्षसाच्या तिसऱ्या अंकांत चाणक्य म्हणतो. राजधानींतून बाहेर गेल्यानंतर जरी त्याने बाहेरून उपद्रव दिला असता तरी त्याचा बंदोबस्त करणें फार सोपें होतें. परंतु अंतःकोप हा अधिक घोक्याचा होता. प्रस्तुत उतारा पुढीलप्रमाणें आहे— 'राक्षसोऽपि स्वामिनि स्थिरानुरागित्वात्सुचिरमेकत्रवासाच्च शीलज्ञानां नन्दानुरक्तानां प्रकृतीनामत्यन्तविश्वास्यः प्रज्ञापुरुषकाराभ्यामुपेतः सहायसंपदाभियुक्तः कोशवानिहैवान्तर्नगरे वर्तमानः खलु महान्तमन्तःकोपमुत्पादयेत् । दूरीकृतस्तु बाह्यकोपमुत्पादयन्नपि कथमप्युपायैर्वशयितुं शक्यः ।'

विशाखदत्ताच्या चाणक्याचें हें विधान अर्थशास्त्रांतील या विषयासंबंधींच्या पुढील विवरणावर आधारलें आहे हें स्पष्ट आहे.[३२] राज्ञोऽभ्यन्तरो बाह्योवा कोप इति । अहिभयादभ्यन्तरः कोपो बाह्यकोपात् पापीयान् । अन्तरमात्यकोपश्चान्तःकोपात् ।' जातां जातां लक्षांत ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट अशी की, या उताऱ्यांत अमात्यकोपाचा उल्लेख असून मुद्राराक्षसाच्या चौथ्या अंकांत उल्लेखिलेल्या अमात्यव्यसनाचा आणि त्याचा अर्थ एकच आहे.[३३] तेथे राक्षस म्हणतो, 'अन्येषां भूपतीनां कदाचिदमात्यव्यसनमव्यसनं स्यात् । न पुनश्चन्द्रगुप्तस्य ।' या अमात्यव्यसनांची अर्थशास्त्र भाग ८, प्रकरण १ यांत चर्चा केली असून तेथे 'अमात्यमूलाः सर्वारम्भाः' असें कौटिल्याने अगदी असंदिग्धपणें म्हटलें आहे, आणि अमात्यव्यसनाचा गंभीरपणा मान्य केला आहे. अमात्यव्यसन हें स्वामिव्यसनापेक्षा अधिक गंभीर आहे असें भारद्वाजाचें मत असून अर्थशास्त्राने त्याचा उल्लेख केला आहे.[३४]

---

३१. He who is situated beyond the territory of any of the above kings and who is very powerful and capable of helping the enemy, the conqueror, and the madhyama king together or individually, or of resisting any of them individually, is a neutral king. ( शामशास्त्री यांचें भाषान्तर. )

[ ३२, ३३, ३४ या टीपा, पृष्ठ २९ वर पहा. ]

मुद्रा किंवा परवाना— छावणींतून बाहेर जाण्याकरिता किंवा आंत प्रवेश मिळविण्याकरितां आवश्यक असलेल्या परवान्यांच्या ( passports ) पद्धतीचा उल्लेख मुद्राराक्षसाच्या पांचव्या अंकांत आला आहे. तेथें क्षपणक म्हणतो–'इदानीमितः प्रत्यासन्ने कुसुमपुरे न कोऽप्यमुद्रालाञ्छितो निर्गन्तुं प्रवेष्टुं वानुमोद्यते ।'

नंतर त्याच अंकांत पुढच्या प्रवेशांत भागुरायण परवाने देत असतांना आपल्याला दिसतो.[३५] अर्थशास्त्राच्या दुसऱ्या भागांतील चौतिसाव्या प्रकरणांत परवान्याविषयींचे नियम दिले आहेत. परवान्यांसाठी एक अध्यक्ष असतो, आणि प्रत्येक परवान्यामागें एक माष घेऊन त्यानें ते द्यावयाचे असतात. ज्याच्या जवळ परवाना असतो त्याला अनिर्बंध रीतीनें देशाच्या बाहेर जातां येतें किंवा आंतहि येतां येतें. परंतु परवान्याशिवाय जो असें करील त्याला दण्ड करावयाचा असतो. खोटे परवाने धारण करणाऱ्यांना शिक्षा करावयाची असते.

अर्थशास्त्रांतील या उताऱ्यावरून असें स्पष्टपणें दिसतें की, केवळ छावणींतून बाहेर जाण्याकरितां किंवा आंत येण्याकरितांच परवाने लागत नसून देशांतून बाहेर जाण्याकरितां किंवा आंत येण्याकरितांहि लागत असत.

कौटिल्याच्या अर्थशास्त्राचें ज्यांच्या बाबतींत विशाखदत्तानें भरपूर ऋण घेतलें आहे अशा कांही महत्त्वाच्या विषयांचा वर उल्लेख केला आहे. इतरहि कांही मुद्द्यांचा उल्लेख करतां येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ, मुद्राराक्षस अंक ५, श्लोक ११ यांत प्रयाणकालीं सैन्याच्या विभागांची जी व्यवस्था सांगितली आहे, ती अर्थशास्त्राच्या दहाव्या भागांतील चर्चेशीं पूर्ण जुळणारी आहे. त्याचप्रमाणें या नाटकांत उल्लेखिलेल्या शिक्षेच्या विविध प्रकारांचा उगम अर्थशास्त्रांत आढळेल. उदाहरणार्थ, या नाटकांत शिक्षेच्या पुढील प्रकारांचा उल्लेख आलेला आहे—शूलारोपण आणि सनिकार निर्वासन

---

३२. The troubles of the king may be either internal or exernal. Internal troubles are more serious than external troubles which are like the danger arisng from a lurking snake. Troubles due to a minister are more serious than other kinds of internal troubles. ( शामशास्त्री यांचें भाषान्तर. )

३३. मुद्राराक्षस, पृष्ठ १२६

३४. स्वाम्यमात्यव्यसनयोरमात्यव्यसनं गरीयः ।

३५. मुद्राराक्षस, पृष्ठ १३६ व १३८.

( विटंबनापूर्वक हद्दपार करणें ),[३६] विचित्रवध ( छळ करून ठार मारणें )[३७] खड्डयांत जिवंत पुरणें आणि हत्तींच्या पायीं चिरडून मारणें.[३८] अर्थशास्त्र, अध्याय ४, प्रकरण ११ यांत अनेक प्रकारांच्या विचित्रवधाचा उल्लेख केलेला आहे. उदाहरणार्थ पाण्यांत किंवा आगींत फेंकून देणें, जीभ कापणें, बोटांचा किंवा जननेन्द्रियाचाहि छेद करणें इत्यादि.

---

३६. मुद्राराक्षस, पृष्ठ २६, ३४, ३६.

३७. मुद्राराक्षस, पृष्ठ ६२.

३८. मुद्राराक्षस, पृष्ठ १६६.

# २

# विवेचक रसास्वाद

## राजकारणी कारस्थानांनी भरलेलें नाटक

पहिल्या विभागांत म्हटल्याप्रमाणें राजकीय डावपेच हाच मुद्राराक्षसाचा मुख्य विषय आहे. अनेक गुप्त मसलती, मुत्सद्देगिरीचे डावपेच आणि उलट पेच, मनुष्यवधाच्या योजना, हेरगिरी, विषप्रयोग, गृहदाह, बनावट पत्रें, आणि मुख्यतः कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत योजिलेल्या शास्त्रीय परिभाषेत राजनीति-विषयक अनेक समस्यांचा केलेला विद्वत्तापूर्ण उहापोह अशा सर्व गोष्टींनी भरलेलें हें एक शंभर टक्के निर्भेळ राजकीय नाटक आहे असें निःशंकपणें म्हणतां येईल. राजकीय विषयांवरील अनेक चर्चा त्यांत असल्यामुळे त्याला वादविवादात्मक नाटक (Discussion Play) असेंहि म्हणतां येईल. सर्व संस्कृत नाट्यवाङ्मयांत हें एकच अशा प्रकारचें नाटक आहे. शृंगाररसाला येथे मुळीच वाव नाही, आणि जी एकुलती एक स्त्रीभूमिका या नाटकांत आहे तीहि यौवनाच्या भरांत असलेल्या युवतीची नसून एका प्रौढ स्त्रीची आहे.

## पडदा वर जाण्यापूर्वी

डोंगरी प्रदेशांत राहणाऱ्या पर्वतेश्वर नांवाच्या एका शूर राजाच्या आणि इतर राजांच्या मदतीने, आणि चाणक्याच्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेचें आणि दूरदृष्टीचें साहाय्य घेऊन, चन्द्रगुप्ताने नंदांच्या पाटलिपुत्र किंवा कुसुमपुर या राजधानीवर हल्ला केला, आणि नंतर झालेल्या युद्धांत नंदांचा त्याच्या आप्तेष्टांसह समूळ विनाश झाला.

परंतु राक्षस हा नंदांचा स्वामिनिष्ठ, धोरणी, बुद्धिमान् व धैर्यशाली सचिव मात्र या संहारांतून बचावला. शत्रुपक्षांत असणाऱ्या या सचिवाचे अद्वितीय गुण चाणक्याला चांगले माहीत होते. आणि त्याला कैद करून कारा-वासांत ठेवण्याऐवजीं चन्द्रगुप्ताच्या सेवेंत दाखल करून मंत्रिपद स्वीकारावयास लावावयाचें असा त्याने निश्चय केला.

परंतु नंद घराण्याशीं राक्षस अत्यंत एकनिष्ठ होता, आणि नवीनच राज्यावर आलेल्या चन्द्रगुप्ताचें निर्दालन करून नंद घराण्यांतलि कोणाला तरी

राज्य मिळवून देण्याच्या संधीच्या तो वाट पाहणार हें निश्चित होतें. चाणक्याने हें सर्व दूरदृष्टीने हेरलें, आणि नंद घराण्यांतील एखाद्या वंशजाला पाठिंबा देण्याची संधी राक्षसाला मिळूं नये म्हणून, सर्वार्थसिद्धि या शेवटच्या नंदाने प्राण वाचविण्यासाठी वानप्रस्थाश्रम स्वीकारला असतांहि, चाणक्याने त्याचा वध घडवून आणला. आता राक्षस कोणासाठी झटणार होता? म्हणून राक्षसाला वश करून घेण्याची हीच संधी आहे असें चाणक्याला वाटलें.

नंदांचा पराभव करण्याच्या कामीं ज्याचा बराच उपयोग झाला होता आणि चन्द्रगुप्ताच्या राज्याचा निम्मा भाग मिळविण्याविषयीं ज्याला वचन देण्यांत आलें होतें, त्या पर्वतेश्वर नांवाच्या पहाडी मुलखांतील राजाचा त्रास दूर करण्याचें चाणक्याने मध्यंतरी ठरवलें. राज्याचा थोडा सुद्धा भाग सोडण्याची चाणक्याची इच्छा नव्हती. परंतु पर्वतेश्वर हयात असेपर्यंत त्याला कसलीहि सबब सांगतां आली नसती. एक संभावित गृहस्थ म्हणून आपला शब्द पाळणें चाणक्याला भाग होतें. तेव्हा या विचित्र परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठी चाणक्याने गुप्त रीतीने पर्वतेश्वराचा नाश करण्याकरिता एका विषकन्येची योजना केली. तिने आपलें काम उत्कृष्ट रीतीने बजाविलें आणि पर्वतेश्वराचा वध झाला. अशा प्रकारें चाणक्याच्या हृदयांत सलणारें एक शल्य मोठया युक्तीने काढण्यांत आलें. या कपटी वधानंतर राक्षसानेच पर्वतेश्वराचा खून घडवून आणला, अशी बातमी चाणक्याने राजधानींत पसरविली. आणि पर्वतेश्वराचा मुलगा मलयकेतु याच्याकडे जाऊन 'चाणक्यानेच तुझ्या पित्याचा वध केला आणि तो कोणत्याहि क्षणीं तुझाहि वध घडवून आणण्याची शक्यता आहे, तेव्हा तूं इतःपर राजधानींत राहणें फार धोक्याचें आहे,' असें त्याला गुप्तपणें कळवण्यासाठी आपला; भागुरायण नांवाचा दूत पाठविला. मलयकेतूचा यावर विश्वास बसला आणि चाणक्य कधी तरी आपलाहि घात करील असें भय वाटून तो राजधानींतून तत्क्षणीं बाहेर पडला.

आता राजधानींत अधिक काळ राहणें राक्षसालाहि धोक्याचें वाटलें, आणि आपली पत्नी आणि मुलगा चंदनदास या आपल्या जिवलग मित्राच्या स्वाधीन करून तो शहराबाहेर निसटला, आणि राजधानीपासून पुष्कळ दूर राहत असलेल्या मलयकेतूकडे गेला. आपल्या पित्याच्या खुनामुळे चिडलेल्या मलयकेतूशीं त्याने मैत्रीचा तह केला. सर्व नंदसाम्राज्य देण्याचें त्याला आश्वासन देऊन राक्षसाने मोठें सैन्य जमा केलें, आणि राजधानीवर हल्ला करून चन्द्रगुप्ताचा नाश करण्याविषयीं आणि नंदाची गादी परत मिळविण्याविषयीं त्याने मलयकेतूला चिथावणी दिली. मलयकेतूलाहि ही कल्पना पसंत पडली, आणि ठरल्याप्रमाणें

राजधानीवर हल्ला करण्यासाठी सैन्य जमविण्यास त्याने आरंभ केला. आणि याच ठिकाणीं नाटकाची सुरवात झाली आहे.

## नाटकाची रेखीव व प्रमाणबद्ध रचना

मुद्राराक्षसाच्या कथानकांतील धागे ज्या चातुर्यानें विशाखदत्ताने गुंफले आहेत त्याला संस्कृत नाट्यवाङ्मयांत तोड नाही. नाटकाच्या पर्यवसानासंबंधीं जी कल्पना नाटककाराने मनांत ठेवली आहे ती कल्पना मूर्त करण्याच्या दृष्टीनेच त्याने प्रत्येक घटनेची अतिशय काळजीपूर्वक मांडणी केली आहे. अगदी बारीकसारीक तपशिलाचाहि मध्यवर्ती कल्पनेच्या पूर्तीसाठी व उठावासाठीच त्याने उपयोग करून घेतला आहे. नाट्यवस्तूच्या विकासासाठी व प्रमुख व्यक्तींच्या स्वभावदर्शनासाठी जी जी गोष्ट आवश्यक आहे असें त्याला वाटलें त्या प्रत्येक गोष्टीचा त्याने मोठ्या धोरणाने उपयोग करून घेतला आहे. आणि कथानकाच्या विकासाच्या दृष्टीने ज्या गोष्टीचा उपयोग नाहीं अशी अनावश्यक गोष्ट टाळण्याची त्याने पराकाष्ठा केली आहे. यामुळे रचना कोठेहि विस्कळित झाली नाही. ती अत्यंत प्रमाणबद्ध व रेखीव आहे. प्रेक्षकाची उत्कंठा कायम ठेवून त्याला मधूनमधून आश्चर्याचे धक्के देत अनपेक्षित घटनांच्या योगें रंगत उत्पन्न करणारें, असें चटकदार व नाट्यपूर्णतेने ओतप्रोत भरलेलें कथानक संस्कृत नाट्यसृष्टींत दुसरें आढळावयाचें नाही.

नाटकांतील घटना, व्यक्तींचा स्वभाव, आणि विचार व भावना या तीन घटकांचें कलात्मक मीलन होणें यांतच नाटकाच्या यशाचें बीज असतें. आणि विशाखदत्ताने हें मीलन चातुर्यानें घडवून आणलें आहे.

ज्या नंदवंशाचा चाणक्याने आपल्या कर्तृत्वाने संपूर्ण विनाश केला आहे त्या वंशाचा एकनिष्ठ सेवक राक्षस याच्या ठायीं असलेल्या विविध गुणांची चाणक्याला चांगली माहिती आहे. त्याच्या गुणांविषयीं चाणक्याला नितान्त आदर आहे. राक्षसाची स्वामिभक्ति अलौकिक आहे व तो बुद्धिमान व धोरणी अमात्य आहे. असल्या गुणी अमात्याने नंदांच्या घराण्यासाठी सतत कारस्थानें करीत बसावें व चंद्रगुप्ताचें स्थैर्य नष्ट करावें ही गोष्ट चाणक्याच्या दृष्टीने धोक्याची आहे. यामुळे वाटेल ते करून राक्षस चंद्रगुप्ताचा प्रधान व्हावा अशीच योजना आखण्याचा चाणक्याने निर्धार केला आहे. राक्षसासारख्या स्वामिभक्त, एकनिष्ठ व कर्तबगार अमात्याची जोड चंद्रगुप्तासारख्या अननुभवी राजाला मिळाली तर त्याचें नुकतेंच मिळालेलें राज्य स्थिर होईल

व त्याचा उत्कर्ष होईल, आणि असें झालें तरच आपण तपश्चर्येला मोकळे होऊं, असा विचार मनांत प्रबळ झाल्याबरोबर राक्षसाला वश करावयाचें व चंद्रगुप्ताचें सचिवपद त्याला पतकरावयास लावावयाचें हें चाणक्याचें उद्दिष्ट ठरलें.

पण आपल्या मालकाचा—नंद राजाचा—चंद्रगुप्ताने नाश केला हा विचार राक्षसाच्या मनांतून क्षणभरहि नाहीसा होत नसल्यामुळे तो चंद्रगुप्ताचा हाडवैरी झाला आहे. अशा स्थितींत राक्षसाने चंद्रगुप्ताचें सचिवपद पतकरणें ही गोष्ट अशक्यप्राय आहे, याची चाणक्याला चांगली जाणीव आहे. पण ही गोष्ट साधावयाचीच असा चाणक्याने निश्चय केला आहे. अनेक प्रकारचीं भलीं-बुरीं कारस्थानें करून चाणक्य राक्षसाला हतबल व हतबुद्ध करून टाकतो. पण एवढ्याने भागावयाचें नाही, हें लक्षांत घेऊन राक्षसाचा परममित्र चंदनदास यालाच चाणक्य अटकेंत ठेवतो. या चंदनदासाच्या घरीं राक्षसाची पत्नी गुप्त-पणाने राहत होती. मलयकेतूला साहाय्य देऊन त्याच्या सैन्यासह पाटलिपुत्रावर हल्ला करावयाचा, हा राक्षसाचा बेत चाणक्याने फार चातुर्याने उधळून लावला आहे. मलयकेतूचें व राक्षसाचें तीव्र वितुष्ट येईल, पण मलयकेतु राक्षसाचा वध करणार नाही, अशीच योजना चाणक्याने केली आहे. आणि ती त्याच्या अपेक्षे-प्रमाणें सफळहि झाली आहे.

सर्व बाजूंनी अपयश पदरीं आल्यामुळे राक्षस उद्विग्न होतो व आत्म-घाताचे विचार त्याच्या मनांत प्रबळ होतात. पण आपला परममित्र चंदनदास चाणक्याच्या अटकेंत आहे तोंपर्यंत आपल्याला जगलेंच पाहिजे, या विचाराने तो आत्मघाताची कल्पना सोडून देतो. याच सुमाराला चंदनदासाला सुळावर चढविण्याचा चाणक्याचा निर्धार झाला आहे. इतकेंच नव्हे तर त्याला प्रत्यक्ष वध्यस्थानीं नेलें आहे असेंहि राक्षसाला कळतें. केवळ आपल्यासाठी चंदनदास बळी जात आहे हें दिसतांच राक्षसाचा भावनावेग अनावर होतो आणि स्वतःचा प्राण देऊन चंदनदासाची सुटका करण्याचा तो निश्चय करतो. आणि तत्क्षणीं तो वध्यस्थानाकडे जातो. चाणक्याला नेमकें हेंच पाहिजे होतें. राक्षस अशा प्रकारें चाणक्याच्या तावडींत जिवंत व निःशस्त्र सापडला आहे. स्वतः चाणक्य तेथे येतो व राक्षसाशीं कमालीच्या सौजन्याने वागतो. चन्द्रगुप्तहि येतो व तसेंच सौजन्य तोहि राक्षसाला दाखवितो. या सौजन्याची राक्षसाने कधीहि अपेक्षा केलेली नव्हती. यामुळे त्याचें मन भारून गेलें आहे. अशा स्थितींत चन्द्रगुप्ताचें सचिवपद पतकरलें तरच चंदनदासाची तावडतोब सुटका होईल अशी चाणक्य अट घालतो. आणि प्रिय मित्राचे प्राण वाचविण्यासाठी राक्षस

ती गोष्ट कबूल करतो. अशा रीतीने नंद घराण्याचा अमात्य चन्द्रगुप्ताचा अमात्य होतो आणि नाटकाचें भरतवाक्यहि तोच म्हणतो.

काय वाटेल तें करून राक्षसाला चन्द्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारावयास लावावयाचें हा जो चाणक्याचा निश्चय नाटकाच्या पहिल्याच प्रवेशांत झाला आहे, त्या निश्चयाच्या साफल्यासाठीच नाटकांतील प्रत्येक घटना घडलेली आहे इतकेंच नव्हे तर घटना, व्यक्तिलेखन, आणि विचार व भावना यांचें मोठें कलात्मक मीलन घडून आलें आहे.

## चाणक्याच्या स्वभावांतील मर्मस्थानें

प्रस्तावनेंत सूत्रधार नटीशीं बोलत असतांना चंद्राच्या ग्रहणाचा उल्लेख करतो. संपूर्णमण्डल चंद्रावर क्रूरग्रह केतु आक्रमण करूं पाहत आहे असा सूत्रधाराचा आशय आहे. हा उल्लेख चंद्रग्रहणाचा आहे. पण सूत्रधाराच्या वचनांतील 'केतु' म्हणजे चंद्रगुप्ताचा प्रतिस्पर्धी मलयकेतु, आणि 'चंद्र' म्हणजे चंद्रगुप्त असा अर्थ चाणक्याने घेतला व 'मी जिवंत असतां चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याची कोणाची छाती आहे?' असा क्रोधाचा, आत्मविश्वासाचा व उद्दामपणाचा उद्‌गार एकाएकी त्याच्या तोंडून बाहेर पडला.[1]

हा चाणक्याचा आवाज आहे हें सूत्रधाराने ओळखलें आहे. चाणक्याच्या स्वभावांतील मर्म सूत्रधाराने स्पष्ट केलें आहे. ज्याने नन्दवंशाचा समूळ नाश केला तो हा 'कुटिलमति' कौटिल्य चंद्रगुप्तावर शत्रु हल्ला करणार या कल्पनेने खवळून गेला आहे.

चाणक्याचा रंगभूमीवरील पहिला प्रवेश कमालीचा नाट्यपूर्ण आहे. आपल्या शेंडीला स्पर्श करीत संतापाने बेभान होऊन तो बोलत आहे. आपण जिवंत आहोंत तोंपर्यंत चंद्रगुप्ताचा पराभव करणें ही गोष्ट सिंहाच्या जबड्यांत हात खुपसून त्याची दाढ उपटण्यासारखीच अशक्य आहे, अशी त्याची खात्री आहे. नन्दवंशाला काळसर्पिणीप्रमाणें असलेली आपली शेंडी अजून पुन्हा बांधलेली नसतांच चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याचा विचार एखाद्याच्या मनांत येतोच कसा हें त्याला कळत नाही. चाणक्याचा पराक्रम किती, आणि आपला पराक्रम किती, यांतील तारतम्य पाहण्याची ज्याच्या बुद्धीमध्ये कुवत नाही असा एखादा मूर्ख माणूस चंद्रगुप्तावर आक्रमण करण्याचा बेत योजूं लागला तर दिव्याच्या ज्योतीवर झडप घालून मरून जाणाऱ्या पतंगाप्रमाणेंच

---

१. आः क एष मयि स्थिते चन्द्रमभिभवितुमिच्छति ? ( अंक १–११ ).

त्याची अवस्था झाल्यावाचून राहणार नाही असें तो बोलत आहे.[२] यांत त्याचा अतिरेकी आत्मविश्वास जसा दिसत आहे तसाच त्याचा उद्दाम दर्पहि दिसत आहे.

## राक्षसाला वश करण्याची चाणक्याची तळमळ

एकान्तामध्ये तो आपलें मनोगत बोलून दाखवीत आहे. चन्द्रगुप्ताच्या राज्याला स्थैर्य प्राप्त करून द्यावें या विचाराने प्रेरित होऊन शत्रूच्या कारस्थानावर मात करण्यासाठी त्याने ज्या युक्त्यांचा अवलंब केला त्यांची माहिती या त्याच्या स्वगतांतून मिळते; त्याचप्रमाणें राक्षसाच्या हालचालींचीहि माहिती मिळते.

पर्वतकाचा विषकन्येच्या द्वारें कपटाने वध झाल्यामुळे त्याचा पुत्र मलयकेतु भयंकर चिडला आहे. नंदकुलाचा समूळ नाश झाल्यामुळे खवळलेल्या राक्षसाने मलयकेतूशीं संधान बांधलें आहे, नंदांचें सारें राज्य मिळवून देण्याचें आमिष त्याला दाखविलें आहे, आणि त्याच्या ताब्यांत असलेल्या मोठ्या सैन्याची मदत घेऊन चंद्रगुप्तावर हल्ला करण्याची योजनाहि त्याने आखली आहे. ही गुप्त गोष्ट नागरिकांना समजलीच कशी याचें चाणक्याला नवल वाटत आहे. पण नागरिकांना हें समजलें तर समजलें. सर्व लोकांसमक्ष नंदवंशाच्या नाशाची घोर प्रतिज्ञा करून आपल्या कर्तबगारीने ज्याने ती पार देखील पाडली त्या पराक्रमी चाणक्याला याची भीति कां म्हणून वाटावी ? राक्षस चंद्रगुप्तावर हल्ला करण्याचा मनसुबा रचीत आहे हें साऱ्या जगाला कळलें तरी त्याचा पक्का बंदोबस्त करण्याचें सामर्थ्य जोंपर्यंत चाणक्याच्या अंगीं आहे तोंपर्यंत भिण्याचें त्याला कारणच काय ? जाळण्यासारखें कांहीहि उरलें नाही म्हणूनच केवळ त्याचा क्रोधाग्नि शांत झाल्यासारखा दिसत आहे, तो श्रांत झाला आहे म्हणून नव्हे.[3] याचाच अर्थ असा की, चाणक्याने हातांतलें शस्त्र अजून खाली ठेवलें नाही.

नंदवंशाच्या विनाशाची प्रतिज्ञा पूर्ण झालेली असली तरी शस्त्र धारण करण्याचें चाणक्याला कारण काय ? कारण असें की, चन्द्रगुप्ताला राज्य प्राप्त झालें असलें तरी त्याला अजून स्थैर्य आलेलें नाही. हें स्थैर्य येईपर्यंत शत्रु अनेक कटकटी

२. सद्यः परात्मपरिमाणविवेकमूढः
कः शालभेन विधिना लभतां विनाशम्? (अंक १, श्लोक १०).

३. दाह्याभावान्न खेदाज्ज्वलन इव वने शाम्यति क्रोधवह्निः।
(अंक १, श्लोक ११).

उत्पन्न करणारच. म्हणून चन्द्रगुप्ताला स्थैर्य येईपर्यंत शस्त्र धारण करणें चाणक्याला भाग पडलें आहे.[४] जोंपर्यंत नन्दांचा कर्तबगार अमात्य राक्षस ताब्यांत आला नाही तोंपर्यंत नंदवंशाचा समूळ नाश झाला असें म्हणतां यावयाचें नाही, आणि चन्द्रगुप्ताच्या राज्याला स्थैर्य प्राप्त झालें असेंहि म्हणतां यावयाचें नाही, याची चाणक्याला चांगली जाणीव आहे.

राक्षसाला वश करण्यासाठी चाणक्याची जी इतकी धडपड चालली आहे तिचें प्रयोजन कोणतें ? राक्षसाची स्वामिभक्ति अलौकिक आहे, नन्दवंशावर त्याची अकृत्रिम भक्ति आहे. स्वाभाविकच असला एकनिष्ठ व कर्तबगार अमात्य चंद्रगुप्ताच्या मदतीला आला तर तें चाणक्याला हवें आहे. पण यांत एक अडचण आहे. नंदांच्या घराण्यांतील एक जरी मनुष्य जिवंत असला तरी त्याला पुन्हा नंदांचें गेलेलें राज्य मिळवून देण्यासाठी राक्षस प्रयत्नांची शिकस्त करणार हें उघड आहे. आणि राक्षसाने चंद्रगुप्ताचें सचिवपद पतकरावें ही तर चाणक्याची अतिशय उत्कट इच्छा आहे.

नन्दवंशातील सर्वार्थसिद्धि नांवाचा एक पुरुष चंद्रगुप्त राज्यावर आल्या-नंतरहि जिवंत होता. प्राणभयाने हा सर्वार्थसिद्धि तपोवनांत दडून बसला होता. पण चाणक्याने तपोवनांत देखील त्याचा वध करण्यास मागेपुढे पाहिलें नाही. नन्दांच्या घराण्याचा शेवटचा अंकुर अशा प्रकारें नष्ट झाल्यावर आता राक्षस कोणासाठी प्रयत्न करणार ? पण चाणक्याची कल्पना खोटी ठरली; आणि मलयकेतु नांवाच्या राजाशीं संगनमत करून आपला उद्योग राक्षसाने चालूच ठेविला आहे. एका दृष्टीने राक्षस चाणक्याला शक्य तेवढा त्रास देत आहे हें खरें असलें तरी राक्षसाची कर्तबगारी व त्याचे विविध गुण यांची चाणक्याला सतत जाणीव आहे. 'मंत्रिबृहस्पति' असें विशेषण वापरून चाणक्याने राक्षसाच्या बुद्धीचा केवढा गौरव केला आहे ! हा गौरव चाणक्याने एकान्तांत स्वगत भाषणांत केलेला असल्यामुळे त्याच्या भावनेचा खराखुरा आविष्कार त्यांतून झालेला आहे हें स्पष्ट दिसेल. आपल्या मालकाच्या सर्वस्वाचा नाश झाला, त्याच्या वंशाचा शेवटचा अंकुर देखील नष्ट झाला, तरी सुद्धा कृतज्ञ राहून राक्षस त्या घराण्याची मनोभावें सेवा करीत आहे हें फार अलौकिक कृत्य आहे याविषयीं चाणक्याची खात्री झाली आहे.[५] असला गुणी अमात्य चन्द्रगुप्ताच्या

---

४. सोऽहमिदानीमवसितप्रतिज्ञाभारोऽपि वृषलापेक्षया (वृषल—चन्द्रगुप्त) शस्त्रं धारयामि ।

५. भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासङ्गेन निःसङ्गया
भक्त्या कार्यधुरं वहन्ति कृतिनस्ते दुर्लभास्त्वादृशाः ।। (अंक १, श्लोक १४)

मदतीला आला तर त्याच्या वैभवांत कसलाहि उणेपणा राहाणार नाही असें चाणक्याला वाटत आहे.

## चाणक्यानें केलेलीं कारस्थानें

राक्षसाला काय वाटेल तें करून कोंडींत पकडलें पाहिजे, असा विचार करून चाणक्याने अनेक युक्त्यांचा अवलंब केला आहे. आपल्या स्वगतांत त्याने आपल्या प्रयत्नांचा सांगोपांग आढावा घेतला आहे. ( १ ) पर्वतक नांवाच्या एका राजाची मदत चाणक्याने नंदांच्या उच्छेदासाठी घेतली होती. राज्य मिळालें तर अर्धें तुला देऊं, असें वचनहि चाणक्याने त्याला दिलें होतें.[६] स्वाभाविकच पर्वतकाचा घात करण्यासाठी राक्षस धडपडत होता. याचा फायदा चाणक्याने घेतला. चन्द्रगुप्त किंवा पर्वतक यांच्यापैकी कोणाचाहि घात झाला तरी चाणक्याला अद्दल घडेल या कल्पनेने राक्षसाने विषकन्येच्या द्वारें बिचाऱ्या पर्वतकाचा वध केला अशी बातमी चाणक्याने आपल्या हेरांच्या मार्फत नगरांत प्रसृत केली.[७] (२) या बातमीवर लोकांचा विश्वास बसावा यासाठी चाणक्याने एक युक्ति योजिली. 'तुझ्या पित्याचा चाणक्याने कपटाने खून केला' असें भागुरायण नांवाच्या चाणक्याच्या एका विश्वासू व बुद्धिमान हेराने एकान्तांत मलयकेतूला ( पर्वतकाच्या पुत्राला ) सांगितलें. यामुळे मलयकेतु कमालीचा घाबरला. चाणक्य केव्हा तरी आपलाहि असाच विश्वासघात करील व आपल्याला ठार मारील अशी त्याला भीति वाटली, व तो तत्काळ कुसुमपुर सोडून दूर निघून गेला. यानंतर राक्षसाने मलयकेतूशीं संधान बांधलें, हें चाणक्याला समजलें आहे. तथापि बुद्धीच्या जोरावर मलयकेतूवर सहज मात करतां येईल यांत चाणक्याला कसलाहि संदेह वाटत नाही. पण मलयकेतूला चाणक्याने पकडलें असतें तर राक्षसाने कपटाने पर्वतकाचा वध केला ही बातमी गांवांत पसरल्यामुळे राक्षसाची जी बदनामी आपोआप झाली होती, ती नाहीशी झाली असती. आणि हेंच चाणक्याला नको होतें. म्हणून मलयकेतूला पकडून बंदींत टाकण्याचा मूर्खपणा त्याने केला नाही. ( ३ ) याच्या जोडीला चाणक्याने अनेक विश्वासू व बुद्धिमान हेरांची योजना केली आहे. हे सारे हेर काळजीपूर्वक पारखून घेतलेले आहेत. राज-

---

६. "......तस्मिन्नेव क्षणे पर्वतेश्वरभ्रातरं वैरोचकमेकासने चन्द्रगुप्तेन सहोपवेश्य कृतः पृथिवीराज्यविभागः ।" (अंक २–४१)

७. राक्षसाने विषकन्या पाठविली होती हें खरें आहे. पण ती पर्वतकाला मारण्यासाठी नसून चन्द्रगुप्तालाच मारण्यासाठी, हें त्याच्याच कबुलीवरून स्पष्ट होईल.

कन्या तस्य वधाय या विषमयी गूढं प्रयुक्ता मया
दैवात्पर्वतकस्तया स निहतो यस्तस्य राज्यार्धहृत् ।। (अंक २, श्लोक १६)

धानींत राक्षसाच्या बाजूचे लोक अजून जर कोणी असले तर त्यांची सारी माहिती या हेरांनी चाणक्याला तावडतोब कळवावयाची आहे. (४) नंदवंशावर प्रेम करणारे लोक आणि पूर्वीचे अमात्य यांच्या प्रत्येक हालचालीचा अगदी बारकाईने शोध करण्यांत चाणक्याने कोणतीहि कसूर केलेली नाही. (५) भद्रभट इत्यादि चन्द्रगुप्ताचे जे कळकळीचे सहकारी होते त्यांनी चाणक्याच्या सांगण्यावरून चन्द्रगुप्तावर रागावण्याचें नाटक केलें, आणि ते राजधानी सोडून निघून गेले व मलयकेतूला मिळाले. (६) चन्द्रगुप्ताचा घात करण्यासाठी राक्षसाने जे मारेकरी राजवाड्यांत सर्वत्र पेरून ठेवले होते त्यांचें कारस्थान चाणक्याने उघडकीला आणलें व त्यांना व्यवस्थित अद्दल घडविली. यानंतर चांगल्या विश्वासू लोकांनी सतत चन्द्रगुप्ताजवळ राहावें व त्याच्या प्राणाला जपावें अशी चाणक्याने व्यवस्था केली. (७) इन्दुशर्मा नांवाचा एक ब्राह्मण चाणक्याचा सहाध्यायी व मित्र होता. तो राजनीतींत व ज्योतिषशास्त्रांत पारंगत होता. चाणक्याने नंदवंशाच्या विनाशाची प्रतिज्ञा केली तेव्हाच त्याने या इन्दुशर्म्याला क्षपणकाचा (जैन भिक्षूचा) वेष घ्यावयास लावलें; व त्याने कुसुमपुरांत (पाटलिपुत्रांत) नन्दांच्या सर्व अमात्यांच्या बरोबर दोस्ती केली. राक्षसाची तर त्याच्यावर अगदी बहाल मर्जी बसली होती. या इन्दुशर्म्याकडे एक महत्त्वाची कामगिरी सोपविण्याचा चाणक्याचा विचार आहे. (ही कामगिरी नेमकी कोणती हें चाणक्याने या ठिकाणी स्पष्ट केलें नाही. प्रेक्षकांची उत्कण्ठा वाढावी यासाठीच नाटककाराने ही युक्ति योजिली आहे हें उघड आहे.)

## पर्वतकाचा खून व मलयकेतूचें पलायन

पर्वतकाच्या आणि मलयकेतूच्या बाबतींत चाणक्याने जीं कारस्थानें केलीं त्यांत त्याच्या बुद्धीचा प्रकर्ष दिसून येतो. पर्वतकाची त्याने भरपूर मदत घेतली व त्या मदतीच्या जोरावर नन्दांचा विनाश करणें त्याला सुलभ झालें. पर्वतकाच्या मदतीचा मोबदला म्हणून नन्दांच्या राज्याचा अर्धा भाग त्याला देण्याचें चाणक्याने कबूल केलें होतें. प्रत्यक्ष जय मिळाल्यावर व नन्दांचें राज्य हस्तगत झाल्यावर मात्र अर्धें राज्य पर्वतकाला देण्याचें चाणक्याच्या जिवावर आलें. एवढी धडपड करून राज्य मिळवलें, आणि त्याचा अर्धा भाग दुसऱ्याला द्यावा लागणार, हा विचार त्याला छळूं लागला. पर्वतकाचा कांटा काढणें हाच यांतून मार्ग होता. चन्द्रगुप्ताचा घात करण्यासाठी राक्षसाने विषकन्येची योजना केली हें त्याला समजलें, आणि ती विषकन्या पर्वतकाकडे जाऊन त्याचा घात करील अशी मोठ्या कौशल्याने चाणक्याने योजना केली.[८] पर्वत-

८. अंक २, श्लोक १५ पाहा.

काचा वध झाला. आणि राक्षसानें हें कपटी कारस्थान केलें अशी वातमी (चाणक्याच्या गुप्त हेरांच्या कर्तवगारीमुळे) नगरांत ज्याच्या त्याच्या तोंडीं झाली. पर्वतकाचा पुत्र मलयकेतु या वेळीं राजधानींतच होता. आपल्या पित्याचा राक्षसानें कपटानें घात केला अशी त्याचीहि कल्पना झाली असली पाहिजे. पण तो नगरांत राहणें चाणक्याच्या दृष्टीनें फार धोक्याचें होतें. त्याला पकडून तुरुंगांत टाकणें हेंहि धोक्याचें होतें. त्याला पकडलें असतें तर पर्वतकाचा घात चाणक्यानेंच केला असला पाहिजे, अशी लोकांना शंका आली असती. म्हणून चाणक्यानें त्याला पकडण्याची भानगड केली नाहीं. पण तो राजधानींत राहणें हेंहि बरें नव्हतें. कारण मग पर्वतकाला राज्याचा जो अर्धा भाग देण्याचें वचन चाणक्यानें दिलें होतें तो अर्धा भाग मलयकेतूला देण्याची पाळी आली असती. आणि चाणक्याला हें मुळींच नको होतें. म्हणून मलयकेतु आपण होऊन राजधानी सोडून निघून जाईल अशी युक्ति त्यानें योजिली. त्याचा विश्वासू हेर भागुरायण मलयकेतूकडे गेला. भागुरायणानें चाणक्याच्या सूचनेप्रमाणें उत्कृष्ट बतावणी केली. 'राक्षसानें तुमच्या पित्याचा घात केला हें खरें नसून या प्रकाराला चाणक्यच सर्वस्वीं जबाबदार आहे' असें भागुरायणानें मोठ्या चातुर्यानें मलयकेतूच्या मनांत भरवून दिलें. भागुरायण हा चाणक्याचा सेवक आहे हें मलयकेतूला माहीत होतें. प्रत्यक्ष चाणक्याच्या सेवकानें ज्याअर्थीं असली भयंकर गोष्ट सांगितली त्याअर्थीं ती विश्वसनीय असलीच पाहिजे असें स्वाभाविकच मलयकेतूला वाटलें. चाणक्याचें त्याला भय वाटूं लागलें. हा आपलाहि एक दिवस असाच कांटा काढील हा विचार त्याला स्वस्थ वसूं देईना. आणि एक दिवस राजधानी सोडून तो पळून गेला. यामुळे चाणक्यानें किती गोष्टी साधल्या पाहा. पर्वतकाच्या मृत्यूची जबाबदारी टाळली, ती राक्षसावर ढकलली, आणि पर्वतकाला किंवा मलयकेतूला राज्याचा अर्धा वाटा द्यावा लागला असता तो वाचवला.[१]

---

१. दुसऱ्या अंकातील राक्षसाचा पुढील उद्‌गार पाहा.

परिहृतमयशः पातितमस्मासु च घातितोऽर्धराज्यहरः ।
एकमपि नीतिबीजं बहुफलतामेति यस्य तव ॥

(अंक २, श्लोक १९)

तिसऱ्या अंकांतील खुद्द चाणक्याचें स्पष्टीकरण पाहा.

"निग्रहे तावत् पर्वतकोऽस्माभिरेव व्यापादितः इति कृतघ्नतायाः स्वहस्तो दत्तः स्यात् । प्रतिश्रुतराज्यार्धप्रतिपादनेऽपि पर्वतकविनाशः केवलं कृतघ्नतामात्रफलः स्यादिति मलयकेतुरपक्रामन्नुपेक्षितः ।" (अंक ३-८३)

## कारभाराविषयीं चंद्रगुप्ताचें औदासीन्य

तात्पर्य, आपल्याकडून शक्य तितकी खबरदारी घेतली आहे असें वाटून चाणक्य समाधानाचा सुस्कारा सोडतो. त्याला एकाच गोष्टीचा खेद वाटत आहे. राज्याची सारी जबाबदारी चाणक्यावर सोपवून चन्द्रगुप्त मोकळा झाला आहे, राज्यकारभारांत तो खरें लक्ष घालीत नाही, हेंच एक त्याच्या दृष्टीने वैगुण्य आहे. पण अपार कष्ट करणाऱ्या राजाला राज्यवैभवाचा खरा उपभोग तरी कसा घेतां येणार ? दुसऱ्याने कोणी तरी राज्याची दैनंदिन जबाबदारी पतकरावी, आणि आपण सुखोपभोगांत मग्न असावें, ही स्थिति कोणता राजा स्पृहणीय मानणार नाही ! असें समाधान मानून चन्द्रगुप्ताच्या राज्यकारभाराच्या बाबतींतील औदासीन्याकडे चाणक्य दुर्लक्ष करीत आहे.[१०]

## चंद्रगुप्ताचे तीन वैरी

चाणक्य विचारमग्न असतांनाच यमपट दाखवून गाणीं म्हणणाऱ्याचें सोंग घेऊन नगरांत फिरणारा निपुणक नांवाचा चाणक्याचा हेर येतो. त्याने नगरांतून कांही महत्वाची बातमी आणली आहे. चाणक्याने मोठ्या धोरणाने लोक नाराज होणार नाहीत अशी व्यवस्था केलेली असल्यामुळे एकंदरींत लोक चन्द्रगुप्ताच्या राज्यावर खूष आहेत. पण चन्द्रगुप्ताचें वैभव ज्यांना पाहवत नाही असे तीन लोक नगरांत आहेत असें निपुणकाला कळलें आहे. हे तिघेहिं पहिल्यापासूनच राक्षसाचे जिवलग दोस्त आहेत, अशीहि माहिती निपुणकाला समजली आहे. चन्द्रगुप्ताचें वैभव ज्यांना सहन होत नाही त्यांना आपला जीव नकोसा झाला असला पाहिजे हें उघड आहे. या तीन राजद्रोही असामींची निपुणकाला समजलेली माहिती अशी आहे— ( १ ) जीवसिद्धि नांवाचा क्षपणक पहिल्यापासून राक्षसाशीं संगनमत करून आहे. राक्षसाने चिथावल्यावरून या क्षपणकाने विषकन्येच्या द्वारें पर्वतकाचा कपटाने घात केला. ( हा जीवसिद्धि क्षपणक म्हणजे दुसरा कोणी नसून चाणक्याचा प्रियमित्र इन्दुशर्मा नांवाचा ब्राह्मण होता ! निपुणक हा चाणक्याचा बुद्धिमान हेर आहे. पण जीवसिद्धि हा चाणक्याचाच हेर आहे, हें मात्र निपुणकाला माहीत नाही. तो राक्षसाचा जिवलग दोस्त आहे अशीच निपुणकाची प्रामाणिक समजूत आहे. चाणक्याची हेरांची संस्था किती कार्यक्षम होती याचाच हा पुरावा आहे. राक्षसाने पर्वतकाचा वध करविला अशीच निपुणकाची समजूत आहे. निपुणकाने

१०. तदेवमसत्तो न किंचित्परिहास्यते । वृषल एव केवलं प्रधानप्रकृतिरस्मास्वारोपितराज्यतंत्रभारः सततमुदास्ते । अथवा यत् स्वयमभियोगदुःखैरसाधारणैरपाकृतं तदेव राज्यं सुखयति । ( अंक १-२१ )

सांगितलेली हकिकत ऐकून चाणक्य मनांतल्या मनांत हसत असला पाहिजे!) (२) शकटदास नांवाचा एक कायस्थ राक्षसाचा परममित्र असून तो चन्द्रगुप्ता-विरुद्ध कारस्थानें करीत असतो. (कायस्थ हा बोलूनचालून अगदीच मामुली माणूस. त्याला भिण्याचें कांही कारण नसलें तरी चाणक्याने धूर्तपणाने सिद्धार्थक नांवाचा आपला विश्वासू हेर त्याच्या मागावर ठेवला होता. सिद्धार्थकाने शकट-दासाशीं चांगलीच दोस्ती जमविली होती.) (३) पुष्पचत्वरांत चंदनदास नांवाचा जो जवाहिऱ्या आहे तो राक्षसाचा जणू जीव कीं प्राण आहे. राक्षस कुसुमपुरांतून निघून गेला तेव्हा त्याने आपली बायको या चंदनदासाच्याच घरीं गुप्तपणाने ठेवली. (आपली बायको ज्या अर्थी राक्षसाने चंदनदासाच्या घरीं ठेवली त्या अर्थी तो राक्षसाचा अतिशय निकटचा मित्र असला पाहिजे हें दुसऱ्या कोणी चाणक्याला सांगण्याची मुळीच गरज नाही.)

## राक्षसाची मुद्रा चाणक्याच्या हातीं

चाणक्याच्या दृष्टीने चंदनदासाविषयींची माहिती सर्वांत महत्त्वाची आहे. राक्षसाची बायको चंदनदासाच्या घरीं आहे यापेक्षा अधिक महत्त्वाची बातमी कोणती असूं शकेल? पण ही बातमी निपुणकाला कळली कशी? त्याचें असें झालें--

गाणीं म्हणत निपुणक नगरांतून फिरत होता. त्याच्या वेषामुळे कोणत्याहि घरांत त्याला मज्जाव नव्हता. हिंडतां हिंडतां तो चंदनदासाच्या वाड्यांत शिरला, आणि यमपट पसरून गाणीं म्हणूं लागला. इतक्यांत सुमारें पांच वर्षांचा एक मुलगा एका खोलींतून काय आहे तें पाहाण्यासाठी बाहेर धावत येऊं लागला. लगेच बायकांचा ओरडा ऐकूं आला. एका बाईने (ही राक्षसाची बायको होती.) त्या मुलाला चटूकन आंत ओढलें. (हा मुलगा राक्षसाचाच.) या गडबडींत त्या बाईच्या बोटांतून एक अंगठी निसटली, ती खाली पडली, आणि घरंगळत निपुणक होता त्या जागीं येऊन थांबली. अंगठी सैल असल्यामुळे ती पडली हें त्या बाईच्या ध्यानांत आलें नाही. त्या अंगठीवर अमात्य राक्षसाचें नांव कोरलेलें दिसतांच निपुणकाला धन्यता वाटली, आणि ती अंगठी घेऊन तो तसाच चाणक्याकडे आला.

राक्षसाची बायको गुप्तपणें चंदनदासाच्या घरीं राहत आहे, ही बातमी फार महत्त्वाची होती यांत शंकाच नाही. पण प्रत्यक्ष राक्षसाचें नांव असलेली अंगठी (मुद्रा) हातीं येणें ही त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. राज्य-

कारभारांत पत्रांवर शिक्कामोर्तब करण्यासाठी जी अंगठी राक्षस वापरीत असे तीच आता चाणक्याच्या हातांत आलेली आहे.[११]

राक्षसाचा शिक्का ('सील') हातांत आल्यामुळे चाणक्याला उत्कट हर्ष होणें अगदी स्वाभाविक आहे. एखादें महत्त्वाचें राजकीय पत्र लिहून त्यावर राक्षसाचा हा शिक्का उठविला म्हणजे झालें. राक्षसाला गोत्यांत आणण्याचें केवढें नामी साधन निपुणकाच्या कर्तबगारीने (अथवा खरें म्हणावयाचें तर अनुकूल दैवाच्या कृपेने !) चाणक्याच्या हातांत आलें आहे ! या साधनाचा योग्य तो उपयोग करून घेतला नाही तर चाणक्याची मातब्बरी ती काय राहिली ?

## पर्वतकाच्या अलंकारांची प्राप्ति

एक क्षण जाण्यापूर्वीच पत्र लिहून घेऊन त्यावर राक्षसाची मुद्रा उठविण्याचा चाणक्याचा बेत पक्का झाला आहे. घाईघाईने तो शिष्याला हाक मारतो आणि त्याला शाई व भूर्जपत्र आणावयास सांगतो. राक्षस ज्यायोगें निश्चितपणें सापळ्यांत अडकेल असाच मजकूर त्याला पत्रांत लिहावयाचा आहे.[१२]

बनावट पत्र तयार करून त्याच्यावर राक्षसाच्या अंगठीने शिक्कामोर्तब करावयाचा त्याचा निर्धार होतो न होतो तोंच द्वारपालिका येते व चंद्रगुप्ताचा निरोप चाणक्याला सांगते. पर्वतेश्वराचें और्ध्वदैहिक करावें व त्या निमित्ताने त्याच्या अंगावरील दागिने ब्राह्मणांना दान करावे अशी चंद्रगुप्ताची इच्छा आहे, आणि त्यासाठी त्याला चाणक्याची अनुज्ञा हवी आहे. निरोप ऐकतांच चाणक्याला हर्ष होतो. एक विलक्षण कल्पना त्याच्या मनांत चमकून गेली आहे. पण आपला आनंद तो द्वारपालिकेला दिसून देत नाही. अगदी गंभीरपणें तो उलट निरोप पाठवतो. पर्वतेश्वराचे दागिने ब्राह्मणांना दान करावयास मुळीच हरकत नाही. पण हे ब्राह्मण सत्पात्र मात्र असावेत. एवढ्यासाठी स्वतः चाणक्यच असे सत्पात्र ब्राह्मण चंद्रगुप्ताकडे पाठविणार आहे.

---

११. स्वतःचें नांव जिच्यावर कोरलेलें आहे अशी अंगठी नेहमी आपल्याजवळ अगदी सुरक्षित असली पाहिजे, ती फार जबाबदारीची वस्तु आहे, हें राक्षसाला माहीत असलेंच पाहिजे. अशा स्थितींत नगरांतून बाहेर जाण्यापूर्वी ही अंगठी त्याने आपल्या बायकोला दिलीच कशी, याचा उलगडा होत नाही. "सत्यं नगरान्निष्क्रामतो मम हस्ताद् ब्राह्मण्या उत्कण्ठाविनोदार्थं गृहीता" असें राक्षस दुसऱ्या अंकांत म्हणतो (अंक२-१०३). तथापि ही अंगठी त्याने बायकोला द्यावयास नको होती.

१२. अनेन खलु लेखेन राक्षसो जेतव्यः । (अंक १-६५)

चन्द्रगुप्ताला सदर निरोप पाठवल्यानंतर लगेच तो आपल्या वर्गातल्या तीन ब्राह्मणांना निरोप पाठवितो. या ब्राह्मणांनी चन्द्रगुप्ताकडून पर्वतकाचे अलंकार घ्यावयाचे व ते चाणक्याला आणून द्यावयाचे असा त्याने मनसुबा रचला आहे. पर्वतक हा मलयकेतूचा पिता, आणि सध्या मलयकेतु व राक्षस यांची दोस्ती आहे. यामुळे या संधीला पर्वतकाचे दागिने हातीं आले तर राक्षसाला जाळ्यांत पकडण्याचा चाणक्याचा डाव सहज सिद्धीला जाईल हें उघड आहे.

## शकटदासाकडून लिहवून घेतलेलें बनावट पत्र

पर्वतकाचे दागिने हस्तगत करण्याची चोख योजना केल्यानंतर चाणक्य त्या बनावट पत्रांतील मजकूर जुळवूं लागतो. कुलूत देशाचा चित्रवर्मा, मलयाचा राजा सिंहनाद, काश्मीरचा राजा पुष्कराक्ष, सिंधु देशाचा राजा सिन्धुषेण, पारसीकांचा राजा मेघ, हे पांच म्लेच्छ राजे राक्षसाचे जिवलग दोस्त आहेत ही माहिती चाणक्याला आपल्या विश्वासू हेरांकडून कळली आहे. हे राजे विशेष प्रबळ असले पाहिजेत असें चाणक्य त्यांचा घात करण्याचा मनसुबा रचीत आहे यावरून वाटतें. बनावट पत्रांत यांचीं नांवें स्पष्ट लिहावीं असें एकदा त्याला वाटतें. पण लगेच तो विचार बदलून सारा मजकूर अगदी मोघम ठेवावा, कोणाचेंहि नांव लिहूं नये असें तो ठरवतो.

पत्रांतील मजकूर मोघम ठेवण्याचें त्याने कां ठरवलें याचा लगेच उलगडा झाला आहे. हें पत्र त्याला शकटदासाकडून लिहवून घ्यावयाचें आहे. शकटदास हा राक्षसाचा प्रिय मित्र असल्यामुळे त्याच्या हस्ताक्षरांत तें पत्र लिहवून घेतलें आणि त्यावर राक्षसाच्या अंगठीने मोर्तब केलें की पत्र अगदी अधिकृत व विश्वसनीय झालें ! पण मग चित्रवर्मा इत्यादि राजांच्या नांवाचा उल्लेख करतां येणें शक्य नाही. कारण शकटदास राक्षसाचा मित्र असल्यामुळे राक्षसाच्या मर्जीतील या राजांची त्याला माहिती असलीच पाहिजे. अशा स्थितींत या राजांचा उल्लेख पत्रांतील मजकुरांत आला तर शकटदासाला जबर शंका येईल व तो पत्र लिहून देणार नाही हें उघड आहे. म्हणून पत्रांतील मजकूर मोघम ठेवावयाचा आहे.

पण शकटदास हें असलें बनावट पत्र लिहावयास तयार होईलच कसा ? चाणक्याच्या दृष्टीने हें अगदी सोपें काम आहे. त्याचा विश्वासू व बुद्धिमान हेर सिद्धार्थक हा शकटदासाचा जिवलग मित्र होता.[१३] सिद्धार्थकासारख्या

१३. तस्मिन् मया सुहृच्छद्मना सिद्धार्थको विनिक्षिप्तः । (अंक १–५२)

मित्राने एखादें पत्र लिहिण्यास सांगितलें तर शकटदास नाही म्हणावयाचा नाही असा चाणक्याचा होरा होता, आणि तो खरा ठरलाहि.

या पत्राच्या मदतीने राक्षस आणि मलयकेतु या दोघांना गोत्यांत आणावयाचा चाणक्याचा बेत आहे. त्याच्या सूचनेप्रमाणें सिद्धार्थक शकटदासाकडून पत्र लिहवून घेऊन तें चाणक्याच्या ताब्यांत देतो.[१४] चाणक्याच्या सूचनेवरून सिद्धार्थक त्या पत्रावर राक्षसाच्या अंगठीने मोर्तब करतो.

### शकटदासाला राक्षसाकडे पाठविण्याची योजना

चाणक्याचें कारस्थान आता रंगत चाललें आहे. ज्या बनावट पत्राचा उपयोग चाणक्य राक्षसाच्या व मलयकेतूच्या विरुद्ध करून घेणार आहे त्यावर राक्षसाचा शिक्का आहे, आणि शकटदास त्या पत्राचा लेखक आहे. शकटदास राक्षसाच्या जवळ असला, आणि ती अंगठीहि राक्षसाच्या ताब्यांत असली, तर तें पत्र बनावट आहे असें म्हणावयाची खुद्द राक्षसाची सुद्धा प्राज्ञा होणें शक्य नाही. हा माझा शिक्का नाही असें त्याला कसें म्हणतां येईल ? आणि शकटदास हा त्याचा निकटवर्ती मित्र. तेव्हां त्याचें हें अक्षर नाही असें तरी त्याला कसें म्हणतां येईल ? तात्पर्य, जेव्हा तें पत्र उघडकीला येईल तेव्हा तें मोघम भाषेंत असलें तरी राक्षसाने सांगितल्यावरून त्याच्या प्रिय मित्राने तें लिहिलें, व त्यावर राक्षसानेच शिक्कामोर्तब केलें असेंच सिद्ध होईल—राक्षसाला पत्राविषयींची जबाबदारी टाळतां येणेंच शक्य होणार नाही, असा चाणक्याचा अंदाज असला पाहिजे.

राक्षसाचें व मलयकेतूचें भवितव्य निश्चित करणारें तें पत्र बंद करून सिद्धार्थकाच्या ताब्यांत दिल्यावर कारस्थानाचा उरलेला भाग चाणक्य पुरा करतो. राक्षसाची अंगठी त्याच्या ताब्यांत गेली पाहिजे, आणि शकटदासहि राक्षसाच्या संनिध राहिला पाहिजे, हा कारस्थानाचा उरलेला भाग आहे.

कारस्थानाचा बारीकसारीक तपशील चाणक्याच्या मनांत किती त्वरेने तयार होतो हें पाहण्यासारखें आहे. शकटदासाला राक्षसाजवळ पोचतें करण्याचें त्याने ठरविलें आहे. शकटदासाच्या इच्छेचा हा प्रश्नच नाही. त्याने गेलेंच

---

१४. शकटदासाने लिहिलेलें हें पत्र पांचव्या अंकांत (५–६९) समग्र वाचावयास मिळेल. पत्र सारें मोघम आहे हें खरें आहे. तथापि तें राजनैतिक कारस्थानासंबंधींच असल्यामुळे शकटदासाने लिहिलेंच कसें याचें नवल वाटतें. शिवाय 'वाचिकं च आप्ततमादस्मात् सिद्धार्थकात् श्रोतव्यम्' असा सिद्धार्थकाचा स्पष्ट उल्लेख त्यांत आहे. कोणता उपद्व्याप करून सिद्धार्थकाने शकटदासाला बनविलें तें कळत नाही.

पाहिजे. शकटदासाला राजद्रोहाच्या आरोपावरून सुळीं द्यावयाचा हुकूम करण्याचें त्याने योजिलें आहे. पण प्रत्यक्ष तसा हुकूम देण्याच्या आंतच सिद्धार्थकाला पुढच्या कारस्थानाचा सारा तपशील त्याने सांगून टाकला आहे.

सिद्धार्थकाने सुळीं देण्याच्या ठिकाणीं जावयाचें, तेथील मांगांना विशिष्ट खूण करावयाची, त्या खुणेचा अर्थ ध्यानांत घेऊन घाबरल्याचें सोंग करून मांग पळून गेल्यावर शकटदासाची सुटका करावयाची, आणि त्याला तडक राक्षसाकडे घेऊन जावयाचें; आपल्या प्रिय मित्राचे प्राण याने वाचविले हें ध्यानांत घेऊन राक्षस जें पारितोषिक देईल तें सिद्धार्थकाने ताबडतोब घ्यावयाचें, आणि विशेष म्हणजे कांहीं दिवस राक्षसाच्याच तैनातींत राहावयाचें—असा चाणक्याच्या पुढील कारस्थानाचा तपशील ठरला आहे.

## सिद्धार्थकाने करावयाचीं कारस्थानें

आणखी एक महत्त्वाची गोष्ट चाणक्य सिद्धार्थकाला सांगण्याच्या बेतांत आहे, पण तिचा तपशील प्रेक्षकांना आताच कळावयाचा नाही. शत्रूचें सैन्य कुसुमपुराजवळ आलें म्हणजे कांहीं तरी विशेष महत्त्वाची गोष्ट करावयाची आहे असें चाणक्य सिद्धार्थकाला सांगतो. पण पुढचा मजकूर तो सिद्धार्थकाच्या कानांत सांगत असल्यामुळे त्या गोष्टीची नेमकी कल्पना या ठिकाणीं प्रेक्षकांना येत नाही. प्रेक्षकांची उत्कंठा वाढविण्याचा आणखी एक प्रयत्न. सिद्धार्थकाच्या कानांत चाणक्याने जें सांगितलें आहे त्याचा सर्व उलगडा पांचव्या अंकांत होणार आहे.

राक्षस आणि मलयकेतु यांच्यामध्ये अगदी ऐन वेळीं कमालीचें वितुष्ट यावें यासाठी चाणक्य त्या बनावट पत्राचा उपयोग करून घेणार आहे. मलयकेतूचें सैन्य कुसुमपुरापासून एकदोन मुक्कामांच्या अंतरावर येऊन ठेपलें असतां सिद्धार्थक छावणींतून निसटून जाण्याचा प्रयत्न करतो. पण त्याला पकडतात. त्याच्याजवळ तें पत्र सापडतें. आणि चन्द्रगुप्ताला देण्यासाठी राक्षसाने हें पत्र माझ्याजवळ दिलें असें तो निगरगट्टपणें म्हणतो. खुद्द राक्षसाच्या तोंडावरहि तो हेंच सांगतो. पत्रावर राक्षसाचा शिक्का, आणि अक्षर शकटदासाचें, यामुळे पत्राच्या खरेपणाविषयीं मलयकेतूच्या मनांत कसलीहि शंका राहत नाही. आणि अशा प्रकारें राक्षसाने आपला केसाने गळा कापला याविषयीं मलयकेतूची पक्की खात्री होते. गोष्टी कोणत्या रीतीने घडून येतील याचा जो अंदाज चाणक्य बांधतो तो अगदी तंतोतंत खरा होतो हें सिद्धार्थकाला त्याने दिलेल्या सूचनांवरून स्पष्ट होईल.

## जीवसिद्धि व शकटदास यांच्या शिक्षेचें नाटक

नगरांतील तीन असामी चन्द्रगुप्ताचें वैर करीत आहेत ही माहिती चाणक्याला निपुणकाकडून कळली होती. या तीन लोकांना शासन करण्याचा बेत चाणक्य आता कृतींत आणीत आहे. क्षपणक जीवसिद्धि याने राक्षसाच्या सांगण्यावरून विषकन्येच्या द्वारें पर्वतकाचा घात केला म्हणून त्याची धिंड काढून नगरांतून हाकलून देण्याचा हुकूम दिला आहे. ( हा जीवसिद्धि चाणक्याचा विश्वासू मित्र आहे; म्हणून त्याला राजधानींतून हाकून देण्याची अगदी सौम्य शिक्षा मिळाली आहे. गंमत ही की, राक्षस सुद्धा या क्षपणकाला आपला प्रिय मित्र मानीत होता आणि चाणक्याच्या हालचालीची बातमी काढण्यासाठीच राक्षसाने त्याला राजधानींत ठेवलें होतें,[१५] हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. चाणक्याच्या हेरांनी राक्षसाला सर्व बाजूंनी घेरलें होतें व त्यांनी त्याच्या काळजाला हात घातला होता याचेंच हें निदर्शक आहे. ).

शकटदास चन्द्रगुप्ताचा घात करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो अशा आरोपावरून त्याला सुळीं देण्याचा व त्याच्या घरांतील माणसांना तुरुंगांत टाकण्याचा हुकूम झाला आहे. ( शकटदासाला सुळावरून सोडवून त्याला राक्षसाकडे घेऊन जाण्याची कामगिरी सिद्धार्थकाकडे सोपविली आहे. कामगिरी सुलभ व्हावी म्हणून शकटदासाला वध्यस्थानीं घेऊन जाण्याचें नाटक यथास्थित पार पाडणें भागच आहे. ) शकटदासाने लिहिलेलें व राक्षसाचा शिक्का असलेलें पात्र चाणक्य सिद्धार्थकाच्या ताब्यांत देतो, आणि सिद्धार्थक शकटदासाची पुढची व्यवस्था करण्यासाठी निघून जातो. सांगितलेली प्रत्येक गोष्ट जशीच्या तशी करून सिद्धार्थक आपली कामगिरी अगदी चोख बजावणार यांत चाणक्याला कसलाहि संशय नाही.

## चंदनदासासाठी तयार केलेला सापळा

चंदनदासाच्या घरीं आपली बायको सुरक्षित राहील असा विचार करून राक्षस निर्धास्तपणें राजधानी निघून सोडून गेला होता. आपण चाणक्याचा फार भयंकर अपराध करीत आहोंत याची चंदनदासाला चांगली जाणीव होती. परंतु मित्रावरील उत्कट प्रेमामुळे तो हा धोका पतकरावयास तयार होता. आज ना उद्या केव्हा तरी चाणक्याला ही बातमी कळेल, व तो आपल्या घराची

---

१५. खुद्द राक्षसाची ही साक्ष पाहा—

‘ प्रतिक्षणमरातिवृतान्तोपलब्धये तत्संहतिभेदनाय च व्यापारिताः सुहृदो जीवसिद्धिप्रभृतयः । ’ ( अंक २–२ )

झडती घेईल हीहि कल्पना चंदनदासाला होती. यामुळे कोणत्याहि संकटाला तोंड देण्याची त्याच्या मनाने तयारी करून ठेवली आहे. आपल्या पश्चात् चाणक्याने घराची झडती घेतली तर राक्षसाची वायको त्याच्या हातीं सापडेल ही कल्पना असल्यामुळे कांही बाका प्रसंग येण्याचा धोका दिसल्याबरोबर राक्षसाच्या वायकोला तावडतोब दुसऱ्या एखाद्या सुरक्षित ठिकाणीं घेऊन जाण्याची सूचना त्याने आपल्या एकनिष्ठ मित्रांना देऊनहि ठेवलेली होती.

आणि अपेक्षेप्रमाणें चाणक्याचें बोलावणें आलेंच. आपल्या अपराधाची जाणीव असल्यामुळे, आणि चाणक्याशीं गांठ असल्यामुळे, चंदनदास मनांत हादरला असला तर तें स्वाभाविक आहे.

राक्षसाची वायको चंदनदासाने आपल्या ताब्यांत द्यावी अशी चाणक्याची धडपड असल्यामुळे चंदनदास एकदम बिथरूं नये म्हणून चाणक्य जपत आहे. चंदनदास येतांच चाणक्य शिष्टाचाराचें व सौजन्याचें भरपूर नाटक करतो. नाटकीपणा चाणक्याच्या रोमरोमांत भिनलेला असल्यामुळे त्याला हें सहज जमतें. चाणक्यासारख्या बड्या माणसाने आपल्यासारख्या अगदी सामान्य माणसाला इतका विलक्षण मान द्यावा याचें चंदनदासाला नवल वाटतें, आणि याच्या पोटांत कांही तरी कपट असल्याखेरीज हा इतकें सौजन्य दाखविणें शक्य नाही असें वाटून तो खाली जमिनीवर बसूं लागतो; पण फार आग्रह करून चाणक्य त्याला आपल्याजवळ आसनावर बसावयास लावतो.

आणि कमालीच्या नाटकीपणाने चाणक्य त्याच्याशीं अतिशय आपुलकीने बोलूं लागतो. त्याच्या व्यापाराविषयीं कळकळीने चौकशी करतो. ही कळकळ जरा फाजीलच आहे असें वाटून चंदनदास शक्य तेवढी सावधगिरी बाळगत आहे. पण चाणक्याच्या धूर्तपणापुढे तो किती वेळ टिकाव धरूं शकणार ? त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवतां यावा यासाठी चाणक्याची सारी धडपड चाललेली आहे. "चन्द्रगुप्ताच्या ठिकाणीं असलेल्या अनेक दोषांमुळे राजधानींतील लोकांना नंद राजांच्या गुणांची प्रतिक्षणीं आठवण होत असेल नाही ?" असें चाणक्य एकदम चंदनादासाला विचारतो. हा मोठा विचित्र सापळा आहे. 'होय' असें उत्तर चंदनदासाने दिलें तर तो उघड उघड राजद्रोह ठरेल. आणि 'नाही' असें उत्तर दिलें तरी चंदनदास खोड्यांत अडकत आहे. प्रजेला नंदांची आठवण होत नाही असें म्हटलें तरी 'चन्द्रगुप्ताच्या ठायीं दोष आहेत' हा भाग चंदनदासाला मान्य आहे असें ठरेल, आणि त्याची राजद्रोहांत गणना होईल. कांहीहि उत्तर दिलें तरी चंदनदास

अडचणींत सापडलाच पाहिजे अशी खात्री असल्यामुळे चाणक्याने धूर्तपणाने हा प्रश्न विचारला आहे.[१६]

पहिल्याच फेरींत आपण चंदनदासाला नेस्तनाबूत करूं ही चाणक्याची आशा मात्र सफळ होत नाही. चाणक्याने जो खोडा तयार केला होता त्यांत चंदनदास अडकत नाही, आणि या क्षणापुरती तरी चाणक्याला हार खावी लागते. 'चंद्रगुप्तावर प्रजेचें निरतिशय प्रेम आहे' असें तो तत्काळ उत्तर देतो. ज्याअर्थी प्रजेचें चंद्रगुप्तावर प्रेम आहे त्याअर्थी मागच्या राजांच्या गुणांची आठवण करण्याचा प्रश्नच मुळीं उद्भवत नाही, असा चंदनदासाचा अभिप्राय आहे. चंदनदानाने मोठ्या कौशल्याने या वेळेपुरती तरी चाणक्याच्या तावडींतून आपली सुटका करून घेतली आहे.

पण ज्याच्याशीं सामना देण्याची पाळी चंदनदासावर आली आहे तो मनुष्य सामान्य नाही. असे कैक चंदनदास त्याने आतापर्यंत जमीनदोस्त करून टाकले असतील. क्षणभर पराभव झाला तरी चाणक्य तो चाणक्य! त्याने लगेच दुसरा पेच टाकला आहे. चंदनदास म्हणतो त्याप्रमाणें लोक जर चन्द्रगुप्तावर खरोखरच संतुष्ट असतील तर त्यांच्यापासून चन्द्रगुप्तालाहि उलट कांही अपेक्षा असणें स्वाभाविक आहे, असें चाणक्य म्हणतांच आपल्याकडून बरेंच धन मिळावें ( चंदनदास खूप श्रीमंत जवाहिऱ्या आहे. ) अशी चाणक्याची अपेक्षा असावी अशी चंदनदासाची स्वाभाविकच कल्पना होते. आणि, 'किती धन पाहिजे ?' असें तो तावडतोब विचारतो. पैशाची गोष्ट काढतांच चाणक्य त्याला दटावतो. नन्द राजे प्रजेकडून द्रव्य उकळीत असतील, पण हें राज्य नंदांचें नसून चन्द्रगुप्ताचें आहे, चन्द्रगुप्त प्रजेकडून कधीहि लाच घेत नसतो, राज्यांतील लोक सुखांत असले म्हणजे त्याला खरें सुख आहे, अशी झणझणीत चपराक तो चंदनदासाला लगावतो. राज्यांतील लोक सुखांत केव्हा राहतील ? ते राजाच्या विरुद्ध वर्तन करणें सोडून देतील

१६. 'अलीकडे तूं खोटें बोलण्याचें सोडून दिलें आहेस का ?' या प्रश्नासारखाच चाणक्याचा प्रश्न आहे. 'हो' असें उत्तर दिलें तर पूर्वी खोटें बोलत होतों, आता तें सोडून दिलें आहे, असा अर्थ होतो. 'नाही' असें उत्तर दिलें तर पूर्वी खोटें बोलत होतों आणि आताहि तेंच करीत आहें, असा कबुलीजबाब होतो. या खोड्यांतून सुटकेचा मार्ग म्हणजे, 'मागे कधीहि मीं खोटें बोललों नाही, आणि आताहि खोटें बोलत नाही, यामुळे खोटें बोलणें सोडून देण्याचा प्रश्नच मुळीं उद्भवत नाही' असें रोखठोक उत्तर देणें. चंदनदासाने असेंच केलें आहे.

तेव्हाच ! असें सूतोवाच चाणक्य करतो. चंदनदासाचा गुन्हा त्याच्या पदरांत घालण्याची चाणक्याची धडपड चाललेली आहे. एवढ्या कर्तबगार राजाला विरोध करण्याची कुणाची छाती आहे? असें चंदनदासाने विचारल्याबरोबर ' खुद्द तूं राजाला विरोध करीत आहेस ' असा स्पष्ट आरोप चाणक्य करतो. चंदनदास गांगरतो, पण तो धीर सोडीत नाही. ' माझ्यासारखा क्षुद्र माणूस सम्राटाला कसला विरोध करणार ? ' असें बोलून[१७] तो बाजू सावरून घेण्याचा दुबळा प्रयत्न करतो. पण त्यांत त्याला यश येत नाही. ' राक्षसाची बायको तूं आपल्या घरांत दडवून ठेवली आहेस,' असा अधिक स्पष्ट आरोप चाणक्याने केल्याबरोबर चंदनदास साफ कानांवर हात ठेवतो.

चंदनदास कबूल करावयास तयार नाही असें दिसतांच चाणक्य मोठ्या धूर्तपणाने पवित्रा बदलतो. नुसती धमकी दिली तर हा कबूल करावयाचा नाही, युक्तीनेच त्याच्याकडून गुपित काढून घेतलें पाहिजे, असें ठरवून तो चढलेला आवाज सौम्य करतो व गोडीगुलाबीने बोलूं लागतो. चंदनदासाने घाबरण्याचें कांहीहि कारण नाही; पराभूत झालेल्या राजाचे अधिकारी घाबरून नगर सोडून पळून जाण्याची धडपड करतात; गडबडींत आपलीं मुलेंमाणसें बरोबर नेणें त्यांना जमत नाही; मग कोणाच्या तरी घरीं मुलेंमाणसें ठेवणें त्यांना भाग पडतें; आणि अनेक वेळां नागरिकांना स्वतःच्या इच्छेच्या विरुद्ध जाऊनहि हें पतकरावें लागतें. एखाद्या माणसाच्या इच्छेला न जुमानतां जर अधिकाऱ्याने आपलीं बायकामुलें सक्तीने त्याच्या घरांत आणून ठेवलीं तर तो काय करूं शकणार ? त्याचा नाइलाज होतो. अशा गोष्टी बाका प्रसंग आला असतां नेहमी घडतात. तात्पर्य, पूर्वीच्या राजाच्या अधिकाऱ्यांचीं मुलेंमाणसें अशा प्रकारें एखाद्याच्या घरीं असतीलहि. पण यांत त्याचा दोष मुळीच नाही. इच्छे-विरुद्ध जी गोष्ट करणें भाग पडतें तिची जबाबदारी त्या माणसावर लादतां येत नाही. येथपर्यंत त्याचा कांहीहि अपराध नाही. त्याने ती गोष्ट राजाच्या कानांवर घातली नाही आणि ती गुप्त ठेवली तरच त्याचा गुन्हा होईल, एरवी नाही.

## चंदनदासाचा अलौकिक त्याग

चाणक्याची मात्रा बरोबर लागू पडली आहे. 'माझ्या इच्छेविरुद्ध राक्षसाने आपल्या कुटुंबांतील माणसें माझ्या घरीं ठेवलीं, माझा अगदी नाइलाजच झाला,' असें कबूल करतांच आपण सुटून जाऊं अशी चंदनदासाची भोळी समजूत होते. आणि ' राक्षसाचीं माणसें त्या वेळीं माझ्या घरीं होतीं हें खरें आहे ' असें तो चटकन बोलून जातो. अगदी थोड्या वेळापूर्वी त्याने साफ

१७. शान्तं पापम् । कीदृशस्तृणानामग्निना सह विरोधः । ( अंक १-१२२ )

८८८७

कानांवर हात ठेवले होते, आणि आता 'माणसें होतीं' असें तो म्हणतो. म्हणजे तो खोटें बोलला. आणि चाणक्य हें कसें सहन करील! तो चंदनदासाच्या पदरांत त्याच्या खोटेपणाचें माप घालतो. आपण परस्परविरुद्ध विधानें केलीं हें कबूल करण्याखेरीज चंदनदासाला गत्यंतर नाही. पण हा खोटेपणा चंद्रगुप्ताच्या राज्यांत मुळीच चालावयाचा नाही (नन्दांच्या राज्यांत तो चालत असेल, असें चाणक्याला मिस्कीलपणें सुचवावयाचें आहे.) असें चाणक्य दटावतो. 'त्यावेळीं राक्षसाची बायको माझ्या घरीं होती हें खरें. पण आता ती कोठे गेली हें मला माहीत नाही,' असें चंदनदासाने उत्तर दिल्याबरोबर या प्रकारांत केवढा मोठा धोका आहे याची चाणक्य त्याला जाणीव करून देतो, आपण केलेल्या पराक्रमी कृत्यांचा त्याच्यापुढे पाढा वाचतो, आणि त्याला घाबरवून सोडण्याची कोशीस करतो; अपराधी माणसांना राजा कसलें कडक शासन करतो याचीहि त्याला जाणीव करून देतो. तरी चंदनदासाचा नकार कायमच आहे. चाणक्य पुन्हा कडक शब्दांत दम देतो. पण चंदनदासाचें मन पालटत नाही. त्याचा निश्चय अगदी कायम आहे. चाणक्याच्या दटावणीला तो भीक घालीत नाही. 'राक्षसाची बायको खरोखरच माझ्या घरीं असती तरीहि मी तिला तुमच्या ताब्यांत दिलें नसतें. आणि ती आता ज्याअर्थी माझ्या घरीं नाही त्याअर्थी प्रश्नच उद्‌भवत नाही!' असें तो सारें धैर्य एकवटून म्हणतो.

स्वतःच्या प्राणावर बेतलें आहे हें स्पष्टपणें दिसत असतांनाहि केवढा अलौकिक त्याग करावयास चंदनदास तयार झाला आहे! आपण राक्षसाच्या बायकोचा ठावठिकाणा सांगितला तर वाटेल तेवढें धन चाणक्याकडून मिळूं शकेल, आणि उलट चाणक्याला हवी ती माहिती दिली नाही तर देहान्तशासन होईल, हें चंदनदासाला दिसत आहे. अशा परिस्थितींत आपला प्राण वाचवावा असा मोह कोणालाहि झाला असता. पण चंदनदासाच्या त्यागी ध्येयवादाची परिसीमा झाली आहे. मानवी जीवनांत असला त्याग दिसणें ही गोष्ट असंभाव्य आहे. चंदनदासाला कोंडींत पकडण्यासाठी चाणक्य टपलेला असला तरी तो सुद्धा चंदनदासाच्या या अलौकिक त्यागाच्या झळाळीने दिपून गेला आहे, त्याचें मन चंदनदासाविषयीं नितान्त व अकृत्रिम आदराने भरून गेलें आहे. या पापी कलियुगांत असला अलौकिक त्याग शिबि राजाशिवाय दुसरा कोण करूं शकेल? असा विचार मनांत येऊन[१८] चाणक्य मनांतल्या मनांत अत्यंत संतुष्ट झाला आहे.

---

१८. सुलभेष्वर्थलाभेषु परसंवेदने जनः।
क इदं दुष्करं कुर्यादिदानीं शिबिना विना? (अंक १, श्लोक २५)

पण बाह्यात्कारीं तो कठोरपणाचें नाटक चालू ठेवतो, आणि चंदनदासाला व त्याच्या मुलांमाणसांना अटकेंत ठेवण्याचा हुकूम करतो. त्याची सारी धनदौलतहि जप्त करावयास तो सांगतो. इतकें झालें तरीहि चंदनदासाच्या कठोर निश्चयांत थोडा सुद्धा बदल होत नाही, आणि आलेला प्रसंग सहन करण्याची तो मनाची तयारी करतो.

## राक्षसहि असाच त्याग करील ही चाणक्याची खात्री.

चंदनदास निघून गेला तरी त्याच्या अलौकिक त्यागाने भारून गेलेल्या चाणक्याला कांहीं सुचेनासें झालें आहे. आणि त्याच्या मनांत एक विलक्षण कल्पना आली आहे. राक्षसाच्या संकटामध्ये चंदनदास आपला जीव द्यावयासहि तयार झाला आहे. उत्कट मैत्रीचा प्रकर्ष झाल्याशिवाय ही गोष्ट शक्य होणार नाही. चंदनदासाचें राक्षसावर जसें अलौकिक प्रेम आहे तसेंच राक्षसाचेंहि उलट तितकेंच अलौकिक प्रेम चंदनदासावर असलें पाहिजे. चंदनदासाच्या प्राणावर बेतलें आहे असें जर राक्षसाला कळलें तर चंदनदासाचा प्राण वाचविण्यासाठीं राक्षस देखील आपला प्राण अर्पण करावयास मागेपुढे पाहणार नाही, अशी चाणक्याची खात्री होते. आणि चंदनदास फासावर जात आहे असें राक्षसाला कळविण्याची व्यवस्था केली तर चंदनदासाची सुटका करण्यासाठीं स्वतः राक्षस वध्यस्थानीं खात्रीने येईल असा अंदाज बांधून तो पुढचे बेत योजूं लागतो. चाणक्याची ही कल्पना पुढे संपूर्णपणें यशस्वी झाली आहे. सर्व बाजूंनी अपयश येऊन वैतागलेला राक्षस केवळ चंदनदासाच्या सुटकेसाठीं सहाव्या अंकांत गुप्तपणें राजधानींत आला असतां केवळ आपल्यासाठीं चंदनदास सुळीं जात आहे हें कळतांच आपला प्राण अर्पण करून चंदनदासाला वाचविण्याच्या इराद्याने तो वध्यस्थानीं जातो व चाणक्याचे सेवक त्याला पकडतात.

## भद्रभट इत्यादि अधिकाऱ्यांचें पलायन

राक्षस आणि मलयकेतु या दोघांनाहि गोत्यांत आणण्यासाठीं जीं कारस्थानें चाणक्याने योजिलीं आहेत त्यांच्यापैकीं एक एक कारस्थान आता प्रत्यक्ष कृतींत येऊं लागलें आहे. वध्यस्थानांतून शकटदासाची सिद्धार्थकाने सुटका केली व त्याला घेऊन तो पळून गेला अशी वर्दी येते. लगोलग भागुरायणहि पळून गेल्याची बातमी येते. भागुरायणाला पकडून आणण्यासाठीं भद्रभट इत्यादि अधिकाऱ्यांना पाठवावें तर तो स्वतः आणि पुरुषदत्त, डिंगरात, बलगुप्त, राजसेन, रोहिताक्ष, विजयवर्मा हे त्याचे सहकारी देखील पहाटेच पळून गेल्याची वार्ता शिष्य चाणक्याला कळवतो. प्रत्येक गोष्ट चाणक्याच्या योजनेप्रमाणें तंतो-

तंत पार पडली आहे.[१९] सारेंच तंत्र एकाएकी कसें बिघडून गेलें या विचाराने चाणक्याचा शिष्य कमालीचा गोंधळून गेला असला तरी चाणक्य शांत आहे. बाह्यात्कारीं तो शिष्याची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांना आपल्या जवळ राहावयाचेंच नव्हते असे लोक गेले तें बरेंच झालें; आणि अजून ज्यांना जावयाचें असेल त्यांनीहि बेलाशक निघून जावें; मोठमोठ्या सैन्यापेक्षाहि अधिक कर्तबगार असलेली, आणि नंदांचा समूळ नाश करून आपलें सामर्थ्य जिने सिद्ध केलें आहे अशी आपली बुद्धि जोंपर्यंत स्थिर आहे तोंपर्यंत भिण्याचें चाणक्याला कारणच काय? शिष्याच्या समोर नाटकी आविर्भाव करून भद्रभट इत्यादींना पकडून आणण्याची, आणि एखाद्या रानहत्तीला धरून आणून त्याला कामाला लावतात त्याप्रमाणें राक्षसाला धरून आणून त्याला चंद्रगुप्ताच्या कामाला लावण्याची भाषाहि तो बोलतो.

## राक्षसाच्या स्वभावांतील मर्मस्थानें

'मंत्रिबृहस्पति' असा मोठ्या गौरवाने ज्याचा चाणक्याने उल्लेख केला आहे, आणि ज्याच्या विविध गुणांचा चंद्रगुप्ताच्या राज्याला उत्कृष्ट स्थैर्य मिळवून देण्याच्या बाबतींत चांगला उपयोग करून घेतां येईल अशी चाणक्याची खात्री आहे, त्या राक्षसाविषयीं आपण हा वेळपर्यंत पुष्कळ ऐकलें आहे. पण त्याचा प्रत्यक्ष परिचय मात्र झाला नव्हता.

दुसऱ्या अंकांत आपल्याला प्रत्यक्ष राक्षसाच्या निवासस्थानींच जाण्याचा योग आला आहे. एकान्तामध्ये राक्षस विचारमग्न आहे. नन्दांच्या घराण्याचा अधःपात आणि चंद्रगुप्ताचा विजय याच एका गोष्टीने त्याच्या मनांत थैमान घातलें आहे. प्रतिकूल निष्ठुर दैवाने सर्व प्रकारांनी मात केली असल्याने रात्रंदिवस निरलस परिश्रम करूनहि आपल्या एकाहि प्रयत्नाला यश येत नाहीं यामुळे राक्षस पराकाष्ठेचा खिन्न झाला आहे. नन्दवंशांतील शेवटचा अंकुर देखील सुकला. आता कष्ट तरी कोणासाठी करावयाचे? चित्राची सीमारेषा मनांत तयार आहे. पण ज्याच्यावर ती सीमारेषा व्यक्त करावयाची तो चित्रपट कुठे आहे? हा विचार अतिशय असह्य आहे.[२०] सुखोपभोगाची त्याला कसलीहि

---

१९. चंद्रगुप्ताशीं भांडण झालें आहे असें नाटक करून भद्रभट व त्याचे सहकारी यांनी पळून जावयाचें आणि मलयकेतूला जाऊन मिळावयाचें अशी स्वतः चाणक्यानेच त्यांना सूचना देऊन ठेवलेली होती. "तत्तत्कारणमुत्पाद्य कृतककृत्यतामापादिताः चन्द्रगुप्तसहोत्थायिनः भद्रभटप्रभृतयः प्रधानपुरुषाः......" (अंक १–२१)

२०. सर्वेयं मम चित्रकर्मरचना भित्तिं विना वर्तते। (अंक २, श्लोक ४)

लालसा नाही, स्वतःच्या प्राणाला जपण्याची त्याला जरूर वाटत नाही, आपली प्रतिष्ठा व आपला इतमाम या गोष्टी तो पूर्णपणें विसरून गेला आहे. आता कशांतहि त्याचें मन रमत नाही. ज्याच्यावर प्राणापलीकडे प्रेम केलें व ज्याच्यासाठी हाडांचीं काडें केलीं तो आपला स्वामी परलोकाला गेला. आता शत्रूचा निःपात करून तरी त्याच्याविषयींची कृतज्ञता व्यक्त करणें एवढेंच त्याचें कर्तव्य आहे. आणि म्हणूनच सर्व बाजूंनी कोंडी झाली असतांहि हातांत शस्त्र धारण करून राजकारणाचे अपार कष्ट तो सोशीत आहे.

एकाच गोष्टीचें त्याला विलक्षण आश्चर्य वाटत आहे. सर्व प्रकारांनी स्पृहणीय असलेल्या नंदाचा त्याग करून राज्यलक्ष्मी हीन कुळांत जन्मलेल्या चंद्रगुप्ताकडे ( 'वृषल' ) गेली. वारांगनेंत आणि तिच्यांत फरक तो काय राहिला ? पुरुषांचे गुण जाणण्याची पात्रताच स्त्रियांच्या ठायीं नसते हेंच खरें ! राज्यलक्ष्मीनें चंद्रगुप्ताचा आसरा घेतला आहे. म्हणून तिचा तो आसरा नाहीसा करून टाकून तिला अनाथ केली पाहिजे, असा विचार त्याच्या मनांत प्रबळ झाला आहे.

## राक्षसाच्या योजना

कुसुमपुरांतून निघून जातांना आपली बायको आपण चंदनदासाच्या घरीं ठेवली हें फार बरें झालें, असें त्याला वाटतें. राक्षसानें आपली बायको ज्याअर्थीं अजून कुसुमपुरांतच ठेवली आहे त्याअर्थीं नंदाचें राज्य पुन्हा स्थापन करावें याविषयीं त्याची खटपट चालू आहे असा विश्वास नंदवंशाच्या पूर्वींच्या सेवकांना वाटेल व ते आपले प्रयत्न चालू ठेवतील, या विचारानेच राक्षसानें ती व्यवस्था केली होती.

राजधानींतून राक्षस बाहेर पडला तरी शत्रूला सतावण्यासाठी त्यानें अनेक मार्गांचा अवलंब केला होता. चंद्रगुप्ताला ठार मारण्यासाठी त्यानें मारेकऱ्यांची योजना केली. हे मारेकरी संतुष्ट ठेवण्यासाठी आणि शत्रूविरुद्ध प्रभावी प्रचार करण्यासाठी आपला प्रिय मित्र शकटदास याच्या जवळ राक्षसानें भरपूर द्रव्य देऊन ठेविलें. प्रत्येक क्षणीं शत्रूच्या महत्त्वाच्या हालचाली कळाव्यात एवढ्यासाठी जीवसिद्धि इत्यादि विश्वासू मित्रांची योजना केली. ( हा जीवसिद्धि चाणक्याचा विश्वासू हेर असून राक्षसाला तो आपला परममित्र वाटत आहे ! चाणक्याच्या बुद्धीच्या मानानें राक्षसाची बुद्धि प्रत्येक वेळीं कोती ठरली आणि चाणक्याच्या कारस्थानाला तो बळी पडत गेला. भोंवतालच्या ज्या लोकांना तो विश्वासू मित्र मानीत होता ते सारे चाणक्याचे हेर होते. ही गोष्ट त्याला जेव्हा समजली

तेव्हा कसलाहि प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत उरलें नव्हतें. ) दैव जर शत्रूला अनुकूल झालें नाही तर आपल्या बुद्धीच्या जोरावर आपण अजून शत्रूचा नि:पात करूं असा त्याला विश्वास वाटत आहे.[२१]

## मलयकेतूने राक्षसाला नजर केलेले अलंकार

अशा प्रकारें राक्षसाच्या मनांत भावनांचें काहूर माजलें असतांनाच एक अनपेक्षित घटना घडते. या घटनेमुळे राक्षस पुढे भलत्याच संकटांत सापडला आहे. हा केवळ योगायोग आहे. पण त्याचा परिणाम मात्र चमत्कारिक झाला आहे. नन्दनवंशाचा नाश झाल्या दिवसापासून राक्षस विषण्ण झाला आणि त्याने अलंकार वर्ज केले. बरेच दिवस त्याच्या अंगावर एकहि अलंकार न दिसल्यामुळे मलयकेतूला वाईट वाटतें व आपल्या अंगावरील अलंकार काढून ते मोठ्या आदराने तो राक्षसाकडे पाठवितो. हे अलंकार राक्षसाने अंगावर घातलेच पाहिजेत, असा मलयकेतूचा अतिशय प्रेमळ आग्रह असल्यामुळे राक्षसाचा अगदी नाइलाजच होतो, व तो ते अलंकार परिधान करतो.

## विराधगुप्ताने सांगितलेला राजधानींतील वृत्तान्त

एवढ्यांत विराधगुप्त नांवाचा त्याचा विश्वासू हेर कुसुमपुरांतील बातमी घेऊन येतो. आपण निघून आल्यानंतर मागे कुसुमपुरांत काय काय घडलें हें जाणून घेण्याची राक्षसालाहि अनावर उत्कण्ठा आहे. विराधगुप्त सतत परिश्रमामुळे फार खंगलेला दिसतांच राक्षसाला अतिशय वाईट वाटतें व त्याच्या डोळ्यांत अश्रु तरारतात.

चंद्रगुप्ताच्या व पर्वतेश्वराच्या सैन्यांनी कुसुमपुराला वेढा घातला तेव्हापासून झालेला सर्व महत्त्वाचा वृत्तान्त विराधगुप्त कथन करतो. विराधगुप्त वेढ्याची रोमहर्षक हकिकत सांगत असता राक्षस कमालीचा भावनोत्कट होतो. त्या घटना आत्ता या वेळीं प्रत्यक्ष घडत आहेत असा त्याला भास होतो. वस्तुस्थितीचा त्याला पार विसर पडतो, आणि सैन्याला उद्देशून तो भराभर हुकूम देखील सोडूं लागतो. इतकें त्याचें मन बेभान झालें आहे. विराधगुप्ताने वस्तुस्थितीची जाणीव करून देतांच आपण भलतीकडेच वाहवलों हें त्याला कळतें व तो खिन्न होतो.[२२]

---

२१. तस्यैव बुद्धिविशिखेन भिनद्मि वर्म
वर्मीभवेद्यदि न दैवमदृश्यरूपम् ।। (अंक २, श्लोक ८)

२२. कष्टं वृत्तमिदम् । मया पुनर्ज्ञातं स एवायं काल इति । (अंक २-३४)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

विराधगुप्ताने सांगितलेल्या हकिकतींतील महत्त्वाच्या घटना राक्षसाला समजणें जितकें आवश्यक आहे तितकेंच त्या प्रेक्षकांना समजणेंहि आवश्यक आहे. नगराबाहेर राहून त्याने नगरांत जीं कारस्थानें चालू ठेवलीं होतीं, आणि चाणक्याच्या समयसूचकतेमुळे जीं राक्षसावरच उलटलीं होतीं, त्या साऱ्या कारस्थानांचा इतिहास प्रेक्षकांना कळावा यासाठीच विराधगुप्त इतका सारा तपशील सांगत आहे. बहुतेक सारा दुसरा अंक विराधगुप्ताच्या निवेदनानेच भरलेला आहे. तथापि हें सारें निवेदन नाट्यपूर्ण घटनांनी रंगलेलें आहे आणि मोठ्या कौशल्याने तें केलेलें आहे. यामुळे प्रेक्षकांच्या दृष्टीने त्यांत थोडा सुद्धा कंटाळवाणेपणा आलेला नाही. उलट तें अतिशय रंगतदार झालें आहे. ती ती घटना जशीच्या तशी प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर उभी राहून तिच्याशीं प्रेक्षक अगदी तन्मय होऊन जावेत अशीच विराधगुप्ताच्या निवेदनांत रंगत साधलेली आहे.

कुसुमपुराला मोठा वेढा पडला आणि तो फार दिवस चालू राहिला. यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होऊं लागले. हे हाल सर्वार्थसिद्धीला (सर्वार्थसिद्धि हा नंदवंशांतील शेवटचा पुरुष.) पाहवले नाहीत. विषण्ण होऊन एका भुयारांतून तो नगराच्या बाहेर पडला व तपोवनांत जाऊन राहिला.[२३] सर्वार्थसिद्धि निघून गेल्यामुळे राक्षसाचें सैन्य हताश झालें. कांहीं बिलंदर लोकांनी नगरांत चंद्रगुप्ताच्या मिरवणुकीच्या वेळीं चाललेल्या विजयाच्या घोषणांत व्यत्यय आणण्याचें विलक्षण साहसहि करून पाहिलें. नंदांचें राज्य पुन्हा स्थापितां आल्यास पाहावें या विचाराने स्वतः राक्षसहि भुयारांतून नगराच्या बाहेर पडला. राक्षस निघून गेल्यावर चंद्रगुप्ताचा घात करण्यासाठी त्याने योजिलेल्या विषकन्येने पर्वतेश्वराचाच वध केला.

चंद्रगुप्ताला ठार मारण्यासाठीच राक्षसाने या विषकन्येची योजना केलेली होती. पण चंद्रगुप्ताला मारण्याऐवजीं तिने पर्वतकाचाच वध केला. ही गोष्ट चाणक्याच्या पथ्यावरच पडली म्हणून राक्षसाला वाईट वाटत आहे. हें सारें चाणक्याचेंच कारस्थान आहे याची राक्षसाला जाणीव आहे. आपण योजिलेली प्रत्येक गोष्ट विपरीत होते हें पाहून राक्षस कष्टी झाला आहे. प्रतिकूल दैव आपला आणखी किती व कोणत्या प्रकारांनी छळ करणार आहे हेंच त्याला कळेनासें झालें आहे.

---

२३. सर्वार्थसिद्धि हा नंदवंशांतील शेवटचा उरलेला एकच एक अंकुर असल्यामुळे तो तपोवनांत राहिला होता तरी चाणक्याने त्याचा घात करविला. त्याचीच ही कबुली पाहा– " अनयैव बुद्ध्या तपोवनगतोऽपि घातितस्तपस्वी नन्दवंशीयः सर्वार्थसिद्धिः। " (अंक १–२१)

आपल्या पित्याचा वध झाला असें कळतांच मलयकेतु कमालीचा घाबरला आणि तावडतोब नगरांतून पळून गेला. (वास्तविक, 'तुझ्या पित्याचा चाणक्यानेच कपटाने वध केला' असें चाणक्याचा विश्वासू हेर भागुरायण याने मलयकेतूच्या मनांत पक्केपणीं भरवलें; मलयकेतूला चाणक्याची भीति वाटूं लागली; चाणक्य एखाद्या दिवशीं आपलाहि घात करावयास कमी करणार नाही असें त्याच्या मनाने घेतलें व तो प्राणाच्या भीतीने पळून गेला—अशी खरी हकिकत होती. अंक १–२१ पाहा. 'पिता ते चाणक्येन घातितः इति रहसि त्रासयित्वा भागुरायणेनापवाहितः पर्वतकपुत्रो मलयकेतुः।') अर्धें राज्य देण्याचें वचन चाणक्याने पर्वतकाला दिलें होतें. पण तो मेला, आणि त्याचा पुत्र मलयकेतु हाहि पळून गेला. यामुळे पर्वतकाचा भाऊ वैरोचक याला तें अर्धें राज्य देण्याचें ठरवून चाणक्याने वैरोचकाचा विश्वास संपादन केला अशी माहिती विराधगुप्ताला मिळाली आहे.

## चाणक्याची राक्षसावर मात

राज्याभिषेक झाल्यानंतर चंद्रगुप्ताची दरबारी थाटांत जी मिरवणूक निघाली तिचाहि वृत्तान्त यानंतर विराधगुप्त सांगत आहे. अमुक वेळेला चंद्रगुप्त नन्दांच्या राजवाड्यांत प्रवेश करणार अशी चाणक्याने नगरांत जाहीर घोषणा केली. नंतर कुसुमपुरांतील साऱ्या कारागिरांना त्याने एकत्र जमविलें. "मध्यरात्रीचा मुहूर्त चांगला आहे असें ज्योतिष्यांनी सांगितल्यामुळे बरोबर मध्यरात्रीं चंद्रगुप्त नन्दांच्या वाड्यांत प्रवेश करणार आहे. यासाठी राजवाडा शृंगारावयाचा आहे. तरी पूर्वेकडच्या दरवाजापासून आरंभ करून सर्व राजवाडा सुशोभित करा," असा हुकूम चाणक्याने त्या कारागिरांना केला.

इतक्यांत कांही कारागीर म्हणाले—"महाराजांचा लवकरच राजवाड्यांत प्रवेश होणार हें जाणून दारुवर्मा नांवाच्या कारागिराने मुख्य दरवाजाजवळ सोन्याची भव्य कमान उभारली आहे. आता राजवाड्याचा आंतला भाग तेवढा सुशोभित करावयाचा राहिला आहे."

या दारुवर्म्याला कसलीहि सूचना दिलेली नसतांहि त्याने कमान उभारली यांत कांही तरी धोका आहे असें चाणक्याला वाटलें असावें. पण आपलें मनोगत बाहेर न दाखवतां त्याने संतुष्ट झाल्याचें नाटक केलें, दारुवर्म्याच्या समयसूचकतेची भरपूर तारीफ केली, आणि या दक्षतेबद्दल लवकरच मोठें पारितोषिक देण्याचें त्याला अभिवचन दिलें. (चाणक्याच्या या अभिवचनाचें खरें मर्म तत्क्षणीं राक्षसाच्या ध्यानांत आलें आहे.)

मुहूर्त साधण्यासाठीं बरोबर मध्यरात्रीं चंद्रगुप्त राजवाड्यांत प्रवेश करणार आहे, अशी पुन्हा एकदा चाणक्यानें कारागिरांना सूचना दिली. आणि त्याच वेळीं पर्वतकाचा भाऊ वैरोचक याला चंद्रगुप्ताच्याच सिंहासनावर बसवून चाणक्यानें त्या दोघांना एकत्र राज्याभिषेक केला, व राज्याच्या दोन सारख्या वाटण्या केल्या; आणि अशा रीतीनें अर्धे राज्य देण्याचें जें वचन त्यानें पर्वतकाला दिलें होतें त्याची प्रामाणिकपणें पूर्तता केली (असा लोकांचा समज झाला !), आणि प्रजाजनांची मर्जी संपादन केली.

पर्वतकाचा घात केल्यामुळे जें अपयश येण्याची शक्यता होती त्याचें अशा प्रकारें चाणक्यानें धूर्तपणानें निवारण करून टाकलें आहे ही गोष्ट राक्षसाच्या ध्यानांत आल्यावाचून राहिलेली नाहीं. पण बिचाऱ्या वैरोचकाचा सुद्धा कांहीं तरी युक्तीनें गुप्तपणानें काटा काढून टाकावयाचा मनसुबा चाणक्यानें खास रचला असला पाहिजे हें राक्षसानें बरोबर हेरलें आहे.

वैरोचकाला राज्याभिषेक झाला आहे. चित्रविचित्र पोशाखानें व अनेक झगमगणाऱ्या अलंकारांनीं त्याचें शरीर पूर्णपणें झाकून गेलें आहे. रात्रींच्या वेळीं अगदीं निकट परिचयाच्या माणसांना सुद्धा यामुळे त्याची ओळख पटली नसती. त्याच्या डोक्यावर रत्नजडित मुकुट चढविण्यांत आला, गळ्यांत खूप मोठा जाडजूड हार घालण्यांत आला. (त्याला कोणी ओळखूं नये यासाठींच हा सारा बंदोबस्त चाणक्यानें केला होता.)

चंद्रगुप्त नेहमीं ज्या चन्द्रलेखा नांवाच्या हत्तिणीवर बसत असे त्याच हत्तिणीवर बसावें अशी चाणक्यानें वैरोचकाला सूचना दिली. (चंद्रगुप्ताच्या खास हत्तिणीवर बसावयाची परवानगी देऊन चाणक्यानें मुद्दाम आपला फार मोठा सन्मान केला अशीच बिचाऱ्या वैरोचकाची कल्पना झाली व त्यानें तत्काळ त्याला संमति दिली !) जे शरीररक्षक नेहमीं चंद्रगुप्ताबरोबर असत ते सारे वैरोचकाच्या भोवती राहिले. (मध्यरात्रीं मशालींच्या व हिलालांच्या उजेडांत हा चंद्रगुप्तच आहे अशी कळीच्या कमानीवर चढून बसलेल्या दारुवर्म्याची कल्पना व्हावी यासाठींच चाणक्यानें वैरोचकाला चंद्रगुप्ताच्या हत्तिणीवर बसावयास लाविलें, आणि चंद्रगुप्ताच्या शरीररक्षकांनीं वैरोचकाच्या मागोमाग राहावें अशी मुद्दाम व्यवस्था केली.)

वैरोचक वाड्यांत शिरावयाच्या बेतांत असतां भोवतालच्या साऱ्या परिस्थितीवरून हा चंद्रगुप्तच आहे अशी कमानीवर चढून बसलेल्या दारुवर्म्याची कल्पना झाली आणि कमानीची कळ उपसून वैरोचकाच्या अंगावर कमान पाडण्यासाठीं दारुवर्मा अगदीं तयार राहिला.

पण इतक्यांत चंद्रगुप्ताच्या परिवारांतील राजांनी (बहुतेक चाणक्याने अगाऊ सूचना देऊन ठेवली असल्यामुळे) आपल्या घोड्यांचे लगाम एकदम खेचले, आणि ते दरवाजाबाहेरच थांबले.

पूर्वी योजिल्याप्रमाणें कळीची कमान वेळेवर कोसळली नाही आणि चंद्रगुप्त कमानीखाली सांपडला नाही तर दुसरी एक योजना राक्षसाच्या लोकांनी करून ठेवली होती. वैरोचक ज्या हत्तिणीवर बसलेला होता तिच्यावर वर्वरक नावाचा जो माहूत होता, तो राक्षसाचा सेवक होता. वैरोचक हा चंद्रगुप्तच आहे अशी वर्वरकाची सुद्धा खात्री होती. कमान आयत्या वेळीं जर कोसळली नाही तर पोकळ सुवर्णदण्डांत दडविलेल्या एका कट्यारीने वर्वरकाने अंबारींत बसलेल्या चंद्रगुप्ताचा वध करावयाचा अशी योजना होती. वेळप्रसंगीं विलंब होऊन घोटाळा होऊं नये म्हणून कट्यार उपसून काढण्यासाठी वर्वरकाने सोनेरी साखळीने बांधलेला तो पोकळ सुवर्णदण्ड ओढला. त्याच्या त्या हाल-चालीमुळे अंकुशाचा प्रसाद मिळणार अशी हत्तिणीची कल्पना झाली, आणि तिने अचानक वेग वाढवला व ती झपाट्याने चालूं लागली. हा वेळपर्यंत हत्तीण ज्या वेगाने चाललेली होती तो ध्यानांत येऊन इतक्या वेळांत ती कमानीखाली येईल असा दारुवर्म्याने अंदाज केला व त्याप्रमाणें कमानींतील कळ उपसून ती पाडण्याच्या तयारींत तो होता. पण अनपेक्षितपणें हत्तीण झपाट्याने चालूं लागल्यामुळे कमान एक क्षणभर अगोदर कोसळली, आणि वैरोचकाला चंद्रगुप्त समजून त्याच्यावर कट्यारीचा वार करणारा वर्वरकच कमानीखाली सापडला व जागच्या जागीं ठार झाला.

कमान तर कोसळली. पण अपेक्षेपेक्षा भलतेंच कांही तरी झालें हें दिसतांच आपला जीव आता धोक्यांत आहे अशी भीति दारुवर्म्याला वाटली, तो जिवावर उदार झाला, आणि कमानींतील लोखंडी कळ हातांत घेऊन त्याने चंद्रगुप्त समजून वैरोचकाला हत्तीवरच ठार केलें. अशा रीतीने चंद्रगुप्ताला मारण्यासाठी राक्षसाने जी युक्ति योजिली ती फसली, चंद्रगुप्त सुखरूप राहिला, आणि वैरोचक व वर्वरक यांचा मात्र बळी पडला. दारुवर्म्याने केलेला प्रकार पाहतांच वैरोचकाच्या पुढे चालणाऱ्या पायदळांतील सैनिकांनी तत्क्षणीं दारुवर्म्याला पकडलें, आणि त्याला धोंड्यांनी चेचून तेथल्या तेथे ठार मारलें.

चन्द्रगुप्त राजभवनांत प्रवेश करीत असतां मिरवणुकींतच त्याला मारावें यासाठी राक्षसाने जी योजना अतिशय काळजीपूर्वक आखली होती तिचा चाणक्याच्या समयसूचकतेमुळे असला विलक्षण बोजवारा उडाला !

पण राक्षसाचें दुर्दैव एवढ्याने संपलें नाही. चंद्रगुप्ताला ठार मारण्यासाठी त्याने पाठविलेल्या प्रत्येक मारेकऱ्याचें कारस्थान चाणक्याने धूर्तपणाने वेळींच उघडकीस आणलें, आणि त्या मारेकऱ्यांचाच निकाल लावला. याचें प्रत्येक उदाहरण चाणक्याच्या सूक्ष्म अवलोकनाचें व समयसूचकतेचें उत्कृष्ट द्योतक आहे. तात्पर्य, चंद्रगुप्ताला मारण्याचें राक्षसाचें प्रत्येक कारस्थान पूर्णपणें फसलें आहे. प्रत्येक वेळीं चाणक्याने त्याच्यावर बिनतोड मात केली आहे.

पण इतकें झालें तरी राक्षस निराश होत नाही. चंद्रगुप्ताचा नाश करून पुन्हा नन्दवंशाची प्रतिष्ठापना होईपर्यंत त्याच्या मनाला समाधान लाभणार नांही, आणि प्रयत्नांत तो थोडी सुद्धा कसूरहि करणार नाही.[२४]

## राक्षसाच्या जिवलग मित्रांवरील तोहमत

विराधगुप्ताचा वृत्तान्त अजून संपलेला नाही. राक्षसाने पाठविलेल्या मारेकऱ्यांचे उपद्व्याप उघडकीला आल्यापासून चाणक्य चंद्रगुप्ताच्या जिवाला अतिशयच जपूं लागला. राक्षसाच्या जिवलग मित्रांचा त्याने माग काढला आणि त्यांना पकडलें. राक्षसाच्या सांगण्यावरून क्षपणक जीवसिद्धीने विष-कन्येच्या द्वारें पर्वतकाचा वध केला म्हणून त्याची धिंड काढून राजधानींतून त्याला हाकून दिलें. ( जीवसिद्धीच्या या प्रकरणात चाणक्याने किती तरी गोष्टी मोठ्या चातुर्याने साधल्या हें राक्षसाच्या लक्षांत आलें आहे—१. आपल्यावर येणारें पर्वतकाच्या वधाचें किटाळ बाजूला सारलें. २. हें किटाळ राक्षसाच्या माथीं मारलें. ३. निम्में राज्य देण्याचें पर्वतकाला वचन दिलें होतें. पर्वतकच जगांतून नष्ट झाल्यामुळे राज्याचा वाटा देण्याचा प्रश्न आपोआपच संपला. ). दारुवर्मा इत्यादि मारेकरी चंद्रगुप्तावर घातले असा आरोप ठेवून चाणक्याने शकटदासाला सुळावर चढवलें. ( वध्यस्थानांतून शकटदासाला घेऊन सिद्धार्थक पळाला हें विराधगुप्ताला कळलेलें दिसत नाही. ‘ शकटदासः शूलमारोपितः ’ असेंच तो म्हणत आहे. ) शटकदासाचा भीषण शेवट झाल्याचें ऐकून भावना-प्रधान राक्षसाला फार मोठा धक्का बसला आहे. धन्यासाठीं शकटदासाने बलि-दान केलें, आणि आपण मात्र जगण्याची धडपड करीत आहोंत असें वाटून तो खिन्न होतो.

यानंतर विराधगुप्त चंदनदासाची हकिकत सांगतो. शकटदासावरील संकटाची हकिकत ऐकतांच चंदनदासाने राक्षसाच्या बायकोला दुसऱ्या एका सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेवलें. राक्षसाच्या बायकोला चंदनदास ताब्यांत देईना

२४. सखे, प्रारब्धमपरित्याज्यमिति प्रत्यक्षमेवैतद् भवताम्। ( अंक २–६८ )

म्हणून चाणक्य भयंकर संतापला आणि त्याने चंदनदासाला व त्याच्या बायका-मुलांना तुरुंगांत डांबून ठेवलें आहे. केवळ आपल्यासाठी चंदनदासावर हें घोर संकट आलें आहे, या विचाराने राक्षसाला फार खिन्नता आली आहे. स्वतःला व स्वतःच्या बायकोला तुरुंगांत टाकलें असतें तरी राक्षसाला इतकें दुःख झालें नसतें.[२५]

## मलयकेतूचे अलंकार सिद्धार्थकाच्या हातीं.

विराधगुप्ताची कुसुमपुरांतील हकिकत संपते न संपते तोंच एक अत्यंत अनपेक्षित व आश्चर्यकारक घटना घडते. शकटदासाला सुळीं दिला असें थोड्याच वेळापूर्वी विराधगुप्ताने सांगितलें होतें. पण सिद्धार्थक शकटदासाला घेऊन आला आहे. शकटदासाला जिवंत पाहतांच राक्षस हर्षाने बेभान होतो. सिद्धार्थकाच्याच कर्तबगारीमुळे शकटदास मृत्यूच्या जबड्यांतून निसटला हें कळतांच राक्षसाचें मन कृतज्ञतेने भरून जातें, आणि आनंदाच्या भरांत (आपण केवढी चूक करीत आहोंत हें लक्षांत न येऊन) तो आपल्या अंगावरील दागिने काढून तत्काळ सिद्धार्थकाला बक्षीस म्हणून देऊन टाकतो. (हे दागिने राक्षसाचे नव्हते; मलयकेतूने आपल्या अंगावरील दागिने मुद्दाम राक्षसाला भेट म्हणून ते पाठविले होते. अंक २–९ पाहा. राक्षसाने बक्षीस दिलेल्या मलयकेतूच्या या दागिन्यांचा पुढे सिद्धार्थक राक्षसाला खोड्यांत पकडण्यासाठी बिनतोड उपयोग करून घेणार आहे. अंक ५ – ११५ पाहा.)

'शकटदासाची व राक्षसाची भेट झाल्याबरोबर तो पारितोषिक देईल तें घे' ही सूचना चाणक्याने पूर्वीच सिद्धार्थकाला देऊन ठेवली होती हें खरें आहे. तथापि मलयकेतूचेच दागिने सिद्धार्थकाच्या हातीं येतील असें त्याला वाटण्याचें कोणतेंहि कारण नव्हतें. मालकाच्या विनाशामुळे खिन्न होऊन राक्षसाने अलंकारांचा त्याग करावा, तें न पाहवल्यामुळे मलयकेतूने आपल्या अंगावरील दागिने उतरून ते राक्षसाकडे पाठवावेत, प्रियमित्राच्या अनपेक्षित भेटीमुळे हर्षातिरेकाने नेमके तेच दागिने त्याने सिद्धार्थकाला देऊन टाकावेत—हा सारा योगायोग आहे. आणि हा योगायोग सर्वस्वीं चाणक्याच्याच पथ्यावर पडला आहे.

शकटदासाच्या भेटीच्या क्षणीं राक्षसाला विलक्षण आनंद झाला होता, आणि त्यामुळे आपण जे दागिने सिद्धार्थकाला देत आहोंत ते मलयकेतूने आपल्याला भेट म्हणून (ही भेट होती हें लक्षांत ठेवणें जरूर आहे!) पाठ-

२५. ननु वक्तव्यं संयमितः सपुत्रकलत्रो राक्षस इति। (अंक २ – ८६)

विलेले आहेत हें त्यावेळीं राक्षसाच्या लक्षांत आलें नसेल, हें एक वेळ क्षम्य मानलें तरी मन स्थिर झाल्यावर ही गोष्ट त्याच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. पण शेवटपर्यंत हें त्याच्या लक्षांत आलें नाही.

## राक्षस खोड्यांत अडकतो.

राक्षसाकडून पारितोषिक घेतलें म्हणजे सिद्धार्थकाचा कार्यभाग उरकला असें नाही. अजून पुष्कळ गोष्टी त्याला करावयाच्या आहेत. चाणक्याच्या सूचनेप्रमाणेंच तो प्रत्येक गोष्ट करीत आहे. आता त्याची बतावणी सुरू होते. या परक्या ठिकाणीं त्याच्या परिचयाचा कोणीहि नसल्यामुळे हे दागिने कोठे सुरक्षित राहतील असा त्याला प्रश्न पडला आहे. म्हणून आपल्याजवळ असलेल्या अंगठीने मोर्तब करून ते दागिने राक्षसाच्याच भाण्डागारांत ( तिजोरींत ) ठेवावे अशी कल्पना त्याच्या मनांत आली आहे. जरूर लागेल तेव्हा तो ते परत घेईल. सिद्धार्थकाच्या या सूचनेंत कांही धोका आहे अशी राक्षसाला चुकून सुद्धा शंका येत नाही. हा शकटदासाचा परममित्र आहे, आणि त्याने स्वतःचा जीव धोक्यांत घालून शकटदासाला मृत्यूच्या जबड्यांतून ओढून काढला आहे, हा विचार मनांत आल्यामुळेहि राक्षसाने त्याच्या बोलण्यावर निःशंक मनाने विश्वास ठेवला असेल.

आणि आता सिद्धार्थक ती राक्षसाची मुद्रा बाहेर काढतो. ही राक्षसाची मुद्रा आहे हें शकटदासाच्या ताबडतोब लक्षांत येते व राक्षसाच्या कानांत तो ही गोष्ट सांगतो. राक्षस नगरांतून बाहेर पडला तेव्हा त्याच्या पत्नीने ती अंगठी मनाला विरंगुळा म्हणून मागून घेतली होती. पण ती सिद्धार्थकाच्या ताब्यांत कशी आली असावी ? कुसुमपुरांत चंदनदास नांवाच्या जवाहिऱ्याच्या घराच्या जवळ ती सापडली असें न कचरतां सिद्धार्थक सांगून टाकतो. आणि सारा प्रकार राक्षसाच्या ध्यानांत येतो. राक्षसाचें समाधान होतें, आणि सिद्धार्थकाची बतावणी यशस्वी होते. ही अमात्यांची अंगठी आहे, ती तू अमात्यांना देऊन टाक, तुला भरपूर द्रव्य मिळेल, असें शकटदासाने म्हटल्याबरोबर सिद्धार्थक तत्क्षणीं ती अंगठी राक्षसाला देऊन टाकतो. अंगठी पुन्हा राक्षसाच्या ताब्यांत गेलीच पाहिजे हें चाणक्याच्या कारस्थानाचें फार महत्त्वाचें अंग आहे. पांचव्या अंकांत या अंगठीचा खरा प्रताप दिसणार आहे. ( आपल्याजवळ असलेली अंगठी राक्षसाची आहे हें सिद्धार्थकाच्या ध्यानांत पूर्वीच कसें आलें नाही ? असा प्रश्न राक्षस विचारीत नाही आणि शटकदासहि विचारीत नाही ! )

अंगठी राक्षसाच्या ताब्यांत दिल्यावर चाणक्याच्या सूचनेप्रमाणें[२६] आणखी एक नाटक करतो. शकटदासाला चाणक्याच्या तावडींतून सोडवून त्याने चाणक्याचा भयंकर अपराध केला आहे. अशा स्थितींत पुन्हा कुसुमपुरांत जाणें फार धोक्याचें आहे असें त्याला वाटत आहे. म्हणून राक्षसाच्याच तैनातींत राहावें अशी त्याची उत्कट इच्छा आहे. सिद्धार्थकाची ही विनंती सुद्धा राक्षस तत्काळ मान्य करतो.

## चंद्रगुप्त व चाणक्य यांच्या वितुष्टाची बातमी

सिद्धार्थक शकटदासाबरोबर निघून गेल्यावर विराधगुप्त राक्षसाच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगतो. मलयकेतु पळून गेल्यापासून चंद्रगुप्त फार रागावला आहे; चाणक्य देखील फारच उन्मत्त झाला असून मनाच्या विरुद्ध एकहि गोष्ट झालेली त्याला खपत नाही, आणि चंद्रगुप्ताची आज्ञा पुन्हा पुन्हा मोडून तो त्याच्या मनाला फार व्यथा देत असतो, अशी माहिती विराधगुप्ताला कळली आहे, आणि त्याला स्वतःलाहि याचें प्रत्यंतर मिळालें आहे.

चंद्रगुप्त आणि चाणक्य यांच्यामध्ये वितुष्ट येण्यापेक्षा राक्षसाच्या दृष्टीने अधिक चांगलें दुसरें काय आहे ? या बातमीने राक्षसाला पुन्हा आशा वाटूं लागली आहे ! विराधगुप्ताला तो लगेच कुसुमपुराला जावयास सांगतो. राजधानींत स्तवकलश नांवाचा राक्षसाचा प्रिय मित्र भाटाच्या (वैतालिकाच्या) वेषाने राहत आहे. त्याने चातुर्याने राजवाड्यांत प्रवेश मिळवावा, आणि चाणक्याने चंद्रगुप्ताच्या आज्ञेचें उल्लंघन करून त्याची अमर्यादा केली, की तत्क्षणीं स्तवकलशाने चंद्रगुप्ताला प्रोत्साहन देणारे श्लोक म्हणावेत अशी राक्षसाची नवीन योजना आहे. त्याप्रमाणें विराधगुप्त कुसुमपुराकडे जातो.

## पर्वतकाचे अलंकार राक्षस विकत घेतो.

याच वेळीं राक्षसाला खोड्यांत अडकविण्यासाठी चाणक्याने योजिलेली आणखी एक युक्ति सफळ होते. पर्वतकाचे जे तीन दागिने चंद्रगुप्ताने विश्वावसु इत्यादि तीन ब्राह्मणांना दान दिले होते ते तत्क्षणीं चाणक्याच्या ताब्यांत आले होते.[२७] ते तीन दागिने विक्रीसाठी कोणीतरी आणले आहेत, आणि

---

२६. तस्माच्च सुहृत्प्राणपरिरक्षणपरितुष्टात् पारितोषिकं ग्राह्यम् । राक्षस एव कंचित्कालं सेवितव्यः । (अंक १–८३)

२७. मागे अंक १ पाहा. "उच्यन्तामस्मद्वचनाद् विश्वावसुप्रभृतयस्त्रयो भ्रातरे वृषलात् प्रतिगृह्याभरणानि भवद्भिरहं द्रष्टव्यः इति ।" (अंक १–७१)

कसलीहि शंका न येतां, ते विकत घ्यावेत अशी राक्षस शकटदासाला सूचना देत आहे. चंद्रगुप्त आणि चाणक्य यांच्यांतील वितुष्ट प्रतिक्षणीं वाढत जाईल आणि त्याचा फायदा आपल्याला घेतां येईल अशी गोड आशा बाळगणारा राक्षस चाणक्याच्या सापळ्यांत अधिकाधिक गुंतत चालला आहे. पांचव्या अंकांत पर्वतकाचे हे अलंकारच राक्षस आणि मलयकेतु यांच्यामध्ये भयंकर वितुष्ट आणावयास कारण होतात.

## राक्षसाने केलेले प्रमाद

राक्षसाने चंद्रगुप्ताचा घात करण्यासाठीं अनेक कारस्थानें केलीं हें खरें आहे. तथापि बुद्धिमत्तेच्या बाबतींत तो चाणक्याच्या मानाने फारच सामान्य ठरला. आणि यामुळेच त्याच्या सर्व कारस्थानांचा बोजवारा उडाला. भावना-प्रधानता आणि विकारवशता या गोष्टी राक्षसाच्या स्वभावांत मुरलेल्या आहेत. यामुळे क्षणिक भावनावेगाच्या आहारीं जाऊन तो विचित्र चुका करून बसतो. मलयकेतूने प्रेमाने भेट म्हणून पाठविलेले अलंकार सिद्धार्थकाला देणें, आणि चाणक्याने हेराकरवीं पाठविलेले पर्वतकाचे दागिने विकत घेणें या दोन्ही गोष्टी फार घातक ठरल्या आहेत. एका क्षणाचाहि विचार न करतां अतिशय घाईने या गोष्टी त्याने केल्या. पर्वतकाचे दागिने विकत घेण्यापूर्वी त्याने दहा वेळां विचार करावयास हवा होता. दागिन्यांविषयीं प्रथम शंका मनांत येणें हेंच त्या परिस्थितींत अगदी स्वाभाविक होतें. राक्षसाचा हेर असे दागिने घेऊन चाण-क्याकडे गेला असता तर काय झालें असतें ? चाणक्याने प्रथम त्या माणसाला पकडलें असतें, किंवा दागिन्यांच्या बाबतींत अगदी बारीक तपास केला असता. राक्षसाच्या भोळेपणामुळे आणि भावनावशतेमुळे तो दर वेळीं गोत्यांत आला आहे. ज्यांना तो आपले परममित्र समजतो त्याच्यापैकी बहुतेक सारेच चाणक्याचे विश्वासू हेर आहेत. उलट राक्षसाच्या एकाहि हेराने चाणक्याच्या बुद्धीला अशी भुरळ घातल्याचें उदाहरण दाखवितां येणार नाही. राक्षसाच्या ज्या हेरांनी खुद्द राजवाड्यांतच कारस्थानें करावयाचें ठरविलें त्यांच्या कारस्थानांचा वेळींच व्यवस्थित छडा लावून चाणक्याने तीं कारस्थानें बीजावस्थेतच मोडून काढलीं आणि राक्षसाच्या सेवकांना भयंकर कडक शासन केलें. दैव राक्षसाला प्रतिकूल होतेंच, पण धोरणीपणाच्या व समयसूचकतेच्या अभावामुळे राक्षसाने आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला अशीच त्याच्या अपयशाची मीमांसा करावी लागेल. राजधानीमध्ये आपण जे विश्वासू हेर मुद्दाम ठेवले होते त्यांनी रचलेलें प्रत्येक कारस्थान चाणक्याने मोठ्या धूर्तपणाने उद्ध्वस्त केलें याची सांगोपांग

माहिती विराधगुप्ताकडून नुकतीच कळलेली असतां एका अपरिचित माणसाकडून तीन बहुमोल अलंकार (हे पर्वतकासारख्या राजाचे अलंकार होते!) राक्षस तत्क्षणीं विकत घेतो हें कांही शहाणपणाचें कृत्य नाही.

आणि अंगठीच्या बाबतींत राक्षसाने केलेली चूक कोणत्याहि दृष्टीने समर्थनीय ठरण्यासारखी नाही. ज्या अंगठीने राजकीय पत्रांवर शिक्कामोर्तब करावयाचा, ती अंगठी राक्षसाने आपल्या बायकोला दिलीच कशी? राजधानींतून बाहेर पडून मलयकेतूशीं संगनमत केल्यावर तो पत्रांवर कशाने मोर्तब करीत असावा? अंगठीवाचून त्याचें अडलें कसें नाही? कोणताहि खरा राजकारणी मुत्सद्दी अशा धामधुमीच्या काळांत आपलें नांव कोरलेली अंगठी कोणालाहि (प्रत्यक्ष बायकोला देखील) देणार नाही. राजकीय व्यवहाराच्या निमित्ताने राक्षसाला सुद्धा या अंगठीची प्रत्येक क्षणीं जरूर लागणार हें 'राजकारणांतील कामाच्या वेळीं याच अंगठीचा तू उपयोग कर' असें शकटदासाला त्याने सांगितलें[२८] यावरून स्पष्ट आहे.

## राक्षसाच्या मित्रांचे प्रमाद

राक्षस ज्यांना फार कर्तबगार समजत होता असे राक्षसाचे विश्वासू मित्र सुद्धा चाणाक्षपणाच्या बाबतींत निश्चितपणें कमी पडले. उदाहरणार्थ, सिद्धार्थक हा आपला परममित्र आहे अशी शकटदासाची खात्री होती. सिद्धार्थकाने शकटदासाला चांगलेंच बनविलें आणि तें प्रसिद्ध बनावट पत्र त्याच्याकडून लिहवून घेतलें. पत्रांतील भाषा अगदीं मोघम आहे हें खरें आहे. तथापि राजकारणांतील महत्त्वाच्या डावपेचांसंबंधीं तें आहे, एवढें तरी शकटदासाला कळावयास नको होतें काय? शकटदास हा राक्षसासाठी राजधानींत विविध कारस्थानें करीत होता, हें तर खुद्द राक्षसाच्याच उद्गारावरून स्पष्ट आहे.[२९] अशा स्थितींत सिद्धार्थक हा चाणक्याचा हेर आहे, हें शकटदासाच्या चुकून देखील लक्षांत येत नाही आणि सिद्धार्थकाच्या सांगण्यावरून राजकारणी डावपेचांचा उल्लेख असलेलें पत्र लिहावयास तो तावडतोब तयार होतो, हें फारच विलक्षण आहे. एखाद्या धंदेवाईक सामान्य कायस्थाच्या हें लक्षांत येणें शक्य नाही. पण

---

२८. सखे शकटदास, अनयैव मुद्रया स्वाधिकारे व्यवहर्तव्यं भवता।
(अंक २–११०)

२९. चन्द्रगुप्तशरीरमभिद्रोग्धुमस्मत्प्रयुक्तानां तीक्ष्णरसदायिनामुपसंग्रहार्थं परकृत्योपजापार्थं च महता कोशसंचयेन स्थापितः शकटदासः। (अंक २–२)

शकटदास हा राक्षसाचा राजकारणांतील विश्वासू मित्र आहे आणि राक्षसाच्या सांगण्यावरून अनेक प्रकारचीं कारस्थानें करण्यासाठीच तो राजधानींत राहिलेला आहे हें लक्षांत घेतलें असतां पत्र लिहिण्याच्या बाबतींत त्यानें अक्षम्य घाई केली असेंच म्हणावें लागतें.

## राक्षसाच्या हेरांचे प्रमाद

राक्षसाचे हेरहि असल्याच विचित्र चुका करतात. दारुवर्म्यानें राजवाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ सोन्याची कमान उभी केली हें कारागिरांनी आपण होऊन चाणक्याला कां सांगितलें? चाणक्याने कमानीविषयीं मुद्दाम कांही चौकशी केली असती तर गोष्ट निराळी होती. पण तसें कांहीच झालें नसता कमानीची जी हकिकत कारागिरांनी सांगितली तिच्यामुळे चाणक्यासारख्या धूर्त माणसाला संशय आला नसता तरच तें चमत्कारिक दिसलें असतें.

तात्पर्य, राक्षसाने स्वतः अक्षम्य चुका केल्या, आणि त्याच्या मित्रांनी व विश्वासू हेरांनीहि तशाच चुका केल्या, व चाणक्याच्या कर्तबगारीला भरपूर साहाय्य केलें. नुसता प्रतिकूल दैवाला दोष देत बसण्यांत राक्षसाला समाधान वाटत असलें तरी त्यामुळे त्याच्या कमकुवत धोरणाचें व राजकारणी प्रमादांचें समर्थन होऊं शकत नाही.

## राक्षसाला स्वारीसाठी प्रोत्साहन

राजधानींत राक्षसाच्या परममित्रांनी आणि विश्वासू हेरांनी जीं कारस्थानें केलीं तीं सारी फसल्यानंतर पुढील प्रयत्नांच्या बाबतींत राक्षस उदासीन राहूं नये व राजधानीवर स्वारी करण्याचा विचार त्याने कायमचा सोडून देऊं नये यासाठी चाणक्याने फार धूर्तपणाने व दूरदर्शीपणाने एक युक्ति योजली. चाणक्य आणि चंद्रगुप्त यांचे वारंवार खटके उडतात, चाणक्यहि चंद्रगुप्ताचें ऐकत नाही व त्याचा अवमान करतो अशी राजवाड्यांत नोकरांची कल्पना व्हावी, आणि ही गोष्ट खुद्द राक्षसाच्या हेरांच्याहि कानीं जावी अशी मोठ्या कौशल्याने चाणक्याने व्यवस्था केली होती. विराधगुप्त हा राक्षसाचा विश्वासू हेर होता. चाणक्य व चंद्रगुप्त यांचा बेबनाव दररोज वाढत चालला आहे, अशी विराधगुप्ताचीहि खात्री होते व ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट तो राक्षसाच्या कानांवर घालतो.[३०] या बाबतींत राक्षसाची पूर्ण खात्री व्हावी म्हणून चाणक्य व

---

३०. अंक २–१२२ पाहा. "मलयकेतोरपक्रमणात् प्रभृति कुपितश्चन्द्रगुप्तश्चाणक्यस्योपरीति चाणक्योऽप्यतिजितकाशितया असहमानस्तैस्तैराज्ञाभङ्गैश्चन्द्रगुप्तस्य चेतः-पीडामुपचिनोति । इत्थमपि ममानुभवः ।"

चन्द्रगुप्त अगदी कडाक्याच्या भांडणाचें मोठें कलापूर्ण नाटक करतात. हें सारें अथपासून इतिपर्यंत निव्वळ नाटक असलें तरी राजवाड्यांतील अगदी निकटच्या सेवकांना (उदाहरणार्थ, वैहीनरीसारख्या कञ्चुकीला) सुद्धा तें खरोखरीचें भांडण वाटतें. मग राजवाड्यांत गुप्तपणें वावरणाऱ्या स्तवकलशासारख्या राक्षसाच्या हेरांना तें खरेंखुरें भांडण वाटलें असलें आणि चाणक्याचें व चन्द्रगुप्ताचें भयंकर वितुष्ट आलें आहे अशी खात्री होऊन लगेच ती महत्त्वाची गोष्ट त्यांनी राक्षसाला कळविली असली तर तें अगदी क्रमप्राप्त असेंच आहे.

## चंद्रगुप्ताच्या स्वभावांतील मर्मस्थानें

तिसऱ्या अंकांत हें भांडणाचें नाटक आहे. हें सारेंच नाटक पहिल्यापासून मोठें रंगत जातें, आणि त्याचा शेवटहि मोठा परिणामकारक होतो. 'भांडणाचा आपण दोघे देखावा करूं, आणि मला अधिकारावरून काढून टाकण्याचा देखावा करून तू कांही काळ आपल्या मनाप्रमाणें एकटा कारभार कर' अशी चाणक्याने स्पष्ट आज्ञाच दिल्यामुळे[३१] चंद्रगुप्ताची मोठी केविलवाणी अवस्था झाली आहे. गुरूने आज्ञाच केली असल्यामुळे ती पाळण्यावाचून गत्यंतर नाही. पण भांडणाचा नुसता देखावा करावयाचा असला तरी आपण हें भयंकर पातक करीत आहोंत अशी त्याच्या मनाला सतत टोचणी लागून राहिली आहे.[३२] गुरूच्या आज्ञेंत राहूनहि आपलें स्वातंत्र्य अबाधित आहे असेंच चंद्रगुप्ताला वाटत आहे. यापेक्षा अधिक कांही स्वातंत्र्य असावें असें त्याला कधीच वाटलें नाही.[३३] यामुळेच गुरूबरोबर भांडावयाचें नाटक करण्याचें सुद्धा त्याच्या जिवावर आलें आहे. चंद्रगुप्ताच्या स्वभावांतील एक मर्म येथे प्रकट झालें आहे. राजकारणांतील साऱ्या महत्त्वाच्या गोष्टी चाणक्याच्या कर्तबगारीवर सोपवून चंद्रगुप्त अगदी आरामांत आहे. राज्यकारभाराच्या बाबतींत चंद्रगुप्त अगदी उदासीन आहे अशी तक्रार खुद्द चाणक्यानेच पहिल्या अंकांत केली होती.[३४] राज्यकारभारांत जातीने अगदी बारीक लक्ष घालणाऱ्या राजाला राज्यवैभवाचा उपभोग तरी कसा घेतां येणार, अशी शंका चंद्रगुप्ताच्या मनांत आली आहे.[३५] नेहमी प्रजेसाठी धडपडणाऱ्या राजाला खऱ्या सुखाचा आस्वाद कसा घेतां येणार, असें त्याला वाटत आहे.[३६] चंद्रगुप्ताच्या मनांत चाललेल्या या विचारांची चाणक्यालाहि जाणीव असावी असें दिसतें.[३७]

---

३१. कृतककलहं कृत्वा स्वतंत्रेण किंचित्कालान्तरं व्यवहर्तव्यमित्यार्यादेशः। (अंक ३–३)

३२. स च कथमपि मया पातकमिवाभ्युपगतः। (अंक ३–३)

[ ३३, ३४, ३५, ३६, ३७ या टीपा पुढील ६८ पृष्ठावर पहा. ]

## भांडणाच्या नाटकाची नांदी

आणि आता चाणक्य व चंद्रगुप्त यांच्या भांडणाच्या नाटकाला प्रत्यक्ष सुरवात झाली आहे.

राजधानींत कौमुदीमहोत्सव सुरू करावा आणि सर्व लोकांनी त्यांत उत्साहाने भाग घ्यावा अशी आज्ञा चंद्रगुप्ताने केली आहे, हें चंद्रगुप्ताचा कंचुकी वैहीनरि सुगाङ्ग राजवाड्याची देखरेख करण्यासाठीं नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून देत आहे. पण कौमुदी महोत्सवाला बंदी करण्यांत आलेली आहे असें अधिकारी कंचुकीला सांगतात. कंचुकीला ही गोष्ट असंभाव्य वाटते. एवढ्यांत खुद्द चंद्रगुप्त तेथे येतो. कंचुकीला बरोबर घेऊन राजा ( पूर्वी ठरल्याप्रमाणें ) राजवाड्याच्या गच्चीवर जातो. कौमुदी-महोत्सव सुरू करावा अशी आपण आज्ञा केलेली असतांहि नगरांत उत्सवाचें कसलेंहि चिह्न दिसत नाही याचें राजाला मोठें नवल वाटतें. ‘ कौमुदी महोत्सवाला बंदी करण्यांत आली आहे ’ असें कंचुकी भीत भीत सांगतो. चाणक्याने तर हा प्रकार केला नसेल ना ?, असें राजा पुटपुटतांच कंचुकी ताबडतोब ‘ होय ’ असें उत्तर देतो. राजा संतापतो ( अथवा संतापल्याचें नाटक करतो. ) आणि चाणक्याला बोलावणें पाठवतो. कंचुकी कमालीचा घाबरतो आणि चाणक्याकडे जातो.

चाणक्याच्या घराचें ( अथवा पर्णकुटीचें ) ऐश्वर्य ( ! ) पाहतांच चाणक्य राजाची फिकीर कां करीत नाही हें कंचुकीच्या लक्षांत येतें. पराकाष्ठेच्या निःस्पृह माणसाला राजवैभवाची कसली पर्वा ? [३८] मोठ्या अदबीने कंचुकी राजाचा निरोप चाणक्याला सांगतो. लगेच चाणक्य खूप चिडल्याचा आविर्भाव करतो.

---

३३. अथवा शश्वदार्योपदेशसंस्क्रियमाणमतयः सदैव स्वतंत्रा वयम् ।......
विनयरुचयस्तस्मात्सन्तः सदैव निरंकुशाः
परतरमतः स्वातंत्र्येभ्यो वयं हि पराङ्मुखाः॥ ( अंक ३, श्लोक ६ )

३४. वृषल एव केवलं प्रधानप्रकृतिरस्मास्वारोपितराज्यतंत्रभारः सततमुदास्ते । ( अंक १–२१ )

३५. राज्यं हि नाम राजधर्मानुवृत्तिपरस्य महदप्रीतिस्थानम् । ( अंक ३–३ )

३६. परायत्तः प्रीतेः कथमिव रसं वेत्ति पुरुषः । ( अंक ३, श्लोक ४ )

३७. अथवा यत् स्वयमभियोगदुःखैरसाधारणैरपाकृतं तदेव राज्यं सुखयति । ( अंक १–२१ )

३८. निरीहाणामीशस्तृणमिव तिरस्कारविषयः । ( अंक ३, श्लोक १६ )

आपण उत्सवाला बंदी केली ही चहाडी कोणी केली हें त्याला कळत नाही. स्वतः महाराज राजवाड्याच्या गच्चीवर उभे असतां साऱ्या नगरांत सामसूम दिसल्यामुळे त्यांच्याच लक्षांत ही गोष्ट आली असें कंचुकी म्हणतांच चाणक्य बिचाऱ्या कंचुकीवर टाफरतो. राजवाड्यांतले नोकर आपल्याला पाण्यांत पाहतात अशी ओरड करून तो चन्द्रगुप्ताच्या भेटीला जातो.

सिंहासनावर बसलेल्या चन्द्रगुप्ताकडे पाहतांच आपण केवढी कर्तबगारी केली हा विचार मनांत येऊन चाणक्य अगदी संतुष्ट झाला आहे. वरकरणी मात्र तो भयंकर संतापलेला दिसत आहे. चाणक्य येतांच चन्द्रगुप्त उठतो आणि त्याला नम्रपणें अभिवादन करतो.

उपचार संपल्यावर 'कां बोलावलंस मला ?' असें चाणक्य विचारतो. राजा जेव्हा अधिकाऱ्याला मुद्दाम बोलावणें पाठवतो तेव्हा कांहीतरी महत्त्वाचें काम असलेंच पाहिजे असें चाणक्य म्हणतांच 'कौमुदी महोत्सवाला आपण कां बंदी केली ?' असें चन्द्रगुप्त विचारतो. आपल्या भेटीची इच्छा मनांत धरून राजाने आपल्याला बोलावलेलें नसून आपली हजेरी घेण्यासाठी बोलावलें आहे हें दिसतांच चाणक्याचा पारा चढतो. अमुक एक गोष्ट गुरूने कोणत्या हेतूने केली हें विचारण्याच्या भानगडींत शिष्याने पडावेंच कशाला ? कांही तरी विशिष्ट प्रयोजन असल्याशिवाय चाणक्य स्वप्नांत सुद्धा एखादी गोष्ट करणार नाही,[३९] असें चाणक्य आपल्या शिष्याला स्पष्टपणें बजावतो. पण हें प्रयोजन कोणतें तेंच समजावून घेण्यासाठी शिष्य उत्सुक असल्यामुळे आचार्य तें प्रयोजन आता स्पष्ट करीत आहेत.

## राक्षसाच्या हेराचें कारस्थान

राज्यकारभार तीन प्रकारचा असतो असें राज्यशास्त्रावरील अधिकारी लेखकांचें म्हणणें आहे. ( १ ) स्वतः राजा सर्व अधिकार गाजवितो असा कारभार, ( २ ) राजा कांहीहि करीत नाही आणि अमात्य सारी सत्ता गाजवितो असा कारभार, आणि ( ३ ) राजा व अमात्य परस्परांच्या विचाराने व्यवस्था पाहतात असा कारभार.[४०] चन्द्रगुप्ताचा कारभार दुसऱ्या प्रकारचा, म्हणजे अमात्याच्या अधीन असल्यामुळे अमात्याने एखादी गोष्ट कां केली हें विचारण्याचें त्याला कारणच नाही, साऱ्या गोष्टी अमात्यच करणार, राजाने

३९. न प्रयोजनमन्तरा चाणक्यः स्वप्नेऽपि चेष्टते । ( अंक ३–४९ )

४०. त्रिविधा सिद्धिः —( १ ) राजायत्ता सिद्धिः, ( २ ) सचिवायत्ता सिद्धिः, ( ३ ) उभयायत्ता सिद्धिः

स्वस्थ बसावें असें चाणक्याने म्हटल्याबरोबर[४१] अनुकूल संधीचा उपयोग करून चन्द्रगुप्ताला प्रोत्साहन देणारे श्लोक म्हणावेत अशी राक्षसाने ज्याला सूचना दिली होती[४२] तो स्तवकलश नांवाचा राक्षसाचा हेर हीच नामी संधी आहे असें वाटून दोन श्लोक म्हणतो. मदोन्मत्त हत्तींची गंडस्थळें फोडणाऱ्या पराक्रमी सिंहाला कोणी डिवचलेलें ज्याप्रमाणें कधीहि सहन होत नाही, त्याप्रमाणें तेजस्वी सम्राटाला आपल्या आज्ञेचें उल्लंघन सहन होत नाही; अंगावर अलंकार घातले म्हणजे कांही कोणी सम्राट होत नसतो, ज्याच्या आज्ञेचें उल्लंघन करण्याची कोणाचीहि ताकद होत नाही तोच खरा सम्राट होय— असा स्तवकलशाने म्हटलेल्या दोन श्लोकांचा आशय आहे.

हे श्लोक कानीं पडतांच राक्षसाच्या हेराचेंच हें कारस्थान असलें पाहिजे हें चाणक्याच्या तावडतोब लक्षांत येतें. राक्षस आपल्यावर मात करूं पाहत आहे या कल्पनेचें त्याला हसूं येतें. राक्षसाने कितीहि भानगडी केल्या तरी चाणक्य एक क्षणभरहि निष्काळजी राहणें शक्य नाही.[४३]

## चंद्रगुप्ताचा कोंडमारा

भाटांनी आपली स्तुति केल्यामुळे राजा संतुष्ट झाला आहे. त्या भाटांना खूप मोठें पारितोषिक देण्याचा तो वैहीनरीला हुकूम करतो. तत्क्षणीं चाणक्य वैहीनरीला थांबावयास सांगतो. इतक्या क्षुद्र कारणासाठी एवढी मोठी रक्कम खर्च करणें चाणक्याच्या दृष्टीने भलताच मूर्खपणा आहे. कोणतीहि गोष्ट आपल्या मर्जीप्रमाणें करतां येत नाही, सर्व बाजूंनी आपला अगदी कोंडमारा झाला आहे असें वाटून राजाहि फार रागावतो.[४४] जो राजा स्वतः कारभारांत लक्ष घालत नाही त्याने हें सारें मुकाट्याने सहन केलेंच पाहिजे, असें म्हणून चाणक्याने चंद्रगुप्ताच्या मर्मावर आघात केला आहे. सारा कारभार स्वतः आपल्या ताब्यांत घ्यावयाची राजा तयारी दाखवितो. दोघांपैकी कोणीहि माघार घ्यावयास तयार नाही.

४१. ततः सचिवायत्तसिद्धेस्तव किं प्रयोजनान्वेषणेन ? यतो वयमेवात्र नियुक्ताः वत्स्यामः। ( अंक ३–५१ )

४२. चाणक्येन क्रियमाणेष्वाज्ञाभंगेषु चन्द्रगुप्तः समुत्तेजनसमर्थैः श्लोकैः उपश्लोकयितव्यः। (अंक २–१२३ )

४३. आः ज्ञातम्। राक्षसस्यायं प्रयोगः दुरात्मन् राक्षस, दृश्यसे। भोः जागर्ति खलु कौटिल्यः। ( अंक ३–५४ )

४४. आर्येणैवं सर्वत्र निरुद्धचेष्टाप्रसरस्य मे बन्धनमिव राज्यं, न राज्यमिव। ( अंक ३–५८ )

## आपल्या धोरणाचें चाणक्यानें केलेलें समर्थन

तथापि कौमुदीमहोत्सवाच्या बंदीचें कारण समजावून घेण्याची राजाची इच्छा कायम आहे. 'कौमुदीमहोत्सव करावयाचाच कशासाठी?' असा चाणक्याचा उलट प्रश्न आहे. तूर्त उत्सवाला अनुकूल अशी परिस्थिति मुळीच नसल्यामुळे जाणूनबुजून उत्सवाला बंदी केली असें चाणक्य म्हणतो, आणि भद्रभट इत्यादि जे अधिकारी चंद्रगुप्ताला सोडून मलयकेतूला उघडपणें जाऊन मिळाले त्यांच्याविषयींची अधिकृत माहिती ज्यांत आहे असें एक 'लेखपत्र' प्रतीहारीकडून मागवून घेतो. [४५]

एवढे उत्कृष्ट सहकारी व प्रतिष्ठित अधिकारी मलयकेतूकडे निघून गेले याला तशींच बलवत्तर कारणें असलीं पाहिजेत, आणि तीं कारणें समजावून घेण्याची चन्द्रगुप्ताची इच्छा आहे. चाणक्य लगेच त्याला सर्व माहिती देतो.

भद्रभट व पुरुषदत्त हे दोघे अनुक्रमें गजाध्यक्ष व अश्वाध्यक्ष होते. हे दोघेहि स्त्रीलंपट होते, त्यांना शिकारीचा भलताच नाद होता, आणि ते दारू फार पीत असत. स्वाभाविकच या व्यसनाधीनतेमुळे आपल्या कामाकडे त्यांचें फार दुर्लक्ष होऊं लागलें. यामुळे चाणक्यानें त्यांचा अधिकार काढून घेतला व त्यांना तो अगदींच क्षुद्र वेतन देऊं लागला. ते दोघे चिडले व मलयकेतूला जाऊन मिळाले. डिंगरात व बलगुप्त या दोन अधिकाऱ्यांना अतिशय लोभ सुटला, राजाकडून मिळणारा तनखा त्यांना अपुरा वाटूं लागला, आणि मलयकेतु अधिक तनखा देईल अशा आशेने ते मलयकेतूकडे गेले. राजसेनाला राजाकडून अचानक मोठ्या देणग्या मिळाल्या. या देणग्या राजा एखाद्या वेळीं परत तर घेणार नाही ना, अशी शंका येऊन तो मलयकेतूला मिळाला. भागुरायण हा एका काळीं पर्वतकाचा मित्र होता. 'तुझ्या पित्याचा चाणक्यानेंच कपटानें घात केला' असें भागुरायणानें मलयकेतूला सांगितलें व त्याला पळून जाण्याची सूचना दिली. राजधानींत चंदनदास इत्यादि लोक पकडले गेल्यानंतर आपल्या अपराधाचा आता वाईट परिणाम होईल, अशी त्याला भीति वाटली व तो मलयकेतूकडे गेला. यानें आपले प्राण वाचवले, या विचारानें

---

४५. कांही तरी कुरापत काढून चन्द्रगुप्ताशीं भांडण करण्याचा देखावा करावयाचा आणि मलयकेतूला जाऊन मिळावयाचें, अशी खुद्द चाणक्यानेंच भद्रभट व त्याचे सहा सहकारी यांना सूचना दिली होती, आणि त्या सूचनेप्रमाणेंच ते पळून गेले होते. "तत्तत्कारणमुत्पाद्य कृतककृत्यतामापादिताश्चन्द्रगुप्तसहोत्थायिनः भद्रभटप्रभृतयः प्रधानपुरुषाः ।" (अंक १–२१;) अंक १–१५८ सुद्धा पाहा.

मलयकेतूनेहि कृतज्ञतेने भागुरायणाला आपला अमात्य केलें. रोहिताक्ष व विजयवर्मा हे दोघेहि कमालीचे मग्रूर होते. यांच्या नातेवाईकांना राजाने मोठ्या देणग्या दिल्या होत्या. या गोष्टींचें त्यांना फार वैषम्य वाटलें व ते मलयकेतूकडे गेले.

तात्पर्य, हे मोठे अधिकारी शत्रूकडे कां गेले याचीं तपशीलवार कारणें चाणक्याला चांगलीं माहीत होतीं हें उघड झालें आहे. असें असतांहि चाणक्याने त्यांना कसें जाऊं दिलें, अशी चंद्रगुप्ताला सकारण शंका आली आहे. काय वाटेल ती खटपट करून त्यांनी आपल्याला सोडून जाऊं नये अशी व्यवस्था करणें जरूर होतें, असा चंद्रगुप्ताचा अभिप्राय आहे.

यावर चाणक्याचें उत्तर तयार आहे. बिथरलेल्या अधिकाऱ्यांना ताळ्यावर आणण्याचे दोन उपाय असतात. त्यांच्यावर अनुग्रह करणें, किंवा त्यांना बंदींत टाकणें, हे ते दोन मार्ग होत. भद्रभट व पुरुषदत्त या दोघांना अधिकारावरून काढून टाकलें होतें. यांच्यावर अनुग्रह करावयाचा म्हणजेच त्यांना पुन्हा कामावर घ्यावयाचें. पण त्यांच्या सारख्या व्यसनी माणसांना अधिकार दिला असता तर हत्ती व घोडे हा जो राज्याच्या स्थैर्याचा पाया तोच उद्ध्वस्त झाला असता. डिंगरात व बलगुप्त यांचा लोभीपणा परिसीमेला गेला असल्यामुळे सारें राज्य त्यांना बहाल केलें असतें तरी त्यांचें समाधान झालें नसतें. असल्या लोकांवर अनुग्रह कसला करावयाचा ? आपलें द्रव्य राजा परत घेईल अशी राजसेन व भागुरायण यांना भीति वाटत होती. यांच्यावर अनुग्रह कसा शक्य आहे ? आपल्या नातेवाईकांना राजा फार मान देतो ही गोष्ट रोहिताक्ष व विजयवर्मा यांना आवडली नाही. अशा लोकांना कोणताहि अनुग्रह वश करूं शकणार नाही.

तात्पर्य, अनुग्रह हा जो मार्ग तो या सर्व अधिकाऱ्यांच्या बाबतींत निरुपयोगी होता.

आणि त्यांचा निग्रह करणें म्हणजेच त्यांना पकडून बंदींत टाकणें हा मार्गहि धोक्याचा होता. नंदांचें राज्य चंद्रगुप्ताला नुकतेंच मिळालेलें. अशा अस्थिर परिस्थितींत प्रमुख अधिकाऱ्यांना जर कडक शिक्षा केली असती तर नंदवंशाच्या अभिमान्यांना राग आला असता व त्यांनी चंद्रगुप्ताशीं कसलेंहि सहकार्य करण्याचें नाकारलें असतें. म्हणून निग्रह देखील अशक्य झाला.

आणि आता चंद्रगुप्ताच्या एका काळच्या सहकाऱ्यांशीं मलयकेतूने संगनमत केलें आहे, राक्षसासारख्या बुद्धिमान् सचिवाचें मलयकेतूला मोठें पाठबळ आहे,

आणि यामुळे प्रोत्साहन मिळून खूप मोठ्या सैन्यानिशीं कुसुमपुरावर हल्ला करण्याचा मलयकेतूने मनसुबा रचलेला आहे. अशा स्थितींत सैन्याच्या कवायती करणें व नादुरुस्त झालेले किल्ले दुरुस्त करणें हीं अत्यंत महत्त्वाचीं कामें बाजूला ठेवून कौमुदीमहोत्सव कसला करावयाचा? असा विचार करून उत्सवाला जाणूनबुजून बंदी केली अशी चाणक्याची भूमिका आहे.

## राजनीतीच्या विवरणाचें प्रयोजन

ज्या अधिकाऱ्यांचें चंद्रगुप्ताशीं कसलेंहि वितुष्ट आलेलें नव्हतें अशा अधिकाऱ्यांवर काल्पनिक आरोप ठेवून चाणक्याने त्यांच्या (काल्पनिक) दुर्वर्तनाची जी चिकित्सा केली ती पूर्णपणें सहेतुक आहे. राजवाड्यांत राक्षसाचे गुप्त हेर वावरत आहेत याचें त्याला नुकतेंच प्रत्यंतर मिळालें होतें. वैतालिकाचें सोंग घेऊन चंद्रगुप्ताला चाणक्याच्या विरुद्ध प्रोत्साहन देणाऱ्या हेराला तत्क्षणीं पकडणें चाणक्याला सहज शक्य होतें. पण तें त्याने कधीच केलें नसतें. मलयकेतूला जाऊन मिळालेल्या भद्रभट इत्यादि चंद्रगुप्ताच्या अधिकाऱ्यांचें त्याच्याशीं खरोखरच वितुष्ट आलें होतें आणि चाणक्य त्यांच्यावर फार संतापला आहे, व त्यांना कोणत्याहि कारणाने पुन्हां अधिकारावर घ्यावयाचें नाहीं हा त्याचा निश्चय झाला आहे, ही गोष्ट मलयकेतूला व राक्षसाला कळावी आणि त्या दोघांचा त्या अधिकारावर पूर्ण विश्वास बसावा व त्यांना दोघांनी आपले खरे मित्र मानावे हा चाणक्याचा हेतु होता. आणि राक्षसाच्या हेरांनी चंद्रगुप्ताचें व आपलें हें भांडण ऐकावें व त्याची संपूर्ण बातमी तावडतोब राक्षसाला कळवावी अशीच चाणक्याची खटपट चालली आहे.

## मलयकेतूच्या उपेक्षेची मीमांसा

चाणक्याने आपल्या धोरणाचें एवढे बारकाईनें विवेचन केलें तरी चंद्रगुप्ताचें समाधान झालें नाही. (तें व्हावयाचें नाहीं असेंच ठरलेलें होतें!) साऱ्या अनर्थाला कारण असलेला जो मलयकेतु तो राजधानींतून पळून जात असतां त्याच्याकडे चाणक्याने दुर्लक्ष कां केलें, अशी त्याची शंका आहे.

मलयकेतूच्या बाबतींत दोन मार्ग चाणक्यापुढे होते. त्याला पकडावयाचें किंवा पर्वतकाला कबूल केलेला राज्याचा अर्धा भाग त्याला द्यावयाचा. त्याला पकडला असता तर पर्वतकाच्या खुनांत चाणक्याचाच हात असला पाहिजे, अशी लोकांना शंका आली असती, आणि हें चाणक्याला नको होतें. बरें, वचनाप्रमाणें अर्धें राज्य त्याला दिलें असतें तर मग अपार कष्ट करून जें साधलें

तेंच उद्ध्वस्त झालें असतें. एवढ्या परिश्रमाने जें राज्य मिळविलें त्याचा थोडा सुद्धा भाग दुसऱ्याला मिळूं नये अशी चाणक्याची धडपड होती. म्हणून त्याने पर्वतकाचा खून करविला. आता अर्धें राज्य मलयकेतूला देण्याची जर पाळी आली तर मग केलेली सारीच खटपट वाया गेली असें होईल म्हणून मलय-केतूच्या पलायनाकडे चाणक्याने मुद्दाम धोरणाने दुर्लक्ष केलें.

## राक्षसाच्या उपेक्षेचीं कारणें

खुद्द राक्षस नगरांत राहत होता तरी त्याच्याकडे चाणक्याने दुर्लक्ष केलें, यालाहि सबळ कारण होतें. नंदवंशावर राक्षसाची अलौकिक भक्ति होती, नंदांवर अनुरक्त असलेल्या लोकांचा त्याच्यावर फार विश्वास होता, तो अतिशय बुद्धिमान व तितकाच पराक्रमी होता, चांगल्या विश्वासू व एकनिष्ठ मित्रांची त्याला मदत होती, आणि त्याच्या जवळ भरपूर द्रव्य होतें. अशा स्थितींत तो नगरांत राहिला असता तर त्याने नागरिकांना फितवलें असतें व घरभेदेपणा केला असता. ( हा 'अन्तःकोप' होय. ) पण राजधानींतून दूर गेल्यावर त्याने कितीहि कारस्थानें केलीं ( हा 'बाह्यकोप' होय. ) तरी त्याला कोंडींत पकड-ण्याचे अनेक मार्ग उपलब्ध होते. राक्षस राजधानींत राहणें म्हणजे हृदयांत शल्य असल्यासारखेंच असल्यामुळें तो बाहेर गेल्यामुळे हें शल्य आपोआपच उपटलें गेलें, असें राक्षसाच्या बाबतींत स्पष्टीकरण आहे.

त्याच्यावर हल्ला करून पकडणें शक्य होतें हें खरें. पण चाणक्याच्या दृष्टीने हा मार्ग फार धोक्याचा होता. बोलूनचालून तो राक्षस! त्याच्यावर हल्ला केला असतां तर तो जिवावर उदार होऊन लढला असता, चंद्रगुप्ताचे पुष्कळ सैनिक त्याने मारले असते, किंवा तो स्वतःच मेला असता. आणि हेंच नेमकें चाणक्याला नको होतें. चंद्रगुप्ताचा तो सचिव झाला पाहिजे यासाठीच तर चाणक्याची सारी धडपड होती. रानहत्तीला ज्याप्रमाणें अनेक युक्त्यांनी काबूंत आणतात त्याप्रमाणें राक्षसाला घेरून त्याला काबूंत आणावयाचें हा तर चाणक्याचा खरा उद्देश आहे.[४६]

---

४६. वनगज इव तस्मात्सोऽभ्युपायैर्विनेयः । ( अंक ३, श्लोक २५ )

रानहत्तीला पकडून त्याला कामाला जुंपतात त्याप्रमाणें राक्षसाला युक्तीने वश करून चंद्रगुप्ताचें सचिवपद त्याला पतकरावयास लावावयाचें ही कल्पना चाणक्याने मागे पहिल्या अंकाच्या शेवटीं बोलून दाखविली होती.

बुध्द्या निगृह्य वृषलस्य कृते क्रियाया-
मारण्यकं गजमिव प्रगुणीकरोमि ॥ ( अंक १, श्लोक २८ )

## नाटकी संतापाचा नाटकी उद्रेक

चाणक्याच्या या स्पष्टीकरणानंतर चंद्रगुप्ताला बोलण्यासारखें कांहींहि उरलेलें नाहीं. पण चाणक्याला क्षुब्ध करावयाचें घोरण ठरलेलें असल्यामुळे चंद्रगुप्त राक्षसाची भरपूर तारीफ करतो. चाणक्य भयंकर खवळतो. पूर्वी केलेल्या नंदवंशाच्या विनाशाची चंद्रगुप्ताला तो आठवण करून देतो. पण दैव अनुकूल होतें, म्हणूनच नंदाचा नाश झाला, त्यांत चाणक्याची कसलीहि कर्तबगारी नाहीं, असें चंद्रगुप्त कुत्सितपणें म्हणतो.[४७] या कुत्सित उद्गारामुळे चाणक्याचा संताप अनावर होतो, तो जमिनीवर पाय आपटतो, बांधलेली शेंडी पुन्हा सोडण्यासाठीं त्याचा हात फुरफुरू लागतो. चाणक्याच्या या वेळच्या हालचाली इतक्या परिणामकारक होतात की, आपला गुरु खरोखरच संतापाने बेभान झाला कीं काय अशी चंद्रगुप्ताला भीति वाटूं लागते.

क्षणांत चाणक्य आपला नाटकी राग आवरतो, आणि राक्षस जर खरोखरच इतका मोठा असेल तर त्यालाच शस्त्र देऊन टाकलें पाहिजे, असें म्हणून नाटकी आविर्भाव करून हातांतली तरवार खाली फेकून देतो, आणि तितक्याच नाट्यपूर्ण रीतीने आकाशांत पाहून स्वतःशीं म्हणतो—"राक्षसा! कौटिल्याच्या बुद्धीवर मात करण्याची तुझी महत्त्वाकांक्षा शेवटीं सफल झाली खरी! पण याद राख. चाणक्याचें व चन्द्रगुप्ताचें वितुष्ट आणण्यासाठीं तूं जें कारस्थान केलें आहेस तें तुझ्यावरच उलटल्याशिवाय राहणार नाहीं!" आणि इतकें बोलून तो तडक निघून जातो. सारेंच नाट्यपूर्ण!

## चाणक्याचा अधिकार काढून घेतल्याची घोषणा

चाणक्याला अधिकारावरून काढून टाकलें आहे आणि स्वतः महाराज सर्व कारभार जातीने पाहणार आहेत अशी तावडतोब घोषणा होते.

अखेर चाणक्याच्या तावडींतून राजेसाहेबांची सुटका झाली म्हणून कंचुकी देखील खऱ्या समाधानाचा सुस्कारा सोडतो. आता महाराज खरेखुरे सम्राट झाले असें त्याला वाटतें. अगदी निकट असलेल्या कंचुकीवर सुद्धा चाणक्य व चन्द्रगुप्त यांच्या नाट्यपूर्ण कलहाचा केवढा विलक्षण परिणाम झाला आहे!

चाणक्याने आज्ञा केली म्हणूनच केवळ नाइलाजाने चन्द्रगुप्त या नाटकी भांडणाला तयार झाला होता. पण गुरूचा उपमर्द करण्याचा नुसता

४७. 'नन्दकुलविद्वेषिणा दैवेन' हे चंद्रगुप्ताचे शब्द (अंक ३–९६) पुढे सातव्या अंकांत चाणक्य जसेच्या तसे वापरतो. (अंक ७–३७)

देखावाच जरी त्याने केला असला तरी सुद्धा त्याच्या मनाला फार वेदना होत आहेत. आपलें कांही तरी चुकलें, मोठें पातक आपण केलें, असें वाटून तो कष्टी झाला आहे.[४८]

## चाणक्याच्या कारस्थानांची प्रगति

तिसऱ्या अंकाच्या शेवटीं भयंकर संतापल्याचें परिणामकारक नाटक करून चाणक्य निघून जातो तो आपल्याला सातव्या अंकांतील शेवटच्या प्रवेशापर्यंत पुन्हा भेटत नाही. राक्षसाला सर्व बाजूंनी कोंडींत पकडावयाचें आणि तो अगतिक झाल्यावर चंद्रगुप्ताचें सचिवपद पतकरण्याखेरीज त्याला गत्यंतर उरूं नये अशीच व्यवस्था करावयाची, हें चाणक्याने ठरविलें आहे. आपल्या या योजनेला भरपूर यश यावें यासाठीं अनेक चतुर कारस्थानांचें बीज त्याने पेरलें आहे. यांपैकी कांही कारस्थानांची प्रगतीहि सुरू झाली आहे. त्याचा विश्वासू हेर भागुरायण याने मलयकेतूचा संपूर्ण विश्वास संपादन करून घेतला आहे व तो मलयकेतूचा अमात्य झाला आहे. भद्रभट इत्यादि प्रमुख अधिकाऱ्यांनी चंद्रगुप्ताशीं वितुष्ट आल्याचें नाटक उत्कृष्टपणें पार पाडलें व ते सारे मलयकेतूच्या तैनातींत राहिले. शकटदासाकडून बनावट पत्र लिहवून घेऊन व त्यावर राक्षसाच्या अंगठीने मोर्तब करून चाणक्याने तें सिद्धार्थकाच्या जवळ दिलें. शकटदासाला वधस्तंभावरून सोडून सिद्धार्थक त्याला घेऊन राक्षसाकडे गेला, राक्षसाची मर्जी त्याने संपादन केली, राक्षसाची अंगठी त्याला परत दिली, मलयकेतूचे जे अलंकार राक्षसाने त्याला बक्षीस दिले ते मोहोरबंद करून त्याने राक्षसाच्याच तिजोरींत ठेवले, पर्वतकाचे दागिने राक्षस विकत घेईल ही चाणक्याची कल्पना खरी ठरली. अशा प्रकारें राक्षसाला व मलयकेतूला गोत्यांत आणण्याच्या चाणक्याच्या कारस्थानांना मूर्त स्वरूप येऊं लागलेलें आहे. त्यांचा विकास लवकरच होणार आहे.

आता एकच महत्त्वाची गोष्ट राहिली. चाणक्याने आपल्या सर्व कारस्थानांचा पुरा बीमोड केला, व कांही कारस्थानें उलट आपल्यावरच कौशल्याने उलटविलीं, याचें भरपूर प्रत्यंतर आल्याबरोबर राक्षस निराश होईल व चंद्रगुप्तावर स्वारी करण्याचा बेत वैतागाने सोडून देईल, याची चाणक्याला चांगली

४८. आर्याज्ञयैव मम लंघितगौरवस्य
बुद्धिः प्रवेष्टुमिव भूविवरं प्रवृत्ता।
ये सत्यमेव हि गुरूनतिपातयन्ति
तेषां कथं नु हृदयं न भिनत्ति लज्जा ? (अंक ३, श्लोक ३३)

कल्पना होती. राक्षसाने निराश होऊं नये व स्वारीचा बेत सोडून देऊं नये, स्वारी करण्यास त्याला भरपूर प्रोत्साहन मिळावें, यासाठीच चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यांतील वितुष्ट दररोज वाढत चाललें आहे अशी बातमी राक्षसाच्या कानांवर जाईल अशी त्याने योजना केली. चाणक्याच्या कल्पनेप्रमाणें ती बातमी राक्षसाच्या कानांवर गेली सुद्धा. आणि तिचा परिणामहि चाणक्याच्या अपेक्षे-प्रमाणेंच घडून आला आहे. चाणक्यांत व चंद्रगुप्तांत वितुष्ट आलें आहे, याचा फायदा घेऊन आतां चंद्रगुप्तावर स्वारी केली तर यश येईल असें राक्षसाला वाटूं लागलें आहे; व त्या दोघांचें वितुष्ट वाढावें व आपलें काम सुकर व्हावें या हेतूने त्याने तत्काळ गुप्त हेराची योजनाहि केली आहे. जेणेंकरून राक्षस स्वारीचा निश्चय करील अशी बिनतोड परिस्थिति निर्माण करण्याचें चाणक्याचें धोरण असल्यामुळे तिसऱ्या अंकांत चंद्रगुप्त व चाणक्य यांच्या खोट्या भांडणांच्या नाटकाचा यशस्वी प्रयोग करण्यांत आला आणि राक्षसाची स्वारी होईल अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यांत आली.

## अंतर्धान पावलेल्या चाणक्याचें रंगभूमीवरील वर्चस्व

चाणक्याने मोठ्या धोरणाने सर्वत्र जोरदार सुरुंग पेरून ठेवले आहेत. त्यांचा स्फोट होण्याचीच फक्त वाट बघावयाची आहे. यामुळे चाणक्य आता अदृश्य झाला तरी कांहीहि बिघडणार नाही. त्याच्या कारस्थानांना मूर्त स्वरूप येऊन राक्षस प्रत्येक क्षणाला अधिकाधिक खोड्यांत कसा सापडतो व अगतिक होतो हेंच दृश्य आता आपल्याला पाहावयाचें आहे. यामुळे आता नाटक संपे-पर्यंत आपण राक्षसाच्याच सहवासांत राहणार आहोंत.

चाणक्य सध्या जरी अंतर्धान पावला आहे तरी त्याचें अस्तित्व मात्र प्रत्येक क्षणाला आपल्याला अतिशय तीव्रतेने जाणवत राहणार आहे. त्याचे कर्तबगार सेवक ज्या पद्धतीने त्याच्या योजना प्रत्यक्ष कृतींत आणणार आहेत, ती पद्धति इतकी कौशल्यपूर्ण आहे की, चाणक्य प्रत्यक्ष रंगभूमीवर नसला तरी सारें वातावरण त्याच्या अलौकिक प्रभावाने भारलें गेलें आहे, याची सारखी जाणीव प्रेक्षकांच्या मनांत होत राहते. आणि हेंच नाटककाराचें कौशल्य होय.

## कृतककलहांतील प्रभावी नाट्य

तिसऱ्या अंकांतील नाट्यपूर्णता अद्वितीय आहे. एकहि घटना अस्थानीं नाही, एकहि वाक्य निर्हेतुक नाही. प्रत्येक वाक्य अगदी ठाशीव व रेखीव आहे. एखादा शब्द विनाकारण आला आहे हें दाखविणें जवळ जवळ अशक्य आहे. या नाट्यपूर्ण घटनेंतून चंद्रगुप्ताच्या स्वभावांतील मर्मस्थानें उत्कृष्ट रीतीने प्रकट

झालीं आहेत; चाणक्याच्या वादकौशल्याचीहि परिसीमा झाली आहे व त्याच्याहि अंतरंगाचा उत्कृष्ट परिचय झाला आहे. राज्यशास्त्राची जी चर्चा चाणक्याने केली आहे ती पाण्डित्यपूर्ण असली तरी सारेंच विवेचन कमालीचें आकर्षक झालें आहे. प्रसंगाच्या नाट्यपूर्णतेला त्यामुळे यत्किंचित् बाध येत नाही. विशाखदत्ताचें चातुर्य या ठिकाणीं कळसाला पोचलें आहे यांत शंका नाही.

चाणक्य हा नुसता बुद्धिमान पंडित नाही, नुसता कारस्थानी व कावेबाज मुत्सद्दी नाही, तर तो एक जातिवंत नट आहे, हेंहि या प्रकाराने सिद्ध झालें आहे. वैहीनरीसारखा अत्यंत निकट असलेला कंचुकी तर हादरतोच, पण साऱ्या गोष्टींची पहिल्यापासून चांगली जाणीव असतांना चाणक्य खरोखरच संतापला कीं काय अशी शंका खुद्द चंद्रगुप्तालाहि येते, व तो अगदी बेचैन होतो. चाणक्याच्या अभिनयकौशल्याचा आणखी दुसरा कोणता पुरावा हवा ?

## मलयकेतूच्या मनांत विषाची पेरणी

चाणक्याने पेरलेल्या नीतिबीजाला आता धुमारे फुटूं लागले आहेत. चाणक्य व चन्द्रगुप्त यांचें कांही कारणावरून भांडण झालें आणि चाणक्याने चन्द्रगुप्ताचा अपमान केला तर चन्द्रगुप्ताला प्रोत्साहन मिळावें यासाठी स्तव-कलशाने श्लोक म्हणावयाचे अशी जी योजना राक्षसाने केली होती ती योजना त्याच्या दृष्टीने सिद्धीला गेली आहे. करभक नांवाच्या दूताला राजवाड्यांतील बातमी काढून आणण्यासाठी राक्षसाने पाठविलें होतें ( अंक २, पृ. ७४-१२३ व ७६-१२८ पाहा. ) तो पाटलिपुत्राहून परत आला आहे. एकान्तामध्ये तो राजधानींतील हकिकत राक्षसाला सांगत असतांनाच मलयकेतु भागुरायणासह राक्षसाच्या भेटीला येण्यासाठी निघाला आहे.

राक्षसाकडे अचानक जाऊन त्याला चकित करावें असा विचार मनांत येऊन परिवारांतील सर्व लोकांना थांबावयास सांगून मलयकेतु फक्त भागुरा-यणाला बरोबर घेऊन राक्षसाच्या निवासस्थानाकडे जावयास निघतो. एकान्त असल्यामुळे आपल्या मनांतील कांही महत्त्वाच्या शंकांचा त्याला भागुरायणा-कडून उलगडा करून घ्यावयाचा आहे. भद्रभट इत्यादि चन्द्रगुप्ताचे एका काळचे मित्र व सहकारी चन्द्रगुप्ताला सोडून आपल्याकडे आले. त्यावेळीं, राक्षसाची मध्यस्थी आम्हांला नको, शिखरसेन सेनापतीच्या मार्फतच आम्ही सारें बोलणें करणार आहोंत, असा त्यांनी निरोप पाठविला होता. या निरोपा-मागे त्यांचा कोणता हेतु असावा हें मलयकेतूच्या अजून लक्षांत आलेलें दिसत नाही. भागुरायण या प्रकारांतील मर्म मलयकेतूला समजावून सांगत आहे.

शिखरसेन मलयकेतूच्या खास मर्जीतील आहे व त्याच्या हिताला नेहमी जपत असतो, हें ध्यानांत घेऊन भद्रभटादिकांनी राक्षसाची मध्यस्थी न पत्करतां शिखरसेनाची मध्यस्थी पत्करली असली पाहिजे असें भागुरायणाचें स्पष्टीकरण आहे. राक्षसाच्या निष्ठेविषयीं मलयकेतूच्या मनांत किल्मिष उत्पन्न करावें हाच भागुरायणाचा उद्देश आहे, आणि तो उद्देश सफळहि झाला आहे. आपण ज्याला मित्र व हितकर्ता मानतों तो राक्षस आपला खरा हितकर्ता नाही अशी ओझरती शंका मलयकेतूच्या मनांत निर्माण झाली तरी भागुरायणाचें साधणार आहे. राक्षसाचें खरें वैर आहे तें चाणक्याशींच आहे, चन्द्रगुप्ताशीं त्याचें वैर नाही, हें मलयकेतूच्या मनांत ठसविण्याची भागुरायणाची खटपट चालू आहे. आपल्या कर्तबगारीमुळे चाणक्य फार चढून गेला आहे; केव्हा तरी चाणक्याच्या या वृत्तीची चन्द्रगुप्ताला चीड आल्याशिवाय राहणार नाही; आणि तीव्र प्रतिक्रिया झाल्यामुळे एखाद्या वेळीं चन्द्रगुप्ताने चाणक्याला अधिकारावरून दूर केलें तर चन्द्रगुप्त हा नंदांच्या घराण्यांतील असल्यामुळे त्याच्याशीं तह करावा असा मोह राक्षसाला होईल, आणि हा फार दिवसांचा एकनिष्ठ अमात्य आहे असें वाटून चन्द्रगुप्तहि राक्षसाशीं मैत्री करण्यास तयार होईल—अशी भद्रभट इत्यादींची कल्पना झाली असावी. आपण राक्षसाच्या मार्फत मलयकेतूशीं बोलणें केलें तर तो आपल्यावर कदाचित् विश्वास ठेवणार नाही, असें भद्रभटाला वाटलें असावें. भागुरायणाचें हें स्पष्टीकरण मलयकेतूला पटलें आहे, आणि त्याबरोबर राक्षसाच्या निष्ठेविषयीं त्याच्या मनांत शंकाहि निर्माण झाली आहे. केव्हा तरी राक्षस आपल्याला सोडून चन्द्रगुप्ताला मिळण्याची शक्यता आहे एवढा विचार मलयकेतूच्या मनांत घोळूं लागला तरी भागुरायणाच्या दृष्टीने ती मोठीच घटना आहे.

आणि राक्षसाविषयीं मनांत हें किल्मिष उत्पन्न होऊन तें सळूं लागलेलें असतांनाच मलयकेतु राक्षसाच्या घराजवळ येतो. आंत पाटलिपुत्रांतून महत्त्वाची बातमी घेऊन आलेला करभक राक्षसाशीं बोलत आहे. कुसुमपुराचें नांव ऐकतांच मलयकेतूच्या मनांत एक विचित्र कल्पना येते. एकान्तामध्ये राक्षस काय बोलत आहे तें आडून ऐकावें असा त्याला मोह होतो. भागुरायणाने मोठ्या चातुर्याने राक्षसाविषयीं जें किल्मिष मलयकेतूच्या मनांत निर्माण केलें आहे त्याचा प्रभाव अशा रीतीने ताबडतोब दिसून येऊं लागला आहे.

## राक्षसाविषयीं मलयकेतूच्या मनांत शंकांचें काहूर

एकान्तामध्ये राक्षस काय बोलत आहे तें आड उभे राहून ऐकावें असा मोह ज्या क्षणीं मलयकेतूला झाला त्याच क्षणीं राक्षस त्याला दुरावूं लागला

आहे. कुसुमपुरांत घडलेली एक फार महत्त्वाची घटना आंत करभक राक्षसाला सांगत आहे. कौमुदीमहोत्साला बंदी करून चाणक्याने चंद्रगुप्ताचा अपमान केला असतां चंद्रगुप्ताला चाणक्याविरुद्ध चिथावणी देणारे श्लोक स्तवकलशाने म्हटले हें ऐकतांच राक्षस खूष होतो. अगदी योग्य वेळीं चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यामध्ये दुहीचें बीज पेरलें या विचाराने राक्षस खूष झाला आहे. पण याही-पेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट करभक सांगतो. चाणक्याने आपल्या आज्ञेचा भंग करून आपला उपमर्द केला या विचाराने चंद्रगुप्त क्षुब्ध झाला आणि राक्षसाची खूप तारीफ[४९] करून त्याने चाणक्याला अधिकारावरून दूर केलें व सारा कारभार स्वतःकडे घेतला, ही करभकाने सांगितलेली हकिगत राक्षसाच्या दृष्टीने जितकी महत्त्वाची आहे तितकीच मलयकेतूच्या दृष्टीनेहि महत्त्वाची आहे.

राक्षस आज ना उद्या केव्हा तरी चंद्रगुप्ताशीं मैत्री करील ही कल्पना भागुरायणाने चातुर्याने मलयकेतूच्या मनांत नुकतीच भरविली होती. आणि त्यांत चंद्रगुप्ताने राक्षसाची तारीफ केली या राक्षसाच्याच दूताने एकान्तांत सांगितलेल्या गोष्टीची भर पडली आहे. चंद्रगुप्ताने ज्या अर्थी राक्षसाची स्तुति केली त्या अर्थी राक्षसाविषयीं त्याला ओढ वाटत असली पाहिजे अशी कल्पना मलयकेतूच्या मनांत येणें ही गोष्ट ओघानेच आली. मलयकेतूच्या अस्थिर मनःस्थितीचा भरपूर फायदा घेण्याचा भागुरायणाचा निर्धार झाला आहे. चंद्रगुप्ताने राक्षसाची स्तुति करणें या गोष्टीपेक्षा त्याने चाणक्याला अधि-कारावरून काढून टाकलें ही गोष्ट राक्षसाच्या पुढच्या डावपेचांच्या दृष्टीने किती तरी अधिक महत्त्वाची आहे हें भागुरायण स्पष्ट करतो.

कौमुदी महोत्सवाला केलेली बंदी हें चन्द्रगुप्ताच्या चाणक्यावरील क्रोधाचें एकमेव कारण आहे कीं आणखी कांही कारणें घडलीं, असें राक्षस करभकाला विचारतो. आणखी कांही कारणें समजावून घेण्याची राक्षसाची कां धडपड चालली आहे हें मलयकेतूच्या सुकुमार बुद्धीला उमजत नाही. भागुराय-णाला हें हवेंच होतें. चाणक्य अतिशय धूर्त असल्यामुळे एखाद्या क्षुद्र कारणा-मुळे चंद्रगुप्ताला नाखूष करण्याची चूक तो करणार नाही; शिवाय चंद्रगुप्तहि कृतज्ञ असल्यामुळे एवढ्यातेवढ्यावरून तो चाणक्याचा उपमर्द करणार नाही; यामुळे चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यामधील वितुष्टाला जितकीं जास्त कारणें तितकें तें वितुष्ट चिरस्थायि हा विचार राक्षसाच्या मनांत प्रबळ झाला असला पाहिजे, असें स्पष्टीकरण भागुरायणाने केल्याबरोबर मलयकेतूच्या बालबुद्धीला तें पटतें.

---

४९. सर्वथा अत्मात्यराक्षस एवात्र प्रशस्यतरः। (अंक ३-८८)

राक्षस आणि मलयकेतु राजधानींतून पळून जाणाच्या तयारींत आहेत हें चांगलें माहीत असतांना चाणक्याने तिकडे दुर्लक्ष केलें असें वाटल्यामुळेहि चंद्रगुप्त चाणक्यावर संतापला आहे, असें करभकाने सांगितल्याबरोबर आता चंद्रगुप्त आपल्या तावडींत पुरा सापडला, आता चंदनदासाची तुरुंगांतून सुटका करणें सोपें झालें आहे, असें वाटून राक्षस संतुष्ट होतो. याचें मर्म मलयकेतूला समजत नाही. बालक अज्ञ आहे, त्याला सज्ञान करण्यासाठी भागुरायण तयार आहेच. चाणक्याची व चंद्रगुप्ताची एकदा खरीखुरी फारकत झाली म्हणजे मग चंद्रगुप्ताचा विनाश करण्यांत कांहीहि मतलब नाही असें राक्षसाला वाटलें असलें पाहिजे असें भागुरायणाचें भाष्य आहे.

ज्या चंद्रगुप्ताला राजपद मिळवून दिलें, त्याच्यांकडून चाणक्य कधीहि उपमर्द सहन करणें शक्य नाही, तो पुन्हा एखादी घोर प्रतिज्ञा करील, असें राक्षसाला वाटतें. पण चाणक्य कितीहि संतापी असला तरी एखादी घोर प्रतिज्ञा पूर्ण करण्यांत कसल्या भयंकर यातना असतात हें त्याला चांगलें माहीत असल्यामुळे पुन्हा एखादी घोर प्रतिज्ञा करण्याच्या भानगडींत तो पडणार नाही, असें शकटदास राक्षसाचें समाधान करतो.

## राक्षसाने आपल्या धोरणाचें केलेलें समर्थन

आणि हा वेळपर्यंत बाहेर उभा राहून ऐकत असलेला मलयकेतु आंत येतो.[५०] राक्षसाच्या निष्ठेविषयीं मलयकेतूच्या मनांत संशय निर्माण झाला आहे, हें लक्षांत ठेवूनच त्याचा प्रत्येक उद्‌गार वाचला पाहिजे. सारीं सैन्यें लढाईसाठीं अगदी सज्ज आहेत; अशा स्थितींत शत्रूवर एखादें संकट येईल अशी आशा करीत आणखी किती दिवस हात जोडून बसावयाचें, असा सूचक प्रश्न मलयकेतु

५०. आपल्या घरांत राक्षस ज्यावेळीं करभकाशीं बोलत बसला आहे त्याचवेळीं बाहेर मलयकेतु उभा आहे व राक्षसाचें बोलणें ऐकून तो भागुरायणाशीं बोलत आहे. राक्षसाची खोली, आणि खोलीबाहेर उभे राहिलेले मलयकेतु व भागुरायण, हीं दृश्यें एकाच वेळीं प्रेक्षकांना दिसलीं पाहिजेत हें उघड आहे. रंगभूमीवर या दोन दृश्यांची मांडणी कशी करीत असतील? रंगभूमीची डावी बाजू व उजवी बाजू यांच्यामध्ये एक पडदा टाकला तरच प्रेक्षकांना एकाच वेळीं दोन दृश्यें दिसतील, आणि राक्षस व मलयकेतु या दोघांचीं भाषणें ऐकूं येतील. ‘मृच्छकटिक’ नाटकाच्या पहिल्या अंकांत अशीच घटना आहे. चारुदत्त आपल्या घरांत बोलत असतां त्याच वेळीं बाहेर रस्त्यावर शकार वसन्तसेनेचा पाठलाग करीत आहे. दोन्ही दृश्यें प्रेक्षकांना दिसत आहेत.

विचारतो. आता कालहरण करण्याचें मुळीच कारण नाहीं, आता तावडतोब शत्रूवर स्वारी करावयाची असें राक्षस म्हणतांच शत्रू एखाद्या अडचणींत सापडला आहे काय अशी मलयकेतु पृच्छा करतो. करभकाने राजधानींत घडलेलें जें वृत्त थोड्या वेळापूर्वी सांगितलें होतें, तें सारें मलयकेतूने आडून ऐकलें आहे याची राक्षसाला मुळीच कल्पना नसल्यामुळे तो स्वच्छ मनाने व मोकळेपणाने बोलत आहे. चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यामध्ये वितुष्ट आलें आहे ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे व या संधीचा फायदा घेऊन तावडतोब स्वारी केली पाहिजे, असें राक्षस म्हणतो.

## राक्षसानें केलेलें राजनीतीचें विवेचन

भद्रभट इत्यादि चंद्रगुप्ताच्या पूर्वीच्या सहकार्योच्या बाबतींत भागुरायणानें जें स्पष्टीकरण थोड्या वेळापूर्वी केलें होतें तें मलयकेतूच्या डोक्यांत सारखें घोळत असल्यामुळे त्याविषयीं बोलण्याचा मोह मलयकेतूला आवरत नाही. भद्रभट इत्यादि चंद्रगुप्ताचे अधिकारी त्याला सोडून आपल्याला येऊन मिळाले ते केवळ चाणक्याच्याच दोषांमुळे; आता चाणक्य निघून गेल्यावर पूर्वीपासून चंद्रगुप्तावर प्रीति करणारे ते अधिकारी पुन्हा चंद्रगुप्ताला जाऊन मिळतील, अशी शंका (ही शंका खुद्द मलयकेतूला मुळीच आली नव्हती, भागुरायणानेच चातुर्याने ती त्याच्या मनांत भरवून दिलेली होती!) मलयकेतु व्यक्त करतो. आणि मलयकेतूने निर्मळ मनाने ही शंका विचारली आहे असें वाटून राक्षसहि आपल्या धोरणाचें समर्थन करण्याच्या इराद्याने राजनीतींतील एका महत्त्वाच्या प्रश्नाचें विवेचन करतो.

राजधानींत राज्यक्रांतीच्या वेळीं जे अधिकारी होते त्यांचे दोन गट पडतात. ( १ ) चंद्रगुप्ताबरोबर उठावणी करणारे त्याचे सहकारी, व ( २ ) नंद-वंशावर मनापासून प्रेम करणारे व चंद्रगुप्ताचा द्वेष करणारे सैनिक व मुत्सद्दी. यांपैकी पहिल्या गटांतील अधिकारीच चाणक्याच्या दोषांमुळे विरक्त झाले व चंद्रगुप्ताला सोडून गेले. परंतु दुसऱ्या गटांतील लोकांची गोष्ट वेगळी आहे. पित्याप्रमाणें पूज्य असलेल्या नंद राजाचा विनाश चाणक्याने केला म्हणून त्यांचा चाणक्यावर राग होता. पण दुसरा कोणताहि आश्रय नसल्यामुळे हे लोक या वेळीं नाइलाज म्हणूनच चंद्रगुप्ताची सेवा करीत आहेत. मलयकेतू-सारख्या पराक्रमी राजाचा आश्रय जर त्यांना मिळाला तर मात्र ते तत्क्षणीं चंद्रगुप्ताला सोडून जातील व मलयकेतूच्या आश्रयाला येतील. खुद्द राक्षसानें हेंच केलें नाही का ?

चाणक्य व चंद्रगुप्त यांच्यामधील वितुष्ट हेंच एक स्वारी करण्याचें कारण आहे असें नाहीं. पण राक्षसाच्या दृष्टीने तें सर्वांत प्रमुख कारण आहे. मलयकेतूला मात्र राक्षसाचें हें स्पष्टीकरण पटत नाहीं. चंद्रगुप्ताने चाणक्याला अधिकारावरून दूर केलें आहे हें खरें असलें तरी तो राज्यकारभार दुसऱ्या एखाद्या कर्तबगार सचिवाच्या हातीं सोपवील, किंवा स्वतःच सर्व कारभार आपल्या हातीं घेईल, असें मलयकेतूला वाटतें.

पण स्वतःच्या हातांत राज्यकारभार घेण्यास चंद्रगुप्त अगदी असमर्थ आहे, याविषयीं राक्षसाला कसलीहि शंका नाहीं. जे राजे 'स्वायत्तसिद्धि' असतात, म्हणजेच स्वतः कारभार करण्यास समर्थ असतात. किंवा जे 'उभयायत्तसिद्धि' असतात, म्हणजे सचिवांची मदत घेऊन स्वतः कारभार करतात, त्यांच्याच बाबतींत हें शक्य असतें. पण चंद्रगुप्त हा पूर्णपणें 'सचिवायत्तसिद्धि' आहे, चाणक्याच्या मदतीशिवाय अगदी क्षुद्र गोष्ट सुद्धा तो स्वतःच्या अकलेने करूं शकत नाहीं. तो डोळे असून आंधळा आहे, त्याला जग दिसत नाहीं. अशा स्थितींत चाणक्याच्या अभावीं तो स्वतः राज्यकारभार कसला करणार ? असें राक्षसाचें प्रतिपादन आहे.[५१]

एकंदर परिस्थितीचा विचार केला असतां या वेळीं जर स्वारी केली तर विजय अगदी निश्चित आहे अशी राक्षसाची खात्री झाली आहे. राक्षसाची जर अशी खात्री झालेली असेल तर सैन्याला कूच करण्याचा तावडतोब हुकूम देण्यास हरकत नाहीं, असें मलयकेतु म्हणतो. आणि राक्षसहि स्वारीसाठीं मुहूर्त पाहण्याच्या उद्योगाला लागतो.

चन्द्रगुप्तावर स्वारी करण्याचा बेत राक्षसाने सोडून देऊं नये, मलयकेतूचें सैन्य घेऊन त्याने प्रत्यक्ष स्वारी करावी, यासाठी चाणक्याची जी खटपट चाललेली आहे तिला अशा प्रकारें भरघोस यश आलें आहे.

## सिद्धार्थकाच्या कारस्थानाला चढलेला रंग

पहिल्या अंकांत शकटदासाकडून बनावट पत्र लिहवून घेऊन व त्यावर

५१. स्वायत्तसिद्धिषु उभयायत्तसिद्धिषु वा भूमिपालेषु तत् संभवति। चंद्रगुप्तस्तु दुरात्मा नित्यं सचिवायत्तसिद्धिरेव स्थितश्चक्षुर्विकल इवाप्रत्यक्षलोकव्यवहारः कथमिव स्वयं प्रतिविधातुं समर्थः स्यात्? (अंक ४–८५)

चंद्रगुप्त हा सचिवायत्तसिद्धि आहे याचा मागे तिसऱ्या अंकांत चाणक्याने देखील अगदी स्पष्ट उल्लेख केला होता.

"इह खलु अर्थशास्त्रकारास्त्रिविधां सिद्धिमुपवर्णयन्ति राजयत्तां सचिवायत्तामुभयायत्तां चेति। ततः सचिवायत्तसिद्धेस्तव किं प्रयोजनान्वेषणेन?" (अंक ३–५१)

राक्षसाच्या अंगठीने शिक्कामोर्तब करून चाणक्य तें पत्र सिद्धार्थकाच्या हवालीं करतो. त्यानंतर वध्यस्थानीं जाऊन शकटदासाची सुटका करावयाची, त्याला घेऊन राक्षसाकडे जावयाचें, राक्षस संतुष्ट होऊन जें बक्षीस देईल तें घ्यावयाचें, व कांही काळ राक्षसाच्या तैनातींत राहावयाचें, अशी कामगिरी चाणक्य सिद्धार्थकाला सांगतो. आणि शेवटीं शत्रूचें सैन्य अगदी राजधानीजवळ येऊन ठेपल्यावर करावयाची एक महत्त्वाची कामगिरी तो सिद्धार्थकाच्या कानांत सांगतो.[५२]

पहिल्या अंकांत चाणक्याने जी कामगिरी सिद्धार्थकाच्या कानांत सांगितली ती कामगिरी पार पाडण्याचा समय आता आला आहे. मलयकेतूचें सैन्य राजधानीच्या अगदी जवळ येऊन ठेपलें आहे. मलयकेतूच्या छावणींत अगदी तंग वातावरण आहे. छावणींतून बाहेर जाणारे व बाहेरून छावणींत येणारे यांच्यावर सक्त देखरेख असून भागुरायणाचा परवाना असल्याशिवाय कोणीहि बाहेर पडूं शकत नाही अथवा आंत येऊं शकत नाही अशी परिस्थिति आहे. (छावणींतून बाहेर जाण्यासाठी व छावणींत येण्यासाठी परवाना कोणाचा ? –– तर भागुरायणाचा, चाणक्याच्या विश्वासू सेवकाचा ! )

कोणत्या दिवशीं प्रत्यक्ष राजधानींत दाखल होऊं या विचाराने छावणींत सारे सैनिक बेचैन झाले असतां सिद्धार्थक घाईघाईने छावणींतून बाहेर पडण्याच्या बेतांत आहे. त्याच्या हातांत शकटदासाने लिहिलेलें तें पत्र आहे.

दुसऱ्या अंकांत सिद्धार्थक शकटदासाला घेऊन राक्षसाकडे जातो. तेव्हा आपल्या मित्राची सुटका झाल्यामुळे संतुष्ट झालेला राक्षस ( आपण काय करीत आहोंत हें भावनावेगाच्या भरांत लक्षांत न आल्यामुळे ) मलयकेतूने मुद्दाम प्रेमाने पाठविलेले दागिने[५३] सिद्धार्थकाला बहाल करतो. राक्षसाच्या अंगठीने मोर्तब करून हे दागिने सिद्धार्थकाने राक्षसाच्याच तिजोरींत ठेवले होते.[५४] या दागिन्यांची पेटी सुद्धा या वेळीं सिद्धार्थकाच्या जवळ आहे.

---

५२. अंक १-८३ पाहा. 'ततः प्रत्यासन्नेषु परेषु प्रयोजनमिदमनुष्ठेयम्। ( कर्णे ) एवमिव।'

५३. अंक २-६ पाहा. 'इमानि आभरणानि कुमारेण स्वशरीरादवतार्य प्रेषितानि धारयितुमर्हत्यमात्यः।'

५४. अंक २-१०० पाहा. 'अत्र प्रथमप्रविष्टस्य नास्ति कोऽपि परिचितो यत्रेमममात्यस्य प्रसादं निक्षिप्य निर्वृतो भवामि। तस्मादिच्छाम्यहमेतया मुद्रया मुद्रितममात्यस्यैव भाण्डागारे स्थापयितुम्। यदा मे प्रयोजनं तदा ग्रहीष्यामि।'

आणि पाटलिपुत्राला जाण्याचा देखावा करून सिद्धार्थक छावणींतून बाहेर पडण्याच्या गर्दींत आहे. इतक्यांत त्याला क्षपणक (जीवसिद्धि) भेटतो. क्षपणकाचें दर्शन एरवी कितीहि अशुभ असलें तरी या विशिष्ट क्षपणकाचें खरें रूप माहीत असल्यामुळे सिद्धार्थकाला त्याचें दर्शन अशुभ नाही. छावणींत केवढें तंग वातावरण आहे, परवान्यावाचून कोणालाहि बाहेर जातां येत नाही अथवा आंत येतां नाही, इत्यादी गोष्टींचें क्षपणक मोठें रसभरित वर्णन करतो. आपण राक्षसाच्या खास तैनातींत असल्यामुळे आपल्याला परवान्याची जरूर नाही असें सिद्धार्थक म्हणतो. पण कांहीहि असलें तरी परवाना लागणारच असें क्षपणक त्याला बजावतो.

## राक्षसाला गोत्यांत आणणारा क्षपणकाचा कबुलीजबाब

इकडे मलयकेतूचा विश्वासू अमात्य भागुरायण आपल्या डेऱ्यांत परवाने देत बसला आहे. चाणक्याच्या राजनैतिक कारस्थानांतील सारे धागेदोरे उलगडणें त्याच्यासारख्या चतुर माणसालाहि शक्य झालेलें नाही. आपली शरणागति तो कबूल करीत आहे. मलयकेतु एक क्षणभरहि भागुरायणाला दूर होऊं देत नाही. मलयकेतूचा आपल्यावर केवढा विलक्षण विश्वास आहे याची भागुरायणाला चांगली जाणीव आहे. मलयकेतूने आपल्यावर इतका विश्वास ठेवावा, आणि आपण त्याचा केसाने गळा कापावयास तयार व्हावें, याचें त्याला क्षणभर वाईट देखील वाटतें. पण चाकराची इच्छा असो अथवा नसो, त्याने मालकाच्या मर्जीप्रमाणें वागलेंच पाहिजे असें तो आपल्या मनाचें समाधान करून घेतो.[५५]

भागुरायणाच्या मनांत एका प्रकारच्या चिंतेने काहूर केलें असलें तर मलयकेतूच्या मनात निराळ्याच शंकेचें थैमान चाललें आहे. राक्षस आपल्याशीं

---

५५. कष्टमेवमस्मासु स्नेहवान् कुमारो मलयकेतुरतिसंधातव्यः इत्यहो दुष्करम्। अथवा

कुले लज्जायां च स्वयशसि च माने च विमुखः
शरीरं विक्रीय क्षणिकधनलोभाद्धनवति।
तदाज्ञां कुर्वाणो हितमहितमित्येतदधुना
विचारातिक्रान्तः किमिति परतंत्रो विमृशति? (अंक ५, श्लोक ४)

मलयकेतूचा विश्वासघात करण्याची कल्पना भागुरायणाला मनांतून खरोखरच निंद्य वाटत होती, आणि केवळ पोटासाठी चाणक्याची आज्ञा पाळणें त्याला भाग पडलें आहे, असें भागुरायणाच्या या स्वगतावरून आपण समजावें काय? कीं तो सुद्धा (चाणक्याप्रमाणें) नाटक करीत आहे असें मानावें?

एकनिष्ठ नाही, तो आपली प्रतारणा करीत आहे, अशी त्याची ( भागुरायणाच्या कारस्थानामुळे ) समजूत झालेली असल्यामुळे, नंदवंशावरील भक्तीचा प्रभाव बलवत्तर होऊन राक्षस आता चाणक्यापासून दुरावलेल्या चंद्रगुप्ताला तर जाऊन मिळणार नाही ना ? या शंकेने मलयकेतूचें चित्त अस्वस्थ झालें आहे. क्षणोक्षणीं त्याची खिन्नता वाढत चालली आहे.

परवाने देण्यासाठी भागुरायण आपल्या डेऱ्यांत बसला असतां एक क्षपणक परवान्यासाठी भेटूं इच्छीत आहे अशी वर्दी एक सेवक देतो. हा राक्षसाचा मित्र जीवसिद्धि आहे हें भागुरायण तत्क्षणीं ओळखतो. राक्षसाचें नांव निघतांच क्षपणक एकदम भयंकर संतापतो. राक्षसाचें नांव देखील ऐकण्याची त्याला इच्छा नाही. परम मित्रावर असला हा लटका राग कशासाठी ? असें भागुरायण त्याला मिस्कीलपणानें विचारतो.

भागुरायण आणि क्षपणक जीवसिद्धि यांचें बोलणें मलयकेतु आड उभा राहून ऐकत आहे. ( आड उभे राहून दुसऱ्यांचें बोलणें ऐकण्याची मलयकेतूला सवयच जडलेली दिसते. मागे राक्षसाच्या घराच्या बाहेर उभा राहून राक्षसाचें व करभकाचें बोलणें त्याने असेंच ऐकलें होतें. आडून बोलणें ऐकणें हें कधी कधी फार धोक्याचें असतें, याची मलयकेतूला चांगलीच प्रचीति आली आहे. )

राक्षसावर इतका राग होण्याचें कारण काय, हें सांगण्याची क्षपणक टाळाटाळ करीत आहे. आणि स्वाभाविकच मलयकेतूचें कुतूहल क्षणाक्षणाला वाढत आहे. राक्षसाच्या निष्ठेविषयीं अगोदरच त्याच्या मनांत किल्मिष उत्पन्न झालेलें असल्यामुळे क्षपणकाच्या तोंडून राक्षसाविषयीं कांही चमत्कारिक गोष्ट बाहेर पडते कीं काय या विचाराने त्याचें कुतूहल वाढलें आहे. क्षपणक टाळाटाळीचा देखावा करतो. पण सारें कांही सांगितल्याशिवाय परवानाच मिळावयाचा नाही असें भागुरायणानें दटावतांच क्षपणक नाइलाज झाल्याचें नाटक करतो, आणि राक्षसाच्या बदमाषपणाची हकिकत सांगूं लागतो. ( मलयकेतु आड उभा राहून हें सारें ऐकत आहे ! )

पूर्वी हा क्षपणक पाटलिपुत्रांत राहत होता. राक्षसाची व त्याची खूप दोस्ती होती. राक्षसानेच गुप्तपणाने विषकन्येच्या द्वारें पर्वतेश्वराचा ( मलयकेतूच्या पित्याचा ) वध केला. ( राक्षसाने विषकन्येच्या द्वारें पर्वतकाचा वध केला हें प्रत्यक्ष राक्षसाच्या दोस्ताकडून कळतांच मलयकेतूला भयंकर धक्का बसतो. चाणक्यानेच पर्वतकाचा वध केला अशी त्याची हा वेळपर्यंत समजूत होती. अंक १–२१, चाणक्याचें स्वगत पाहा. 'पिता ते चाणक्येन घातितः

हात रहास त्रासयेत्त्रा भागुरायणेनापवाहितः पर्वतकपुत्रो मलयकेतुः ।' ज्याच्यावर सारा विश्वास टाकून आपण इतके दिवस निर्भय राहिलों तो राक्षस आपल्या पित्याचा मारेकरी आहे हें कळतांच मलयकेतु रागाने बेभान झाला असला तर तें स्वाभाविकच आहे. ) जीवसिद्धि राक्षसाचा मित्र असल्यामुळे चाणक्याने त्याची नगरांत धिंड काढली व त्याला नगरांतून हाकून दिलें. आणि आता खुद्द राक्षसच त्याच्यावर उलटला असून तो केव्हा घात करील तें सांगतां येत नाही असें दिसल्यामुळे क्षपणक अतिशय घाबरला आहे.

पर्वतकाच्या वधाच्या बाबतींत काय काय भानगडी झाल्या तें सारें भागुरायणाला चांगलें माहीत आहे. पण तो मुद्दाम चातुर्याने पर्वतकाच्या वधाचें खापर राक्षसाच्या माथीं फुटावें याची खटपट करीत आहे. पर्वतकाला अर्धें राज्य देण्याचें वचन चाणक्याने दिलें होतें; पण अर्धें राज्य देण्याचें त्याच्या जिवावर आल्यामुळे त्यानेच कपटाने पर्वतकाचा काटा काढला अशी गांवांत बातमी पसरल्याचा उल्लेख भागुरायण करतो. पण क्षपणक आश्चर्याचा धक्का बसल्याचा देखावा करतो. गांवांत असली विलक्षण खोटी बातमी पसरावी याचें त्याला आश्चर्य वाटलें आहे. चाणक्याचा विषकन्येशीं कसला संबंध? चाणक्याचा पर्वतकाच्या वधाशीं कसलाहि संबंध नव्हता असें क्षपणक ठासून सांगतो.

## राक्षसाच्या कपटीपणाविषयीं मलयकेतूची खात्री

भागुरायण संतुष्ट होतो व तत्क्षणीं क्षपणकाला परवाना देतो. ही हकिकत क्षपणकाने जशीच्या तशी मलयकेतूला सांगावी असा भागुरायण आग्रह धरतो. पण मलयकेतूने सारें कांही आडून ऐकलें आहे. आपल्या पित्याचा खून राक्षसानेच केला याविषयीं त्याची पूर्ण खात्री झाली आहे. आपण भागुरायणाला सांगितलेली हकिकत मलयकेतूने ऐकली आहे, हें कळतांच आपला कार्यभाग झाला, या विचाराने क्षपणक निहायत खूष होतो आणि तत्क्षणीं निघून जातो.

राक्षसाने केलेल्या कपटी कारस्थानामुळे मलयकेतूला राक्षसाची शिसारी आली आहे. जिवलग मित्र म्हणून ज्याच्यावर निभ्रांतपणें विश्वास ठेवला त्यानेच असा केसाने गळा कापावा, व आपलें 'राक्षस' हें नांव सार्थ करावें, या प्रकाराने त्याला उबग आला आहे. रागाच्या सपाट्यांत मलयकेतु राक्षसाला ताबडतोब ठार मारील अशी परिस्थिति निर्माण झाल्याचें दिसतांच भागुरायण मोठ्या चातुर्याने एक युक्ति योजतो. राक्षसाच्या जिवाला जपावयाचें अशी

चाणक्याची स्पष्ट सूचना[५६] असल्यामुळे, राक्षसाचा गुन्हा सौम्य दिसावा यासाठी भागुरायण मलयकेतूला राजनीतींतील मर्म स्पष्ट करून सांगतो.

## राक्षसाला वाचविण्यासाठी भागुरायणाची युक्ति

राजनीतीच्या सिद्धान्तांच्या अनुरोधाने चालण्याचा ज्यांचा संकल्प झालेला असतो असे राजे 'अरि', 'मित्र', व 'उदासीन' या तीन प्रकारच्या राजांशीं जो व्यवहार करतात तो नेहमी राजनीतीच्या तत्त्वांच्या अनुरोधानेच करीत असतात. एखाद्या परिस्थितींत सामान्य माणसें ज्या रीतीने वागतात त्यापेक्षा निराळी रीत राजनीतिज्ञांची असते. ते स्वेच्छेने वर्तन करीत नाहीत,तर राजनीतीच्या तत्त्वांप्रमाणेच वर्तन करतात. पाटलिपुत्रांत राज्यक्रांति होण्याच्या समयीं सर्वार्थसिद्धि हा नन्दवंशीय पुरुषच नन्दाच्या गादीवर बसावा अशी राक्षसाची इच्छा होती हें खरें आहे.[५७] पर्वतक हा चद्रगुप्तापेक्षां अधिक सामर्थ्य-शाली आहे असें तेव्हा राक्षसाला वाटलें. आपल्या कार्याच्या आड पर्वतकच येईल असें दिसल्यामुळे पर्वतकच हा आपला खरा शत्रु आहे असें राक्षसाने मानलें. म्हणून त्या परिस्थितीत पर्वतकाचा नाश करण्यावाचून त्याला गत्यंतर नव्हतें. मित्रांचे शत्रु बनणें, आणि शत्रु मित्र होणें, हा प्रकार राजकारणांत नेहमीच घडत असतो. यामुळे पूर्वी राक्षसाच्या हातून पर्वतकाच्या वधाची गोष्ट घडली असली तरी राजकारणाच्या दृष्टीने आता ती विसरलीच पाहिजे. राक्षस हा गुन्हेगार आहे या दृष्टीने आज त्याच्याकडे पाहणें योग्य होणार नाही. नन्दांचें राज्य मिळवणें हें जें आपलें उदिष्ट आहे तें सफल होईपर्यंत राक्षसाला संभाळून घेणेंच राजकारणाच्या दृष्टीने उचित व आवश्यक आहे. भागुरायणाने केलेलें हें मार्मिक विवेचन मलयकेतूला पटणारच, हें सांगण्याची जरूर नाही. राक्षसाचा या तंग परिस्थितींत वध केला तर मोठमोठे अधिकारी बिथरतील व त्याचा परिणाम लढाईच्या दृष्टीने घातक होईल हें दिसल्यामुळे राक्षसाचा वध करण्याचा बेत मलयकेतु सोडून देतो.

## शकटदासाने लिहिलेलें तें पत्र

सिद्धार्थकाच्या नाटकाला आता रंग चढूं लागला आहे. राक्षसाच्या कपटीपणाची प्रतीति आल्यामुळे मलयकेतु त्याच्यावर भयंकर चिडलेला आहे.आणि

---

५६. रक्षणीयाः राक्षसस्य प्राणाः इति आर्यादेशः। ( अंक ५–५२ )

५७. स (राक्षसः) खलु कस्मिंश्चिदपि जीवति नन्दान्वयावयवे वृषलस्य साचिव्यं ग्राहयितुं न शक्यते। ......अनयैव बुद्ध्या तपोवनगतोऽपि घातितस्तपस्वी नन्दवंशीयः सर्वार्थसिद्धिः। (अंक १--२१)

बरोबर याच वेळीं चौकीदाराचा तातडीचा निरोप येतो. एक माणूस परवान्या-वाचून छावणींतून बाहेर पडत असतां त्याला पकडून ठेवलें; त्याची झडती घेतली असतां त्याच्याजवळ एक पत्र सापडलें. हा निरोप आल्यावर लगेच शिपाई सिद्धार्थकाला घेऊन येतात. आपण राक्षसाच्या खास तैनातींत असून काम फार महत्त्वाचें व तातडीचें असल्यामुळे परवाना घेण्याला सवड मिळाली नाही, असें सिद्धार्थक भागुरायणाने विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देतो. भागुरायण सिद्धार्थ-काच्या हातांतून तें पत्र हिसकावून घेतो. राक्षसाचा शिक्कामोर्तब त्या पत्रावर दिसतांच मोहोर कायम ठेवून भागुरायण पत्र फोडतो व मलयकेतूजवळ देतो. पहिल्या अंकांत सिद्धार्थकाला सांगून शकटदासाकडून चाणक्याने जें पत्र लिहवून घेतलें होतें तेंच हें पत्र आहे. या पत्रावर पत्ता नाही. ज्याला उद्देशून पत्र लिहिलें आहे त्याच्या नांवाचा कसलाहि उल्लेख पत्रांतील मजकुरांत नाही. पण मजकूर वाचल्याबरोबर हें पत्र राक्षसानेच चंद्रगुप्ताला लिहिलें असलें पाहिजे असें जाणत्या माणसाच्या तावडतोब लक्षांत यावें असाच मजकुराचा रोख आहे. पत्राचा आशय पुढीलप्रमाणें आहे—

" आमच्या वैऱ्याच्या नाश करून आपण आपलें वचन खरें केलें आहे. आता आमच्यासाठी आपण आणखी एक गोष्ट करावी. आपण पूर्वी कबूल केल्याप्रमाणें आमच्या मित्रांशींहि तह करावा आणि त्यांना संतुष्ट करावें. आपण जर त्यांच्यावर हा अनुग्रह केला तर ते कृतज्ञ राहतील व त्यांच्या सध्याच्या आश्रय-दात्याचा नाश करतील व आपल्याला येऊन मिळतील. आपल्याला याची आठवण असली तरी सुद्धा पुन्हा आठवण करून देत आहों. वर ज्यांचा उल्लेख केला आहे त्या राजांपैकी कांहींना शत्रूचें द्रव्य आणि हत्ती मिळावेत असें वाटत आहे. इतरांना शत्रूचा प्रदेश हवा. आपण जे तीन अलंकार पाठविले ते मिळाले. या पत्रासोबत आम्ही देखील एक चीज पाठवीत आहोंत, तिचा स्वीकार व्हावा. तोंडी निरोप आमचा विश्वासू सेवक सिद्धार्थक आपणांस कळवील. "

## मलयकेतूने राक्षसाला दिलेले अलंकार

सदर पत्राच्या शेवटीं सिद्धार्थक तोंडी निरोप सांगेल असें स्पष्ट लिहिलें असल्यामुळे मलयकेतूसमोर भागुरायण त्याला खूप छेडतो. पण सिद्धार्थक सांगावयास तयार होत नाही. अखेर त्याला फटके मारतात. ( बहुधा हें नाटकच असावें. ) सिद्धार्थकाने खाकेंत लपविलेली दागिन्यांची मोहोरबंद पेटी खाली पडते. मोहोर राक्षसाचीच आहे. ' पत्राबरोबर आम्ही एक चीज पाठवीत आहोंत ' असा जो उल्लेख पत्रांत होता ती चीज म्हणजे ही दागिन्यांची पेटीच

असली पाहिजे असें मलयकेतूला वाटतें. मोहोर कायम ठेवून भागुरायण ती पेटी उघडतो. आणि मलयकेतूला पुन्हा आश्चर्याचा धक्का बसतो. दुसऱ्या अंकांत त्याने स्वतःचे दागिने राक्षसाला भेट म्हणून पाठविले होते तेच हे दागिने ! तेव्हा हें पत्र चंद्रगुप्तालाच पाठविलें असलें पाहिजे, व ते राक्षसानेच लिहिलें असलें पाहिजे, याविषयीं मलयकेतूच्या मनांत संशय राहत नाही.

## आणि तो तोंडी निरोप

सिद्धार्थकाला पुन्हा एकदा फटके मारतांच तो सारें कांही सांगून टाकतो. (सिद्धार्थकाला बाहेर घेऊन जातात यावरून त्याला फटके मारण्याचें नाटक असावें वाटतें.) खुद्द राक्षसाच्या सांगण्यावरून आपण हें पत्र चंद्रगुप्ताकडे घेऊन चाललों होतों असें सिद्धार्थक कबूल करतो. ज्या तोंडी निरोपाचा पत्रांत उल्लेख होता तो तोंडी निरोपहि सिद्धार्थक सांगतो— "माझे प्रिय मित्र असलेल्या पांच राजांना आपल्याविषयीं विशेष स्नेह वाटत आहे. चित्रवर्मा, सिंहनाद, पुष्कराक्ष, सिन्धुषेण, मेघनाद हे ते राजे होत.[५८] या राजांपैकी पहिल्या तीन राजांना मलयकेतूचें राज्य पाहिजे, उरलेल्या दोघांना मलयकेतूचे हत्ती आणि त्याचा खजिना पाहिजे. तरी चाणक्याला सचिवपदावरून काढून टाकून आपण ज्याप्रमाणें माझें समाधान केलें त्याचप्रमाणें या राजांच्या विनंतीप्रमाणें आपण करावें."

पत्र शकटदासाकडून लिहवून घेतलें असल्यामुळे चित्रवर्मा इत्यादि पांच राजांचीं नांवें व चाणक्याचें नांव त्यांत येणें शक्यच नव्हतें. म्हणून ही सारी भानगड तोंडी निरोपाच्या द्वारें सांगण्याची योजना चाणक्याने केली होती. पण तोंडी निरोप व पत्रांतील मोघम मजकूर यांच्यामध्ये साम्य असल्याशिवाय पत्र लिहिणाऱ्यानेच तोंडी निरोप सांगितला हें मलयकेतूला खरें वाटलें नसतें. म्हणून पत्रांत जो मोघम मजकूर होता तोच तोंडी निरोपांत नांवनिशीसह तपशीलवार आला आहे इतकेंच. शकटदासाने लिहिलेलें पत्र चाणक्याने मोघम कां ठेवलें याचा आता पूर्ण उलगडा झाला आहे.

---

५८. अंक १ श्लोक २० पाहा.

कौलूतश्चित्रवर्मा, मलयनरपतिः सिंहनादो नृसिंहः
काश्मीरः पुष्कराक्षः क्षतरिपुमहिमा, सैन्धवः सिन्धुषेणः।
मेघाख्यः पंचमोऽस्मिन् पृथुतुरगबलः पारसीकाधिकाराजो
नामान्येषां लिखामि ध्रुवमहमधुना चित्रगुप्तः प्रमार्ष्टु ॥

## राक्षसाची व मलयकेतूची भेट

चित्रवर्मा इत्यादि राजे मलयकेतूचे परम मित्र होते. ज्यांच्यावर आपण पूर्ण विश्वास ठेवला ते आपले मित्रहि आपला असला नीच विश्वासघात करावयास उद्युक्त व्हावेत या गोष्टीचा मलयकेतूला भयंकर संताप आला आहे. हे सारे इतके राक्षसाच्या कच्छपीं कां होते, याचाहि आता मलयकेतूला उलगडा झाला आहे.

आणि तत्क्षणीं राक्षसाला भेटण्याचें तो ठरवितो. बिचारा राक्षस आपल्या डेऱ्यांत विचारमग्न होऊन बसला आहे. आपल्या सैन्यांत फार फितूर माजला आहे हें कळल्यामुळे तो खिन्न झाला आहे. आपल्या मनाचें कसें तरी समाधान करून घेऊन राजधानीवर हल्ला करण्याच्या वेळीं सैन्याचे कसे विभाग पाडावयाचे याची योजना तो आखतो व तशी सूचना योग्य त्या सेनाधिपतींना देण्याचीहि तो व्यवस्था करतो. चित्रवर्मा इत्यादि राजे मलयकेतूच्या फार विश्वासांतले असल्यामुळे ते नेहमी मलयकेतूजवळ असावेत अशी राक्षसाची योजना आहे. ( ही योजना करून राक्षसाने आपल्या विनाशाची खाशी तरतूद करून ठेवली आहे ! )

इतक्यांत मलयकेतु येत आहे अशी वर्दी येते. मलयकेतूच्या मनांत केवढा भयंकर क्षोभ माजला आहे याची राक्षसाला यत्किंचित् कल्पना नाही. मलयकेतूने मुद्दाम आपल्याला दागिने भेट म्हणून पाठविले होते. आता मलयकेतु भेटीला येत असल्यामुळे त्याच्या मनाला बरें वाटावें म्हणून राक्षस चांगल्या बुद्धीने अंगावर दागिने घालण्याचे ठरवतो. पण मलयकेतूने दिलेले दागिने राक्षसाने सिद्धार्थकाला बहाल करून टाकले असल्यामुळे [५९] दुसऱ्या अंकाच्या शेवटीं विकत घेतलेल्या तीन दागिन्यांपैकी [६०] एक दागिना अंगावर घालून तो मलयकेतूच्या भेटीला जाण्यास तयार होतो. ( मलयकेतूचा पिता पर्वतेश्वर याचा हा अलंकार होता. राक्षसाचें दैवच खोटें आहे. अगदी नकळत तो प्रत्येक क्षणीं नवीन अडचणींत सापडत आहे. )

## राक्षसाची उलटतपासणी

राजधानीवर हल्ला करण्याची सारी योजना तयार झाली आहे, सैन्याचे विभाग पाडून त्यानी कसे व्यूह रचावयाचे याचीहि आखणी झाली आहे असें राक्षसाने म्हटल्याबरोबर योजनेचा तपशील समजावून घेण्याची मलयकेतु इच्छा

---

५९. अंक २-९९ पाहा.

६०. अंक २-१२५ पाहा.

व्यक्त करतो. चित्रवर्मा इत्यादि राजांनी मलयकेतूच्या संरक्षणासाठी नित्य त्याच्या भोवती राहावयाचें असें राक्षसानें ठरवलेलें पाहून मलयकेतु थरथरतो. आपल्या प्राणांवर उलटून जे शत्रूशीं गुप्त कारस्थानें करण्यांत दंग झाले आहेत तेच राजे युद्धामध्ये आपल्याभोवती राहणार यांतील धोका मलयकेतूला चांगला समजला आहे.

पण थोडा वेळ आपल्या भावनांचा क्षोभ आवरून राक्षसाच्या पदरांत त्याच्या अपराधाचें पुरेपूर माप टाकण्याच्या इराद्याने मलयकेतू त्याला छेडूं लागतो. 'अगदी अलीकडे कुसुमपुराकडे कोणी माणूस पाठविला होता का ?' असें मलयकेतूने विचारल्यावरोबर राक्षस कानांवर हात ठेवतो. मलयकेतु सिद्धार्थकाला आंत बोलावतो. 'या माणसाजवळ पत्र देऊन त्याला कशासाठी पाठविलें होतें ?' असा प्रश्न मलयकेतु विचारतो. सिद्धार्थक दिसतांच राक्षसाला विलक्षण आश्चर्य वाटतें. पण सिद्धार्थक लाजेने मरणप्राय दुःख झाल्याचें नाटक करतो. खूप मारल्यामुळे शेवटीं नाइलाजाने खरी गोष्ट सांगणें भागच पडलें असें सिद्धार्थक म्हणतो. कसली खरी गोष्ट ? आणि कसलें रहस्य ? राक्षसाच्या कांहीच ध्यानांत येत नाही. सिद्धार्थक तेंच तेंच पुन्हा बोलत आहे. आपल्या धन्यासमोर खरी गोष्ट सांगण्याचा सिद्धार्थकाला धीर होत नाही असें वाटून मलयकेतु सारा प्रकार सांगण्याची भागुरायणाला सूचना करीत आहे.

## राक्षसाविरुद्ध बिनतोड पुरावा

आणि जें कारस्थान राक्षसाच्या मनांत स्वप्नांत देखील कधी आलें नव्हतें तें कारस्थान भागुरायण मोठें खुलवून सांगत आहे. 'या माणसाजवळ पत्र देऊन तुम्हीच त्याला चंद्रगुप्ताकडे पाठविलें होतें व त्याला तोंडी निरोपहि सांगितला होता, असें भागुरायण म्हणतो. फार मारल्यामुळे शेवटीं खरें सांगणें भाग पडलें अशी सिद्धार्थकहि बतावणी करतो. हें सारें साफ खोटें आहे, मारल्यामुळे सिद्धार्थक खोटें बोलत आहे, असें राक्षस जीव तोडून सांगतो. शेवटीं शकटदासाने लिहिलेलें ते पत्र त्याला दाखविण्यांत येतें. राक्षस पत्र वाचतो. पण हें शत्रूचें कारस्थान आहे असें तो स्पष्टपणें म्हणतो. पण पत्रावरोबर तुम्ही अलंकारहि पाठविला आहे, असें म्हणून भागुरायण सिद्धार्थकाजवळ असलेला अलंकार राक्षसाला दाखवितो. तो अलंकार पाहतांच मलयकेतूने आपल्याला भेट म्हणून दिलेलाच हा अलंकार आहे हें राक्षसाला कळून चुकतें. आपण हा अलंकार एका विशेष आनंदाच्या प्रसंगीं सिद्धार्थकाला दिला होता हें राक्षस कबूल करतो. मलयकेतूने केवढ्या आपुलकीने स्वतःचा अलंकार भेट म्हणून पाठविला, आणि

तो सिद्धार्थकासारख्या मामुली माणसाला राक्षसाने देऊन टाकावा ही घटना मोठीच चमत्कारिक आहे, किंबहुना कृतघ्नपणाची आहे, असें भागुरायण कुत्सितपणें बोलतो.

यानंतर पत्रांत ज्या तोंडी निरोपाचा उल्लेख होता त्याचा निर्देश मलयकेतु करतो. राक्षसाच्या दृष्टीने साराच प्रकार अतर्क्य आहे. कसला निरोप? कोणाला निरोप? आणि पाठवला तरी कुणी? सारेंच गूढ आहे. पत्र आपण कधीच लिहिलें नाही, निरोपहि पाठविला नाही, असें राक्षस स्पष्टपणें सांगतो.

पण पत्रावर राक्षसाची मुद्रा आहे तिची वाट काय? कारस्थानी माणसें नकली मुद्रा सहज तयार करूं शकतात असें राक्षसाचें यावर उत्तर आहे. आता प्रत्यक्ष सिद्धार्थकालाच भागुरायण खरेंखोटें विचारतो. आणि शकटदासाने हें पत्र लिहिलें असें सिद्धार्थक सांगतो. शकटदासाने—आपल्या परम मित्राने— हें पत्र लिहिलें? राक्षसाच्या सहनशक्तीची मर्यादा आता संपली आहे. शकटदासाला बोलावणें पाठविण्याचें ठरतें. पण लगेच तो बेत बदलतो. शकटदास हा राक्षसाचा प्रिय मित्र असल्यामुळे पत्र लिहिल्याचें तो राक्षससमोर कबूल करणें शक्य नाही. शकटदासाने लिहिलेला दुसरा एखादा लेख मिळाला तर त्यातील अक्षर व या पत्रांतील अक्षर एकमेकाशीं ताडून पाहतां येईल, आणि पत्रांतील अक्षर शकटदासाचें असलें तर तें तावडतोब कळून येईल, अशी तोड सुचवण्यांत येतें. ( शकटदासाची व राक्षसाची प्रत्यक्ष भेट झाली असती तर पत्र लिहिण्याच्या वेळीं घडलेला खरा प्रकार शकटदासाने यथातथ्य सांगितला असता. आणि भागुरायणाला हेंच नेमकें नको होतें. म्हणून मोठ्या चातुर्यानें शकटदास राक्षससमोर येऊं नये अशी त्याने व्यवस्था केली आहे. )

पत्रांतील मजकूर शकटदासानेच लिहिला आहे हें सिद्ध होतें. आपल्या प्रिय मित्राने हें पत्र लिहिलेंच कसें? हें कांही केल्या राक्षसाच्या लक्षांत येत नाही. द्रव्याच्या लोभाने शकटदास मित्रप्रेम विसरला असेल काय? राक्षसाची मुद्रा तर नेहमी त्याच्याचजवळ असे.[६१] सिद्धार्थक हा शकटदासाचा जिवलग मित्र; ( सिद्धार्थकानेच शकटदासाला मृत्यूच्या जबड्यातून सोडविलें नव्हतें काय? ) हस्ताक्षर तर शकटदासाचेंच आहे यांत शंका नाही. साऱ्या घटना विलक्षण चमत्कारिक आहेत. राक्षस अगदी हवालदील होऊन गेला आहे. भेदनीतींत कुशल असलेल्या कुटिलमति कौटिल्याशीं शकटदासाने संगनमत केलें असावें,

६१. अंक २-११० पाहा. 'सखे शकटदास, अनयैव मुद्रया स्वाधिकारे व्यवहर्तव्यं भवता।' असें राक्षस शकटदासाला म्हणतो, व आपली अंगठी त्याच्या ताब्यांत देतो.

आणि स्वतःचा प्राण वांचविण्यासाठी विश्वासघात करून आपला बळी देण्याचें ठरविलें असावें, अशी राक्षसाच्या मनाची खात्री होऊं लागली आहे.[६२]

'तीन अलंकार पाठविले ते मिळाले' असा पत्रांत उल्लेख होता.[६३] राक्षसाच्या अंगावरील अलंकारांकडे बोट करून, 'हा त्या तीन अलंकारांपैकीच एक कीं काय?' असें मलयकेतु विचारतो; आणि निरखून पाहतांच आपल्या पित्याचाच हा अलंकार आहे याविषयीं त्याची खात्री पटते, आणि तो दचकतो. आपण हा अलंकार विकत घेतला असें राक्षस म्हणतो. हा पर्वतकाचाच अलंकार आहे अशी मलयकेतूची खात्री झालेली असल्यामुळे तो प्रतीहारीला विचारतो. हा पर्वतेश्वर महाराजांचाच अलंकार आहे असें प्रतीहारी सुद्धा सांगते. ज्या व्यापाऱ्यांकडून आपण अलंकार विकत घेतले ते चाणक्याचेच हेर होते हें आता कुठे राक्षसाच्या ध्यानांत आलें आहे.

पण राक्षसाने अलंकार विकत घेतले यावर मलयकेतूचा थोडा सुद्धा विश्वास बसत नाही. पर्वतकाचे दागिने चंद्रगुप्ताजवळ होते हे मलयकेतूला माहीत आहे. चद्रगुप्त ते राक्षसाला विकून टाकील हें कधींच शक्य नाही एवढें मलयकेतूला समजत आहे. पण एक गोष्ट मात्र शक्य आहे असा विचार त्याच्या मनांत येतो. मलयकेतूला पकडून देण्याची कामगिरी चंद्रगुप्ताने राक्षसाला सांगितली असावी, आणि या कामगिरीचा मोबदला म्हणून त्याने राक्षसाला ते अलंकार दिले असावेत, अशी शंका मलयकेतूला येते.[६४]

## कोंडींत सांपडलेल्या राक्षसाचा अगतिकपणा

शत्रूने मोठया कौशल्याने पसरून ठेवलेल्या जाळ्यांत आपण आता पूर्ण गुंतलों हें राक्षसाला दिसत आहे. पत्रांतील अक्षर शकटदासाचेंच आहे, आणि पत्रावरील मुद्रा राक्षसाची स्वतःची आहे. अशा स्थितींत पत्राशीं आपला कसलाहि संबंध नाही असें तो कोणत्या तोंडाने म्हणणार? आणि त्याच्यावर

६२. आपण कोंडींत सापडलों आहोंत हें दिसल्यावर तरी खुद्द शकटदासाला बोलावणं पाठविण्याचा आग्रह राक्षसाने कां धरला नाही? शकटदास आल्याशिवाय पत्राविषयीं कांहीहि बोलण्याचें त्याने कां नाकारलें नाही? शकटदास आला असता तर 'सिद्धार्थकाने सांगित्यावरूनच हें पत्र मीं लिहिलें' असें त्याने सांगितलें असतें, आणि मग साराच नूर कदाचित् पालटला असता.

६३. 'अलंकारत्रयं च सत्यवता यदनुप्रेषितं तदुपगतम्।' (अंक ५–६९)

६४. चन्द्रगुप्तस्य विक्रेतुराधिकं लाभमिच्छता।
कल्पिता मूल्यमेतेषां क्रूरेण भवता वयम्॥ (अंक ५, श्लोक १७)

विश्वास तरी कोण ठेवणार? शकटदासाने विश्वासघात केला यावर राक्षसाने तरी विश्वास कसा ठेवावा? चंद्रगुप्तासारखा सम्राट् अलंकार विकून पैसे मिळविण्याचा उपद्व्याप करील यावर कोणाचा तरी विश्वास बसेल का? तात्पर्य, उडवाउडवीचें उत्तर देण्यापासून कांहीहि साधावयाचें नाही हें राक्षसाला कळून चुकलें आहे. राक्षसाने पुरा विश्वासघात केला आहे याची खात्री झाल्यामुळे मलयकेतु कमालीचा उद्विग्न झाला आहे. पत्राकडे व अलंकाराकडे बोट दाखवून तो पुन्हा राक्षसाला छेडतो. विचारा राक्षस तरी काय बोलणार? एवढा मोठा कर्तबगार मुत्सद्दी, पण अगतिक झाल्यामुळे त्याच्या डोळ्यांत अश्रु तरारतात, आणि 'दुर्दैव, दुसरें काय?' एवढाच उद्‌गार त्याच्या तोंडून बाहेर पडतो. नन्दांच्या सारखे खरे गुणग्राही व प्रेमळ राजे ज्याने जगांतून नष्ट केले त्या नीच दैवाचाच हा सारा खेळ आहे; असल्या घातक दैवापुढे मानवाच्या प्रयत्नांचा कसला प्रभाव पडणार? हाच विचार त्याच्या मनांत प्रबळ झाला आहे.

## मलयकेतूच्या विकारांचा उद्रेक

दुर्दैवावर सारा दोष टाकून राक्षस आपल्या घोर अपराधावर मुर्दाडपणाने पांघरूण घालूं पाहात आहे असें वाटून मलयकेतु आणखी खवळतो. हें दुष्ट दैवाचें विलसित नसून अघोरी लोभाचेंच विलसित आहे असें तो चिडून बोलतो. इतकेंच नाही तर राक्षसाच्या आतापर्यंतच्या पातकांचा पाढा तो राक्षसापुढे वाचतो. विषकन्येच्या द्वारें पर्वतकाचा कपटाने घात कोणी केला? चंद्रगुप्ताचें सचिवपद मिळविण्याच्या क्रूर लोभाने मलयकेतूची विक्री करावयाचा नीचपणा कोणी केला? विषकन्येच्या द्वारें राक्षसानेच पर्वतकाचा वध केला असा आरोप अगदी स्पष्टपणें मलयकेतूने केल्याबरोबर राक्षस पूर्णपणें खचतो. क्षपणक जीवसिद्धीची याबाबत साक्ष काढावयास मलयकेतु तयार आहे. ज्याला आपण जिवलग मित्र मानलें तो जीवसिद्धि सुद्धा चाणक्याचाच हेर ठरला यामुळे राक्षसाचा उद्वेग अनावर झाला आहे.

## पत्रांत उल्लेखिलेल्या पांच राजांचा वध

मलयकेतूच्या संतापाचा पारा उतरत नाही. राक्षसाशीं मैत्री करून चंद्रगुप्ताला खूष करूं पाहणाऱ्या चित्रवर्मा इत्यादि पांच राजांना ताबडतोब ठार करण्याचा तो सेनापतीला हुकूम देतो. अशा प्रकारें पहिल्या अंकांत चाणक्याने या राजाच्या विनाशाची जी योजना आखली होती [६५] ती आता पूर्ण सफळ

६५. नामान्येषां लिखामि ध्रुवमहमधुना चित्रगुप्तः प्रमार्ष्टु! (अंक १, श्लोक २०).

झाली आहे. चित्रवर्मा इत्यादि राजांच्या वधाची योजना मनांत पूर्णपणे तयार होतांच मलयकेतूवर आपण खात्रीने मात करणार अशी खात्री होऊन चाणक्य संतुष्ट झाला होता.[६६] मलयकेतूने या राजांचा वध केलाच पाहिजे अशीच परिस्थिति त्या बनावट पत्रामुळे निर्माण होईल असा चाणक्याचा अंदाज होता. आणि प्रत्यक्षांत त्याचा हा अंदाज खरा ठरलेला आहे. चित्रवर्मा इत्यादि पांच राजे फार प्रबळ होते व त्यांचा सैन्यांत खूप दरारा होता. असल्या मातबर राजांचा मलयकेतूने क्रूरपणाने वध केला तर सैन्यांतील इतर पराक्रमी राजे बिथरतील, मलयकेतु हा अतिशय अविचारी व क्रूर आहे अशी त्यांना प्रतीति येईल, आपल्याहि प्राणावर केव्हा तरी बेतण्याची पूर्ण शक्यता आहे अशी धास्ती त्यांना वाटेल, आणि अगदी ऐन वेळीं ते मलयकेतूला सोडून जातील, असा कयास चाणक्याने बांधलेला होता. आणि चित्रवर्मा इत्यादींचा वध झाल्यामुळे इतर राजे धावरून पळून गेल्यावर मलयकेतु अगतिक झाला आहे या गोष्टीचा फायदा घेऊन भद्रभट, पुरुषदत्त, डिंगरात इत्यादि ( चंद्रगुप्ताला सोडून मलयकेतूला जाऊन मिळाल्याचा देखावा करणाऱ्या ) चाणक्याच्या सेवकांनी तावडतोब मलयकेतूला पकडून अटकेंत ठेवावयाचें असा चाणक्याच्या योजनेचा उत्तरार्ध असला पाहिजे. आणि त्याच्या योजनेप्रमाणें प्रत्येक गोष्ट जशीच्या तशी घडलेली आहे, हें सहाव्या अंकाच्या सुरवातीला सिद्धार्थकाच्या साक्षीवरून स्पष्ट होईल.[६७]

भोवतालच्या विचित्र परिस्थितीमुळे विषण्ण होऊन मलयकेतु राजधानीवरील स्वारीचा बेत कदाचित् सोडून देईल अथवा दिरंगाई करील असा रागरंग दिसल्यामुळे भागुरायण मलयकेतूला स्वारीविषयीं प्रोत्साहन देतो, आणि मलयकेतु निघून जातो.

## राक्षसाचा भावनाविष्कार

एकांतांत राक्षस आपल्या कमनशिबाचा विचार करीत बसला आहे. चांगला हेतु मनांत धरून जी जी गोष्ट त्याने आतापर्यंत केली ती ती त्याच्याच अंगावर उलटली आहे, इतकेंच नव्हे तर तिच्यामुळे शत्रूचा फायदा

---

६६. हन्त, जितो मलयकेतुः ! ( अंक १–७७ )

६७. अस्ति तावच्चाणक्यनीतिमोहितमतिना मलयकेतुहतकेन निष्कास्य राक्षसं हताश्चित्रवर्मप्रमुखाः प्रधानाः पञ्च पार्थिवाः। ततोऽसमीक्ष्यकार्येष दुराचार इत्युज्झित्वा मलयकेतुकटकभूमिं कुशलतायै...स्वकं स्वकं विषयं सभयं प्रस्थितेषु पार्थिवेषु...भद्रभट ...विजयवर्मप्रमुखैः संयम्य गृहीतो मलयकेतुः। ( अंक ६–७ )

झाला आहे. आणि त्याच्या स्वतःच्या प्रिय मित्रांचा घात झाला आहे. आपली प्रत्येक कृति मित्रघाताला कारण होते हें पाहून तो कमालीचा खिन्न झाला आहे.[६८] यापुढे आपल्यासारख्या अभाग्यानें करावें तरी काय? या प्रश्नाचें उत्तर त्याला मिळत नाही. साऱ्या महत्त्वाकांक्षा सोडून देऊन तपोवनांत जावें? पण मन तर अजून सूडाच्या कल्पनेनें पूर्वीसारखेंच तळमळत आहे; तपश्चर्येनें त्याचें समाधान कसें होणार? आपल्या मालकाचें अनुकरण करून आत्मघात करावा? पण शत्रु जिवंत आहे व वैभवशाली आहे तोंपर्यंत त्याचा निःपात करण्याचा प्रयत्न न करतां आत्मघात करणें हा शुद्ध भेकडपणाच नाही काय? मग काय, हातांत शस्त्र धारण करून व जिवावर उदार होऊन शत्रूवर हल्ला करावा? पण असलें कृत्य या वेळीं तरी अविचारीपणाचें व अव्यवहारीपणाचेंच ठरेल. चंदनदासानें केलेल्या उपकाराची व केवळ आपल्यामुळेच त्याच्यावर कोसळलेल्या घोर संकटाची जोंपर्यंत जाणीव आहे तोंपर्यंत चंदनदासाची सुटका करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, आणि त्या कर्तव्याची पूर्ति होईपर्यंत आपल्याला जगलेंच पाहिजे, असा शेवटीं राक्षसाच्या मनाचा निर्धार होतो. आता चंदनदासाची सुटका हेंच त्याच्या जीविताचें एकमेव प्रयोजन उरलें आहे. सर्व बाजूंनी अपयश आलें, शत्रूनें प्रत्येक बाबतींत मात केली, मित्रांचा घात झाला, दारुण अपमानाच्या क्रूर यातना सहन कराव्या लागल्या—अशा अगतिक अवस्थेंत केवळ चंदनदासाची सुटका करण्यासाठीच सर्व धोके पतकरून राक्षस कुसुमपुरांत जाण्यास तयार झाला आहे.

## चंदनदासासाठी राक्षसाचा त्याग

आणि याहि बाबतींत चाणक्याचा अंदाज शंभर टक्के खरा ठरला आहे. राक्षसावर घोर संकट आलें असतां त्याच्यासाठीं स्वतःचा जीव धोक्यांत घालण्यास ज्याअर्थी चंदनदास तयार झाला आहे, त्याअर्थी चंदनदासाच्या प्राणावर बेतलें असतां त्याला सोडविण्यासाठी राक्षस सुद्धा आपला जीव याच रीतीनें धोक्यांत

६८. ग्रीक नाट्यशास्त्रांत या प्रकाराला *Peripeteia* असें नांव आहे. ट्रॅजिक नाटकांतील एखादी प्रमुख व्यक्ति विशिष्ट उद्दिष्ट मनांत धरून जी कृति करते तें उद्दिष्ट तर सफळ होत नाहीच, पण अगदी उलट गोष्ट घडते. यालाच tragic error म्हणतात. एफ्. एल्. ल्यूकस आपल्या 'ट्रॅजेडी' या ग्रंथांत म्हणतात—"it is the perpetual tragic irony of the tragedy of life that again and again men do thus laboriously contrive their own annihilation or kill the thing they love."

घालवयास मागेपुढे पाहणार नाही ही कल्पना पहिल्या अंकांत चाणक्याच्या मनांत आलेली होती.[६९] चाणक्याची ती कल्पना किती यथातथ्यपणें साकार झाली आहे ! मानवी स्वभावांतील एका नाजूक मर्माचें त्याचें आकलन केवढें प्रभावी ठरलें आहे ! भावनाप्रधान राक्षस कृतज्ञतेच्या प्रभावाने मित्रासाठीं आपला जीव धोक्यांत घालणारच, हें चाणक्याने बरोबर हेरलें होतें.

## मलयकेतूला अटक

चाणक्याने आखलेली प्रत्येक योजना अगदी त्याच्या अपेक्षेप्रमाणें जशीच्या तशी फलद्रूप झाली आहे. प्रतिपक्षावर त्याने पूर्णपणें मात केली, विजय मिळवला, व शत्रूचा नाश केला. त्याच्या कपटनीतीचा विजय झाला, मलयकेतूने राक्षसाला छावणीबाहेर काढून लावलें, आणि चित्रवर्मा इत्यादि पांच प्रमुख राजांचा क्रूरपणाने वध केला. या साऱ्या प्रकारामुळे सैन्यांतील सरदार व सैनिक घाबरले. याच्या अविचारी क्रूरपणाला आपणहि कशावरून बळी पडणार नाही असें भय वाटून अनेक मातबर सरदार छावणी सोडून पळून गेले. मांडलिक राजेहि विषण्ण झाले. परिस्थिति अशा प्रकारें फारच अनुकूल आहे असें दिसतांच भद्रभट इत्यादि चाणक्याच्या विश्वासू सरदारांनी मलयकेतूला पकडून अटकेंत ठेवलें. या प्रकारांत मलयकेतूचा अमात्य भागुरायणहि सामील होता.[७०]

आपल्या सरदारांनी मलयकेतूला पकडल्याचें वृत्त येतांच स्वतः चाणक्य खूप मोठें निवडक सैन्य घेऊन राजधानींतून बाहेर पडला, आणि म्लेच्छ सैन्याचा त्याने पुरा पाडाव केला. मलयकेतूच्या सैन्यांत आघाडीचे मातबर राजे कोणीहि उरलेले नसल्यामुळे चाणक्याचें सारें काम अगदी सोपें झालें.

---

६९. त्यजत्यप्रियवत् प्राणान्यथा तस्यायमापदि ।
तथैवास्यापदि प्राणा नूनं तस्यापि न प्रियाः ॥ (अंक १, श्लोक २६)

७०. भद्रभट, पुरुषदत्त इत्यादि सरदार चन्द्रगुप्ताशीं भांडून निघून गेले व मलयकेतूला जाऊन मिळाले, असें असतां त्यांनीच मलयकेतूला पकडलें या प्रकारांतील भानगड समिद्धार्थक या चाणक्याच्या विश्वासू हेरालाहि अद्यापि कळलेली नाही हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हें झालें तरी कसें? असें तो सिद्धार्थकाला विचारीत आहे. 'वयस्य, भद्रभटप्रमुखाः किल देवात् चन्द्रगुप्तादपरक्ता मलयकेतुं समाश्रिता इति लोके मन्त्यते । तत्किंनिमित्तं कुकविकृतनाटकस्य इव अन्यन्मुखे, अन्यन्निर्वहणे?' आपलीं कारस्थानें गुप्त ठेवण्यासाठी चाणक्य केवढी खबरदारी घेत होता याचा हा उत्कृष्ट पुरावा आहे. सर्वांच्या समक्ष अधिकाराचा त्याग केल्यावर चाणक्याने पुन्हा अधिकाराचा स्वीकार कसा केला हें कोडेंहि समिद्धार्थकाला उलगडत नाही.

## राक्षसाचें राजधानींत आगमन

मलयकेतूच्या छावणींतून राक्षस बाहेर पडल्यावर तो पाटलिपुत्रांतच आला आहे, असें आपल्याला सिद्धार्थकाकडून कळतें. मलयकेतूच्या छावणींतून राक्षस बाहेर पडला, त्या क्षणापासून उदुम्बर नांवाचा चाणक्याचा विश्वासू हेर राक्षसाच्या मागावर होता. त्याच्याकडून राक्षसाची प्रत्येक हालचाल चाणक्याला समजली आहे. नंदांचें राज्य परत मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनहि अपयश पदरीं आल्यावर राक्षस पुन्हा पाटलिपुत्रांत परत आला आहे याचें कारण चंदनदासावरील निस्सीम प्रेम हेंच असलें पाहिजे अशी सिद्धार्थकाची खात्री आहे.

चन्दनदासाच्या बाबतींत चाणक्याने आणखी एक निर्णय घेतला आहे, असें सिद्धार्थकाकडून आपल्याला कळतें. चंदनदासाला सुळावर चढविण्याचा हुकूम चाणक्याने केला असून सिद्धार्थक व समिद्धार्थक या दोघां हेरांकडे चाणक्याने ती कामगिरी सोपविली आहे. त्याप्रमाणें सिद्धार्थक व समिद्धार्थक मांगांचा वेष घेऊन चंदनदासाला वध्यस्थानाकडे घेऊन जाण्याची तयारी करतात.

राक्षसाला वश करून घेण्यासाठी चाणक्याने आखलेल्या योजनेंतील शेवटच्या भागाला आता आकार येण्यास सुरवात झाली आहे. राक्षसाचें व मलयकेतूचें विलक्षण वितुष्ट यावें ती चाणक्याची कल्पना केव्हाच सफल झाली आहे. संतापाच्या भरांत मलयकेतूने राक्षसाला ठार मारूं नये यासाठी त्याने जी खबरदारी घेतली होती तीहि यशस्वी झाली आहे. मलयकेतूच्या छावणींतून राक्षस बाहेर पडला आहे. इतकें सारें झालें, पण तो पाटलिपुत्रांतच पुन्हा परत येईल हें कशावरून ? पण याहि बाबतींत चाणक्याची कल्पना पूर्णपणें खरी ठरली आहे. सर्व बाजूंनी कोंडींत सापडल्यामुळे वैतागलेला राक्षस एखाद्या वेळीं डोक्यांत राख घालील व आत्मघात करील याची कल्पना चाणक्याला नव्हती असें नाही. पण एका गोष्टीमुळे राक्षस आत्मघात करणार नाही असेंहि त्याला वाटत होतें. ज्या चंदनदासाने राक्षसासाठी अलौकिक त्याग केला होता त्याची सुटका होईपर्यंत राक्षसाच्या मनाला थोडें सुद्धा समाधान लाभावयाचें नाही, आणि चंदनदासाची सुटका करण्यासाठी प्रसंगीं तो स्वतःचा जीव देण्यासहि कचणार नाही हें चाणक्याने हेरलें होतें. राक्षसाच्या स्वभावांतील सारीं मर्मस्थानें त्याला चांगली माहीत होतीं. यामुळेच प्रिय मित्राचा जीव वाचवतां येत असेल तर राक्षस वाटेल त्या संकटांत उडी घेण्यास कधींहि मागे पुढे पाहणार नाही याविषयीं चाणक्याची खात्री झालेली होती. म्हणून चंदनदासाला सुळावर चढविण्यासाठी वध्यस्थानाकडे नेलें आहे ही हकिकत

राक्षसाला कळावी, आणि आपले प्राण देऊन चंदनदासाला वाचविण्यासाठी त्याने वध्यस्थानीं प्रकट व्हावें अशीच योजना चाणक्याने केली आहे. मलयकेतूच्या छावणींतून राक्षस बाहेर पडल्यावर त्याला पकडणें हें अतिशय सोपें काम होतें. पण काय वाटेल तें झालें तरी राक्षसाला पकडावयाचें नाही हा तर चाणक्याचा निर्धार झालेला होता. चाणक्याच्या व चंद्रगुप्ताच्या अनपेक्षित व अलौकिक औदार्याची आणि मोठेपणाची प्रत्यक्ष प्रतीति आल्यामुळे चंद्रगुप्ताविषयींची वैरभावना सोडून देऊन राक्षसाने खुषीने त्याचें सचिवपद पतकरणें यांत जें वैभव आहे तें त्याला पकडून, त्याचे हाल करून, त्याच्यावर सक्ती करण्यांत मुळींच नाही हें चाणक्याच्या लक्षांत आलेलें असल्यामुळे राक्षसाला पकडण्याची कल्पना चुकून सुद्धा त्याच्या मनांत आली नाही. राक्षसाच्या अद्वितीय निष्ठेचें त्याला अनेक वेळां प्रत्यंतर मिळाल्यामुळे, व त्याच्या मृदु भावनांची त्याला जाणीव असल्यामुळे, मित्राला प्राणसंकटांतून वाचविण्यासाठी तो स्वतःचा बळी देण्यासहि तयार होईल हें चाणक्याने हेरलें. यांतच मानवी स्वभावांतील मर्माचें अचूक आकलन करण्याचें त्याचें अलौकिक सामर्थ्य प्रतीत होतें.

आणि याच मर्मज्ञतेमुळे, राक्षस पाटलिपुत्रांत जीर्णोद्यानांत आला आहे हें कळतांच, चाणक्य आपल्या एका विश्वासू हेराकडून आणखी एक नाट्यमय घटना घडवून आणतो.

मलयकेतूच्या छावणींतून उद्विग्न होऊन बाहेर पडल्यावर काय करावें याचा राक्षसाने खूप विचार केला. तपोवनांत जाऊन तपश्चर्या करणें, आत्मघात करणें, जिवावर उदार होऊन शत्रूचा सूड घेणें, या साऱ्या मार्गांतील अव्यवहार्यतेची त्याला जाणीव होते आणि शेवटीं केवळ चंदनदासाची मुक्तता करणें एवढें एकच उद्दिष्ट मनांत ठेवून तें सफल करण्यासाठी तो पाटलिपुत्रांत येतो. एकंदर परिस्थितीचा विचार करतां हें त्याचें विलक्षण धाडस होतें यांत शंकाच नाही. पण मित्राचे प्राण वाचविण्यासाठी हें धाडस करावयास तो तयार झाला आहे.

## राक्षसाच्या हळुवार भावनांचा उत्कट आविष्कार

पाटलिपुत्राच्या वेशींतून आंत आल्यावर आता जावें कोठे आणि कसें या विचाराने तो गोंधळून गेला आहे. सारा प्रदेश त्याच्या चांगल्या परिचयाचा आहे. नन्दांच्या वैभवपूर्ण कारकीर्दीत अमात्य असतांना या प्रदेशांतून असंख्य वेळां त्याने संचार केला असेल. आता मात्र त्याच्या मालकीचें कांही

क्र. ८७५९

कांही उरलेलें नाही. प्रत्येक गोष्ट शत्रूच्या मालकीची झाली आहे. एके काळीं जेथे त्याची अमर्याद सत्ता होती तेथेच यावयाची त्याला आता चोरी झाली आहे. दैवाची गति काय विचित्र आहे पाहा ! आपला पहिला आश्रय सोडून राजलक्ष्मी एखाद्या वारांगनेप्रमाणें चन्द्रगुप्ताच्या गळ्यांत मिठी मारीत आहे; राज्यांतील लोकहि मेंढराप्रमाणें वागत आहेत; आपल्या धन्याविषयींचें सारें प्रेम लोक विसरून गेले, आणि आता ते चन्द्रगुप्ताची चरणसेवा करण्यांत धन्यता मानीत आहेत; आपल्या कर्तबगारीचा काडीइतकाहि उपयोग नाही हें दिसून आल्यामुळे सत्प्रवृत्त आप्तांनीहि जबाबदारी टाळावयाचा विचार केला; थोर घराण्यांत जन्मलेल्या प्रतिष्ठित नंदांचा त्याग करून हीन कुळांतील चन्द्रगुप्ताच्या मागे एखाद्या कुलटेप्रमाणें धांवतांना राज्यलक्ष्मीला कसलाहि संकोच वाटला नाही. पण याला इलाज काय? दैव एखाद्या वैऱ्याप्रमाणें हात धुवून मागे लागल्यावर माणसाच्या प्रयत्नांना यश येणार तरी कसें?[७१] नंद राजांच्या स्मृतीला जागून आतापर्यंत जे निकराचे प्रयत्न केले ते वाया घालविण्यास दैवच कारण झालें. चाणक्य हा नंदवंशाचा खरा शत्रु नाही, तर दैवच खरा शत्रु आहे, अशी त्याची खात्री झाली आहे.[७२]

अनेक विचारांनी राक्षसाच्या मनांत काहूर केलें आहे. नुसत्या दुर्दैवाला तरी कां दोष द्यावा? माणसें काय थोडा मूर्खपणा करतात? मलयकेतूचाच मूर्खपणा पाहा ना ! नन्द राजाचा संपूर्ण निःपात झालेला असतांहि त्यांची स्मृति मनांत सतत जागृत ठेवून कृतज्ञतेमुळे त्या घराण्यासाठी राक्षस जिवापाड मेहनत करीत आला. अशा स्थितींत नंदाच्या वैऱ्याबरोबर राक्षस कधीतरी संगनमत करील काय? हा विचार देखील त्या मूर्ख मलयकेतूच्या मनाला शिवला नाही. पण त्याची बुद्धि चळावी अशी दैवानेच योजना केली असली पाहिजे.[७३] मनाची समजूत घालण्याचा राक्षसाने कितीहि प्रयत्न केला तरी दैवाच्या दुष्टपणाचा विचार सारखा उफाळून येत आहे.

सर्व बाजूंनी पदरांत अपयश आलें असलें व कोणताहि मार्ग दिसत नसला तरी सुद्धा चन्द्रगुप्ताशीं तह करण्याचा विचार राक्षसाच्या मनांत चुकून देखील येत नाही. शत्रूच्या तावडींत सापडून मरण आलें तरी तें पतकरेल, पण शत्रूला शरण म्हणून जावयाचें नाही असा राक्षसाच्या मनाचा खंबीर निर्धार

---

७१. ................किमिह करवाम ? स्थिरमपि
प्रयत्नं नो येषां विफलयति दैवं द्विषदिव ॥ (अंक ६, श्लोक ६)

७२. दैवं हि नन्दकुलशत्रुरसौ न विप्रः ॥ (अंक ६, श्लोक ७)

७३. दैवेनोपहतस्य बुद्धिरथवा सर्वा विपर्यस्यति ॥ (अंक ६, श्लोक ८)

झाला आहे. शत्रूने मोठ्या कौशल्याने आपल्यावर प्रत्येक बाबतींत मात केली या विचाराने राक्षसाच्या मनाला तीव्र वेदना होत आहेत. पण आता त्याच्या शहाणपणाचा व सामर्थ्याचा कोणताहि उपयोग नाही. प्राप्त परिस्थिति मन घट्ट करून सहन करणें याशिवाय दुसरें कांहीहि तो करूं शकत नाही.

## रमणीय स्मृतिचित्रें

असंख्य विचारांनी त्याच्या मनाचा असला विलक्षण क्षोभ झाला आहे. एवढ्यांत आपण कुसुमपुराच्या परिसरांत उभे आहोंत याची त्याला तीव्र जाणीव होते. याच ठिकाणीं नंद राजाबरोबर पूर्वी तो अनेक वेळां हिंडला होता. याच ठिकाणीं त्याच्या धन्याने भरधाव सुटलेल्या घोड्यावर बसून धनुष्याची दोरी खेचली आणि वेगाने धावणाऱ्या हरिणावर अचूक बाण सोडला व आपलें धनुर्विद्येंतील कौशल्य दाखवून साऱ्यांना चकित केलें. याच राईमध्ये नंदराजे विहारासाठी येत असत, याच ठिकाणीं अनेक वेळां राजेलोकांच्या बरोबर त्यांची राजकारणावर चर्चा होई, अथवा गप्पागोष्टींना भर येई. आणि आता? कुठे आहेत ते राजे? होतें काय, आणि हें झालें काय? कुसुमपुराच्या वेशीवरील राईचें दृश्य दिसतांच राक्षसाच्या मनाला दारुण वेदना झाल्या आहेत. पूर्वीचीं सारीं स्पृहणीय दृश्यें त्याच्या मनश्चक्षूंसमोर तरळत आहेत. भूतकाळांतील अमर्याद ऐश्वर्य, आणि वर्तमानकाळांतील दुर्दशा, यांच्यामधील भयंकर विरोध सहन करण्याची ताकद त्याच्या मनांत आता राहिलेली नाही.

## तेव्हा—आणि आता!

पण जायचें तरी कुठे? त्याला कांही सुचत नाही. समोरच वठून गेलेली बाग त्याला दिसते. कुणीकडून तरी चंदनदासाची कांही हकिकत कळावी यासाठी तो उतावीळ झाला आहे. पण उघडपणें नगरांत प्रवेश करण्याची त्याची ताकद नाही. कोणी आपल्याला बघत नाही ना? हा विचार मनांत येऊन तो प्रतिक्षणीं अधिकच खचत आहे. काय माणसाचें नशीब असतें पाहा! एका काळीं केवढ्या मोठ्या ऐश्वर्याचा राक्षसाने उपभोग घेतला. आणि आता? उजळ माथ्याने आपल्याच नगरांतून हिंडावयाची त्याला चोरी झाली आहे. केवढें त्याचें वैभव होतें, केवढा थाट होता! राजधानींतील राजमार्गावरून लवाजम्यासह त्याची स्वारी संचारासाठी निघाली म्हणजे शेकडो लोक दुतर्फा उभे राहत, आणि मोठ्या आदराने व कौतुकानें त्याच्याकडे बघत असत. त्याच्या स्वारीचा थाट म्हणजे एखाद्या सम्राटाच्याच स्वारीचा थाट असे. आणि आता? मान खाली घालून, भयचकित मुद्रेने, एखाद्या ओशाळलेल्या गुन्हेगाराप्रमाणें लपतछपत बागेंत शिरण्याचा प्रसंग त्याच्यावर आला आहे.

आणि बागेला तरी काय थोडी अवकळा आली आहे! सारी बाग उजाड झाली आहे. पूर्वीच्या शोभेचा लेशहि आता बागेंत उरलेला दिसत नाही. बागेंत एक सुंदर महाल पूर्वी होता. आता त्या ठिकाणीं फक्त पडक्या भिंती कशावशा उभ्या राहिलेल्या दिसत आहेत. फार मोठी महत्त्वाकांक्षा बाळगून पराक्रमाचीं कृत्यें करणाऱ्या एखाद्या थोर वैभवशाली घराण्याचा दुर्दैवाने नायनाट व्हावा त्याप्रमाणें त्या महालाची दुर्दशा झाली आहे. बागेंत एक सुंदर पुष्करिणी होती. आता त्या पुष्करिणींत पाण्याचा थेंब राहिला नाही. झाडांच्या फांद्यांवर पानें आहेत कुठे? नुसत्या काटक्या दिसत आहेत. वठून गेलेल्या या असल्या झाडांवर फळ तरी कसें दिसणार? पाहवत नाही त्या झाडांकडे. खाली जमिनीवर गवत वाटेल तसें वाढलें आहे. त्याची निगा कोण राखणार? सरपण मिळवण्याच्या लोभाने मूर्ख लोकांनी झाडांवर वाटेल तशा कुऱ्हाडी चालवल्यामुळे तीं बिचारी सुकून जाऊन धरणीवर कोसळण्याच्या बेतांत आलीं आहेत. नंदवंशाची दारुण अवस्था, आणि स्वतःची घोर दुर्दशा, यांचेंच प्रतिबिंब राक्षसाला त्या बागेंत दिसत आहे, आणि त्याच्या वेदनांची तीव्रता असह्य झाली आहे.

गतकाळाच्या सुखद स्मृति आणि वर्तमानकाळांतील भीषण दृश्यें यांच्यामुळे राक्षसाचें मन विषण्ण झालें असतांनाच कानठळ्या बसविणारा नगाऱ्यांचा आणि शिंगांचा आवाज त्याला ऐकूं येतो. हा कसला आवाज असावा? मलयकेतु ताब्यांत आल्यामुळे मौर्यवंशाला जो उत्कट आनंद झाला त्याची घोषणा करणाराच हा वाद्यांचा गजर आहे हें राक्षसाला कळून चुकलें आहे. काय हा विपरीत प्रकार! शत्रूच्या संपूर्ण विजयाची हकिकत त्याला ऐकावी लागली होतीच, आणि आता शत्रूच्या वैभवाची प्रत्यक्ष प्रतीति यावी अशीच दुष्ट दैवाने योजना केली आहे. आणखी किती यातना सोसण्याचें त्याच्या नशिबीं आहे?

## राक्षसाच्या त्यागबुद्धीला आवाहन

खिन्न होऊन राक्षस एका फुटक्या शिळेवर बसला असतां चाणक्याने मुद्दाम पाठविलेला हेर अगदी राक्षसाच्या जवळच गळफास लावण्याचा प्रयत्न करतो. राक्षसाला तें दृश्य दिसतांच तो त्या माणसाजवळ जातो. प्रिय मित्राचा घात टळत नाही या कल्पनेने तो माणूस वैतागला आहे, व जीव देण्यास तयार झाला आहे, हें कळतांच राक्षसाच्या भावनांचा क्षोभ अनावर होतो. राक्षसाने खूप आर्जवें केल्यावर तो माणूस आपली हकिकत मोठ्या नाखुषीने सांगतो. विष्णुदास नांवाचा जवाहिऱ्या हा या माणसाचा प्रिय मित्र. विष्णुदास हा

चंदनदासाचा प्रिय मित्र होता हें राक्षसाला माहीत आहे. यामुळे चंदनदासाची हकिकत या माणसाला माहीत असेल अशी आशा वाटून राक्षस त्याची हकिकत उत्कंठेने ऐकत आहे. चंदनदासाचें मरण टळत नाही म्हणून विष्णुदास अग्निप्रवेश करावयास तयार झाला आहे. आणि विष्णुदासाने अग्निप्रवेश करण्यापूर्वी हा माणूस गळफास लावून घेणार आहे. आता राक्षस चंदनदासाविषयीं उघड चौकशी करतो. आणि माणूसहि सारें कांही सांगतो. चंदनदास हा विष्णुदासाचा परम मित्र. यामुळे मित्रासाठी विष्णुदासाने चन्द्रगुप्ताला एक आग्रहाची विनंती केली. 'मी वाटेल तितकें द्रव्य देतों. पण चंदनदासाची सुटका करा' असें विष्णुदास चन्द्रगुप्ताला विनवून म्हणाला. 'द्रव्याच्या लोभाने मी चंदनदासाला डांबून ठेवलें नाही. त्याने राक्षसाची बायको व मुलगा यांना गुप्त ठिकाणीं दडवून ठेवलें आहे. पुन्हा पुन्हा त्याला सांगून पाहिलें. पण तो त्यांचा ठावठिकाणा सांगत नाही. त्यांना ताब्यांत दिल्यावरोबर त्याची सुटका होईल. नाही तर देहान्तशासनाखेरीज दुसरा मार्ग नाही,' असें चन्द्रगुप्ताने उत्तर दिलें. इतकेंच नाही तर चंदनदासाला सुळावर चढविण्याचाहि त्याने हुकूम केला. चंदनदासाचें मरण आता कांही केल्या टळत नाही.

चंदनदासाच्या अलौकिक त्यागाची ही विलक्षण हकिगत माहीतगार माणसाकडून ऐकतांक्षणींच राक्षसाच्या मनांत भावनांचें काहूर माजतें. तावडतोब त्याच्या मनाचा निर्णय होतो. चंदनदासाचे प्राण वाचविण्यासाठी तत्क्षणीं वध्यस्थानाकडे जाण्याचा तो निर्धार करतो. राक्षसाने तरवार उपसलेली पाहतांच चाणक्याचा हेर त्याला हटकतो. तरवार हातांत घेऊन राक्षस वध्यस्थानीं गेला तर साराच मामला बिघडेल अशी तो सूचना देतो. पूर्वी कोणीतरी शकटदासाला वध्यस्थानांतून पळवून नेलें. यामुळे चन्द्रगुप्त संतापला व त्याने त्यावेळीं वध्यस्थानीं असलेल्या मांगांना मरणाची शिक्षा फर्मावली. तेव्हापासून वध्यस्थानीं हातांत तरवार असलेला एखादा मनुष्य दिसल्याबरोबर मांग त्याला ठार करतात. म्हणून राक्षसाने तरवार हातांत घेऊन तेथे जातां कामा नये असें चाणक्याचा हेर मोठ्या चातुर्याने राक्षसाला पटवून देतो. (राक्षसाच्या हातांत शस्त्र असलें तर एखाद्या वेळीं त्रागा करून तो आत्मघात करून घेईल अशी शक्यता होती. म्हणून तो निःशस्त्र असावा अशी चाणक्याने धूर्तपणाने अगाऊ तरतूद करून ठेवली होती.)

### चंदनदासासाठी प्रकट होण्याचा राक्षसाचा निर्णय

शकटदासाला चाणक्याने आपल्याकडे कपटाने पाठविलें अशा त्या पत्राच्या प्रकरणापासून राक्षसाची खात्री झाली होती. शकटदासाने विश्वासघात

केला अशीच त्याची समजूत झाली होती. पण शकटदासाला एका माणसाने पळवून नेल्यामुळे चन्द्रगुप्ताने चिडून मांगांचाच वध केला असें तर नुकतेंच या माणसाने सांगितलें. चन्द्रगुप्ताने मांगांना मारण्याचें कारण काय? बरें, शकट-दासाच्या मनांत खरोखरीच कांहीहि कपट नव्हतें असें मानलें तर पत्र लिहिण्याचा तो नीच प्रकार त्याने कां केला? पुन्हा राक्षसाच्या मनाचा कमालीचा गोंधळ उडतो. पण चंदनदासाची सुटका करणें हा विचार फार प्रबळ झालेला असल्या-मुळे बाकीच्या गोष्टीकडे तो दुर्लक्ष करतो, त्या माणसाच्या सांगण्याप्रमाणें हातांतील तरवार खाली ठेवतो, आणि वध्यस्थानीं जातो. स्वतःचा प्राण देऊन प्रिय मित्राचा प्राण वाचविण्याच्या त्याच्या करारी निश्चयांत आता कोणताहि व्यत्यय येणें शक्य नाही.

## चंदनदासाच्या त्यागी ध्येयवादाची परिसीमा

इकडे सिद्धार्थकाला व समिद्धार्थकाला चाणक्याने दिलेल्या सूचनेप्रमाणें चंदनदासाला सुळावर चढविण्याची सारी सिद्धता झाली आहे. खांद्यावर सूळ घेऊन [७४] तो वध्यस्थानाकडे चालला आहे. बरोबर त्याची बायको व लहान मुलगा आहे. मित्रासाठी हें मरण आपल्यावर ओढवलें आहे, कोणताहि नीच गुन्हा केल्यामुळे ओढवलेलें नाही, या विचाराने मृत्यूच्या घटकेला देखील चंदन-दासाच्या मनाला अलौकिक समाधान लाभलें आहे. [७५] पत्नीनेहि असेंच स्वतःचें समाधान करून घ्यावें असें त्याला वाटतें. त्याची पत्नी त्याच्या बरोबर मरावयास तयार आहे. पण लहान मुलाचा संभाळ तिच्या पश्चात् कोण करणार? 'आपल्या पश्चात् मीं काय करावें?' असें मुलाने विचारल्याबरोबर 'ज्या ठिकाणीं चाणक्याचा वारा देखील लागणार नाही अशा ठिकाणीं जाऊन राहा' असें चंदनदास भावनावश होऊन त्याला सांगतो. [७६]

## राक्षसाच्या त्यागाचें प्रात्यक्षिक

चंदनदासाची घटका भरत आली आहे. चंडाल (म्हणजे सिद्धार्थक व समिद्धार्थक) त्याला पकडावयास लागतात (अथवा तसा देखावा करतात).

७४. मृच्छकटिक नाटकाच्या शेवटच्या अंकांत वधाची शिक्षा झालेला चारुदत्त असाच खांद्यावर सूळ घेऊन चालला आहे.

७५. मित्रकार्येण मे विनाशो न पुनः पुरुषदोषेण। (अंक ७-६). हेंच वाक्य थोड्या फरकाने पहिल्या अंकांतहि चंदनदासाच्या तोंडीं आलें आहे. (अंक १-१५३

७६. पुत्र, चाणक्यविरहिते देशे वस्तव्यम्। (अंक ७-१३)

एवढ्यांत अचानक राक्षस प्रवेश करतो. 'मला ठार मारा, याला सोडून द्या!' असें तो ओरडून सांगतो.

आपल्याला वाचविण्यासाठीच राक्षस प्रकट झाला आहे हें चंदनदासाला कळून चुकलें आहे. या प्रसंगाने चंदनदासाच्या अलौकिक त्यागी वृत्तीचें विलक्षण प्रत्यंतर आपल्याला मिळालें आहे. आपली सुटका होणार या विचाराने वास्तविक त्याला विलक्षण उत्कट हर्ष व्हावयास पाहिजे होता. पण त्याला वाईटच वाटलें आहे. ज्या योजना राक्षसाने आखल्या होत्या त्या-सार्‍या त्याच्या आगमनामुळे आता वाया जाणार हा विचार मनांत येऊन चंदनदासाला वाईट वाटलें आहे.[७७] या पापी कलियुगांत सर्वत्र स्वार्थाचें थैमान चाललेलें असतां चंदनदासासारखा एखादा मनुष्य ध्येयवादाची व स्वार्थत्यागाची परिसीमा गाठूं शकतो हें पाहून चाणक्यासारख्या माणसानेहि आदराने मान डोलवली होती.[७८] राक्षस तर चंदनदासाचा परम मित्र. मग त्याचें मन कृतज्ञतेने भरून आलें असलें तर त्यांत काय नवल? शिबीच्या व बुद्धांच्याहि यशावर चंदनदासाने आपल्या त्यागाने मात केली असेंच राक्षसाला वाटत आहे.

सिद्धार्थकाचा कार्यभाग साधलेला आहे. यामुळे चंदनदासाला तेथून घेऊन जाण्यास त्याला कसलीहि हरकत वाटत नाही. राक्षस सुद्धा या समयीं धीरोदात्ततेची परिसीमा गाठतो. 'ज्याच्यासाठीं चंदनदासाला बळी द्यावयाचें तुम्ही ठरविलें होतें तो मी राक्षस हजर झालों आहे,' असा निरोप तो अगदी निर्भयपणें चाणक्याला पाठवितो. राक्षसाला खिजविण्यासाठीं सिद्धार्थक मुद्दाम चाणक्याच्या विरुदावलीचा उच्चार करतो.[७९] सारें कांही सहन करणें राक्षसाला आता भागच आहे.

## अलौकिक औदार्याचा अनपेक्षित साक्षात्कार

चाणक्य येतांच राक्षसाच्या मनांतील भावनांचा क्षोभ अनावर झाला आहे. तो काय बोलेल? आपल्याला कशा प्रकारें वागवील? आपला अपमान करील काय? इत्यादि विचारांनी राक्षसाचें मन व्याकुळ झालें असलें पाहिजे.

---

७७. अमात्य, सर्वमपीमं प्रयासं निष्फलं कुर्वता त्वया किमनुष्ठितम्? (अंक ७–२६)

७८. सुलभेष्वर्थलाभेषु परसंवेदने जनः।
क इदं दुष्करं कुर्यादिदानीं शिबिना विना? (अंक १, श्लोक २५)

७९. निवेदयतं तावत् नन्दकुलनगकुलिशाय मौर्यकुलप्रतिष्ठापकाय आर्यचाणक्याय। (अंक ७–३२)

पण राक्षसाच्या कर्तबगारीमुळे व त्याच्या ठायीं असलेल्या अलौकिक गुणांमुळे चाणक्य मनांत त्याच्यावर अगदी निहायत खूष आहे. आणि राक्षसाला आश्चर्याचा विलक्षण धक्का बसेल अशीच घटना घडते. चाणक्य राक्षसाला अभिवादन करतो. राक्षस यामुळे अगदी खजील होऊन गेला आहे.

आणि चाणक्य भराभरा आपल्या कपटनाटकांतील कारस्थानें राक्षसाला सांगून टाकतो. शकटदासाकडून कपटाने तें पत्र लिहवून घेतलें हेंहि चाणक्य सांगतो. शकटदासाविषयींचें राक्षसाच्या मनांतील सारें किल्मिष निघून गेलें आहे. भद्रभट इत्यादींचीं कृत्यें, शकटदासाने लिहिलेलें तें पत्र, सिद्धार्थकाच्या हालचाली, ते तीन अलंकार, क्षपणक जीवसिद्धीचीं कृत्यें, बागेंत भेटलेला गळफास लावून घेणारा माणूस—हे सारे कपटनाटकांतील वेगवेगळे प्रवेश होते; आणि राक्षसाची व चंद्रगुप्ताची मैत्री व्हावी याच एका हेतूने त्यांची मुद्दाम आखणी करण्यांत आली होती, असें चाणक्य स्पष्टपणें राक्षसाला सांगून टाकतो.

एवढ्यांत सम्राट् चन्द्रगुप्ताचें आगमन होतें. येतांच तो नम्रपणाने चाणक्याला अभिवादन करतो. आणि लगेच अमात्यराक्षसाला अभिवादन करण्याची चाणक्य त्याला सूचना देतो. प्रत्येक घटनेनें राक्षस जास्त जास्तच हवालदील होत आहे. चन्द्रगुप्त तत्काळ राक्षसाला अभिवादन करतो. चन्द्रगुप्ताची लीनता पाहून राक्षस चकित झाला आहे. आता त्याला चाणक्याची खरी योग्यता कळून आली आहे. मनांतल्या मनांत तो चाणक्याला धन्यवाद देतो. [८०]

## राक्षसाचें हृदयपरिवर्तन

चंदनदास जिवंत राहावा अशी इच्छा असेल तर चन्द्रगुप्ताच्या तरवारीचा राक्षसाने स्वीकार केलाच पाहिजे असा चाणक्य पेच टाकतो. चाणक्याच्या हातांत आतापर्यंत असलेली तरवार उचलण्याची सुद्धा आपली पात्रता नाही असें राक्षस बोलतो. पण राक्षसाची खरी योग्यता काय आहे तें चाणक्याला चांगलें माहीत आहे. राक्षसाने चन्द्रगुप्ताची तरवार स्वीकारलीच पाहिजे, नाहीतर चंदनदास कांही जगत नाही, हें चाणक्याचें म्हणणें कायम आहे.

आता काय करावें ? राक्षसापुढे फारच मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. नंदांची स्मृति हृदयांत कायम असतां त्यांच्या शत्रूचा सेवक होण्याची त्याच्यावर पाळी आहे. आतापर्यंत स्वतःच्या हातांनी पाणी घालून ज्यांची उत्साहाने जोपासना केली ते वृक्ष स्वतःच तोडण्याचा विचित्र प्रसंग त्याच्यावर

८०. सर्वथा स्थाने यशस्वी चाणक्यः ।

आला आहे. पण हें न करावें तर मित्राचे प्राण कसे वाचणार? परिस्थिति कधी कधी अशी बिकट होते की, प्रत्यक्ष दैवाला देखील हतबुद्ध होऊन परिस्थितीला शरण जावें लागतें.[८१]

मित्राचे प्राण वाचविणें हेंच एक उद्दिष्ट मनांत वागवून राक्षस राजधानींत आलेला आहे. चाणक्याच्या सूचनेप्रमाणें चन्द्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारण्यास तो अनुमति देतो. राक्षसाचा हा फार मोठा अनुग्रह झाला हें स्पष्ट बोलण्यास चाणक्य विसरत नाही. चन्द्रगुप्त तर कमालीची कृतज्ञता व्यक्त करतो.

आणि राक्षस चन्द्रगुप्ताचा प्रत्यक्ष अमात्य झाला आहे. त्याच्या इच्छेप्रमाणें मलयकेतूची सुटका करण्याचा हुकूम चन्द्रगुप्त (चाणक्याच्या सूचनेप्रमाणें) देतो. इतकेंच नव्हे तर त्याचें राज्यहि त्याला परत देण्याची व्यवस्था होते. राक्षसाने अमात्यपद स्वीकारल्यामुळे संतुष्ट होऊन चन्द्रगुप्ताने चंदनदासाला नगरश्रेष्ठी केलें आहे असाहि हुकूम दुर्गपालाला देण्यासाठी चाणक्य सेवकाला सूचना करतो.

आता बंधन फक्त हत्तींना आणि अश्वांना. बाकी साऱ्यांना स्वातंत्र्य! अमात्य राक्षस नेता असतांना आता उणीव तरी कशाची? असा राक्षसाविषयीं मोठा गौरवपर उद्‌गार काढून प्रतिज्ञापूर्तीच्या आनंदाने पुलकित झालेला 'कुटिलमति' कौटिल्य हा वेळपर्यंत मुक्त असलेली आपली शिखा पुन्हा बांधतो, कृतकृत्य झालेला चन्द्रगुप्त आपल्या भाग्याचें कौतुक करतो, आणि हा वेळपर्यंत चन्द्रगुप्ताशीं हाडवैर असलेला व त्याच्या विनाशासाठी सारे प्रयत्न करणारा, पण आता त्याचा अमात्य झालेला, राक्षस नाटकाचें भरतवाक्य म्हणतो.

## राक्षसाच्या परिवर्तनाची मीमांसा

चन्द्रगुप्ताचें अमात्यपद पतकरण्याचें राक्षसाने अखेर मान्य केलें या घटनेची थोडी चिकित्सा करणें जरूर आहे. आपण चाणक्याच्या सूचनेप्रमाणें चन्द्रगुप्ताचा अमात्य होण्याला संमति दिली तरच चंदनदासाचें मरण टळत आहे याची खात्री झाल्यामुळे राक्षसाने सारा स्वाभिमान सोडून देऊन, सूडाची कल्पना सोडून देऊन, चाणक्याच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें हें तर स्पष्ट दिसतच आहे. पण आणखीहि एका महत्त्वाच्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. कोंडींत पकडल्यामुळे दीन झालेल्या राक्षसाने नाइलाज म्हणून चन्द्रगुप्ताचें साचिवपद पतकरलें, आणि मनांत तो त्याचा द्वेष करीत राहिला, तर तें धोक्याचे आहे याची चाणक्याला चांगली जाणीव आहे. मारून

८१. कार्याणां गतयो विधेरपि नयन्त्याज्ञाकरत्व चिरात् ॥ (अंक ७, श्लोक १६)

मुटकून अमात्य बनविलेला माणूस केव्हा काय भानगड उत्पन्न करील तें कोणी सांगावें ? आणि राक्षसासारखा नन्दकुलावर अपरिमित प्रेम करणारा व चन्द्रगुप्ताचा द्वेष करणारा पातळयंत्री व चतुर मुत्सद्दी इच्छेविरुद्ध नाइलाजानें चन्द्रगुप्ताचा अमात्य झाला तर चन्द्रगुप्ताच्या स्थैर्याच्या दृष्टीने तें चांगलें होणार नाही हें चाणक्याला समजत नाही असें नाही. म्हणून ज्यायोगें राक्षसाच्या मनांत मुरलेली चन्द्रगुप्ताविषयींची द्वेषभावना नाहीशी होईल, व चन्द्रगुप्ताविषयीं त्याला आपुलकी वाटूं लागेल, अशीच परिस्थिति चाणक्याने मोठ्या चातुर्यानें निर्माण केली आहे. आपण होऊन चाणक्याच्या ताब्यांत जाण्याचा राक्षसाने जेव्हा निर्धार केला तेव्हाच वाटेल तो अपमान गिळण्याची त्याच्या मनाची तयारी झालेली असलीच पाहिजे. आपला हाडवैरी चाणक्य दिसल्याबरोबर त्याच्या मनाचा विलक्षण क्षोभ झाला आहे. यामुळेच तो हा आपल्याला आता अतिशय अपमानास्पद रीतीनें वागविणार हे राक्षसाला कळून चुकलें आहे. आपल्यासमोर उभा असलेला आपला हाडवैरी 'दुरात्मा' आहे अशी राक्षसाची खात्री आहे. पण चाणक्याच्या लोकोत्तर बुद्धीचा, त्याच्या अपार ज्ञानभांडाराचा, व त्याच्या ठायीं असलेल्या अलौकिक गुणांचा विचार मनांत येतांच राक्षसाच्या मनाची चलविचल झालेली आहे. वास्तविक हा माणूस फार मोठा असून त्याच्या विषयींच्या द्वेषभावनेचा अतिरेक झाल्यामुळेच त्याच्या गुणांची पारख करण्याची कुवत आपल्या बुद्धीला नव्हती असा विचार मनांत येऊन राक्षस खजील झाला आहे.[८२] चाणक्य हा 'दुरात्मा' आहे कीं 'महात्मा' आहे या संभ्रमानें त्याच्या मनाची चलविचल झालेली असतांनाच चाणक्य पुढे येतो, आणि 'अमात्य ! हा मी विष्णुगुप्त आपणांस अभिवादन करीत आहे !' असें मोठ्या नम्रपणानें म्हणतो. 'अमात्य' हें संबोधन चाणक्याच्या तोंडून बाहेर पडल्यावरोबर त्याला कसेंसेंच वाटतें. आपलें अमात्यपद केव्हाच लयाला गेलें, आपण आता कोणीहि नाही, अगतिक झालेला एक दुबळा माणूस याशिवाय आता आपली कसलीहि किंमत नाही, इत्यादि विचारांनी त्याच्या मनाचा कमालीचा गोंधळ उडालेला असतांच 'अमात्य !' हा भावना पुलकित करणारा शब्द त्याच्या कानीं पडतो. आणि हा प्रिय शब्द उच्चारतो कोण ? तर त्याचा हाडवैरी चाणक्य ! या एका शब्दानेच तो खरें म्हणजे दीन होऊन गेला आहे. अशा स्थितींत चाणक्याने नम्र होऊन अभिवादन केल्याबरोबर त्याचें मन विलक्षण गडबडून गेलें असलें तर त्यांत काय नवल ? हा 'महात्मा' कीं 'दुरात्मा' ? हा संभ्रम नष्ट होऊन राक्षसाला

---

८२. आकरः सर्वशास्त्राणां रत्नानामिव सागरः ।
गुणैर्न परितुष्यामो यस्य मत्सरिणो वयम् ।। (अंक ७, श्लोक ७).

चाणक्याच्या महात्मतेची खूण पटावी अशीच चाणक्याची कृति आहे. वाटेल त्या प्रकारचा क्रूर अपमान सहन करण्याची राक्षसाच्या मनाने तयारी केलेली आहे, आणि प्रत्यक्षांत मात्र अगदी वेगळेंच कांहीतरी घडलें आहे. आपल्याला यावेळीं 'अमात्य' या शब्दाने आदरपूर्वक संबोधणारा, आणि नम्रपणाने अभिवादन करणारा चाणक्य, आणि इतके दिवस अनेक कारस्थानें करून आपल्याला गोत्यांत आणणारा क्रूर चाणक्य, या दोन व्यक्ति एकच कीं वेगळ्या? याचा उलगडा न झाल्यामुळे राक्षस बुचकळ्यांत पडलेला आहे. इतक्यांत चाणक्य स्वतः आपल्या विलक्षण कारस्थानांची भूमिका स्पष्ट करतो, आणि राक्षसाच्या मनांत उरलेलें किल्मिष नाहीसें करून टाकतो. 'चन्द्रगुप्ताची व आपल्यासारख्या अलौकिक वीरपुरुषाची मैत्री व्हावी याच एका हेतूने हीं सारीं कारस्थानें मीं केलीं' असें म्हणून[८३] चाणक्य लगेच चंद्रगुप्ताला पुढे बोलावतो, आणि चन्द्रगुप्तहि त्याला अतिशय नम्रपणाने अभिवादन करतो.

आपण पूर्णपणें पराभूत झालों आहोंत, कसलाहि आधार उरलेला नाही, प्रतिकार करण्याचें कसलेंहि सामर्थ्य आपल्यामध्ये उरलेलें नाही, शत्रू सर्व बाजूंनी यशस्वी झाला आहे, आणि अशा प्रबळ शत्रूच्या तावडींतून कोणत्याहि उपायाने सुटका होणें शक्य नाही—अशा स्थितींत आपल्यासारख्या लाचार माणसाला शत्रूकडून जी अपमानाची वागणूक मिळेल ती सहन करण्याशिवाय गत्यंतर नाही याची राक्षसाला चांगली जाणीव होती. आणि यामुळेच चाणक्याने व चन्द्रगुप्ताने मनाचा जो लोकोत्तर उदारपणा अनपेक्षितपणें दाखविला त्याचा प्रभाव राक्षसाच्या मनावर झाल्याखेरीज कसा राहील? आणि या सौजन्यामुळे व औदार्यामुळे तो कमालीचा भारून जातो. इतक्या थोर मनाच्या माणसांशीं वैर कसलें करावयाचें? ती कृतघ्नता होईल, माणुसकीला सोडून वागलें असें होईल, इत्यादि विचारांचें काहूर राक्षसाच्या मनांत झालें असलें पाहिजे. आणि म्हणूनच चन्द्रगुप्ताचा अमात्य होण्यास संमति देतांना त्याच्या मनाला समाधान लाभलें असेल. चन्द्रगुप्ताने जो नम्रपणा दाखविला आहे त्यांत कृत्रिमपणाचा लेशहि नाही अशी पक्की खात्री झाली तेव्हाच त्याच्या मनाने अंतिम निर्णय दिला आहे.[८४] आपण चन्द्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारलें तर चंदनदासाची सुटका होईल हा विचार त्याच्या मनांत प्रबळ झाला आहे हें खरें आहे. तथापि केवळ याच एका कारणामुळे त्याने सचिवपद स्वीकारणें हा एका

---

८३. सर्वोऽसौ वृषलस्य वीर भवता संयोगमिच्छोर्नयः ।। (अंक ७, श्लोक ९)

८४. स्पृशति मां भृत्यभावेन कौटिल्यशिष्यः । अथवा विनय एवैष चन्द्रगुप्तस्य । मत्सरस्तु मे विपरीतं कल्पयति । सर्वथा स्थाने यशस्वी चाणक्यः । (अंक ७-५१)

अनुक्रम . .. .. वि: ..........११६
क्रमांक ......................... नों: दि: ..........

अर्थी सक्तीचाच प्रकार झाला असता. नाखुषीने जर तो अमात्य झाला असता तर कारभारांत त्याचें चित्त राहिलें नसतें, त्याचें वागणें वरकरणी झालें असतें, आणि असल्या या नाराज अमात्याच्या कारभाराचा चन्द्रगुप्ताच्या राज्याच्या स्थैर्याच्या दृष्टीने कसलाहि उपयोग झाला नसता. पण चाणक्याने व चन्द्रगुप्ताने जो अलौकिक उदारपणा दाखविला त्याच्या अकृत्रिमपणाची मनोमन खात्री झाल्यामुळे राक्षसाचें मन निर्मळ झालें, तो भारून गेला, आणि म्हणूनच मोकळ्या मनाने त्याने अमात्यपदाचा स्वीकार केला. आता तो कायावाचामनेंकरून चन्द्रगुप्ताशीं एकनिष्ठ राहणार यांत शंकाच नाही. सैन्याच्या जोरावर राक्षसाला पकडणें, त्याला लाचार करून शरण आणणें, आणि त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला वेठीस धरणें, या गोष्टी चाणक्याला कोणत्याहि प्रकाराने मुळीच अशक्य नव्हत्या. पण या योगें राक्षसाचा देह चाणक्याच्या ताब्यांत आला असता तरी त्याचें मन प्रतिकूलच राहिलें असतें. आणि अमात्यासारखा सर्वश्रेष्ठ अधिकारी मनाने प्रतिकूल राहणें अथवा उदासीन राहणें हें भारीच धोक्याचें होतें. म्हणून राक्षसाचें मन जिंकण्यामध्ये चाणक्याने जें अलौकिक यश मिळविलें तें यश राक्षसाला पकडून सक्तीने वेठीला लावण्याच्या प्रकारापेक्षा शतपटींनी अधिक मोठें आहे. चाणक्य हा नुसताच कावेबाज, कारस्थानी, व कुटिलमति नव्हता. तर मानवी मनाच्या अंतर्मनांत भावनांचीं जीं सूक्ष्म व तरल आंदोलनें चाललेलीं असतात त्यांची पारख करण्याचें, आणि आपला करारी निष्ठुरपणा बाजूला ठेवून उच्च मानवी सद्गुणांचा साक्षात्कार घडविण्याचें सामर्थ्यहि त्याच्या ठायीं होतें याचा आणखी एखादा पुरावा शोधण्याची कसलीहि गरज नाही !

## चाणक्याची लोकोत्तर गुणग्राहकता

आणि पुरावा शोधण्याची एखाद्याला इच्छा झालीच तर त्याच्या प्रयत्नाला भरपूर यश येईल. वाटेल त्या प्रकारचीं कारस्थानें करतांना यत्किंचित् न कचरणाऱ्या या ‘कुटिलमति’ राजकारणी पुरुषाला उदात्त सद्गुणांची, करड्या ध्येयवादाची, व त्यागाची खरी महती चांगली माहीत होती. इतकेंच नव्हे तर असे गुण ज्या व्यक्तीच्यां ठायीं असतील त्या व्यक्तीविषयीं त्याच्या मनांत निर्भेळ आदराचीच भावना वसत होती. अगदी हाडवैरी जरी असला तरी त्याच्या ठायीं असलेल्या उच्च सद्गुणांची पारख चाणक्याला होती, आणि गुणग्रहणाची त्याची शक्ति अलौकिक होती. नन्दवंशाचा त्याने प्रतिज्ञा करून समूळ विनाश केला. त्या वंशाचा एकनिष्ठ सेवक राक्षस हा आपला हाडवैरी आहे असें त्याला वाटणें स्वाभाविक होतें. लढाई चालू असतां व लढाई संपल्यावरहि या हाडवैऱ्याला गोत्यांत आणण्यासाठी कसलींहि क्रूर व कपटी कारस्थानें

करावयास कौटिल्य कधीच कचरला नाही. असे असूनहि राक्षसाच्या ठायीं जे गुण उत्कटत्वाने वास करीत होते त्या गुणांची खरी योग्यता जर यथार्थपणें कोणाला माहीत असेल. तर ती चाणक्यालाच! राक्षस हा बुद्धीच्या बाबतींत प्रत्यक्ष बृहस्पतीच आहे अशी स्पष्ट कबुली त्याने स्वतःच्या मनाशीं दिली आहे. एकान्तामध्ये स्वगत भाषणांत ही कबुली [८५] त्याने दिलेली असल्यामुळे त्यांत कसलाहि दांभिकपणा नाही, नाटकीपणा नाही, कृत्रिमपणा नाही. राक्षसाच्या अलौकिक स्वामिभक्तीवर तो अगदी मनापासून खूष आहे. धनी जोंपर्यंत ऐश्वर्यसंपन्न आहे तोंपर्यंत त्याच्या ऐश्वर्याच्या लोभाने लोक त्याची सेवा करतात; आणि तो विपन्न दशेला पोचला तरी पुन्हा त्याला पहिली प्रतिष्ठा प्राप्त होईल या आशेने ते त्याची सेवा चालू ठेवतात. हा झाला जगाचा नित्याचा व्यवहार. पण आपल्या धन्याचा समूळ विनाश झाला, त्याची स्मृति जागृत ठेवून कृतज्ञतेने त्याची सेवा करीत राहण्यापासून कसलाहि व्यावहारिक लाभ नाही, उलट फार मोठ्या यातना व कष्टच पदरीं पडणार, याची उत्कृष्ट जाणीव असूनहि नन्दवंशाची चाकरी करण्यासाठीं जिवाचें रान करणाऱ्या राक्षसाच्या अलौकिक स्वामिभक्तीचें विपुल प्रत्यंतर मिळाल्यामुळे चाणक्य त्याच्यावर मनोमन संतुष्ट आहे. असला अलौकिक स्वामिभक्त सेवक या जगांत आढळणें अगदी कठिण आहे. असा सच्चा सेवक जर चंद्रगुप्ताला लाभला तर त्याच्या भाग्याला तोटा तो कसला?—इत्यादि विचार मनांत प्रबळ झाल्यामुळेच राक्षस आपल्या बाजूला आलाच पाहिजे अशी तळमळ चाणक्याला लागून राहिली आहे. [८६] इतकेंच नव्हे तर राक्षसाने चंद्रगुप्ताचें सचिवपद स्वीकारणें हा तो मोठाच 'अनुग्रह' समजत आहे. [८७] शत्रूचीं पाळेंमुळें खणून काढण्यांत आसुरी समाधान मानणारा एक क्रूर व भावनाशून्य मुत्सद्दी एवढेंच चाणक्याचें स्वरूप नसून तो खराखुरा गुणग्राही, सद्‌गुणांची कदर करणारा अभिज्ञ आहे.

## त्यागी ध्येयवादाचा चाणक्यावरील प्रभाव

आणि चाणक्याच्या या रसिकतेचा व गुणग्राहकतेचा आणखी एक बलवत्तर पुरावा चंदनदासाच्या प्रकरणांत आपल्याला मिळेल. ही गुणग्राहकता

८५. साधु, अमात्यराक्षस, साधु! साधु, मंत्रिबृहस्पते, साधु! (अंक १–२१)

८६. ऐश्वर्यादनपेतमीश्वरमयं लोकोऽर्थतः सेवते;
तं गच्छन्त्यनु ये विपत्तिषु पुनस्ते तत्प्रतिष्ठाशया।
भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासङ्गेन निःसङ्गया
भक्त्या कार्यधुरं वहन्ति कृतिनस्ते दुर्लभास्त्वादृशाः॥ (अंक १, श्लोक १५)

८७. अत एवास्माकं त्वत्संग्रहे यत्नः। कथमसौ वृषलस्य साचिव्यग्रहणेन सानुग्रहः स्यादिति। (अंक १–२१)

शत्रूच्या बाबतींत प्रकट झालेली असल्यामुळे तिची योग्यता कांहीं आगळीच आहे हें कबूल करावें लागेल. राक्षसासाठी चंदनदासाने स्वतःचा जीव धोक्यांत घातलेला आहे, आपल्या कृत्याचा केवढा घोर परिणाम होईल याची चांगली जाणीव असूनहि चंदनदास आपला बळी द्यावयास तयार झाला आहे, ही घटनाच लोकोत्तर आहे. आणि या घटनेंतील लोकोत्तरपणाची थोरवी चाणक्याला तत्क्षणीं दिसून आली आहे. आपल्या मित्राने आपल्याला वाचविण्यासाठी अलौकिक त्याग केला या जाणिवेने राक्षसाने चंदनदासाची स्तुति करणें वेगळें, [८८] आणि चाणक्याने चंदनदासाच्या अद्वितीय त्यागाची मनोमन थोरवी गाणें वेगळें. राक्षस हा चाणक्याचा हाडवैरी, आणि त्याला वाचवण्यासाठी स्वतःचा जीव देण्यास तयार झालेला चंदनदास हाहि त्याचा वैरीच. वैऱ्याने उच्च सद्गुणांचा, करारी ध्येयवादाचा, अलौकिक त्यागाचा, असला विलक्षण प्रकर्ष दाखवल्याबरोबर एवढा मोठा चाणक्य पण तोहि क्षणभर स्तिमित होतो, आणि त्यागी ध्येयवादाचा मुक्तकंठाने गौरव करतो. स्वगत भाषणांतच हा गौरव प्रकट झालेला असल्यामुळे त्यांत कसलाहि कृत्रिमपणा नाहीं हें सांगण्याची जरूर नाही. चाणक्याचें मन त्यांत यथातथ्य प्रकट झालें आहे. एखाद्याचा घात करून द्रव्याचा लाभ होत आहे असें दिसतांच माणसें सारे लागेबांधे विसरतात, व निष्ठुर बनतात, हा देखावा बाजारी वृत्तीच्या या व्यवहारी जगांत अपवादात्मक नसून नित्याचाच आहे; आणि यामुळेच शिबीचा त्याग अलौकिक व अपवादात्मक होय. असा अलौकिक त्याग करावयास जाणूनबुजून तयार झालेल्या चंदनदासाबद्दल चाणक्याचें मन अमर्याद आदराने ओतप्रोत भरून गेलें आहे. [८९]

---

८८. दुष्कालेऽपि कलावज्जनरुचौ प्राणैः परं रक्षता
नीतं येन यशस्विनातिलघुतामौशीनरीयं यशः।
बुद्धानामपि चेष्टितं सुचरितैः क्लिष्टं विशुद्धात्मना.. (अंक ७, श्लोक ५)

८९. (स्वगतम्।) साधु, चन्दनदास, साधु!
सुलभेष्वर्थलाभेषु परसंवेदने जनः।
क इदं दुष्करं कुर्यादिदानीं शिबिना विना?
(अंक १, श्लोक २५)

सहाव्या अंकांत राक्षसानेहि जगाची ही बाजारी व स्वार्थी वृत्ति पुढील शब्दांत प्रकट केली आहे.

पितॄन् पुत्राः, पुत्रान्परवदभिहिंसन्ति पितरो,
यदर्थं सौहार्दं सुहृदि च विमुञ्चन्ति सुहृदः। (अंक ६, श्लोक १७)

## चाणक्याच्या औदार्याचा प्रकर्ष

चाणक्याच्या मनाचा हा मोठेपणा राक्षस प्रत्यक्ष ताब्यांत आल्यावरहि याच उत्कटतेने आविष्कृत झाला आहे. तो स्वतः राक्षसाला कमालीचें सौजन्य दाखवितो, त्याला अभिवादन करतो, आणि चंद्रगुप्तालाहि राक्षसाला अभिवादन करावयास लावतो. पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरणागत राक्षस दृष्टीला पडतांच राक्षसाविषयींच्या निस्सीम आदराने त्याचें मन भरून जातें. फार मोठ्या मुत्सद्दीगिरीने व चातुर्याने आखलेल्या योजनांनी ज्याने चन्द्रगुप्ताच्या सैन्याला अपार क्लेश दिले, व आपल्या अलौकिक बुद्धीलाहि विलक्षण शीण दिला तोच हा 'महात्मा', राक्षस ही कल्पना मनांत येऊन तो राक्षसाची मनोमन तारीफ करतो.[१०] राक्षसाच्या मोठेपणाची ही जी चाणक्याने कबुली दिली आहे ती स्वतःच्या मनाशीं दिलेली आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. चाणक्य जेव्हा चंद्रगुप्ताची तरवार राक्षसाला अर्पण करूं लागतो तेव्हा ही तरवार घेण्याची पात्रता आपल्या ठायीं नाही असें वाटून राक्षस नाखुषी दाखवितो. चाणक्यासारख्या अलौकिक बुद्धीच्या माणसाच्या हातीं जी तरवार आतापर्यंत होती ती तरवार आपण कशी स्वीकारावी? असा राक्षसापुढे पेंच पडला आहे. त्याची ही भावना अगदी प्रामाणिक व अकृत्रिम आहे. आणि चाणक्यालाहि याची जाणीव आहे. यामुळे राक्षसाला वाटणारा संकोच नाहीसा करण्याचें काम चाणक्य मोठ्या कौशल्याने करतो. "ही तरवार धारण करण्यास आपण पात्र नाही अशी आपण चुकून सुद्धा कल्पना करून घेऊं नका. आमच्या सैन्यांतील हत्तींना व अश्वांना अनेक दिवस अपार क्लेश सहन करावे लागले याचें कारण आपल्या अलौकिक पराक्रमाचा महिमा हेंच होय," असें म्हणून[११] राक्षसाच्या तोंडावर त्याची मुक्तकंठाने तारीफ करण्याचें औदार्य चाणक्य दाखवितो. आणि अखेर राक्षसाने चंद्रगुप्ताच्या तरवारीचा स्वीकार केल्याबरोबर चाणक्याला अतिशय उत्कट हर्ष होतो. 'वृषल, वृषल!' या त्याच्या पुनरुक्तीवरून हें स्पष्ट होईल.[१२] अटकेंत ठेवलेल्या मलयकेतूची पुढे कोणती व्यवस्था करावयाची असें भद्रभटाने विचारलें असतां चाणक्य तत्क्षणीं नवीन अमात्याकडे म्हणजे राक्षसाकडे बोट दाखवितो. आता प्रत्येक गोष्ट राक्षसाच्या इच्छेप्रमाणेंच व्हावयाची आहे असेंच त्याला दर्शवावयाचें आहे.[१३] सर्व बाजूंनी यश प्राप्त झाल्यावर, व हातीं निरंकुश सत्ता आल्यावर, चंद्रगुप्तासारखा सम्राट् सदैव आज्ञेत वागत असतां, आपण होऊन सत्तेचा लोभ सोडून देणाऱ्या व राज्याच्या हितासाठी प्रत्यक्ष वैऱ्याशींहि मैत्री करण्यास उत्सुक असलेल्या कुटिलमति कौटिल्याच्या मनाचा मोठेपणा सर्व अर्थांनी लोकोत्तर आहे यांत शंकाच नाही!

[१०, ११, १२, १३, या टीपा पृष्ठ ११५ वर पहा.]

## साधनशुचिता, व चाणक्याची कुटिल नीति

आणखी एकच महत्त्वाचा मुद्दा उरला आहे. अनेक कपटी व क्रूर कारस्थानें चाणक्यानें केलीं आहेत. हीं कारस्थानें, आणि चाणक्याच्या मनाचा मोठेपणा, यांचा मेळ कसा घालावयाचा ? नाटकाच्या सुरवातीलाच चाणक्याने आपल्या कारस्थानांची स्वमुखाने कबुली दिली आहे, आणि कांही कारस्थानांची विराधगुप्तानें माहिती दिली आहे. चाणक्याच्या विविध कारस्थानांपैकी कांही केवळ शत्रूला कोंडींत पकडण्यासाठी आहेत, आणि कांही खुनी कारस्थानें आहेत. एका काळचा आपला सहकारी व मित्र पर्वतक याचा विषकन्येकडून करविलेला खून, तपोवनांत जाऊन राहिलेल्या सर्वार्थसिद्धीचा खून, हीं अतिरेकी स्वरूपाचीं उदाहरणें होत. भागुरायणाकडून मलयकेतूला बिथरविणें व त्याला पळून जाण्यास भाग पाडणें, राक्षसानेच विषकन्येकडून पर्वतकाचा खून केला ही बातमी सर्वत्र पसरविणें, भद्रभट इत्यादि आपल्या विश्वासू अधिकाऱ्यांना चंद्रगुप्ताशीं भांडण करण्याचा देखावा करावयास लावून त्यांनी मलयकेतूशीं संधान बांधावयाची युक्ति, भागुरायणाचें कारस्थान व त्याचें मलयकेतूशीं संधान, पर्वतकाचे दागिने हस्तगत करून घेऊन ते राक्षसाच्या ताब्यांत जातील अशी योजना, सिद्धार्थका-कडून बनावट पत्र लिहवून घेऊन त्याच्या द्वारें राक्षस व मलयकेतु यांच्यामध्ये वितुष्ट येईल अशी योजना, इत्यादि कारस्थानें चाणक्याने केलीं हें खरें आहे. त्याचप्रमाणें राक्षसाने केलेलीं कारस्थानें त्याच्यावरच उलटावीं या हेतूनेहि चाणक्याने अनेक कारस्थानें केलीं हेंहि खरें आहे. या कारस्थानांपैकीं कांही कारस्थानें चंद्रगुप्ताच्या राज्याला स्थैर्य यावें यासाठी आवश्यक होतीं. उदाहर-णार्थ, चंद्रगुप्ताचा घात करावा या हेतूने राक्षसाने वेळोवेळीं जे मारेकरी धाडले

---

९०. अये, अयमसावमात्यराक्षसः । येन महात्मना

गुरुभिः कल्पनाक्लेशैर्दीर्घजागरहेतुभिः ।

चिरमायासिता सेना वृषलस्य, मतिश्च मे ।। ( अंक ७, श्लोक ८ )

९१. अमात्यराक्षस, योग्योऽहम्, अयोग्यो भवान्, इति कथमेतत् ?

अश्वैः सार्धमजस्रदत्तकविकाक्षामैरशून्यासनैः

स्नानाहारविहारपानशयनस्वेच्छासुखैर्वर्जितान् ।

माहात्म्यात् तव पौरुषस्य मतिमन् दृप्तारिदर्पच्छिदः

पश्यैतान् परिकल्पनाव्यतिकरप्रोच्छूनवंशान् गजान् ।। (अंक ७, श्लोक १५)

९२. ( सहर्षं शस्त्रमर्पयित्वा ) वृषल, वृषल ! अमात्यराक्षसेनेदानीमनुगृहीतोऽसि । दिष्ट्या वर्धते भवान् । ( अंक ७–५८ )

९३. भद्र, निवेद्यताममात्यराक्षसाय । सोऽयमिदानीं जानीते । ( अंक ७–६१ )

त्यांच्या योजनांचा मोठ्या चातुर्याने अगाऊ छडा लावून चाणक्याने त्या मारेकऱ्यांनाच ठार केलें. आपल्या सम्राटाच्या जिवावरच संकट आणणाऱ्या मारेकऱ्यांच्या खुनी कारस्थानांचा छडा लावून त्या मारेकऱ्यांचें निर्दालन करणें हा चाणक्याचा अपराध होय असें म्हणणें बालिशपणाचें द्योतक ठरेल. आता प्रश्न उरला तो चन्द्रगुप्ताला स्थैर्य प्राप्त झाल्यावर राक्षसाच्या व मलयकेतूच्या बाबतींत चाणक्याने केलेल्या कारस्थानांचा. हीं सारीं कारस्थानें त्याने कां केलीं? राक्षसासारखा बुद्धिमान् व राजकारणांत तरबेज असलेला एकनिष्ठ मुत्सद्दी चन्द्रगुप्ताचा सचिव व्हावा हा हेतु सफल व्हावा यासाठीच चाणक्याने सर्व कारस्थानें केलीं. म्हणजे त्याचा हेतु खरोखरच चांगला होता. त्याने स्वतःच सातव्या अंकाच्या अखेरीस आपल्या मनांतील हा हेतु बोलूनहि दाखविला आहे.[१४] हेतु कितीहि चांगला असला, साध्य कितीहि स्पृहणीय असलें, तरी त्यासाठी आक्षेपार्ह साधनांचा उपयोग करणें उचित होईल काय? अशी यावर कांही लोक शंका उपस्थित करतील. साधनशुचितेचें ध्येय मनांत बाळगणाऱ्या, व साध्यसाधनांचा विवेक करीत बसणाऱ्या, या आक्षेपकांनी ज्या काळांत (खिस्तापूर्वी चवथें शतक.) या घटना घडल्या त्या काळांतील राजकारणी प्रणाली, व त्यांचा प्रत्यक्ष प्रयोग, या गोष्टींची दखल अवश्य घेतली पाहिजे. आजच्या युगांतल्या गांधीवादांतील साधनशुचितेच्या कल्पनेच्या प्रभावाने भारून जाऊन दोन हजार वर्षांपूर्वीच्या घटनांच्या योग्यायोग्यतेविषयीं तडकाफडकी शेरे मारणें बरेंचसें धोक्याचें होईल असा इशारा देणें जरूर आहे. दुसरें असें की, कुटिलमति नसलेला सज्जन राक्षस सुद्धा चन्द्रगुप्ताचा वध करावा यासाठी कसलीं भयंकर कारस्थानें सतत करीत आहे, या गोष्टीचीहि दखल घेणें जरूर आहे. चन्द्रगुप्ताचा खून करण्याच्या इराद्याने त्याने विषकन्येची योजना केली, मिरवणुकींत चन्द्रगुप्ताच्या डोक्यावर कळीची कमान कोसळावी अशी व्यवस्था केली, चन्द्रगुप्ताला विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला, तो झोपला असतां त्याचा खून करण्यासाठी शयनगृहांतील भुयारांत निढावलेले मारेकरी दडवून ठेवले. राक्षसाने केलेल्या या कारस्थानांच्या मानाने चाणक्याने केलेलीं कारस्थाने कांही विशेष भयंकर व आक्षेपार्ह होतीं असें म्हणतां येईल काय? ज्या घराण्यावर राक्षसाने निस्सीम प्रेम केलें त्या घराण्याचें गेलेलें राज्य पुन्हा मिळावें याच हेतूने त्याने सारीं कारस्थानें केलीं.

---

१४. भृत्या भद्रभटादयः, स च तथा लेखः स सिद्धार्थक-
स्तच्चालंकरणत्रयं, स भवतो मित्रं भदन्तः किल।
जीर्णोद्यानगतः स चार्तपुरुषः, क्लेशः स च श्रेष्ठिनः
सर्वोऽसौ वृषलस्य वीर भवता संयोगमिच्छोर्नयः॥ (अंक ७, श्लोक ९)

यांत त्याला कसलाहि वैयक्तिक स्वार्थ साधावयाचा नव्हता. म्हणजे त्याचा हेतु चांगला होता. या हेतूच्या पूर्तीसाठी राक्षसाने जर वाटेल तीं कारस्थानें केलीं, तर चन्द्रगुप्ताच्या राज्याला स्थैर्य यावें यासाठी तसलींच कारस्थानें चाणक्य उलट करणार हें ओघानेच आलें. शिवाय, चाणक्याचीं कांही कारस्थानें तरी राक्षसाशीं मैत्री व्हावी व त्याने चन्द्रगुप्ताचें सचिवपद पत्करावें यासाठीच होतीं. या स्पृहणीय साध्यासाठी त्याने जीं साधनें वापरलीं तीं नीतिशास्त्राच्या कक्षेत वसलीं नाहीत तरी तत्कालीन राजकारणाच्या प्रणालींच्या दृष्टीने त्यांत आक्षेपार्ह असें कांहीही दिसणार नाही. प्राचीन भारतांत काय, अथवा मध्ययुगीन भारतांत काय, किंवा युरोपांत काय, व्यावहारिक राजकारण नीतिशास्त्रावर आधारलेलें होतें असें दिसत नाही. आधुनिक युरोपांतील घटना तर अगदी ताज्या आहेत. या साऱ्या गोष्टींचा विचार केला असतां, साधनशुचितेकडे लक्ष दिलें नाही असा आक्षेप चाणक्याच्या राजकारणावर घेणें ही गोष्ट भावनेच्या दृष्टीने गोड वाटली तरी व्यवहारी राजकारणाच्या दृष्टीने तिला विशेष किंमत देण्याचें कांही कारण नाही.

## विशाखदत्ताचें रचनाचातुर्य

रासक्षाने चन्द्रगुप्ताच्या तरवारीचा स्वीकार केला—म्हणजेच त्याचें सचिवपद पत्करण्याचें मान्य केलें—या घटनेवर समाप्तीचा पडदा पडतो. ही घटना साध्य व्हावी याच एका दृष्टीने नाटकांतील साऱ्या घटना घडलेल्या आहेत. चंदनदासाने राक्षसासाठी केलेल्या अलौकिक त्यागाचें प्रत्यंतर मिळतांच राक्षसाला वश कसें करावयाचें याच्या योजनेचा सारा तपशील चाणक्याच्या मनांत तयार झाला. आणि यापुढे प्रत्येक तपशील त्याच्या योजनेप्रमाणें पार पडला आहे. विविध योजनांची आखणी पहिल्या अंकांत झाली आहे, आणि त्यांचा प्रभाव चवथ्या अंकापासून दिसूं लागला आहे. चवथ्या अंकापासून शेवटच्या प्रवेशापर्यंत ज्या महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत, त्यांच्यापैकीं प्रत्येक घटनेचा साक्षात् संबंध पहिल्या अंकाशीं आहे. भागुरायणाने मलयकेतूशीं युक्तीने संगनमत केलें, मलयकेतूने त्याला आपला अमात्य केलें, आणि भागुरायणाने केलेल्या अनेक भानगडींमुळे चवथ्या अंकापासून मलयकेतु सापळ्यांत अधिकाधिक गुंतूं लागला आहे. भद्रभट इत्यादि जे अधिकारी चन्द्रगुप्ताशीं भांडल्याचा देखावा करून पळून गेले व मलयकेतूला मिळाले, त्यांनी पांचव्या व सहाव्या अंकाच्या दरम्यान मलयकेतूला पकडलें आहे. शकटदासाकडून जें बनावट पत्र चाणक्याने पहिल्या अंकांत लिहवून घेतलें आहे, त्याचा प्रभाव पांचव्या अंकांत दिसतो, आणि मलयकेतु या पत्रांत उल्लेखिलेल्या पांच राजांचा

क्रूरपणें वध करतो. पर्वतकाचे दागिने पहिल्या अंकांत चाणक्याच्या ताब्यांत येतात. या दागिन्यांमुळे पांचव्या अंकांत राक्षस गोत्यांत येतो. राक्षसाची मुद्रा पहिल्या अंकांत सिद्धार्थकाकडून चाणक्याच्या हातीं येते. या मुद्रेचा प्रभाव पांचव्या अंकांत दिसून आला आहे. तात्पर्य, पहिल्या अंकांत धाग्याचें एक टोक आहे, आणि त्याचें दुसरें टोक चार ते सात या अंकांपैकीं कोणत्या तरी अंकांत आढळेल.

चन्द्रगुप्ताच्या नाशासाठी राक्षसानें जीं जीं कारस्थानें केलीं त्या साऱ्यांचा बीमोड चाणक्यानें करून टाकला व यामुळे राक्षस कमालीचा निराश झाला. ही गोष्ट दुसऱ्या अंकाच्या अखेरीस आपल्याला कळली आहे. राक्षसावर मात करण्याचें कार्य या ठिकाणीं पूर्ण झालें असल्यामुळे नाटक एका अर्थानें संपलें आहे. पण राक्षसावर नुसती मात करून सैन्याच्या बळावर त्याला पकडणें हा चाणक्याचा हेतु नाही.

सर्व बाजूंनी अपयश आल्यामुळे चन्द्रगुप्तावर स्वारी करण्याचा बेत राक्षसानें सोडून द्यावा हें चाणक्याच्या धोरणाच्या दृष्टीनें बरोबर होणार नाही. त्याला राक्षसाला वश करून घ्यावयाचें आहे. यासाठी चन्द्रगुप्तावर स्वारी करण्यास राक्षसाला प्रोत्साहन मिळावें अशीच योजना चाणक्यानें केली आहे. चन्द्रगुप्त व चाणक्य यांच्यामध्ये भयंकर वितुष्ट आलें आहे अशी बातमी राक्षसाला कळावी, व या वितुष्टाचा फायदा घेऊन एकट्या चन्द्रगुप्ताचा विनाश सहज करतां येईल असा विचार राक्षसाच्या मनांत प्रबळ व्हावा या हेतूनें चाणक्यानें चन्द्रगुप्ताशीं भांडणाचें नाटक केलें आहे. या नाटकाचा परिणाम चाणक्याच्या अपेक्षेप्रमाणेंच घडून आला व चन्द्रगुप्तावर स्वारी करण्याचा राक्षसाचा निर्णय पक्का झाला. चन्द्रगुप्त व चाणक्य यांच्या कलहाचें हें नाटक तिसऱ्या अंकांत घडलें आहे. आणि पहिल्या अंकांत चाणक्यानें ज्या कारस्थानाच्या योजना आखल्या आहेत त्यांचा प्रभाव चवथ्या अंकापासून दिसून येऊं लागला आहे. तिसऱ्या अंकांतील कृतककलहाचें प्रकरण झालें नसतें तर कदाचित् राक्षसानें इतक्या तातडीनें चन्द्रगुप्तावर स्वारी करण्याचा मनसुबा रचलाहि नसता. आणि राक्षस स्वारीच्या बाबतींत उदासीन राहिला असता तर पहिल्या अंकांत ज्या कारस्थानांचा आराखडा चाणक्यानें तयार केला आहे तीं कारस्थानें सफळ होण्याच्या दृष्टीनें फारच मोठा व्यत्यय आला असता; व राक्षसाला वश करण्याचा चाणक्याचा बेत लांबणीवर पडला असता, किंवा त्या बाबतींत कदाचित् चाणक्याची निराशाहि झाली असती. ही निराशा पदरीं येऊं नये

यासाठींच चाणक्याला इतक्या तातडीनें चन्द्रगुप्ताशीं भांडणाचें नाटक करणें भाग पडलें आहे.

## नाट्यात्मकतेचा प्रकर्ष

कृतककलहाचा हा प्रसंग कमालीचा नाट्यपूर्ण आहे. पण नाट्यात्मकतेच्या प्रकर्षानें ज्यांच्यामध्यें उत्कटतेची परिसीमा गाठली आहे, अशा कितीतरी घटना प्रस्तुत नाटकामध्यें आढळतील. पहिल्या अंकांतील चाणक्य व चंदनदास यांचा मुकाबला व चंदनदासाचा लोकोत्तर त्याग हें नाट्यात्मकतेचें उत्कृष्ट उदाहरण आहे. चवथ्या अंकांत राक्षस आपल्या घरांत करभकाशीं एकान्तांत बोलत बसलेला असतांना मलयकेतु बाहेर उभा राहून त्या दोघांचें बोलणें ऐकतो व भागुरायण मलयकेतूच्या मनांत मोठ्या कौशल्यानें किल्मिष उत्पन्न करतो. याहि प्रसंगांत नाट्यात्मकता ओतप्रोत भरलेली आहे. मलयकेतूची व राक्षसाची लगेच जी भेट झाली तीहि नाट्यपूर्ण आहे. पांचव्या अंकांत नाट्यपूर्ण प्रसंगांची रेलचेल आहे. क्षपणक जीवसिद्धि भागुरायणाशीं बोलत असतां मलयकेतु आड उभा राहून ऐकतो, आणि राक्षसानें विषकन्या पाठवून पर्वतकाचा खून करविला हें वृत्त जीवसिद्धीकडून ऐकतांच त्याला भयंकर धक्का बसतो. हा साराच प्रसंग नाटककारानें पहिल्या प्रतीच्या कौशल्यानें रंगविला आहे. पहिल्या अंकांत शकटदासानें लिहिलेलें बनावट पत्र सिद्धार्थकाकडून हिसकावून घेण्यांत येतें, मलयकेतु तें पत्र वाचतो, राक्षसाला बोलावून घेण्यांत येतें व तें पत्र व मलयकेतूचे दागिने राक्षसाला दाखविण्यांत येतात, आणि मलयकेतु व भागुरायण त्याची उलटतपासणी करतात. हा सारा प्रसंग म्हणजे नाट्यपूर्णतेची परिसीमा आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. साराच पांचवा अंक नाट्यपूर्ण झालेला आहे. कौलूत चित्रवर्मा इत्यादि पांच राजांचा क्रूरपणें वध करण्याचा जो हुकूम देतो त्यानें या नाट्यपूर्णतेवर कळस चढविला आहे. सातव्या अंकाच्या शेवटीं राक्षस आणि चाणक्य व चंद्रगुप्त यांच्या भेटीचा प्रसंग हें नाट्यपूर्णतेचें आणखी एक चांगलें उदाहरण आहे. एक 'मृच्छकटिक' नाटक सोडून दिलें तर कमालीच्या नाट्यपूर्ण घटनांनीं प्रेक्षकांना सतत झुलवीत ठेवणारें मुद्राराक्षसासारखें नाटक संस्कृत नाट्यसृष्टींत दुसरें आढळावयाचें नाहीं.

## नाट्यात्मकतेला अनुरूप शैली

या नाट्यात्मकतेला सर्वस्वीं अनुरूप अशाच शैलीची योजना करण्यांत विशाखदत्तानें जें यश मिळविलें आहे तें खरोखर अलौकिक आहे. संवाद किती आकर्षक व खटकेबाज असूं शकतात हें पाहावयाचें असेल तर मुद्राराक्षसाचा

कोणताहि अंक वाचावा. विशेषतः चाणक्य व चंदनदासाच्या भेटीचा पहिल्या अंकांतील प्रसंग, सबंध तिसरा अंक, सबंध पांचवा अंक, हीं शैलीचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. शब्द नुसते लाह्यासारखे उडत आहेत असा भास होतो; एकहि वाक्य अस्थानीं नाही, किंबहुना एकहि शब्द अस्थानीं नाही. सहाव्या अंकाच्या सुरवातीला असलेला राक्षसाचा भावनाविष्कार अतिशय हृदयस्पर्शी उतरला आहे. या प्रसंगांतील काव्यात्मकता वरच्या प्रतीची आहे. आणि या काव्यात्मकतेला साजून दिसेल अशीच शब्दयोजना साधलेली आहे. वृत्तांची योजना, भावनाविष्कार, कल्पनाचित्रें व शब्दयोजना या दृष्टींनी कांही श्लोक विशेष उल्लेखनीय [९५] असले तरी विशाखदत्ताचें खरें कर्तृत्व गद्य संवादांतच दिसून येतें. आणि या बाबतींत त्याच्यावर मात करणारा नाटककार शोधावाच लागेल. विशाखदत्ताचें या बाबतींतील कौशल्य इतकें अप्रतिम आहे की दुसऱ्या अंकांतील विराधगुप्ताचें लांबलचक निवेदन, आणि तिसऱ्या अंकांतील राजनीतींतील गहन सिद्धान्तांची तपशीलवार चर्चा, यांनाहि कांही निराळीच लज्जत आली आहे.

---

९५. उदाहरणार्थ, १·१२, १·१४, १·२७, २·४, २·५, २·६, २·७, २·१३, २·१४, २·१६, २·१८, ३·२, ३·५, ३·६, ३·१०, ३·१४, ३·१६, ३·१७, ३·१९, ३·२२, ३·२४, ३·२७, ३·२८, ३·३०, ४·२, ४·१६, ४·१७, ४·२२, ५·३, ५·४, ५·७, ५·१८, ५·२०, ५·२१, ५·२३, ५·२४, ६·५, ६·६, ६·९, ६·१०, ६·११, ६·१७, ७·४, ७·५, ७·६, ७·१०, ७·१३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम ........................ विः

क्रमांक ........................ नोंः

REFBK-0009771

मराठी ग्रंथ संग्रहालय

दा. क. ९०५१

ठाणे